सत्य घटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे. विशेष संदर्भ : प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

आधुनिकशास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्याशाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधक
नितीन वामन सोनावणे
पीआरएन : ०३३१३००७६०५

मार्गदर्शक
डॉ. भारतकुमार राऊत
पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

फेब्रुवारी–२०२१

प्रतिज्ञापत्र

मी, श्री. नितीन वामन सोनावणे, प्रतिज्ञापूर्वक नमुद करतो की, सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे. विशेष संदर्भः प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र या विषयातील प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापण विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी सादर करीत आहे. या प्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केलेली आहे. त्या माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्य कोठेही उपयोग केलेला नाही अथवा प्रकाशित केलेला नाही.

स्थळ: मुंबई

संशोधक

दिनांक : फेब्रुवारी २०२१

नितीन वामन सोनावणे

मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते, की टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयांतर्गत विद्यावाचस्पती (पीएच.डी) या पदवीसाठी **सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे. विशेष संदर्भः प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र** हा शोध प्रबंध सादर करण्यात आला आहे. हा शोध प्रबंध श्री. नितीन वामन सोनावणे यांनी माझ्या मागदर्शनाखाली पूर्ण केला असून, संबंधित संशोधन कार्य त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवी या परीक्षेकरिता वापरलेले नाही. सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने माझ्या माहितीप्रमाणे सत्य आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यु.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर शोधप्रबंधाचे काम केलेले आहे.

स्थळ: मुंबई

मार्गदर्शक

दिनांक : फेब्रुवारी २०२१

डॉ. भारतकुमार राऊत

Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune

Undertaking

(For Ph.D. Students)

1. I **NITIN WAMAN SONAWANE** (Full Name), have registered my name for the Ph.D. Course in **JOURNALISM & MASS COMMUNICATION** in the year **FEBRUARY 2014**
2. The undertaken research is entitled as : सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे.विशेष संदर्भः प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र
3. I have gone through extensive review of literature of the related published / unpublished research works and the use of such references made have been acknowledged in my thesis.
4. The title and the content of research is original.
5. I understand that, in case of any complaint especially plagiarism, regarding my Ph.D. research from any party, I have to go through the enquiry procedure as decided by the Vidyapeeth at any point of time.
6. I understand that, if my Ph.D. thesis (or part of it) is found duplicate at any point of time, my research degree will be withdrawn and in such circumstances, I will be solely responsible and liable for any consequences arises thereby. I will not hold the TMV, Pune responsible and liable in any case.

   I have signed the above undertaking after reading carefully and knowing all the aspects therein.

Signature :

Address : Flat no 202, Devrai CHSL, Charkop Sector- 6, Ambemata Mandir Road, Kandivali West, Mumbai - 400067.

Ph. No. : 9820350957 email : nitinson@gmail.com

Date : February, 2021 Place : Mumbai

ऋणनिर्देश

''सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे. विशेष संदर्भः प्रकाशचित्रणातून दहा लोककलाकारांचे जीवनचरित्र''

या विषयात संशोधन करण्यासाठी मला माझे सर्वच लोककलाकार व त्यांचा मित्र परिवार, वृत्तपत्र छायाचित्रकर, विविध क्षेत्रातील छायाचित्रकार, चित्रकार, शिल्पकार, पत्रकार, लोककलाकार, विविध वृत्तसंस्था, लोककला समीक्षक, लोककला अभ्यासक, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, लेखक, नाटककार, चित्रपट निर्माते, विविध क्षेत्रातील मान्यवर व तज्ज्ञ या सर्वांनीच मला मदत केली. त्यांचे शाब्दिक ऋण व्यक्त करणे हे मी माझे आद्य कर्तव्य समजतो.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी सुरुवातीलाच माझ्या प्रबंधाचा विषय निवडण्यासाठी व प्रबंधाचा आराखडा तयार करण्यासाठी मला मदत केली तसेच वेळोवेळी मार्गदर्शन केले. म्हणून त्यांचा मी आभारी आहे. माझा हा संशोधांनाचा अवघड विषय ज्यांच्या मुळे मार्गी लागला व माझा प्रबंध पूर्णत्वास नेण्यापर्यंतचा प्रवास ज्यांच्यामुळे सुखकर झाला ते माझे मार्गदर्शक डॉ. भारतकुमार राऊत सर यांच्या ऋणात राहायलाच मला आवडेल. तसेच वेळोवेळी मला मार्गदर्शन करणारे डॉ. विवेक पाटकर सर यांनी मला जे मोलाचे मार्गदर्शन केले त्यामुळेच मी माझा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांच्याही ऋणात राहणे मला आवडेल. माझा प्रबंध शेवटच्या टप्प्यात असताना आपला वेळात वेळ काढून डॉ. सुभाष पवार सर यांनी मला प्रबंधात जे मोलाचे बदल सुचवले व माझ्या प्रबंधला योग्य दिशा दिली, त्यांचा ही मी ऋणी आहे.

हे संशोधन ज्यांच्या सहकार्यामुळेच पूर्ण होऊ शकले असे दहा लोककलाकार:

१. भारुड सादरकर्त्या मीराबाई उमप

२. पारंपारिक गोंधळी राधाकृष्ण कदम (स्वर्गवासी)

३. शाहीर देवानंद माळी

४. वारीनृत्य व घागरनृत्य सादरकर्ते राजू बाबा शेख (स्वर्गवासी)

५. सोंगी भारुड सादरकर्ते निरंजन भाकरे

६. लोकशाहीर विठ्ठल उमप (स्वर्गवासी)

७. जुन्या महिला शाहीर अंबुदेवी बुधगावकर (स्वर्गवासी)

८. सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज

९. शाहीर बापूराव विभूते (स्वर्गवासी)

१०. पखवाज वादक उद्धवबापू शिंदे (आपेगावकर)

या सर्वांनी व त्यांच्या मित्र–परिवारांनी जवळपास १७ वर्षाचा अमूल्य वेळ मला त्यांच्या सोबत घालवण्याची अनमोल संधी दिली, यांच्याशिवाय माझा हा प्रबंध पूर्णच होऊ शकला नसता. तसेच माझ्या द इकॉनॉमिक टाइम्स मधील सहकार्यांनी मला हे संशोधन पूर्ण करण्यासाठी वेळेची मुभा दिली व वेळोवेळी मला प्रोत्साहन दिले. अशा सर्वांचाच मी ऋणी आहे.

संशोधनासाठी १५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. ही प्रश्नावली महाराष्ट्रातील ६०० लोकांकडे पाठवण्यात आली. त्या प्रश्नावलीद्वारे या विषया संदर्भात बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला. याद्वारे संशोधनाला एक दिशा मिळाली व जनमानसांची मते जाणून घेता आली. या आधारे ठोस निष्कर्ष काढण्यात देखील प्रश्नावलीची फारच मोठ्या प्रमाणात मदत झाली. या प्रश्नावली शिवाय हे संशोधन अपुरे राहिले असते. अशा या सर्व ६०० लोकांचा मी आभारी आहे.

प्रशांत नाकवे, नितीन दादरावाला, प्रदीप बांदेकर, राजू राऊत, संदेश भंडारे, गणेश चंदनशिवे, श्रीराम वेर्णेकर, मुकेश पार्पियानी, डॉ. नरेंद्र बोरलेपवार, डॉ. प्रकाश खांडगे, तेजस्विनी चव्हाण, मुकुंद गोविंद कुळे, भारत दिगंबर कदम, श्रीनिवास अकेला, प्रज्ञा उद्धवराव शिंदे (आपेगांवकर), अरुण यशवंत सोनवणे, नितीन शांताराम चव्हाण, मनोज कैलासचंद्र मेहता, माधव शिरवळकर, राजेश सखाराम मडाओ, डॉ. विश्वास पोपट मोरे, रामदास दिगंबर कदम, ओंकार सिंघ प्लाहा, विक्रांत पाटील, फैयाज खान, प्रतिश सर्जेराव गायकवाड, श्रीकांत लक्ष्मण कांबळे, रमेश रामचंद्र वर्तक, सीमा सोनावणे, हरिष ज्ञानू यमगर, सुरेखा नायर, सी. आर. बालासुब्रमणीयम, श्रीनिवास अनंत बेलसरे, संतोष जगधने, सुधीर वाघ, अक्षय भगत, संजय बळीराम जगताप, पुष्कर गायकवाड, वर्षा जोशी पाटील, सुहास चंद्रकांत रेळेकर,

महादेव गोविंद जेकटे, संजय गणपत परब, रवींद्र पुणतांबेकर, नितीन कीर, संजय पटवर्धन, शीतल संदीप मिरके, सतीश म. शिंदे, राहुल अंकुशराव पांचाळ, डॉ. रासगे गंगाधर बापू, सुलभा सुभाष कदम, जितेंद्र रामचंद्र चव्हाण, सुयोग हेमंत पवार, संतोष खरटमोल, नवनाथ गिलबिले, प्रथमेश तांबे, अक्षता वीरकर, सुशिल स. म्हाडगुत, रामचंद्र संतुराम कर्णिक, विवेक सुरेश भोर, शैलेंद्र मांढरे, शंकर चांगदेव मोरे, संग्राम मुक्ता संतराम सावंत, प्रथमेश श्रीकृष्ण प्रभूते डोलकर, विजय देवचंद झनके, हरिप्रसाद विजयकुमार गाडेकर, जितेंद्र किशोर पगारे, रविंद्र वसंत कांबळे, विजय सिताराम गुरव.

वरील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व मान्यवर यांचा देखील मी ऋणी आहे.

कमलाकर सोनटक्के सर, अशोक हांडे यांनी मला त्यांच्या कार्यक्रमात लोककलकरांचे फोटो काढण्याची परवानगी दिली त्याकरता मी त्यांचा आभारी आहे.

अक्षर जुळवणी करणारे माझे मित्र विवेक भोर, प्रशांत कदम व आनंद डोंगरे यांना मी धन्यवाद देतो. तसेच कमलेश देवरुखकर यांनी माझा अंतिम प्रबंध तपासून त्यातलं व्याकरण तपासले. त्यांचाही मी आभारी आहे.

माझे हे संशोधनाचे स्वप्न प्रत्येक्षात आणण्यासाठी माझ्या कुटुंबातील सर्वांनीच मला मदत केली. तसेच माझे मित्र–मैत्रिणी यांनी देखील त्यांचा अमूल्य वेळ माझ्या संशोधांनासाठी दिला या सर्वांचाच मी आभारी आहे.

हे संशोधन पूर्ण करण्यासाठी सहभागी झालेले सर्व घटक, ज्यामुळे माझ्या संशोधनाची वाट सुसह्य झाली. त्या ज्ञात आणि अज्ञात सर्वच व्यक्तींबद्दल मनःपूर्वक ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो.

संशोधक

नितिन वामन सोनावणे

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पान क्रमांक
I	शीर्षक	
II	प्रतिज्ञापत्र	
III	मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र	
IV	ऋणनिर्देश	
V	अनुक्रमाणिका	
प्रकरण पहिले	**संशोधन विषयाची ओळख**	१–१५
१.१	प्रस्तावना	३
१.२	प्रकाशचित्रण कलेचा प्रवास	६
१.३	हे सर्व प्रकाशचित्रणातूनच का ?	८
१.४	संशोधन विषय व त्याचे महत्व	९
१.५	प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले दहा लोककलाकार	१०
१.६	संशोधनाची आवश्यकता	१०
१.७	हे सर्व करताना संशोधकाला काही समस्या उद्‌भवल्या व त्यातून काढलेला मार्ग	१२
१.८	संशोधनाची उद्दिष्टे	१३
१.९	गृहितकृत्ये	१४
१.१०	या संशोधनाची व्याप्ती आणि सीमा	१४
१.११	वापरलेली साधन–यंत्र–सामग्री	१५
१.१२	संशोधनावर काम करायला दिलेला वेळ	१५

प्रकरण दुसरे	**अ : भारत देशात कलांचा उगम, महाराष्ट्रातील लोककलांचा आढावा, काही प्रबंधांचा आढावा विविध साहित्यांच्या माध्यमातून.**	१६–२७
	ब : प्रकाशचित्रांचा जगावर होणारा परिणाम व चित्रपट, माहितीपट, लघुपट यांचा आढावा	२८–१०८
	क : संशोधन पध्दती	१०९–११५
प्रकरण तिसरे	**लोककलाकारांचा जीवनप्रवास आणि त्यांची भेट**	११६–३३०
३.	प्रस्तावना	११९
३.१	**घटकाभ्यास क्रमांक : १ (केस स्टडी) : मीरा उमप**	
३.१.१	मीराबाई उपम यांचा जीवन प्रवास	१२०
३.१.२	मीराबाई उपम यांची भेट	११५
३.२	**घटकाभ्यास क्रमांक : २ राधाकृष्ण कदम**	
३.२.१	राधाकृष्ण कदम यांची जीवन प्रवास	१३७
३.२.२	राधाकृष्ण कदम यांची भेट	१४३
३.३	**घटकाभ्यास क्रमांक : ३ देवानंद माळी**	
३.३.१	देवानंद माळी यांचा जीवन प्रवास	१५३
३.३.२	देवानंद माळी यांची भेट	१६०
३.४	**घटकाभ्यास क्रमांक : ४ राजू बाबा शेख**	
३.४.१	राजू बाबा शेख यांचा जीवन प्रवास	१६८
३.४.२	राजू बाबा शेख यांची भेट	१७६
३.५	**घटकाभ्यास क्रमांक : ५ निरंजन भाकरे**	
३.५.१	निरंजन भाके यांचा जीवन प्रवास	१९३

३.५.२	निरंजन भाकरे यांची भेट	२०४
३.६.	**घटकाभ्यास क्रमांक : ६ विठ्ठल उमप**	
३.६.१	विठ्ठल उमप यांचा जीवन प्रवास	२१७
३.६.२	विठ्ठल उमप यांची भेट	२३०
३.७	**घटकाभ्यास क्रमांक : ७ अंबुदेवी बुधगावकर**	
३.७.१	अंबुदेवी बुधगावकर यांचा जीवनप्रवास	२४९
३.७.२	अंबुदेवी बुधगावकर यांची भेट	२५३
३.८	**घटकाभ्यास क्रमांक : ८ सत्यपाल विश्वनाथ चिंचोलकर**	
३.८.१	सत्यपाल विश्वनाथ चिंचोलकर यांचा जीवन प्रवास	२५८
३.८.२	सत्यपाल विश्वनाथ चिंचोलकर यांची भेट	२७०
३.९	**घटकाभ्यास क्रमांक : ९ शाहीर बापूराव विभूते**	
३.९.१	शाहीर बापूराव विभूतेंचा जीवन प्रवास	२८६
३.९.२	शाहीर बापूराव विभूते यांची भेट	२९७
३.१०	**घटकाभ्यास क्रमांक : १० उध्दव शिंदे**	
३.१०.१	उध्दवजी शिंदे यांचा जीवन प्रवास	३०६
३.१०.२	उध्दवजी शिंदे यांची भेट	३१९
प्रकरण चौथे	**संशोधनाच्या अभ्यासातून प्राप्त झालेले ज्ञान, त्याचे संकलन व पृथक्करण**	३३१–३६६
४.१	परिचय	३३३
४.२	माहिती गोळा करणे व त्याचे पृथक्करण	३३३
४.२.१	तथ्यांचा अर्थ	३३३
४.२.२	मुलाखत	३३४
४.२.३	प्रश्नावली	३३५

४.३	सर्वेक्षणातील माहितीचे विश्लेषण	३३५
४.३.१	तक्ता १ : सर्वेक्षणातील महिला–पुरुष	३३७
४.३.२	सर्व्हेतील सारणी क्रमांक २	३३७
४.३.३	आलेखाचे अर्थनिर्वेचन	३४२
४.४	प्रबंधाची उद्दिष्टे आणि पूर्तता	३६२
४.५	गृहितके पडताळणी	३६५
प्रकरण पाचवे	**निष्कर्ष, शिफारशी व भविष्यवेध**	३६८–३७३
५.१	निष्कर्ष :	३६९
५.२	शिफारशी	३७०
५.३	भविष्यवेध	३७३
VII	संदर्भ सूची	३७४–३८१
VIII	परिशिष्ट	३८२–३८४

प्रकरण : १

संशोधन विषयाची ओळख

अनुक्रमणिका

१.१ प्रस्तावना

१.२ प्रकाशचित्रण कलेचा प्रवास

१.३ हे सर्व प्रकाशचित्रणातूनच का?

१.४ संशोधन विषय व त्याचे महत्त्व

१.५ प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले दहा लोककलाकार

१.६ संशोधनाची आवश्यकता

१.७ हे सर्व करताना संशोधकाला काही समस्या उद्भवल्या व त्यातून काढलेला मार्ग

१.८ संशोधनाची उद्दिष्टे

१.९ गृहितकृत्ये

१.१० या संशोधनाची व्याप्ती आणि सीमा

१.११ वापरलेली साधन–यंत्र–सामग्री

१.१२ संशोधनावर काम करायला दिलेला वेळ

१.१ प्रस्तावना

महाराष्ट्रात असंख्य प्रकारचे प्रयोगात्मक लोककला प्रकार पाहावयास मिळतात. भौगोलिकतेनुसार महाराष्ट्राचे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण असे प्रादेशिक विभाग पडलेले आहेत. परंतु या प्रादेशिक भेदांमुळेच महाराष्ट्र राज्यातील लोककलांमध्ये विविधताही आली आहे. उदाहरणार्थ कोकणात नमन–खेळे, दशावतार हे लोककला प्रकार पाहायला मिळतात. पश्चिम महाराष्ट्रात तमाशा, गोंधळ, जागरण यांसारखे लोककलाप्रकार अधिक रुळलेले आढळतात. विदर्भात दंडार, खडी गंमत हे लोककला प्रकार पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे मराठवाड्यात तखतरावचा तमाशा, भारूड हे लोककला प्रकार अधिक रूढ झालेले दिसतात. याशिवाय वासुदेव, गोंधळी, वाघ्या–मुरळी, कुडमुडे ज्योतिषी अशा भटक्या समुहांच्याही अनेक लोककला महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. फक्त त्यांच्या सादरीकरणात प्रादेशिकतेनुसार फरक झालेला आढळतो.

प्रादेशिकतेमुळे लोककलांच्या सादरीकरणात बदल होत असला तरी, त्या त्या लोककलेचे मूळ स्वरूप सर्वत्र सारखेच असते. उदाहरणार्थ गोंधळ, जागरण, भारूड संपूर्ण महाराष्ट्रात सादर केले जाते. या लोककलांचा मूळ आकृतिबंध सर्वत्र सारखाच असतो, परंतु सादरीकरणात मात्र प्रादेशिकतेनुसार बदल झालेला दिसतो. तसेच महाराष्ट्रात विविध लोककला सादर केल्या जात असल्या तरी प्रत्येक लोककलेच्या सादरीकरणाचा हेतू मात्र वेगळा असतो.

सर्वसाधारणपणे ग्रामीण जीवनातील कलांसाठी लोककला ही संज्ञा वापरली जाते. ग्रामीण लोकसमूहांचे दैनंदिन जीवनाशी संबंधित, परंतु कलात्मक आविष्कार लोककला म्हणून ओळखले जातात.

भारतीय संस्कृतीत सर्व कलांना मानाचे स्थान आहे. संगीत, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि साहित्य या पाच कला मुख्यतः ललितकला म्हणून ओळखल्या जातात. तसेच या पाच कला शास्त्राधिष्ठित असल्यामुळे त्यांना शास्त्रीय कलाही म्हटले जाते. मात्र या कलांव्यतिरिक्त भारतात इतरही अनेक कला विकसित झालेल्या आहेत, ज्या प्रामुख्याने परंपरेने चालत आलेल्या आहेत. परंपरेने चालत आलेल्या कलांनाच लोककला असे म्हटले जाते. कारण तिथे आविष्कार फक्त एका व्यक्तीचा नसतो, तर पूर्ण लोकसमुहाचा असतो. अर्थात शास्त्रीय काय किंवा लोक काय कुठलीही कला ही मानवनिर्मित असते. म्हणूनच लोककलाही

मानवनिर्मित आहेत, फक्त त्यांच्यामागे समूह–मनाची प्रेरणा असते. त्या कला लोकांच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहेत.

''स्त्रियांची जात्यावरची ओवीगीते, कांडपगीते, बाळाला जोजवण्याची गीते किंवा सणासुदीची क्रीडानृत्ये आणि तत्संबद्ध गीते, उत्सवातील नृत्यनाट्य, देवतोपासनेचा अविभाज्य भाग म्हणून केली जाणारी विधी–विधाने, विधीचा भाग म्हणून काढली जाणारी चित्रे, घडवली जाणारी शिल्पे, रांगोळ्या, मूर्तीकरण या सर्व कला पारंपरिक लोकजीवनाचा अविभाज्य घटक असतात. सर्व कला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला आपोआपच अनायासे मिळत असतात. शिवाय प्रत्येक पिढी व प्रत्येक व्यक्ती त्यात आपापल्या प्रकृतीपिंडानुसार आणि बदलत्या पर्यावरणानुसार भर–घटही करीत असतात. त्यामुळे लोककलेमध्ये परंपरा व परिवर्तन यांचा मेळ सतत असतो. त्या जुन्या असूनही नित्य नव्या असतात. प्राकृतिक मुक्तता व उत्स्फूर्तता व लवचिकता हे लोककलांचे अंगभूत वैशिष्ट्य असते. त्यामुळेच लोककलांचा आविष्कार सदैव ताजा व जिवंत असतो. या कलांचे स्वरूप स्वतः आनंद घेणे व इतरांना आनंद देणे असे असते.''[१]

परंपरेने हा सर्व ठेवा जतन होणे आवश्यक आहे. नवीन पिढीपर्यंत लोककला पोहोचवण्यासाठी त्या कलेविषयीचा सविस्तर अभ्यास करून ती आहे त्या स्वरूपात जतन करण्यासाठी वेगवेगळी माध्यमे वापरून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवी. त्यासाठी लोककलांचे लेखन, दृक–श्राव्य, तसेच प्रकाशचित्रण यांसारख्या माध्यमातून या लोककलांचे दस्तावेजीकरण व्हायला हवे आणि हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवूनच संशोधकाने सन २००३ पासून या कामाला सुरुवात केली आहे. २००३ मध्ये मुंबईतील मुलुंड येथे 'कला जत्रा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये राजूबाबा शेख यांचे घागरनृत्याचा कार्यक्रम होता. याच कार्यक्रमात विठ्ठल उमप यांनी पोवाडा सादर केला होता. त्यांच्या भारदस्त आवाजाने आणि सादरीकरणानेही दीपून जायला झाले. या दोन दिग्गज कलाकारांचे कलाप्रकार त्यावेळी संशोधकाने कॅमेऱ्यात बंदिस्त केले आणि तिथेच या लोककलाकारांचे जीवनचरित्र प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून लोकांसमोर आणावे, असे त्याला सुचेल.

त्यानुसार वेगवेगळ्या लोककलाकारांना भेटून त्यांची प्रकाशचित्रे काढायला सुरुवात केली. अभ्यासाचा विषय आटोपशीर राहावा यासाठी केवळ दहा लोककलाकारांची निवड या संशोधनाच्या अभ्यासासाठी त्याने केली. दहा लोककलाकारांचे जीवन चरित्र प्रकाशचित्रणातून मांडण्याचे ठरवले. त्या कलाकारांसोबत त्यांच्या कार्यक्रमस्थळी जाऊन, त्यांच्या घरी राहून, ते जेथे जेथे जातात तेथे त्यांच्यासोबत तो फिरला आणि त्यांची प्रकाशचित्रे काढली. पुढे त्या सर्व लोककलावंतांच्या चलचित्र (व्हिडिओ) कॅमेऱ्याने मुलाखती देखील घेतल्या. अशा तऱ्हेने एकेक कलाकारासोबत मागील सोळा वर्षांत साधारणपणे पन्नास ते साठ वेळा संशोधक फिरला. त्याने त्यांच्या जीवनातले वेगवेगळे क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त केले आहेत. प्रकाशचित्रणाचा एवढा ऐवज जमल्यावरच पुढे २०१४ मध्ये संशोधनासाठी त्याने हा विषय निवडला. कारण त्याला या लोककलाकारांचे सत्य जगापुढे आणायचे होते. त्यांनी जे काही भोगले ते इतरांना भोगायला लागू नये, तसेच या लोककलाकारांनी त्यांची ही लोककला पुढे घेऊन जावी व प्रकाशचित्रणकलेने ती कला जतन व्हावी, असा हेतू यामागे संशोधकाचा होता.

लोककलावंतांनी आजवर त्यांच्या कलेद्वारे समाज प्रबोधन केले. क्षणभर का होईना, समाजाला त्यांचे दुःख विसरायला भाग पाडले. स्वतःच्या दुःखाची पर्वा न करता त्यांनी समाजाला हसवले. त्याच्या कॅमेऱ्याने हे सर्व अनुभवले आहे व ते प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून जतन केलेले आहे. लेखणीच्या माध्यमातूनदेखील वेळोवेळी त्याने या लोककलाकारांवर लिखाण केले व त्यांची लोककला समाजातील लोकांपर्यंत पोहोचवली. तसेच सामाजिक माध्यमांचा म्हणजेच फेसबुक, इंस्टाग्राम, युट्युबचा उपयोग करून या लोककला–कलावंताना जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचा प्रयत्न संशोधकाने केला. इतकेच नाही तर पुढे जाऊन १८ मे २०१८ रोजी स्वतःच्या कामाची ३००० फोटोंची एक वेबसाईट तयार केली. या वेबसाईटवर त्या लोककलाकारांची काही छायाचित्रे टाकून त्यांना जगासमोर आणले. मागील अडीच वर्षात ही वेबसाईट सुमारे १२००० लोकांनी पाहिली. त्या वेबसाईटचा पत्ता आहे:

www.nitinsonawane.com

महाराष्ट्रात लोककला विविध असल्या आणि त्या सादर करणारे कलावंतही संख्येने भरपूर असले तरी महाराष्ट्रात या कला व त्या सादर करणाऱ्या कलावंतांचे म्हणावे तसे दस्तावेजीकरण अद्याप झालेले नाही. त्यातही जे दस्तावेजीकरण थोड्याफार प्रमाणात झालेले

आहे, ते मुख्यतः लेख–स्वरूपात झालेले आहे. म्हणजे ते वर्णनात्मक आहे. छायाचित्रणाच्या माध्यमातून या कला आणि त्या सादर करणारे कलावंत यांचे दस्ताऐवजीकरण अद्याप कुणी फार केलेले नाही. म्हणूनच निवडक कला आणि कलावंतांच्या माध्यमातून ते करण्याचा प्रयत्न तो करत आहे. या अभ्यासातून कला आणि कलावंताचे दस्ताऐवजीकरण करण्याचा प्रयत्न आहेच, सोबत त्या कलावंतांचे जीवनही या अभ्यासातून मुखरीत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या अभ्यासात कॅमेरा हे माध्यम आहे, पण त्यामागची दृष्टी संशोधकाची आहे.

हजार शब्द वापरून जे दाखवता येत नाही, ते कार्य अनेकदा एक प्रकाशचित्र (ज्याला अनेक ठिकाणी छायाचित्र अशीही संज्ञा प्राप्त आहे) करत असते. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे प्रकाशचित्रे समजून घेण्यासाठी कोणतेही शिक्षण घेण्याची आवश्यकता नसते. सुशिक्षितांपासून ते अशिक्षितांपर्यंत सर्वांनाच प्रकाशचित्रे ही केवळ बघूनच समजतात. यासाठी कोणतीही भाषा शिकण्याचे बंधन नसते. त्या अर्थाने छायाचित्रांची भाषा ही सार्वत्रिक भाषा आहे. ती समजण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या भौतिक शिक्षणाची गरज पडत नाही. छायाचित्र समजून घेण्यासाठी भाषा, प्रदेशांचा अडसर येत नाही. त्यामुळेच तर जेव्हा जेव्हा जगातील, वेगवेगळ्या देशांमध्ये, त्या देशांच्या चालीरिती, संस्कृती, परंपरा, उत्सव, त्या देशात आलेल्या नेसर्गिक आपत्ती यांची छायाचित्रे सर्वत्र प्रदर्शित होतात, तेव्हा तेव्हा संपूर्ण जग त्या छायाचित्रांशी जोडले जाते. ही छायाचित्रांची मोठी ताकद आहे. जागतिक पातळीवर छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यामागेही हेच उद्दिष्ट असते. उदाहरणार्थ 'वर्ल्ड प्रेस जागतिक छायाचित्रण स्पर्धा'. या स्पर्धेची सुरुवात १९५५ सालापासून झाली. साल २०१८ ला या स्पर्धेसाठी १२५ देशांमधून ५००० प्रकाशचित्रकरांनी (फोटोग्राफर्सनी) जवळपास १,००,००० प्रकाशचित्रे पाठवली.''[२] इतरही देशांमध्ये जवळपास संपूर्ण वर्षभर प्रकाशचित्रणावरती (फोटोग्राफीवर) असंख्य स्पर्धा व प्रदर्शने भरवली जातात. यातूनच प्रकाशचित्रणाचे महत्त्व लक्षात येते. संशोधकाने काही निवडक कला आणि कलावंत छायाचित्रांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१.२ प्रकाशचित्रण कलेचा प्रवास

''प्रकाशचित्रण कलेच्या तंत्राचा प्रवास वाचला तर मनोरंजक दाखले सापडतात. आपली छबी, आपला मुखवटा, आपले कार्य इतिहासात स्थीर स्वरूपात राहावे, असे मनुष्यप्राण्याला वाटत आले आहे. त्यातून अनेकांनी विविध तंत्रांचा वापर केलेला दिसून येतो.

राजे–महाराजे, श्रीमंत सरदार, सावकार आपली व आपल्या कुटुंबियांची चित्रे प्रख्यात चित्रकाराकडून काढून घेत असत. त्यामागे इतिहासात छबीच्या रूपाने का होईना स्मृतीत राहण्याचा विचार होत होता. नाण्यांवर कोरण्यात आलेली चिन्हे, चेहरे, राज्यसभेचा देखावा ही सुद्धा स्मृति टिकवण्याच्या भावनेतूनच जन्माला आली आहेत. स्तंभ, स्तूप, शीलालेख, ताम्रपट इत्यादी माध्यमांतूनही स्मृति चिरकाल ठेवण्याचा उद्योग राजे–महाराजे यांनी केलेला सापडतो.

प्रकाशचित्रण कलेपूर्वी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांनीही मजकुराला दृश्य रूप देण्यासाठी चित्रकारांचा वापर केलेला दिसून येतो. पाश्चिमात्त्य देशांतील वृत्तपत्रांनी युद्धाचे देखावे वाचकांना सादर करता यावेत यासाठी मोठमोठ्या प्रख्यात चित्रकारांना युद्धभूमीवर पाठवले होते. त्यांनी तिथे प्रत्यक्ष पाहून चित्रे काढली आणि ती संपादकांनी वृत्तांबरोबर सादर केली. कल्पनेने काढलेली चित्रे आणि प्रत्यक्ष देखावा पाहून काढलेली चित्रे यांत तफावत असते, हे या संपादकांनी अचूक ओळखले. वाचकांना प्रत्यक्ष जसा घडला तसाच वृत्तान्त हवा असतो, तसेच त्या घटनेचे चित्रही प्रत्यक्षातले हवे असते, या मागणीतून चित्रकारांचा वापर संपादकांनी करून घेतलेला दिसून येतो. प्रकाशचित्रणकलेचा उदय झाल्यानंतर ही व्यवस्था मागे पडली आणि प्रकाशचित्रांचा प्रवेश वृत्तपत्र व्यवसायात झाला. या तंत्रज्ञानात विविध प्रकारची प्रगती झाली.''[३]

कोणत्याही घटनेची, कोणत्याही प्रसंगाची सत्यता जाणून घेण्यासाठी त्या घटनेच्या अगदी जवळ जावे लागते, त्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहूनच ती घटना, तो प्रसंग कलेच्या माध्यमातून इतरांपर्यंत सत्य स्वरुपात पोहचवता येतो. आता संपूर्ण जगामध्ये खूपच मोठ्या प्रमाणात प्रकाशचित्रण या अत्याधुनिक कलेचा उपयोग जवळपास सगळ्याच क्षेत्रांमध्ये पाहायला मिळतो. वृत्तपत्रे त्यात सर्वात अग्रेसर आहेत. कोणत्याही देशात घडलेल्या घटनेचे वास्तवदर्शन वृत्तपत्रांमधील प्रकाशचित्रांतून दुसऱ्या दिवशी संपूर्ण जगाला होते. ती प्रकाशचित्रे पाहून वाचकांच्या मनात विविध भाव–भावना निर्माण होतात. केव्हा त्यांच्या डोळ्यांतून अश्रू येतात तर कधी ती प्रकाशचित्रे पाहून त्यांना राग येतो, तर कधी त्यांचे मन दुःखी होते. एवढे मोठे सामर्थ्य त्या प्रकाशचित्रात असते.

प्रकाशचित्रांची ही ताकद ओळखनूच संशोधक लोककलावंतांच्या कलांचे आणि जीवनाचेही दस्ताऐवजीकरण कॅमेऱ्याच्या माध्यमातून करत आहे.

१.३ हे सर्व प्रकाशचित्रणातूनच का?

''प्रकाशचित्रण ही प्रकाशाची भाषा होय. विशिष्ट क्षण टिपला की तो अमर होतो. त्याचे कालिक सामर्थ्य हे जसे पुरावा म्हणून असते तसेच ते वार्तापोषक सामग्री या नात्यानेही महत्त्वाचे असते. त्यामुळे एक प्रकाशचित्र हे हजार शब्दांएवढ्या बरोबरीचे असते, असे म्हटले जाते, ते खरेच आहे.

जेव्हा आशय व दृष्टिकोन यांनी भरलेली प्रकाशचित्रे प्रकाशचित्रकार साकार करू लागले तेव्हा जगाला यातील कलेचा साक्षात्कार होऊ लागला. सामाजिक वातावरणात प्रकाशचित्रांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय–ऐतिहासिक घटना, प्रसंग, व्यक्ती, संस्था यांच्या गतस्मृतींचा जीवंत इतिहास म्हणून प्रकाशचित्रांकडे पाहिले जाते.

प्रकाशचित्रांचे संवाद सामर्थ्य स्पष्ट करताना पत्रकारितेचे भाष्यकार प्राध्यापक अर्जुन तिवारी यांनी म्हटले आहे– Photography is an effective medium of communications offering an unlimited variety of perception, interpretation and executio प्रकाशचित्र हे संवादाचे प्रभावी माध्यम होय. त्यातून आकलनाच्या अमर्याद सीमा व विविधता प्रकट होते. त्यात विश्लेषण करण्याचे व अंमलबजावणीचे अनोखे सामर्थ्य प्रकट होते.

ओ. एस. फाऊलर यांच्या मते, ''Picture often conveys more than Volume'' – कुठलेही एक चित्र हे नेहमी एखाद्या खंडापेक्षाही अधिक अर्थाचा प्रसार करत असते. १९३७ साली एका डेग्युटी फ्रेंच व्यक्तीने मेटर पट्टीवर स्पष्ट व स्थिर प्रतिमा अंकित करण्यात यश मिळविले. त्याला जगातील पहिला प्रकाशचित्रकार म्हटले जाते.

सर जे. रेनॉल्डस् म्हणतात, ''A room hang with picture is a room hang with thoughts'' - एखादी चित्राने लटकलेली खोली ही प्रगल्भ विचारांनी युक्त असते. या तीनही अवतरणांतून छायाचित्राचे महत्त्व स्पष्ट होते. वृत्तपत्रातील छायाचित्रे हीसुद्धा व्यक्ती, घटना, प्रसंग तसेच विचारांचे यथार्थ वहन करत असतात.''[४]

१.४ संशोधन विषय व त्याचे महत्त्व

लोककलेचा समृद्ध वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात लोककलाकार मात्र समृद्ध नाहीत. लोककला लोप पावत चालल्या आहेत. लोककलाकार दिसेनासे झालेत. काही लोककलाकार हे फारच दुःखी, कष्टी जीवन जगत आहेत. त्यांचे स्वतःचे आयुष्यच काय, पण चार–पाच पिढ्या एखाद्या कलेसाठी ते खर्ची घालत आहेत. एवढे असूनही त्यांना एक वेळच्या जेवणासाठी देखील संघर्ष करावा लागत आहे. कित्येकदा तर उपाशीपोटीच त्यांना राहावे लागत आहे. ही भयावह परिस्थिती पाहून त्या कलाकारांची पुढे येणारी पिढी या कलेला राम–राम ठोकण्याच्या मनःस्थितीत आहे. त्या कलाकारांच्या मते जी कला एका वेळची भूक भागवू शकत नाही, ती कला काय कामाची? ही व्यथा आहे, खेडोपाडी लोककला प्रकार सादर करणाऱ्या कलाकारांची. ज्या वृद्ध कलाकारांनी आपले संपूर्ण आयुष्य एखाद्या कलेसाठी खर्च केले तो कलाकार उपासमारीला सामोरे जात आहे. एखादा लोककलाकार वेशभूषा करून त्याची कला सादर करण्यासाठी व्यासपीठावर आल्यानंतर त्याचे स्वतःचे दुःख विसरून, वयाची तमा न बाळगता, त्याची कला समोरील लोकांपुढे सादर करतो. त्याचा संपूर्ण अभिनय, अनुभव या कलेसाठी देतो पण रंग फासलेल्या चेहऱ्यामागचे दुःख समोरील लोकांपुढे केव्हाच उलगडू देत नाही. त्यावेळेस तो कलाकार सर्वांची वाहवा मिळवून जातो. त्याप्रसंगी प्रकाशचित्रकार प्रकाशचित्रे काढतात, पत्रकार मुलाखती घेतात. त्यावेळेस त्या कलाकाराच्या जीवनात डोकावून पाहण्याचा प्रयत्न मात्र कोणाकडूनही केला जात नाही. त्याचे दुःखी–कष्टी आयुष्य जाणून घेण्यास कोणालाही रस वाटत नाही. त्या कलाकाराची कला जर टिकवायची असेल तर तो कलाकार जगायला हवा. कलाकार जगला तरच त्याची कला जिवंत राहील. ती जिवंत राहावी यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. संशोधक हा छोटासा खारीचा वाटा उचलून ते प्रयत्न करतो आहे. निवडलेल्या लोककलाकारांसोबत ५० ते ६० दिवस तो (संशोधक) राहिला. त्यांचं राहणीमान, त्यांच दुःख, त्यांनी केलेला कलेसाठीचा रियाज आणि बरेच काही जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे सर्व सत्य कॅमेऱ्यात बंदिस्त केले. काही लोककलाकारांच्या जीवनात डोकावण्याचा प्रयत्न यातून केला. सर्वच लोककलाकार हे काही स्वतःविषयी लिहू शकत नाहीत. म्हणूनच त्यांच्याच मदतीने त्यांचे जीवन, त्यांचे राहणीमान, त्यांच्या पिढ्यांचा इतिहास,

कलेसाठी त्यांनी दिलेले योगदान, त्यांना आलेल्या अडचणी, हे सर्व त्याने प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून जाणून घेतले आहे.

या विषयातून निवडलेल्या १० लोककलाकारांची सत्य परिस्थिती तो समाजापुढे आणू इच्छितो. त्यांच्या कलेची वैशिष्ट्ये, त्यांच्या कलेमुळे समाजावरती होणारा परिणाम, त्यांच्या कलेतून होणारे समाजाचे प्रबोधन, त्या कलाकारांचे आताचे समाजातील स्थान
इत्यादी.

१.५ प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेले दहा लोककलाकार

१. भारुड सादरकर्त्या मीराबाई उमप
२. पारंपारिक गोंधळी राधाकृष्ण कदम (स्वर्गवासी)
३. शाहीर देवानंद माळी
४. वारीनृत्य व घागरनृत्य सादरकर्ते राजू बाबा शेख (स्वर्गवासी)
५. सोंगी भारुड सादरकर्ते निरंजन भाकरे
६. लोकशाहीर विठ्ठल उमप (स्वर्गवासी)
७. जुन्या महिला शाहीर अंबुदेवी बुधगावकर (स्वर्गवासी)
८. सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज
९. शाहीर बापूराव विभूते (स्वर्गवासी)
१०. पखवाज वादक उद्धवबापू शिंदे (आपेगावकर)

१.६ संशोधनाची आवश्यकता

आतापर्यंत इतक्या वर्षाच्या इतिहासात या लोककलेवर प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून संशोधन झालेले नाही ही फारच खेदाची गोष्ट आहे. लोककलेवरती व लोककलेच्या विविध आविष्कारांवरती लिखित स्वरूपात काही मान्यवर संशोधकांनी संशोधनं केली आहेत. ती सर्वच्या सर्व संशोधनं लिखित स्वरुपातील आहेत. त्यातील काही मान्यवर संशोधकांचे प्रबंध संशोधकाने अभ्यासले. तेव्हा असे लक्षात आले की या विषयात आणखीन भर घालण्यासाठी

दृककला हे माध्यम महत्त्वाचे आहे. म्हणूनच संशोधकाने प्रकाशचित्रांद्वारे हा विषय समाजापुढे घेऊन यायचे ठरवले.

सध्या महाराष्ट्र शासनाच्या वतीने वेगवेगळ्या विषयांवर जनजागृती करण्यासाठी लोककलाकारांचा उपयोग केला जात आहे. हे लोककलाकार गावोगावी फिरून त्यांच्या कलेद्वारे समाजाला जागृत करत आहेत. मुंबई–पुणे–नाशिक सारख्या शहरात देखील हे लोककलाकार त्यांची कला सादर करत आहेत. हे सर्व कोठे ना कोठे जतन होणे जरुरीचे आहे. ते जतन करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून ते चित्रित होणे आवश्यक आहे. तोच प्रयत्न गेल्या १६ वर्षापासून तो करतो आहे. उत्तम दर्जाच्या लोककलाकारांची पिढी पुढे घडावी, त्यांना चांगल्या दर्जेदार गोष्टी पाहायला मिळाव्यात, यासाठी तो झटतो आहे. त्याने स्वखर्चाने, या सर्व लोककलाकारांची प्रकाशचित्रे त्यांच्यासोबत फिरून काढली. तसेच वेळोवेळी चलचित्र (व्हिडिओ) कॅमेर्याने देखील त्यांची कला टिपली. चांगल्या गोष्टी लोकांनी पाहायला हव्यात, आपल्या संस्कृतीचे जतन व्हायला हवे, म्हणून त्याची धडपड सुरू आहे. दूरदर्शन व आकाशवाणी यावर लोककला व लोककलावंत यांच्या कलेच्या संदर्भात आता खूपच कमी कार्यक्रम प्रक्षेपित होत आहेत. पूर्वी फारच मोठ्या प्रमाणात कार्यक्रम या सर्वच लोककलांवर सादर होत असत. साल २०१० रोजी नितीन देसाई यांनी 'मराठी पाऊल पडते पुढे' ही लोककलावंतांवरची फारच छान मालिका झी टीव्ही या वाहिनीवर चालवली. यातून महाराष्ट्र राज्यातील लोककलांची व लोककलाकारांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला करून दिली. या अगोदर म्हणजे १९७९ साली जेष्ट नाटककार व लेखक विजय तेंडुलकर यांनी त्यांच्या 'दिंडी' या दूरदर्शनवरील मालिकेतून लोकांना लोककलेची व त्या लोककला सादर करणाऱ्यांची ओळख करून दिली. आता मात्र फारच थोडे कार्यक्रम या लोककला व त्या कलाकारांवर होतात. त्यांचे हे कार्यक्रम वाढावेत, त्यांची कला या माध्यमातून नागर वस्तीत पोहोचावी आणि त्या लोक कलाकारांच्या कलेला चांगले दिवस यावेत. या लोककलाकारांचे राहणीमान उंचावायला हवे. या सर्वांसाठी या संशोधनाची आवश्यकता आहे.

१.७ हे सर्व करताना संशोधकाला काही समस्या उद्भवल्या व त्यातून काढलेला मार्ग

याकरता संशोधकाची सर्वात मोठी अडचण होती ती या गोष्टी करता लागणारा पैसा. कारण हा विषय इतरांपेक्षा फारच वेगळा असल्यामुळे प्रस्तुत संशोधकाला प्रत्यक्षात या लोककलाकारांबरोबर फिरून त्यांचे कार्यक्रम ज्या भागात होतात, ज्या खेडोपाड्यात होतात, त्या प्रत्येक ठिकाणी जावे लागले. तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या आणि मित्रांच्या गाठीभेटीसाठी त्यांच्या घरी जावे लागले. संशोधकासोबत तिसरा डोळा म्हणजेच छायाचित्रण कॅमेरा कायमचा बरोबर असे. कॅमेरा सोबत लाईट, लाईटचे स्टँड, कॅमेरा स्टँड, व्हिडिओ कॅमेरा, व्हिडिओ कॅमेरा स्टँड, माईक आणि या सर्व लोककलांचे व्हिडिओ शूट करण्यासाठी एक कॅमेरामन तसेच या सर्व सामानाची देखरेख करण्यासाठी एक सहकारी, त्याचबरोबर हे सर्व सामान वाहून नेण्यासाठी एक गाडी देखील लागली. या संपूर्ण खर्चाचा ताळमेळ बांधणं फारच कठीण काम होतं. यावरती उपाय म्हणून जेथे जेथे शक्य असेल तेथे एसटी बसने प्रवास केला व कित्येकदा तर रेल्वेने देखील इतके जास्त सामान घेऊन प्रवास केला. त्याचबरोबर महागड्या हॉटेलमध्ये न राहता सरकारी विश्रामगृहात संशोधक राहिला. बऱ्याचदा तर त्या कलाकारांसोबत तो त्यांच्याच घरी राहिला. प्रकाशचित्र काढताना बऱ्याचदा खेडेगावात लोडशेडिंग असल्यामुळे लाईट नसायची. त्यावेळेस कॅमेऱ्याची बॅटरी चार्ज करणे खूपच अवघड व्हायचे, अशा वेळेस पावरबँकचा उपयोग करून घेतला. त्याचप्रमाणे काही खेडेगावात माईकची देखील व्यवस्था नसायची. त्यामुळे त्या कलाकारांचा आवाज रेकॉर्ड करण्यासाठी अगदी त्यांच्या जवळ जाऊन व्हिडिओ शूटिंग करावे लागायचे. स्टेजवरती बऱ्याचदा अंधुक प्रकाश असायचा, त्यावेळेस स्वत:जवळील एल.ई.डी. लाईट वापरून प्रकाशचित्रे काढली. लोककलाकारांची ही कला पाहण्यासाठी प्रेक्षक वर्ग (गावकरी, शेतकरी) बऱ्याच लांबून पायपीट करून किंवा मिळेल त्या वाहनाने येत होते. तो जर त्या प्रेक्षक वर्गाच्या पुढे उभा राहून फोटो काढायला लागला तर त्यांना त्याची अडचण होत असे. म्हणून त्याने बऱ्याचदा खाली बसून किंवा एखाद्या दुसऱ्या कोनातून फोटो काढले.

१.८ संशोधनाची उद्दिष्टे

भारतात '१४ विद्या आणि ६४ कला' एवढा मोठा आवाका कलांचा आहे. कलाकारही त्याच संख्येने संपूर्ण भारतात आहेत. त्या सर्वांवरती काम करणे शक्य नाही. म्हणून महाराष्ट्रातील फक्त १० वैशिष्ट्यपूर्ण व कलागुणसंपन्न असे लोककलाकार २००३ या सालापासून संशोधकाने निवडले. प्रकाशचित्रांच्या माध्यमातून त्यांची प्रकाशचित्रे काढली. पुढे २०१४ साली हाच विषय त्याने त्याच्या संशोधनासाठी निवडला. या १० लोककलाकारांवरती पुन्हा शास्त्रशुद्ध पद्धतीने काम करण्याची संधी यामुळेच मिळाली. त्या कलाकारांच्या जीवनात डोकावण्याचा प्रयत्न केला. त्या लोककलाकारांचं त्यांच्या कलेमागचं आयुष्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला. हे सर्व करताना त्याने संशोधनासाठी काही उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून हे काम करायला सुरुवात केली. जेणेकरून संशोधन योग्य पद्धतीने होईल व ती उद्दिष्टे साध्य होतील.

ती उद्दिष्टे खालील प्रमाणे:

१. प्रकाशचित्रणाचे महत्त्व शोधणे.
२. लोककलाकारांचे जीवन प्रकाशचित्रणातून अभ्यासणे.
३. लोककलाकारांच्या उदरनिर्वाहाची सोय कशी होईल आणि त्यांचे राहणीमान कसे उंचावेल, हे शोधणे.
४. लोककलाकारांना लोकाश्रय व राजश्रय मिळवून देण्यासाठी काय काय करावे लागेल याची माहिती करून घेणे.
५. लोककलाकारांच्या समृद्धीसाठी प्रयत्न करणे व जनजागृतीसाठी मार्ग शोधणे.

१.९ गृहितकृत्ये

१. शब्दरचनेपेक्षा प्रकाशचित्रण हे अधिक प्रभावी साधन आहे.

२. प्रकाशचित्रणामुळे लोककलाकारांचे व्यक्तिमत्व अधिक प्रभावीपणे मांडता येते.

३. प्रकाशचित्रण कला ही सर्वसामान्यांपर्यंत संदेश पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम आहे..

४. काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला प्रकाशचित्रणाद्वारे पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे.

५. प्रकाशचित्रणामुळे घटनेची सत्यता लगेच अनुभवता येते.

१.१० या संशोधनाची व्याप्ती आणि सीमा

भारत देशाला अनेक कला व कलावंत लाभले आहेत. या सर्व कलांवर व कलाकारांवर काम करणे अशक्यच नाही तर असंभव आहे. म्हणून त्याने महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण अशा फक्त १० लोककलाकारांची निवड केली व मागील १६ वर्षांपासून या विषयावर सातत्याने काम केले. प्रत्येक लोक कलाकारासोबत त्यांच्या घरी, ते ज्या गावी–शहरात, ज्या ठिकाणी ते त्यांची लोककला सादर करतात त्या ठिकाणी जाऊन, त्यांची प्रकाशचित्रे तर काढलीच पण चलचित्रणाद्वारे (व्हिडिओ शुटिंग) त्यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या कलेची माहिती, त्या लोककलाकारांचा जीवनप्रवास, त्यांचे त्या कलेतील योगदान, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांची कला पुढच्या पिढीपर्यंत आणि समाजापर्यंत कशी पोहचवू शकतो याबद्दल चर्चा केली. हे सर्व करत असताना त्या लोककलाकारांचे आणि त्यांच्या कार्यक्रमांचे प्रकाशचित्रण देखील केले, कारण प्रकाशचित्रण हे सत्यघटनांचा आढावा घेण्याचे प्रभावी माध्यम आहे. प्रकाशचित्रांतून त्यांची ही कला समाजापर्यंत पोहचावी, त्यांच्या कलेला योग्य ते मानधन मिळावे, त्यांच्या कलेचे जतन व्हावे आणि आधुनिक पिढीला या कलेचे महत्त्व कळावे यासाठी त्याने संशोधन संबंधित सर्व्हे केला. लोककलेशी आणि प्रकाशचित्रणाशी संबधित मान्यवरांच्या भेटी घेतल्या. त्यांची संशोधनाबद्दलची मते नोंदवून घेतली. अनेक प्रबंध, पुस्तके, ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके, माहितीपट, लघुपट, चित्रपट (या विषयासंदर्भात) इत्यादींचा अभ्यास करून संशोधनाची माहिती मिळवली. वेळोवेळी सामाजिक माध्यमातून (Social Media) निवडलेल्या कलाकारांच्या कलेचा प्रचार व प्रसार केला. हे दहाही लोककलाकार

त्यांच्या कलेने समृद्ध आहेत. त्यातील काही लोककलाकारांनी त्यांची कला सातासमुद्रापलीकडे पोहोचवली. भारताचे नाव त्यांच्या लोककलेद्वारे जगापर्यंत पोहोचले. हे सर्व प्रकाशचित्रणातून जास्त प्रभावीपणे मांडता आले कारण ते सर्व लोककलाकार व त्यांचे कलाप्रकार फारच वैशिष्ट्यपूर्ण असे आहेत तसेच यात रंगांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच हे दृककलेतून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचू शकते असे त्याला वाटते. यातील काही लोककलाकार हे परदेशातही जाऊन त्यांची कला सादर करतात. पण त्याला त्याच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रातील कायमस्वरूपी नोकरीमुळे या लोककलाकारांसोबत परदेशात जाण्यासाठी वेळ मिळू शकला नाही आणि आर्थिक परिस्थितीमुळे देखील परदेशात
जाऊन त्यांच्या कार्यक्रमांचे प्रकाशचित्रण करता आले नाही.

१.११ वापरलेली साधन–यंत्र– सामग्री

प्रकाशचित्रण कॅमेरा, मेमरी कार्डस, कॅमेरा बॅटरी, बॅटरी चार्जर, चलचित्रण कॅमेरा, लाईट, लाईटचे स्टँड, कॅमेरा स्टँड, चलचित्रण कॅमेरा स्टँड, माइक, संगणक, लॅपटॉप, इंटरनेट, मोबाईल, हार्ड डिस्क, विषया संदर्भातील अनेक प्रबंध, पुस्तके, ग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, नियतकालिके, माहितीपट, लघुपट, चित्रपट तसेच वही, पेन, पेन्सिल, महाराष्ट्राचा व भारताचा नकाशा.

१.१२ संशोधनावर काम करायला दिलेला वेळ

संशोधक हा सन २००३ या सालापासून वरील विषयावर काम करत आहे. २०१४ साली हाच विषय त्याने संशोधनासाठी निवडला. एकीकडे 'टाइम्स ऑफ इंडिया' या प्रतिष्ठित समूहासाठी पूर्णवेळ छायाचित्रकार म्हणून काम करत असताना देखील एवढ्या वर्षांचा वेळ काढणे अशक्य होते, तरी तो वेळ काढला व सातत्य दाखवत संशोधनाचे काम त्याने मार्गी लावले.

प्रकरण : २

अ : भारत देशात कलांचा उगम

महाराष्ट्रातील लोककलांचा आढावा

काही प्रबंधांचा आढावा

विविध साहित्यांच्या माध्यमातून.

ब : प्रकाशचित्रांचा जगावर होणारा परिणाम व चित्रपट

माहितीपट, लघुपट यांचा आढावा.

क : संशोधन पद्धती

अ : भारत देशात कलांचा उगम, महाराष्ट्रातील लोककलांचा आढावा, काही प्रबंधांचा आढावा, विविध साहित्यांच्या माध्यमातून.

२.१ भारतीय कला

२.२ महाराष्ट्रातील लोककला

२.२.१ लोककलांचे मुख्य प्रकार

२.२.२ मूल्य व्यवस्था आणि लोककला

२.३ काही लोककला प्रकारांचे परीक्षण

२.३.१ पोवाडा

२.३.२ भजन

२.३.२.१ स्वरूप

२.३.३ कीर्तन

२.३.४ अभंग

२.३.५ भारूड

२.३.६ गोंधळ

२.३.७ लोककलाकारांना, त्यांच्या परिवाराला, मित्रांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मुलाखती चलचित्रित केल्या.

२.३.८ काही प्रबंध प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासले.


२.३.९ काही चित्रपट, माहितीपट, लघुपट प्रत्यक्ष पाहून प्रस्तुत संशोधन पूर्ण केले.

२.१ भारतीय कला :

''इ. स. पू. तिसऱ्या सहस्रकातील मोहेंजोदोडो, हडप्पा, सिंधू संस्कृतीच्या कलेपासून भारतीय दृश्य कलांची सुरुवात होते. पण खास भारतीय अशा कलाशैलींची सुरुवात इ. स. पू. तिसऱ्या शतकातील मौर्यकाळापासून होते. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी ही कला निर्माण झाली. ब्राह्मणी मानल्या गेलेल्या हिंदू कलाविष्कारांचा उगम त्याबरोबर अहमहमिकेने झालेला दिसतो. तेथपासून तहत मोगल आणि नंतरच्या संस्थानिक लघुचित्रशैलीपर्यंत परंपराप्राप्त भारतीय दृश्य कलांना नवनवे बहर येत राहिले. मूर्तिपूजेच्या प्रभावातून उपजलेली ही कला वैदिक तत्वज्ञानाचा वारसा सांगत येते. भारतीय संगीताचे मूळसुद्धा सामवेदिक संगीतात आहे, असे मानले जाते. वेदामध्ये मानवाच्या अतिआदिम प्रेरणाचे संगोपन केलेले आहे. पण निसर्गपूजक आर्यांचा मूर्तिपूजेला कडवा विरोध होता. निसर्गातील चैतन्य शक्तीमध्ये काही एक 'ऋत' म्हणजे नियततत्व आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणून 'इंद्र' या त्यांच्या केवलरूप ईश्वरी तत्वाचा आविष्कार त्यांना आकाशातील सूर्याच्या प्रकाशात दिसे तसाच तो अंतरिक्षातील विजेच्या लखलखाटात आणि पृथ्वीवरील अग्नीमध्ये दिसे. निसर्गाशी संवाद साधत निसर्गशक्तीशी एकरूप होण्याची त्यांना तीव्र आकांक्षा होती. मूर्तीपूजा त्यांना थिटी वाटावी हे साहजिक असताना मूर्तिपूजक कलेचा आणि संस्कृतीचा स्रोत आर्यांच्या तत्ववृत्तीत शोधणे तर्कतः विसंगत ठरते. भारतीय कलेच्या भाष्याकारांचे या प्रश्नाकडे लक्ष गेलेले नाही. पण चिकित्सक रसिकांसाठी या प्रश्नाची सोडवणूक प्रथम करणे आवश्यक आहे.''[५]

२.२ महाराष्ट्रातील लोककला

''गावखेड्यातील दैनंदिन जीवनात जी कला सादर केली जाते, तिला लोककला म्हणतात. ग्रामीण जीवनामध्ये गाणे, नाच, नाटक, हस्तकला, अशा कला दैनंदिन जीवनाचा भाग आहेत. त्या कला प्रकारांची सविस्तर माहिती खाली दिली आहे.



(तक्ता)''[६]

२.२.१ लोककलांचे मुख्य प्रकार

१. प्रयोगात्म लोककला – नाच, नाटक, संगीत

२. हस्तकला – हाताने किंवा सोप्या अवजारांचा वापर करून बनवलेले चित्र, वस्तू किंवा शिल्प

२.२.२ मूल्य व्यवस्था आणि लोककला

कलांपेक्षा ही प्रामुख्याचा असतो तो कलाकर. तो जगवला पाहिजे तर कला जगतील. आजकालची मूल्य व्यवस्था ही लोककला सुखाने जगतील अशा नाहीत. काही प्रमाणात लोककलांचे उत्सव सादर होऊन लोककला जगणार नाहीत. कारण त्या लोककलाकारांना सादरीकरणानंतर पुन्हा त्यांच्या मातीत परतावे लागते. त्यामुळे त्यांची आर्थिक, सामाजिक परिस्थिती तितकीशी बदलत नाही.

तेव्हा आज एकूणच नागर प्रेक्षकांसमोर सादर होणाऱ्या प्रयोगात्म लोककला या मूळात लोकविधा आहेत. त्या 'कला' म्हणून जन्माला आलेल्या नाहीत, तर धार्मिक अधिष्ठानांशी संबंधित असे ते विधी आहेत. या लोकविधांमधलं कलातत्त्व नागर संस्कृती वाढलेल्या लोकांना मागाहून जाणवलं आणि त्यांनी अनागर जीवनसंस्कृतीत भरण–पोषण झालेल्या या लोकविधा नागर रंगभूमीवर–रंगमंचावर आणल्या. गेल्या काही वर्षांत तर गोंधळ–जागरण–दशावतार–लावणीसारख्या लोककलांना नागर संस्कृती अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालं. यातली लावणी किंवा तमाशा हा लोककलाप्रकार प्रथमपासूनच रंजनप्रधान होता आणि आहे. मात्र महाराष्ट्राच्या मातीतल्या किंबहुना जगातल्या कुठल्याच प्रयोगात्म लोककला या मूळ रंजनासाठी निर्माण झालेल्या नाहीत. त्यात मनोरंजन नंतर शोधण्यात आले.

आजकाल होणाऱ्या कुळाचार विधींमध्ये लोककला दडलेली आहे. त्या दाखवणाऱ्या कलाकारांची सामाजिक प्रतिष्ठा कमी होत चालली आहे आणि नवीन पिढी उपजीविकेसाठी अन्य मार्ग शोधत आहे. आपल्यासाठी असलेल्या लोककला मात्र त्याचं उदरनिर्वाहाचं मुख्य साधन आहे.

''सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे महाराष्ट्रात शेकडो लोककला आहेत. पण लोककला उत्सव व लोककला दाखवल्या जातात त्या व्यासपीठावर मात्र लावणी, गोंधळ–जागरण, भारूड, दशावतार अशा मोजक्याच लोककला होतात. पिंगळा, वासुदेव, आराधी, भराडी,

जोगते–जोगतिणी, कीर्तन, चित्रकथी, नमनखेळे, अशा अनेक लोककला आणि लोककलावंत आजवर उपेक्षितच राहिले आहेत. पण लावणी–तमाशा, गोंधळ–जागरण या लोककलांना मिळणारं व्यासपीठ अजून या लोककलांना खुलं झालेलं नाही. म्हणूनच महाराष्ट्रात एकूणच लोककलांना बरे दिवस आलेत असं वाटत असलं तरी प्रत्यक्षात दिव्याखाली अंधारच आहे. मात्र हा अंधार दूर करण्याची क्षमता या लोककलांमध्ये जरूर आहे. कारण लोककलांत असलेली ऊर्जा अन् त्यांच्या ठायी असलेली सतत नवनवीन उन्मेष धारण करणारी प्रतिभा शक्ती अन्य कुठल्याच शास्त्रीय कलांमध्ये सापडत नाही. खरं तर आज नावारुपाला आलेल्या शास्त्रीय कला या लोककलांमधूनच उन्नत पावलेल्या आहेत आणि एका परीने लोककलाही शास्त्रीयच असतात. कारण त्या कधी, कुठे, का आणि कशा सादर करायच्या, याचे परंपरेने घालून दिलेले नियम असतातच. उदाहरणार्थ दंडारनृत्य कधी, कुठे करावं आणि त्यातला देवाचा मुखवटा कुठल्या झाडाच्या खोडापासून करायचा ते तो मुखवटा कुणी–कधी धारण करायचा इथपर्यंतचे आदिवीसींचे नीतीनियम ठरलेले असतात. मग यांना शास्त्रीय म्हणायचं नाही? प्रसिद्ध संगीततज्ज्ञ दिवंगत डॉ. अशोक रानडे तर म्हणायचे की, ज्याच्या मागे का, कधी, कशासाठी करायचं असे प्रश्न आहेत, ते सारं शास्त्रीयच असतं.''[७]

२.३ काही लोककला प्रकारांचे परीक्षण

२.३.१ पोवाडा

''शाहिराचा जुन्यातजुना उल्लेख शके ११०० च्या सुमारास महिकावतीच्या बखरीत आढळतो. म्हणजे शाहिरी हे नाव शके ११०० च्या सुमारास रूढ होते. कदाचित समुद्रकाठी अरबी शायर त्या काळात मिरवीत होते. आपलं काव्य लोकांसमोर मांडत होते. म्हणून त्याचाच प्रभाव पडून या अस्सल मराठमोळ्या काव्य प्रकाराला **'शाहिरी'** हे नाव पडले असावे.''[८]

''प्रसिद्ध इतिहास – संशोधक श्री. य. न. केळकर यांनी अशा महत्त्वाच्या ११ पोवाड्यांचा उल्लेख केला आहे.

१. अफझलखानाचा वध – शा. अज्ञानदास

२. तानाजी मालुसरे– तुळसीदास

३. रमाबाईचा पोवाडा – (अज्ञात)

४. नारायणरावांच्या वधाचा अस्सल पोवाडा – लहरी मुकुंदा

५. खडकीची आणि अष्टीची लढाई – रामा केरू

६. आनंदराव धुळपाचा पोवाडा – भिकू बाळा

७. दत्ताजी जाधवाचा पोवाडा – (अज्ञात)

८. सेखोजी आंग्र्याचा पोवाडा – (अज्ञात)

९. टिपूवरील स्वारीचा पोवाडा – राजू सुलतान

१०. आकीवाटच्या वेढ्याचा पोवाडा – मानसिंग भोवाना

११. उमाजी नाईकाचा पोवाडा – जीरखान''[९]

२.३.२ भजन

भगवंताची स्तुती करण्यासाठी जी काव्यरचना संगीता स्वरूपता केली जाते, त्याला भजन असे म्हणतात. अगोदरच्या संतांनी बऱ्यापैकी भजने लिहिली, त्यामध्ये संत नामदेव, चोखामेळा, संत एकनाथ, संत तुकाराम यांचा मोलाचा वाटा आहे.

२.३.२.१ स्वरूप

पूर्वीच्या काळात कष्टकरी शेतकऱ्याचा वेळ सत्कारणी लागावा, म्हणून भजन केले जायचे. त्याला साथ संगत करण्यासाठी पेटी, मृदंग, ढोलकी, तबला, टाळ, या वाद्यांचा उपयोग करून भजन केले जायचे. चक्री भजन, सोंगी भजन, रिंगण भजन हे भजनाचे प्रकार आहेत.

२.३.३ कीर्तन

कीर्तनामध्ये देवी दैवतांचे गुणगान किंवा त्यांच्या लीलांचे वर्णन केले जाते.

२.३.४ अभंग

''अभंग हा विशेष म्हणजे मराठी साहित्यात विकास झालेला कवितेचा व वृत्त–छंदांचा प्रकार आहे. काव्यप्रकार म्हणून अभंगाची वैशिष्ट्ये प्रामुख्याने आध्यात्मिक आशयाच्या अभिव्यक्तीसाठी वारकरी संप्रदायातील संतांनी या काव्यप्रकाराचा व छंदाचा प्रथम उपयोग केला. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ अशा संतांचे विठ्ठलभक्तीपर काव्य प्रामुख्याने

अभंग स्वरूपातच आहे. छंद म्हणून अभंगाचे दोन प्रमुख प्रकार पडतात. एक मोठा अभंग व दुसरा लहान अभंग.''[१०]

२.३.५ भारूड

आध्यात्मिक आणि नैतिक शिक्षण देणारे मराठीमधील रूपकात्मक गीत नाट्य अशी भारुडाची व्याख्या केली जाते

२.३.६ गोंधळ

घरामध्ये एखादे मंगल कार्य हे निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी देवांची पूजा आणि स्तुती केली जाते त्याला गोंधळ असे म्हणतात. अंबे माता, रेणुका देवी आणि अन्य काही देवी दैवतांसाठी महाराष्ट्रात गोंधळ घातला जातो.

२.३.७ लोककलाकारांना, त्यांच्या परिवाराला, मित्रांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मुलाखती चलचित्रित केल्या. त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१. भारुड सादरकर्त्या मीराबाई उमप

२. पारंपारिक गोंधळी राधाकृष्ण कदम (स्वर्गवासी)

३. शाहीर देवानंद माळी

४. वारीनृत्य व घागरनृत्य सादरकर्ते राजू बाबा शेख (स्वर्गवासी)

५. सोंगीभारुड सादरकर्ते निरंजन भाकरे

६. लोकशाहीर विठ्ठल उमप (स्वर्गवासी)

७. जुन्या महिला शाहीर अंबुदेवी बुधगावकर (स्वर्गवासी)

८. सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज

९. शाहीर बापूराव विभूते (स्वर्गवासी)

१०. पखवाजवादक उद्धवबापू शिंदे (आपेगावकर)

११. साईनाथ कांबळे

१२. कविता कांबळे

१३. दत्तू कदम

१४. भारत कदम

१५. गुलाब कदम

१६. कल्पना माळी

१७. सखुबाई माळी

१८. दिलदार शेख

१९. सुमतीनाथ भाकरे

२०. नंदेश उमप

२१. कविता उमप

२२. विजया बुधगावकर

२३. धर्मपाल चिंचोलीकर

२४. आदिनाथ विभूते

२५. प्रसाद विभूते

२६. सर्जेराव

२७. बर्ट कॉर्नलीस

२८. ज्युडी रस्ट

२९. डॉ. नरेंद्र बोरलेपवार

३०. डॉ. प्रकाश खांडगे

२.३.८ काही प्रबंध संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासले, ते खालीलप्रमाणे आहेत

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

संशोधक : नरेंद्र वसंतराव बोर्लेपवार, एम. एफ. ए. (अप्लाईडआर्ट्स)

Digital Camera as a Revolutionary Tool in Editorial Photography. 2013

संशोधक मार्गदर्शक : प्राध्यापक श्री. अरुण भापकर.

२. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

संशोधक : विश्वास पोपट मोरे

लोककला, ललितकला एक प्रबोधनाचे माध्यम : ऐतिहासिक अभ्यास. मार्च २०१८

संशोधक मार्गदर्शक : डॉ. रामचंद्र देखणे.

३. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शाहिरी वाङमय (पोवाडे, लावण्या, तमाशा)

संशोधक: गणेश संपतराव चंदनशिवे

लोकरंगभूमीवरील तमाशाच्या सादरीकरणाचे बदलते स्वरूप: एक चिकित्सक अभ्यास.

ऑक्टोबर, २०११

संशोधक मार्गदर्शक : डॉ. पंडित आनंदराव शिंदे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

संशोधक: कृष्णा किरवले,

महाराष्ट्रातील दलित शाहीर आणि त्यांची शाहिरी १९८७

संशोधक मार्गदर्शक : डॉ. गंगाधर पानतावणे.

५. संशोधक: नवनाथ दत्तोबा चौधरी,

शाहीर विश्वासराव फाटे : व्यक्ती आणि वाङमय. २००२

संशोधक मार्गदर्शक : डॉ. सुदाम जाधव.

६. संशोधक: चंद्रकांत बाबूराव व्यवहारे,

मराठी शाहिरी वाङ्मवाङमयातील समाजदर्शन १९८६

संशोधक मार्गदर्शक : डॉ. यु. म. पठाण.

७. मुंबई विद्यापीठ

संशोधक: भगवान सोनजी सावंत

मराठीतील शाहिरी कविता (कालखंड १९२० ते १९८०):

पोवाड्यातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप. १९९२.

संशोधक मार्गदर्शक : डॉ. माधव राजाराम पोतदार.

८. भारूड, प्रहसने, पिराण्या, गौळणी

संशोधक: सुधाकर गोपाळ चांदजकर,

मराठी संतांची भारुडे : एक विवेचक अभ्यास. १९७४

संशोधक मार्गदर्शक : डॉ. यु. म. पठाण.

९. मुंबई विद्यापीठ

संशोधक: शीला भास्कर टेंबे,

एकनाथी भारूड : एक चिकित्सक अभ्यास १९९१.

संशोधक मार्गदर्शक : डॉ. सदाशिव बाळकृष्ण कऱ्हाडे.

२.३.९ संशोधकाने काही चित्रपट, माहितीपट, लघुपटप्रत्यक्ष पाहून प्रस्तुत संशोधन पूर्ण केले. ते खालीलप्रमाणे आहेत :

१. 'द पॉवर ऑफ फोटोग्राफी टू विटनेस'

२. 'द पॉवर ऑफ फोटोग्राफी मी टू सेलिब्रेट'

३. 'इट व्हॉट कॅन आय डू' ए फोटो जर्नालिस्ट जर्नी थ्रू हॉरर अँड जोय

४. 'द मून शॉट'

५. 'हाऊ फोटो जर्नालिस्ट कॅप्चर द मोमेंट'

६. लिमसे आधार यु लेन्स फ्रन्टलाइन

७. 'ग्लोबल जर्नालिस्ट: कॅरल गझी पुलित्झर विनिंग फोटो जर्नालिस्ट '

८. नॅशनल जिओग्राफीने तयार केलेल्या एकूण बारा छायाचित्रकारांवरील छायाचित्रणासंदर्भात १२ माहितीपटपाहून अभ्यासले.

९. याव्यतिरिक्त २० 'फँटॅस्टिक फोटोग्राफी डॉक्युमेंटरी' म्हणून देखील माहितीपट नॅशनल जिओग्राफीने बनवलेले आहेत. ते देखील अभ्यासले.

१०. तसेच आनंद पटवर्धन यांचे माहितीपट देखील पाहिले. ते 'टू द चिल्ड्रन ऑफ स्वाट फ्रॉम द चिल्ड्रन ऑफ मंडाला', 'हमारा शहर बॉम्बे', 'उन मित्रों की याद प्यारी', 'राम के नाम', 'पिता पुत्र और धर्मयुद्ध', 'जंग और अमन', 'वुई आर नॉट युवर

मंकी' व 'जयभीम कॉम्रेड असे आहेत.

११. तसेच काही खूपच उपयुक्त व माहिती प्रधान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे चित्रपट पाहिले. ते राजा हरिश्चंद्र, संत तुकाराम, कुंकू, माणूस, श्वास, पथेर पांचाली, अपराजितो, अपूर संसार, माया बाजार, मधुमती, मुघल–ए–आझम, चारुलता, भुवन शोम, संस्कार, अंकुर, गर्म हवा, प्यासा, कागज के फूल, साहिब बीवी और गुलाम, नवरंग, दो आँखें बारह हाथ.

१२. सिटीझन केन, ब्रीफ एन्काऊंटर, रोम ओपन सिटी, कॅमेरा बफ, बायसिकल थीव्हज, राशोमान, सेव्हन सामुराई, 'हिरोशिमा, मॉन अमॉर', ब्रेथलेस, शिंडलर्स लिस्ट, नायकन, सिनेमा पॅराडिसो, चिल्ड्रन ऑफ हेवन, लाईफ इज ब्युटीफुल, कॅरेक्टर, पोस्टमेन इन द माउंटन्स, ऑल अबाउट माय मदर, द कप, कंदाहार, ओसामा, ब्यूटीफुल बॉक्सर, खामोश पानी, बफेलो बॉय, इत्यादी चित्रपट.

प्रकरण : २

ब : छायाचित्रांचा जगावर होणारा परिणाम व चित्रपट, माहितीपट, लघुपट यांचा आढावा.

२.४.१ 'सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे' याचे विश्लेषण

२.४.२ फोटो काय करू शकतो?

२.४.२.१ महान प्रकाशचित्रकारांची मते

२.४.२.२ प्रकाशचित्रांनी इतिहास घडवल्याची कितीतरी उदाहरणे येथे देता येतील (या शीर्षकाव्यतिरिक्त– प्रकाशचित्रे जेव्हा इतिहास घडवतात)

२.४.२.३ बीबीसीच्या १० प्रकाशचित्रांनी २०१४ साली इतिहास घडवल्याची उदाहरणे (या शीर्षकाव्यतिरिक्त– बीबीसीची दहा प्रकाशचित्रे)

२.४.२.४ भारतातील महान प्रकाशचित्रकार

२.४.२.५ 'द वीक' या मासिकाने २०१६ साली भारताला अचंबित करणाऱ्या अशा ७ फोटोंची माहिती दिली (या शीर्षकाव्यतिरिक्त– 'द वीक' चे भारताला अचंबित करणाऱ्या सात फोटो)

२.४.२.६ खालील काही दुर्मीळ जुनी व फारच मौल्यवान पुस्तके संशोधकाला उपलब्ध झाली. (या शीर्षकाव्यतिरिक्त– उपलब्ध दुर्मीळ पुस्तके)

२.४.३ छायाचित्रांची दुसरी बाजू

२.४.४ लघुपट, माहितीपट आणि चित्रपट यांच्यातून घेतलेला आढावा

२.४.४.१ चित्रपट

२.४.४.२ नॅशनल जिओग्राफी

२.४.४.३ 'आनंद पटवर्धन' यांचे योगदान

ब : छायाचित्रांचा जगावर होणारा परिणाम व चित्रपट, माहितीपट, लघुपट यांचा आढावा.

२.४.१ 'सत्यघटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे प्रभावी माध्यम आहे 'याचे विश्लेषण

''सत्यमेव जयते हे शब्द भारताच्या राजकीय प्रतिकामध्ये वापरले आहेत. म्हणून भारतीय घटनेमध्ये सत्याचे महत्त्व हे अनन्य साधारण आहे. सत्य ह्या शब्दाचा अर्थ खरेपणा, वास्तविकता, यथार्थता असा होतो. असत्य हा सत्याचा विरोधी अर्थाचा शब्द आहे.

हार्वर्ड विद्यापीठातील विल्यम जेम्स म्हणतात, आजच्या काळात माणसाला एक मोठंच सत्य गवसलं आहे आणि ते म्हणजे आपल्या दृष्टिकोनात बदल करून आपले आयुष्यच माणूस बदलू शकतो.''

''फोटो हे भूतकाळातील आणि वर्तमान काळातील घडलेल्या घटनेची अचूक सत्यता पटवून देण्यासाठी प्रभावी साधन आहे. वर्तमान पत्रातील एखादी घटना, जर फोटोसोबत प्रकाशित झाली असेल तर, त्या घटनेचा परिणाम वाचकावर मोठ्या प्रमाणात होत असतो.

प्रकाशचित्रे आपल्याला अचंबित करतात, उल्हासित करतात, त्या विषयाशी खिळवून ठेवतात आणि कधी-कधी वाचकांच्या मनाला हादरवून टाकतात. समाजावर दीर्घकालीन परिणाम घडवून आणण्याची शक्ती प्रकाशचित्रांत असते.



अनेक युद्ध-छायाचित्रकार भयानक दृश्य, मृत्यू चित्रित करताना आपल्या डोळ्यातले अश्रू कॅमेऱ्यामागे लपवतात. कधीतरी एखादा छायाचित्रकार आत्महत्या करतो, पूर्वायुष्यात टिपलेल्या युध्द छायाचित्रांच्या भयानक सावल्या काहींच्या आयुष्यात मरेपर्यंत साथ सोडत नाहीत.''[११]

२.४.२ फोटो काय करू शकतो?

एखादे छायाचित्र काय करू शकते, याची बरीच उदाहरणे देता येतील. या संशोधकाविषयी सांगायचे झाले, तर खालील दोन उदाहरणे पुराव्यानिशी येथे दिली आहेत. अशाच प्रकारे या संशोधनातून लोककलाकारांचे जीवन प्रकाशचित्रणातून लोकांपुढे आल्यास त्यांनाही आर्थिक मदत मिळू शकते.

उदाहरण: १

सन १९९९ रोजी संशोधकाने एक फोटो काढला. 'रेल्वेच्या रुळावर एक वृद्ध महिला तिच्या आजारी वृद्ध पतीला आंघोळ घालत आहे', असे हे प्रकाशचित्र कुर्ला स्टेशनच्या जवळ धावत्या रेल्वे रुळावर काढले. त्या रेल्वे रुळावरून ठराविक वेळेने ट्रेन धावत होती. त्या धावत्या रुळावर जीवाची पर्वा न करता ती वृद्ध महिला तिच्या आजारी पतीला आंघोळ घालत आहे, असे ते प्रकाशचित्र होतं.

तो फोटो 'आफ्टरनून' या इंग्रजी वर्तमानपत्राने चार कॉलममध्ये छापला आणि सोबत काही शब्दांचा लेख लिहिला. वाचकांनी पुढील दिवशी तो फोटो पाहून संपादक बहेराम कॉन्ट्रॅक्टर सरांना फोन केले व या जोडप्यासाठी मदत करायची इच्छा व्यक्त केली. नंतर त्या सर्वांनी त्यांना मदत केली. त्याच फोटोला पुढे आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला, तसेच चार राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. या सर्वांतून प्रेरणा घेऊन संशोधकाने पुढे तीन वर्ष रेल्वे रुळाच्या शेजारी राहणाऱ्या लोकांच्या दिनचर्या छायाचित्रित केल्या. हे सर्व फोटोंच्या प्रदर्शनाद्वारे लोकांपुढे मांडले.

संपूर्ण भारतात याची पाच जागी प्रदर्शनं झाली. या लोकांचं मृत्यूच्या सापळ्यातलं भयानक जीवन पाहून, धोक्याची परिस्थिती पाहून, महाराष्ट्र शासनाने या सर्वांचे तेथून स्थलांतर केले. या सर्वांना इमारतींमध्ये कायमस्वरूपी २२५ स्क्वेअर फुटाचे घर देण्यात आले. अशी एकूण १७००० (सतरा हजार) घरे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई व स्पार्क यांच्या मदतीने रेल्वे रुळाच्या शेजारी राहणाऱ्या गोरगरीब जनतेला मिळाली. नंतर त्या रुळांच्या शेजारी कायमस्वरूपी उंच भिंत घालण्यात आली. या सर्व गोष्टींमध्ये त्याच्या फोटोंचा मोलाचा वाटा आहे.


पहला
FIRST
72901
TRAL

उदाहरण : २


महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचे प्रमाण फारच भयावह आहे. कित्येक बालके त्यांना योग्य आहार न मिळाल्यामुळे कुपोषित होऊन मरण पावतात. या विषयावर मागील २६ वर्षापासून संशोधक संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात फिरून, वेगवेगळ्या गावी, पाड्यात, खेडोपाडी जाऊन, कुपोषित बालकांची प्रकाशचित्रे काढत आहे. त्याने १९९६ साली मेळघाट येथे जाऊन तेथील कुपोषित मुलांचे फोटो काढले. तेथे तो दहा दिवस राहिला. तेथील वेगवेगळ्या खेड्या-पाड्यांमध्ये फिरला. तेथील तीन व चार नंबर ग्रेडच्या कुपोषित बालकांना त्याने कडेवर उचलून घेऊन, त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भरती केले. कारण ती मुले जगायला हवीत या हेतूने...





ती सर्व मुले जगली देखील. त्याने दहा दिवस त्या सर्व पाड्यांमध्ये फिरून, तेथील भयावह परिस्थिती कॅमेऱ्यर्चीं बंदिस्त केली. मुंबईत आल्यावर या कुपोषित बालकांवरती त्याने 'फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडियाच्या गॅलरी' मध्ये एक प्रदर्शन भरवले. काही वृत्तपत्रांमधून त्या प्रदर्शनाविषयीची व कुपोषणाविषयीची माहिती लोकांपर्यंत पोहोचविली. त्या लेखासोबत तेथे काम करणाऱ्या संपर्क या समाजसेवी संस्थेचा दूरध्वनी क्रमांक देखील वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केला. तो लेख वाचून असंख्य मदतीचे हात पुढे आले. त्या कुपोषित मुलांना संपर्क या सामाजिक संस्थेमार्फत बऱ्याच लोकांनी आर्थिकदृष्ट्या मदत पोहोचवली. या सगळ्यातून प्रेरणा घेऊन त्याने कुपोषणावरचे काम पुढे चालू ठेवले. ते काम आजपर्यंत चालू आहे.

सन २०१४ रोजी या कामाला एक वेगळी दिशा मिळाली. त्याच्या २१ वर्षांच्या कामाचे काही परिस्थितीजन्य फोटो पाहून 'डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया प्राइव्हेट लिमिटेड' या नामांकित कंपनीचे सी. एस. आर. संतोष जगधने हे त्याला भेटायला आले. 'आपण स्वत: जाऊन त्या जव्हार येथील कुपोषणाची परिस्थिती पाहूया', असे म्हणाले. दोघेही तेथे जाऊन त्या मुलांची परिस्थिती पाहून फारच अस्वस्थ झाले.



(दाभेरी या पड्यातील आश्रम शाळा, १९९७ सालचं हे प्रकाशचित्र आहे.)

ती परिस्थिती पाहून सीएसआर मॅनेजर संतोष जगधने यांच्या डोळ्यात पाणी आले. नंतर त्याने, संतोष जगधने व नवदृष्टी या सामाजिक संस्थेमार्फत या मुलांसाठी, त्यांच्या कुपोषणावर मात करण्यासाठी व त्यांच्या शिक्षणासाठी मदत करायची असे ठरवले. पुढे नवदृष्टीच्या माध्यमातून जव्हार मधील दाभेरी या पाड्यात या मुलांसाठी आश्रम शाळा सुरू केली आणि संपूर्ण जव्हार तालुक्यातील मुलांच्या कुपोषणासाठी सकस आहार देण्याचे नियोजन केले. आतापर्यंत जवळपास १०,००,००००० (दहा करोड रुपये) या मुलांच्या शिक्षणावर व त्यांच्या पौष्टिक आहारावर खर्च करण्यात आले आहेत. हे सर्वच संशोधकाने काढलेल्या फोटोंमुळे घडले.



(दाभेरी या पड्यातील तीच आश्रम शाळा, आता अशी प्रशस्त इमारत झालेली आहे.)

करोडो रुपयांची मदत त्याच्या छायाचित्रांनी आतापर्यंत मिळवून दिली. पुढेही ही मदत सुरूच राहणार आहे, असे डॉर्फ केटल केमिकल्स इंडिया प्राइव्हेट लिमिटेड या कंपनीच्या मालकांनी सांगितले.

समाजाला फक्त परिस्थिती सांगून, त्या परिस्थितीची गंभीरता कळत नाही, तर परिस्थितीजन्य पुरावे, प्रकाशचित्रांतून सादर करावे लागतात. त्याच्या प्रकाशचित्रांमुळे सत्यघटना योग्य त्या व्यक्तींपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहचली आणि अनेकांचे आयुष्य सुखकर झाले. यात घेणारा आणि देणारा ही दोन्ही वेगवेगळी टोके आहेत. पण संशोधकाच्या प्रकाशचित्रणातून ती जवळ आलेली आहेत. अशी आणखी उदाहरणे आणि संदर्भ आहेत, जे हे सिद्ध करतात की, सत्यघटनाचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण हे एक प्रभावी माध्यम आहे.

२.४.२.१ महान प्रकाशचित्रकारांची मते

''प्रकाशचित्रण हा एक वेगळा रस्ता आहे पण त्याचं अंतिम ध्येय जीवन हेच आहे.''– पॉल स्ट्रँड

''कॅमेऱ्याने माणसं मारली जात नाहीत.''– टीना मोदोत्ती

'' मला जर शब्दांचा आधार घेऊन गोष्ट सांगता आली असती तर मी कॅमेऱ्याचा आधार घेतला नसता.''– वॉकर एव्हन्झ

''व्यक्तीचं चरित्र हे छायाचित्रासारखंच अंधारातून प्रकाशात येताना निरखून येतं.''– युसुफ कार्श

''युद्ध हे वय वाढत चाललेल्या अभिनेत्रीसारखं असतं, अधिकाधिक धोकादायक आणि छायाचित्रणासाठी विरूप.'' – रॉबर्ट कापा

''आपण कॅमेऱ्याने फोटो काढत नाही तर आपल्या हृदयाने आणि मनाने काढतो.''

– आर्नल्ड न्यूमन

''कॅमेरा हे माझं स्थान आहे. त्याने मी माझ्या भोवतालच्या जगाला अर्थ देतो.'' – आंद्रे कार्तेझ

२.४.२.२ प्रकाशचित्रांनी इतिहास घडवल्याची कितीतरी उदाहरणे येथे देता येतील

''निक यूट : व्हिएतनाम युद्धातील अनेक फोटोंनी समाजावर परिणाम केला आहे, पण निक यूटच्या 'नापाम गर्ल' या फोटोची प्रतिमा अजूनही समाजमनावरून पुसता येत नाही. पाश्चिमात्य जग आणि विशेषतः अमेरिकन समाज हा फोटो विसरू शकत नाही. कारण अमेरिकेने व्हिएतनाममध्ये वापरलेल्या 'नापाम' नावाच्या बॉम्बने अमेरिकेची जगात जी लाज गेली ती या फोटोत संपूर्ण नागड्या धावणाऱ्या नऊ वर्षांच्या 'किम फूकलाही' वाटली नसावी. या फोटोला जितकी बक्षिसं मिळाली असतील तितकी क्वचितच कुठल्या फोटोला मिळाली असतीत. वर्ल्ड प्रेसचा 'फोटो ऑफ द इअर' हा पुरस्कार त्याच वर्षी या फोटोला मिळाला. नंतर १९७३ साली निक यूटला या फोटोबद्दल 'पुलित्झर प्राइझ' मिळालं. निक यूट याच्या याच प्रकाशचित्रामुळे व्हिएतनामचे युद्ध आवरते घ्यावे असे अमेरिकेला वाटले.



केविन कार्टर : ''छायाचित्र जग बदलू शकतात.'' केविन कार्टर एका फोटोशूटसाठी युनायटेड नेशनच्या सुदानमध्ये मदतकार्य करणाऱ्या विमानातून सुदानमधील आयोद या गावात उतरला तेव्हा विमान फक्त ३० मिनिटं थांबणार होतं. विमानापासून वीसेक मीटर अंतरावर त्याच्यापासून त्याला एक खुरडत पुढे सरकरणारी मुलगी दिसली. ती अन्नवाटप केंद्राकडे हळूहळू सरकत होती आणि एक गिधाड तिच्यापासून काही अंतरावर उतरलं. केविनने कॅमेरा सज्ज करून खाली वाकून काही मिनिटं वाट पाहिली. मुलीमधील त्राण हळूहळू संपत होते. गिधाड पंख पसरेल याची त्याने वाट पाहिली, पण तसं घडलं नाही. गिधाड वाट पाहत होतं की या खुरडणाऱ्या भक्ष्याच्या कुडीतून जीव निघून जावा. शेवटी त्याने कॅमेरा क्लिक केला. त्याच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा फोटो त्याने नोंदला होता. हा फोटो काढल्यावर थोडा वेळ तो एका झाडाखाली बसून सिगरेट ओढत बसला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. त्याला त्याच्या मुलीची 'मेगनची' आठवण झाली. या ग्रेट फोटोबद्दल त्याचं जेवढं कौतुक झालं त्यापेक्षाही जास्त टीका झाली. मार्च १९९३ च्या 'न्यूयॉर्क टाइम्स' मध्ये हा फोटो प्रसिद्ध झाला आणि त्या फोटोवर अनेक प्रतिक्रिया आल्या.

सुदानमध्ये काढलेल्या या फोटोचा भार जन्मभर केविनच्या छातीवर राहिला. साऱ्या टीकेला त्याच्याकडे उत्तर नव्हतं, पण लोकांच्या प्रश्नांनी तो विद्ध होत होता. त्याचबरोबर या फोटोने त्याला प्रसिद्धी व यश मिळवून दिलं. त्यानंतर त्याच्यासंबंधी काढलेल्या अपेक्षांचं ओझं त्याला सैरभैर करत होतं. त्याला १९९४ चा छायाचित्रणातील सर्वांत मोठा पुरस्कार 'पुलित्झर पुरस्कार' जाहीर झाला. केविनला मिळालेल्या या सन्मानामुळे त्याला, त्याच्या कुटुंबीयांना आनंद झाला, पण केविनच्या मनात एक प्रकारचा अपराधगंड तयार झाला.

पुलित्झर मिळाल्यानंतर दोन महिन्यांनी, म्हणजेच २७ जुलै १९९४ रोजी पिकअप ट्रकचा गॅस चेंबरसारखा वापर करून केविनने आत्महत्या केली. कार्बन मोनोक्साइड या विषारी वायूचा आधार घेऊन त्याचे मृत्यूला कवटाळलं. तेव्हा केविनचं वय होतं, फक्त ३३ वर्षं. त्याच्याभोवती मित्रांना व कुटुंबातील व्यक्तींना लिहिलेली अनेक पत्रं सापडली. एका पत्रात तो म्हणतो, सुदानमधील त्या मुलीचं भूत मानेवरून मी भिरकावून टाकू शकत नाही.

दुष्काळग्रस्त आणि यादवी युद्ध सुरू असणाऱ्या देशाला मदतकार्य करणाऱ्या संघटना आता केविनचा 'गिधाड आणि मुलगी' हा फोटो मदत मिळवण्यासाठी 'पोस्टर' म्हणून वापरतात.




मार्गरेट बर्क–व्हाइट : २२ जुलै, १९४१ रोजी जर्मनीने रशियावर पहिला बॉम्ब टाकला, तेव्हा मार्गरेट ही एकमेव पाश्चात्य छायाचित्रकार मॉस्कोत उपस्थित होती. 'लाइफ' साठी तिने घेतलेले फोटो इतके महत्त्वाचे होते की, पुढची चार वर्षं 'लाइफ'ने तिला युरोपच्या रणभूमीवरच राहू दिलं. त्या काळातील पुढारी, नाझी छळछावण्या यांचं आणि अमेरिकन विमानाच्या बॉम्ब–पथकाबरोबरही तिने विमानातून प्रकाशचित्रण केलं.

मार्गरेट बर्क–व्हाइट ही युद्ध छायाचित्रकार म्हणूनही पहिली महिला छायाचित्रकार होती. दुसऱ्या महायुद्धात १९४१ साली तिने जर्मनीमध्ये काम केलं. अमेरिकन हवाईदलाबरोबर तिने उत्तर आफ्रिका, इटली आणि नंतर जर्मनीत प्रकाशचित्रण केलं. इटलीत ती वारंवार हवाई हल्ल्यांच्या जवळपास होती. ती एका मुलाखतीत म्हणते, एकदा तुम्ही भीतीवर मात केली की मोठ्या आपत्ती सहसा तुमच्या वाट्याला जात नाहीत.

१९४६ साली 'लाइफ' या मासिकाने तिला भारतात पाठवलं. स्वातंत्र्य चळवळ शिगेला पोहोचली होती आणि फाळणीचेही वारे वाहू लागले होते. १९४७ सालच्या फाळणीनंतर उसळलेल्या हिंसाचाराच्या, कत्तलींच्या, दंगलींच्या कथा तिच्या कॅमेऱ्याने संवेदनशीलतेने आपल्यापर्यंत पोहोचवल्या. फाळणीनंतर उसळलेल्या हिंसाचारात न घाबरता प्रेतांनी आणि रक्ताने माखलेल्या गल्ल्या तिने आपला कॅमेरा सोबत घेऊन पालथ्या घातल्या. निर्वासितांचे न संपणारे लोंढे छायाचित्रबद्ध केले. सोमिनी सेनगुप्ता म्हणतात, मार्गरेट बर्क–व्हाइटच्या या काळातील फोटोंमधून किंचाळ्या ऐकू येतात. फाळणीच्या संपूर्ण काळात तिने केलेलं हे काम आज दस्तावेज म्हणून उपलब्ध आहे. मार्गरेटची फाळणीवरील ६६ छायाचित्रं १९५६ साली लिहिलेल्या 'ट्रेन टू पाकिस्तान' या कादंबरीच्या २००६ साली काढलेल्या नव्या आवृत्तीत छापली आहेत. भारताच्या फाळणी दरम्यान हिंसाचारात पाच लाख लोक मारले गेले. एक कोटी ४०लाख लोकं विस्थापित झाले आणि ७००००स्त्रियांवर बलात्कार झाले अशी अंदाजे आकडेवारी आहे. फाळणीत दोन्ही बाजूंनी मारल्या गेलेल्या लोकांसाठी कुठलेही स्मारक उभारलं गेलं नाही. मार्गरेट बर्क व्हाइटची प्रकाशचित्रे म्हणजेच त्यांचं स्मारक आहे.

भारतात आल्यानंतर तिने 'लाइफ'साठी महात्मा गांधींचेही फोटो काढले. मोहम्मद अली जिना आणि नेहरू यांचेही फोटो काढले. १९५० ते ५६ या काळात तिने 'लाइफ'साठी कोरियन युद्ध, दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या खाणी आणि केनेक्टिक्ट नदीचं खोरं असे फोटोनिबंध प्रसिद्ध केले.



आल्फ्रेड स्टीग्लिट्स : अमेरिकेच्या दृश्यकलेच्या इतिहासातले महत्त्वाचं नाव आल्फ्रेड स्टीग्लिट्स. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अमेरिकन जीवनात बदलाचे वारे वहात होते, नव्या आशा निर्माण होत होत्या, राजकारण, कला यांना नव्या दिशा मिळत होत्या, जगण्याचा दर्जा बदलत होता, नवे प्रयोग होत होते आणि या सगळ्याला साक्षीदार असणारा स्टिग्लिट्स. तो स्वत: गुणी छायाचित्रकार होता पण जास्त महत्त्वाची होती त्याची प्रकाशक, संग्राहक ही कामगिरी, त्यातून त्याने इतर कलावंताना दिलेली संधी. यूरोपात राहून आल्यावर स्टीग्लिट्सला न्यूयॉर्क शहर सांस्कृतिक दृष्ट्या बकाल आहे याची जाणीव झाली आणि त्यानंतर तो सातत्याने झटला युरोपातल्या कला चळवळींची, कलेची ओळख अमेरिकेला करून देण्याकरता. त्याकरता त्याने अनेक कलाप्रदर्शनं भरवली. पिकासो, ब्रांकूशी, मातीस, शेजा, लोत्रेक यांची चित्र/शिल्प

स्टिग्लिट्समुळे अमेरिकेत पोचली. त्याच्या प्रयत्नांमुळे कला प्रदर्शनात पहिल्यांदा चित्रकलेबरोबरच छायाचित्रणाला समान दर्जा दिला गेला. स्टिग्लिट्सची ही कामगिरी वाचताना लक्षात येतं एखाद्या शहराची, देशाची समृद्ध कलासंस्कृती निर्माण होण्यामागचं रहस्य. ती आपोआप, एका रात्रीत बनत नसते, त्यामागे अशा अनेक स्टिग्लिट्सचे परिश्रम उभे असतात. एखादा कलाकार आपल्या मनातल्या विषयाचा किती ध्यास घेऊन पाठपुरावा करतो हेही स्टिग्लिट्सच्याच उदाहरणावरुन लक्षात येते. बारा वर्ष तो सातत्याने ढगांचे फोटो काढत होता. त्याची ढगांच्या सौंदर्यपूर्ण आकारांची अभ्यासचित्र, अमूर्त छायाचित्रणाचा हा ध्यास समजावून घेतल्यावर मग त्याने आपली प्रेयसी ओकिफ़ हिची जी आगळी न्यूड छायाचित्रे काढली त्यांचे अभिजात सौंदर्यमूल्य आपोआप जाणवते. या न्यूड्समुळे त्या काळच्या अमेरिकेन सामाजिक जीवनात खळबळ उडाली. त्यातूनच तीव्र व्यक्तिवादाचा उदय झाला.



अन्सल ऍडम्स : पर्यावरणवादी छायाचित्रकार अन्सल ऍडम्स छायाचित्रण कलेला माणूस आणि यंत्र यांचं द्वैत मानत असे. पृथ्वी आणि त्यावरील निसर्गाशी अध्यात्मिक नातं जुळलं असावं अशी प्रचिती देणारी त्याची छायाचित्रं आहेत. त्यात मानवी अस्तित्त्व नाही. हेन्री कार्तिअर ब्रेसां त्याच्या छायाचित्रांवर टीका करताना म्हणाला– ही छायाचित्रे पाहून वाटतं की जगाचा शेवट झाला आहे आणि उरली आहेत ती फक्त काही झाडं, खडक आणि माती, डोंगर, दर्या, चंद्र यांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी अन्सल ऍडम्सचा कॅमेरा हे एक माध्यम होतं असं

म्हटलं जाई. अत्यंत मेहनती छायाचित्रकार. जवळ जवळ दिवसाला १८ तास तो काम करी. एका फ्रेमकरता अगणित काळ दऱ्याखोऱ्यांमधून भटके.



जॉर्ज रॉजर : युद्ध छायाचित्रकार जॉर्ज रॉजर– १९४५ साली जर्मनीमधील बर्गन बेल्सन येथील छळछावणीत शिरकाव करून छायाचित्रण करणारा हा पहिला युद्धचित्रकार. छळछावणीतील मृत्यूचं थैमान त्याच्या फोटोंमुळे जगभर माहिती झालं. या बेल्सन कॅम्पमधे किमान चार हजार प्रेतं सडलेल्या अवस्थेत उघड्यावर होती. रॉजर म्हणतो, हातात कॅमेरा घेऊन मी कितीतरी तास ते फोटो काढत होतो. जणू काही माझं मन मरुन गेलं होतं.

प्रेतांचा सभोवार खच पडलेला असताना त्याच्या मनात कुठल्या अँगलने हे फोटो काढले असता ती रचना चांगली दिसेल असे विचार येत होते. आपण इतके बधीर कसे झालो याचा त्याला नंतर जबर मानसिक धक्का बसला. त्या विचारांचा अपराधगंड त्याच्या मनात जन्मभर राहिला. हे फोटो रॉजरने आपल्या उत्तरायुष्यात कधीही परत पाहिले नाहीत. त्या आठवणींनीही तो तीव्र नैराश्याच्या मनःस्थितीत जात असे.

या अनुभवानंतर युद्धाचा वीट येऊन रॉजर समाज आणि वन्यजीवन यांच्या छायाचित्रणाकडे वळला. सुदान, युगांडा, द. आफ्रिका येथील वन्य जमाती, चालीरिती, संस्कृती या विषयांच्या नोंदी त्याने घेतल्या. युद्धाच्या भयानकतेला सामोर गेल्यामुळे तो

अतिशय हळवा झाला होता, आदिवासींची जीवनपद्धती आणि निसर्गाशी असलेले त्यांचे नाते हा त्याच्या जीवनभराच्या अभ्यासाचा विषय झाला. मानवी संस्कृतीचे नवे संदर्भ त्याने आदिम संस्कृतीच्या अभ्यासातून शोधले.



रॉबर्ट कापा : रॉबर्ट कापाच्या युद्धाच्या फोटोंमधून युद्धाची दहशत, भयानकता दिसते आणि कंटाळाही दिसतो. विलक्षण मानवी चेहरा त्याच्या या छायाचित्रांमधूनच समोर येतो. तो युद्धाचा द्वेष करत असे. त्यामुळे त्याने युद्धाचं कधीही उदात्तीकरण केलं नाही. तो म्हणत असे– लोकांच्या वेदना, दु:ख पाहून ते कॅमेऱ्यात नोंदवताना जाणवते ती हतबलता आणि तरीही त्या नोंदी घेणं आवश्यक असतं, सोपं मात्र नसतं.




रॉबर्ट कॅपा यांनी छायाचित्रित केलेले मृत लोकांचे नॉर्मंडी मधील शेत © फोटो नॉर्मंडी / फ्लिकर

डॉन मॅक्लिन : डॉन मॅक्लिन लिहितो– इतिहास असं सांगतो की, प्रत्येक युद्धाला एका साक्षीदाराची गरज असते. ज्या प्रतिमा लोकांना युद्धाविषयी घृणा आणतील, त्यांच्या जगण्याच्या विचारात बदल घडवून आणतील त्या प्रतीकांच्या शोधात आपण रहायला हवं. एकदा एका पॅलेस्टाइन बाईने त्याच्या मुस्कटात लावली. नुकतंच तिचं घर उध्वस्त झालं होतं आणि नवरा मरून पडला होता आणि मी आत फोटो घेण्यास धावलो. असे अनुभव खूप शिकवून जातात. युद्धसुद्धा एखाद्या व्यसनासारखं असतं. युद्ध परिस्थितीतील घटना तुम्हाला उत्तेजित करू शकतात.

भारतातील कॉलऱ्याच्या साथीत बळी पडणाऱ्या आधीच दारिद्र्यात पिचणाऱ्या कुटुंबांचे फोटो काढतानाची मनस्थिती तो वर्णन करतो– फोटो घेत असताना माझ्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. फोटो काढून झाल्यावर मी खिशातले होते तितके भारतीय पैसे त्यांच्या पुढ्यात

टाकून बाहेर आलो, पण मला आत कुठेतरी स्वत:बद्दल अतिशय घृणा वाटली. असं वाटलं माझी सर्जनशीलता त्यांच्या शोषणावर आधारीत आहे. पण मी स्वत:ची समजूत काढतो की त्यांच्या परिस्थितीला मी जबाबदार नाही.''[१२]



माणूस आणि आजारी पत्नी, बहुदा कॉलराचा बळी, बांगलादेश, १९७१

''गेल्या महिन्यात मेक्सिको–अमेरिकेच्या सीमेवरील एका छायाचित्राने पाहणाऱ्यांची मने हेलावली, व्याकूळ झाली. अशी जगाला हादरवून टाकणारी वेदनांची छायाचित्रे या आधीही आपण अनुभवलेली आहेत.

गेल्या २७ जून रोजी जगभरातील प्रसार माध्यमांमध्ये आणि सोशल मीडियावरही एकाच छायाचित्राची चर्चा होती. समुद्राच्या किनाऱ्यावरील पाण्यात उपडा पडलेला एक पन्नाशीच्या पुरुषाचा देह आणि त्या माणसाच्या पाठीवर जणू टी–शर्टमध्ये दडवले असावे असे एका छोट्या बाळाचे अर्धे उघडे शरीर. अर्थात ते बाळही मृत पावलेले. पाण्यावर दोन मृतदेह तरंगत, निपचित पडलेले आहेत. त्यांचा मृत्यू झाला असला तरी त्या लहान बाळाला वाचवायचा प्रयत्न

त्या बापाने मरणाआधी कसा केला असेल याची कल्पना करून, ते छायाचित्र पाहून जगातील अनेक संवेदनशील माणसं हेलावून गेली. समाज माध्यमावर हे छायाचित्रदेखील त्याच भावनेनं शेअर केलं गेलं आणि निर्वासितांच्या प्रश्नाकडे जगाचं नव्यानं लक्ष वेधलं गेलं!

ऑस्कर आणि व्हेलेरिया मार्टिनेज हे या बापलेकीचं नाव. अमेरिका–मेक्सिको सीमेवर सुरू असलेल्या वादाचा फटका साल्वाडोअरमधील नागरिकांना बसत आहे. अनेक नागरिकांनी अमेरिकेकडे शरणागतीची मागणी केली आहे. त्यात ऑस्कर देखील होता, त्याच्या पत्नीसह तो सीमा पार करत होता. त्यावेळी बोट उलटली. पाण्यात बोट उलटत असताना त्याने आपलं बाळ आपल्यापासून दूर जाऊ नये म्हणून आपल्या टीशर्ट मध्ये घट्ट पकडून ठेवलं. अगदी दोघांचाही मृत्यू झाला, तरी ते बाप–लेक तसेच एकमेकांना बिलगून होते. बाप आपल्या तान्हुलीला शेवटपर्यंत वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्या छायाचित्रातून दिसतं. ते फक्त दोन मृतदेह नाहीत, तर आपल्या छकुलीला स्वतःचं मरण येईपर्यंत वाचविण्याचा प्रयत्न करणारा बाप त्यात पाहणाऱ्याला दिसतो. असं असल्यानेच खरंतर ती प्रतिमा वर्तमानपत्रात व समाज माध्यमात प्रसारित झाली आणि जगात गाजली.



हे छायाचित्र प्रसारित झाल्यामुळे मेक्सिको–अमेरिकेच्या या सीमाप्रश्नांची काहीही माहिती नसलेल्या किंवा प्रत्यक्ष संबंध नसलेल्या जगभरातील अनेक वाचकांनाही या समस्येचं भयावह स्वरूप लक्षात आलं. भाषा, धर्म, प्रांत यापलीकडे कुठेतरी माणुसकी नावाच्या धर्माची

आज किती आणि कशी गरज आहे याची जाणीव झाली. त्या पार्श्वभूमीवर जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्राचे अध्यक्ष 'डोनाल्ड ट्रम्प' मात्र अत्यंत निर्दयपणे, या सर्व निर्वासितांनी जेथून ते आले तेथे परत जावं, असं विधान करतात. निर्वासितांबाबत रशियाचे राष्ट्राध्यक्ष 'पुतीन' हेदेखील हीच भूमिका मांडताना दिसतात. दुसरीकडे, छायाचित्राच्या भाषेत बोलायचं झालं तर जगभरात 'स्व'मध्ये गुंतलेला, त्यामुळेच सेल्फीच्या प्रेमात पडलेल्याला आपल्याशिवाय दुसऱ्याचं काहीच पडलेलं नसणारा समाज वाढत असल्याचं दिसून येत आहे. देश व राष्ट्रवादाचा दाखला घेऊन धर्म, वंश व प्रांताचा संदर्भ देत देशातील नागरिकांचं मन भरकटवून टाकण्याचा प्रयत्न सत्ताधीशांकडून होत आहे. असं सारं असताना, त्या एका छायाचित्राने या सगळ्यांना विचार करायला भाग पाडलं आहे.

एखादं छायाचित्र हे एक हजार शब्दांच्या लेखापेक्षाही जास्त परिणामकारक असतं, हे खरं असलं तरी ते पाहणारांच्या मनात सहिष्णुतेची भावना नसेल तर त्याचा काहीच परिणाम होणार नाही.

ही अशी अनेक वृत्तछायाचित्रं माणसाची संवेदनशीलता जागृत ठेवण्याचं काम करतात. भारतातील भोपाळ गॅस दुर्घटनेचे असे लहान मुलाला पुरतानाचे छायाचित्र प्रसिद्ध झाल्यावर त्या दुर्घटनेची भयानकता देशभरात–जगभरात जाणवली. २ ते ४ डिसेंबर १९८४ रोजी भोपाळमध्ये युनियन कार्बाइड कंपनीमुळे घडलेल्या गॅस दुर्घटनेमुळे सुमारे आठ हजार माणसांचा गुदमरून बळी गेला. लाखभर लोक डोळे व श्वसनाच्या विकाराने विकलांग झाले. पाब्लो बार्थोलो यांनी एक लहान मुलाला पुरतानाचं छायाचित्र काढलं. त्या मुलाचे कोणीच पालक त्याची मागणी करायला आले नाही. त्या मृत बालकाची नोंद तरी झाली का हेही समजलं नाही. त्या घटनेची भयानकता आजही त्या फोटोतून कळते. पुढे हेच प्रकाशचित्र १९८४ सालच 'वर्ल्ड प्रेस फोटो ऑफ द इएर' म्हणून निवडल गेलं. अशा पद्धतीने जगातला मानाचा समजला जाणारा पुरस्कार भारतीय छायाचित्रकाराला मिळाला.



उपासमार हा असाच एक विषय जगभर महत्त्वाचा राहिला आहे. १९६९ साली नायजेरिया आणि बिर्लामधील तीन वर्षं चाललेल्या युद्धात दहा लाख लोक मारले गेले. त्यामुळे कित्येक लाख लोक अन्नपाण्याविना तडफडून मेले. डॉन मॅकलिन हा लंडनच्या 'संडे टाइम्स' करता काम करणारा छायाचित्रकार बिआफ्रामध्ये काम करायला गेला होता. आत्यंतिक उपासमारीने शरीराचं चिपाड झालेल्या २४ वर्षांच्या तरुण मातेचं, तान्ह्या बाळाला दूध

पाजतानाचं छायाचित्र त्याने काढलं. अन्नपाण्याविना बिआफ्रामधील मातेची काय अवस्था झाली, हे दाखविणारं ते छायाचित्र मनाला सुन्न करतं.



दृश्य माध्यमांची चलती असलेल्या जगात मोबाइलमुळे आज छायाचित्रांचा अक्षरशः सुळसुळाट झालेला आहे. परंतु परिणामकारक छायाचित्र मिळण्यासाठी छायाचित्रकारात पत्रकार दडलेला असावा लागतो आणि पत्रकारामध्ये माणुसकीची आच असणारं संवेदनशील मन असावं लागतं! वर्षानुवर्ष मनाचा ठाव घेणारे आणि इतिहास लिहिणारे छायाचित्र तेव्हाच जन्माला येते.''[१३]

२.४.२.३ बीबीसीच्या १० प्रकाशचित्रांनी २०१४ साली इतिहास घडवल्याची उदाहरणे

''बी.बी.सी.च्या हिस्ट्री मासिकाने देखील साल २०१४ मध्ये ज्या १० प्रकाशचित्रांनी (फोटोंनी) इतिहास घडवला अशी प्रकाशचित्रे त्यांनी जगापुढे आणली. ती पाहून त्या मागच सत्य आणि इतिहास डोळ्यापुढे जिवंत झाल्याशिवाय राहत नाही.

१. टियानॅनमेन चौकात एकटा निषेध, बीजिंग, ५ जून १९८९.




(© बेटमॅन गेट्टी इमेजेस)

२. अपोलो ८, २४ डिसेंबर १९६८.



(© एसएसपीएल / गेट्टी इमेजेस)

३. अली मजले लिस्टन मेन, २५ मे १९६५.




(© बेटमॅन / गेट्टी इमेजेस)

४. अँटीएटेमचा मृत. शार्पसबर्ग जवळ, मेरीलँड, १९ सप्टेंबर १८६२.



(© कॉर्बिस / गेट्टी इमेजेस)

५. हिरोशिमाचा भयानक अनुभव एनोला गे, ६ ऑगस्ट १९४५.



(© युनिव्हर्सल हिस्ट्री आर्काइव्ह / यूआयजी गेट्टी इमेजेसद्वारे)

६. नेल्सन मंडेलाचे वॉक टू फ्रीडम पार्ल, दक्षिण आफ्रिका, ११ फेब्रुवारी १९९०.



(© अल्लन टॅन्नेनबॅम / द लाइफ इमेज कलेक्शन / गेट्टी इमेजेस)

७. भीती आणि वेदना सोमे येथे. जुलै १९१६, उत्तर फ्रान्स.



(© जेओफ्री मालिनस / आयडब्ल्यूएम गेट्टी इमेजेसद्वारे)

८. स्टॅलिनने ट्रॉटस्कीला इतिहासामधून पुसून टाकले. बोलशोई थिएटरच्या बाहेर, मॉस्को, ५ मे १९२०.



(© युनिव्हर्सल हिस्ट्री आर्काइव्ह / गेट्टी इमेजेस)

९. रेचस्टॅगवर लाल झेंडा उभारणे. बर्लिन, २ मे १९४५.



(छायाचित्रकार: येवगेनीखल्देई © गेट्टी इमेजेस)

१०. ट्रँग बँगची ज्वलंत मुलगी, दक्षिण व्हिएतनाम, ८ जून १९७२.''[१४]



(© गेट्टी इमेजेस)

२.४.२.४ भारतातील महान प्रकाशचित्रकार

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी आणि नंतरच्या काळापासून ते आजपर्यंत असंख्य फोटोग्राफर्सनी त्यांच्या त्यांच्या परीने त्यांच्या प्रकाशचित्रणातून सत्य घटना, त्या वेळेची वस्तुस्थिती समाजापर्यंत पोहचवण्याचे काम केले. समाजमनावर परिणाम करणारी प्रकाशचित्रे त्यांनी काढली. ते प्रकाशचित्रकार आहेत:


रघु राय, ए. एल. प्रतीक, बंदी राजन बासू, बी. एस. रंगा, गौतम राजध्यक्ष, होमाई व्यारावाला (महिला), कुल्वंत रॉय, लालाराजा दीनदयाल, मधविह कृष्णण, प्रबुद्धा दासगुपता, रघुबीर सिंघ, सुभाशंकर बॅनर्जी, किशोर पारेख, तोलाराम कुकरेजा, गोपाल बोधे (हवाई छायाचित्रकार) प्रशांत पांजियार, संदेश भंडारे, आर्को दत्ता, स्वपण पारेख, मुकेश पार्पियानी, सॅबिस्टीन डिसोझा, निरज पिर्यदर्शी, पलशरंजन भौमिक, प्रदीप चद्रा, प्रदीप बांदेकर, जितेंद्र आर्य, अतुल कसबेकर, डेबू रत्नानि, सुधारक ओलवे, प्रशांत नाकवे, हौशी जाल, संतोष बने, अतुल लोके, अतुल कांबळे, दयानीता सिंघ (महिला), सोनी तारापूरवाला (महिला), राधिका रामस्वामी (महिला), सुधीर शिवराम, पंकज कौशल, इत्यादी.

''रघू रायः हे एक मनस्वी छायाचित्रकार आहेत. त्यांच्या दृष्टिकोनातून इंदिरा गांधी, मदर तेरेसा, गंगाघाट, कोलकाता शहरातील जनजीवन, भोपाळ गॅसकांड आणि त्यानंतरचे भयाण वास्तव, मुंबईतील मरिनड्राईव्ह, गावखेड्यात राहणारी असंख्य सामान्य माणसे, त्यांची जीवनपद्धती सारे काही वृत्तपत्रातून लोकांसमोर मांडले. वृत्तपत्रातील छायाचित्रांना एक महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. भोपाळच्या भयाण वास्तवात एका छोट्या मुलाला जमिनीत पुरताना दाखवलेला चेहरा आजही अनेकांच्या लक्षात असेल. इतकी माणसे त्यावेळी मेली होती की, पुरताना त्या मुलाचे डोळे उघडे आहेत हे देखील कुणाच्या लक्षात आले नव्हते, पण रघू राय यांच्या कॅमेऱ्याने ते टिपले होते. भोपाळ गॅसकांडची भयानकता एका फोटोत सामावली गेली. आपल्या कलेविषयी ते अतिशय जागरूक आहेत. 'मी जेव्हा क्लिक करतो त्यावेळी त्या क्षणाचे ऐतिहासिक दस्तावेज तयार होत असते. लिखित इतिहास बदलता येतो, पुन्हा लिहिता येतो. पण आमचे छायाचित्र हे एक ऐतिहासिक न बदलणारे दस्तऐवज असते.' माननीय पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे ते फारच आवडते प्रकाशचित्रकार होते. त्या कुठल्याही सभेला, कार्यक्रमांना जाताना रघु राय त्यांच्या सोबतच असायचे. नंतर भारत सरकारने त्यांना पद्मश्री देऊन गौरविले.''[१५]



''**होमाई व्यारावाला** : भारतातल्या पहिल्या महिला वृत्तछायाचित्रकार होमाई व्यारावाला या होत्या. १९३०च्या सुमारास त्यांनी प्रकाशचित्रण क्षेत्रात काम करायला सुरुवात केली. 'ईस्टर्न ब्युरो ब्रिटीश इन्फर्मेशन सर्व्हिसेस' साठी त्यांनी प्रकाशचित्रण सुरू केले. महात्मा

गांधींच्या अनेक सभा, भारताच्या फाळणीचा निर्णय झाला ती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक, पहिल्या स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण असे ऐतिहासिक क्षण, तसेच पाकिस्तान निर्मितीच्या आदल्या दिवशीच्या पत्रकार परिषदेतील मोहम्मद अली जिना, भारताला स्वातंत्र्य प्रदान केल्यानंतर भारत सोडून जाणारे लॉर्ड माउंटबॅटन, तिबेटमधून भारतात प्रवेश करणारे तरुण दलाई लामा, पहिल्या प्रजासत्ताकदिनी मानवंदना स्वीकारणारे, राष्ट्रपती भवनात पहिल्यांदा टेलिफोन लाइन लागली तेव्हा रिसिव्हर तोंडासमोर धरून हसत असणारे डॉ. राजेंद्रप्रसाद याबरोबरच जॅकलिन केनेडी, अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर, डॉ. मार्टिन ल्युथर किंग अशा दिग्गज व्यक्तींचे होमाईंनी जे फोटो काढले आहेत त्याचे मूल्य शब्दातीत आहे. २०११ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मविभूषणने सन्मानित केले. त्यांच्या अनेक फोटोंनी समाजाला विचार करायला भाग पाडले.''[१६]




''**गोपाळ बोधे**: देशातील आठहजार पाचशे किलो मीटरच्या सागरी किनारपट्टीचे छायाचित्रण आणि लडाखचे टोपोग्राफिक फोटोग्राफी करणारे ते जगातील पहिले छायाचित्रकार ठरले. त्यांच्या कामाचा एक ध्यास मनी असायचा, तो म्हणजे कोणत्याही कलाकृतीचे डॉक्युमेंटेशन करणे. हे काम त्यांनी इतक्या जिव्हाळ्याने केले की त्यांचा हा ठेवा पुढील शेकडो वर्षांसाठी संग्रही राहिला आहे.

नव्वदीच्या उत्तरार्धापासून बोधे हे सर्वांना हवाई छायाचित्रकार म्हणून परिचित झाले. नौदलातील नोकरीची संधी साधत त्यांनी त्या दरम्यान केलेल्या अनेक हवाई सफरींमधून किनाऱ्यालगतचे सर्व दीपगृह आपल्या कॅमेऱ्यात टिपले. देशातील ऐतिहासिक देवळांचे जतन आणि संवर्धन व्हावे यासाठी त्यांनी देशातील विविध देवळांची हवाई छायाचित्रे काढली. त्यात तिरुपती मंदिर, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, मुंबईतील प्रसिद्ध सिध्दिविनायक मंदिर आणि शेगावच्या गजानन महाराज मंदिराचे त्यांनी पुस्तक तयार केले. त्याचबरोबर 'गोवा अ व्ह्यू फ्रॉम हेवेन्स','मुंबई अ व्ह्यू फ्रॉम हेवेन्स', 'पोर्ट्रेट्स ऑफ इंडियाज लाईट हाऊसेस', 'एन्शंट ट्रेड रुट्स ऑफ महाराष्ट्र', 'महाराष्ट्र अ व्ह्यू फ्रॉम हेवेन्स', 'लक्षद्वीप अ व्ह्यू फ्रॉम हेवेन्स' ही सर्व पुस्तके काढली. आपल्या छायाचित्रणाचा वापर हा अधिकाधिक समाजोपयोगी कामासाठी करण्याकडे बोधे यांचा विशेष कल होता. महाराष्ट्राच्या पुस्तकात त्यांनी दाखवलेले लोणार सरोवर, अजिंठा–वेरूळ, कैलास लेण्या तसेच कृष्णा, गोदावरी नद्यांची विस्तीर्ण पात्रे, चंद्रभागेचा तीर हे सारे विलक्षण असेच होते.''[१७]



किशोर पारेख: जेव्हा भारत पाकिस्तान फाळणी झाली आणि बांग्लादेश उदयास आले तेव्हा किशोर पारेख यांनी बांग्लादेशात जाऊन असंख्य प्रकाशचित्रे काढली. नंतर मुंबईमध्ये येऊन ती विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रे व मासिकांना पुरवली. कालांतराने ते परदेशात गेले व तेथे त्यांनी 'बांग्लादेश ए ब्रुटल बर्थ' हे प्रकाशचित्रांचे पुस्तक काढले. पुढे त्यांचे हेच पुस्तक भारत व बांग्लादेशसाठी देखील मोलाचा दस्तावेज ठरले. त्या पुस्तकाच्या नंतर असंख्य प्रती काढण्यात आल्या. भारत सरकारने तसेच बांग्लादेश सरकारने देखील किशोर पारेख यांचा सन्मान केला.



सॅबिस्टीन डिसोझा: या छायाचित्रकाराचा उल्लेख येथे करणे फारच जरुरीचे आहे. या छायाचित्रकाराच्या छायाचित्रांनी इतिहास घडवला. मुंबई मध्ये टाइम्स वृत्त समूहासाठी काम करत असताना, सॅबिस्टीन डिसोझा यांनी २६ नोव्हेंबर, २००८ रोजी जो आतिरेकी हल्ला मुंबई मध्ये झाला त्याची छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे छायाचित्रे काढली. ती अंगावरती शहारे आणणारी होती. विशेष म्हणजे हातात ते एके५६ ही मशीन गन घेऊन बेछूट गोळीबार करतानाचा अजमाल कसाब आणि त्याचा सहकारी या दोन अतिरेक्यांचा पाठलाग करून त्यांनी फोटो काढले. त्या नंतर ते दोन अतिरेकी जेव्हा स्टेशनच्या बाहेर गेले तेव्हा देखील सॅबिस्टीन

डिसोझा यांनी स्टेशनच्या आवारात मृत व जखमी व्यक्तींच्या रक्ताचा सडा होता तो कॅमेऱ्यात बंदिस्त केला. पूर्ण जगाला पहिल्यांदा जिवंत अतिरेकी दिसला तो सॅबिस्टीन डिसोझा यांच्या धाडसामुळे. त्यानी काढलेल्या फोटोमुळे.



पुढे जेव्हा कोर्टामध्ये अजमल कसाबचा खटला सुरू झाला तेव्हा न्यायाधीशांनी साक्षी पुरावे म्हणून सॅबिस्टीन डिसोझा यांचे फोटो ग्राह्य धरले व प्रत्यक्षदर्शी म्हणून सॅबिस्टीनची साक्ष देखील नोंदवून घेतली. विशेष म्हणजे न्यायाधीशांनी देखील सॅबिस्टीन डिसोझा यांची फारच स्तुती केली. पुढे अजमल कसाबला फाशी देण्यात आली.

सॅबिस्टीन डिसोझा यांचा दुसरा गुजरात दंगलीचा फोटो फारच लोकप्रिय झाला. २८ फेब्रुवारी,२००२मध्ये गुजरातची दंगल झाली. त्यामध्ये २०००जण मृत्युमुखी पडले. ३००जण बेपत्ता झाले आणि २५००जण जखमी झाले. गुजरात दंगलीचा चेहरा म्हणून या फोटोला आताही ओळखले जाते.



नयन खानोलकर: मुंबईमधील वन्यजीव संशोधक नयन खानोलकर यांच्या बिबट्याच्या फोटोला बीबीसीच्या वन्यजीव छायाचित्र स्पर्धेत सर्वोत्कृष्ट छायाचित्राचा पुरस्कार मिळालाय.

मुंबईच्या आरे मिल्क कॉलनीत काढलेला हा बिबट्याचा फोटो आहे. अर्बन वाईल्डलाइफ या श्रेणीत या फोटोने हा पुरस्कार पटकावला. बिबट्यांच्या येण्या–जाण्याच्या वाटांवर त्यांनी कॅमेरा ट्रॅप लावले आणि अशाच एका ठिकाणी आरे कॉलनीतल्या एका घराजवळ हा बिबट्या कॅमेऱ्यात चित्रित झाला.



२.४.२.५ 'द वीक' या मासिकाने २०१६ साली भारताला अचंबित करणार्या अशा ७ फोटोंची माहिती दिली.

द वीक या मासिकाने देखील भारताला अचंबित करणार्या अशा ७ फोटोंची माहिती त्यांच्या मासिकात १९ ऑगस्ट, २०१६ला दिली आहे. ते ७ फोटो शीर्षकासोबत खालीलप्रमाणे

१. जम्फेलयेशी आत्मद्रोह (२०१२)



तिबेटमधील चिनी व्यापाराच्या निषेधार्थ जम्फेलयेशीने स्वत: ला पेटवले । एएफपी

२. मुंबईचा दहशतवादी हल्ला, २६/११ (२००८)



२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यादरम्यान आयकॉनिक ताज हॉटेलमधील बिलो धूर । एपी

३. निसर्गाचा कोपातून वाचलेले (२००५)



फोटोजर्नलिस्ट आर्को दत्ताचा आयकॉनिक फोटो । रॉयटर्स

४. गुजरात दंगलींचा चेहरा (२००२)




२००२ च्या गुजरात दंगली दरम्यान कुतुबुद्दीन अन्सारी याचे आर्को दत्तांनी काढलेले छायाचित्र

जेव्हा त्सुनामी वादळ आले तेव्हा मुंबईमध्ये आर्को दत्ता आणि संशोधक दोघेही व्हिण्टेज कार रॅलीचा इव्हेंट करत होते. मुंबई ते बांद्रा अशी ती रॅली दोघांनी फोटोंच्या माध्यमातून शूट केली, तेव्हाच आर्कोला फोन आला आणि तो त्याला म्हणाला मी त्सुनामी असाइमेंट करायला

चाललोय आणि तो क्षणात निघून देखील गेला. आर्को यांचा हा त्सुनामीचा फोटो सर्वच वृत्तपत्रांनी वापरला. त्याच फोटोला नंतर 'वर्ल्ड प्रेस फोटो ऑफ द ईयर २००५' चा पुरस्कार देखील मिळाला. तेव्हाच आर्को दत्ता हा जगाच्या काना-कोपर्यात जाऊन पोहोचला.

आर्को दत्ताच्या दुसर्या गुजरात दंगलीच्या फोटोने देखील इतिहास घडवला. गुजरात दंगलीचा चेहरा म्हणून या फोटोकडे पहिले जाते. तेव्हा सर्वात जास्त वृत्तपत्रांनी व मासिकांनी हा फोटो वापरला.

५. बाबरी मशीद विध्वंस (१९९२)



१९९२ मध्ये, हजारो हिंदू कारसेवकांनी सोळाव्या शतकातील अयोध्येची बाबरी मशीद पाडली.

६. राजीव गांधींची हत्या (१९९१)




राजीव गांधींचे शेवटचे छायाचित्र, त्यांच्या हत्येच्या काही क्षण आधी हे क्लिक केले गेले होते.

७ 'अज्ञात मुलाचे दफन' (१९८४)




भोपाळ गॅस दुर्घटनेत ठार झालेल्या अज्ञात मुलाचे दफन''[१८]

२.४.२.६ खालील काही दुर्मिळ जुनी व फारच मौल्यवान पुस्तके संशोधकाला उपलब्ध झाली. ती पुस्तके व त्यातील ''काही परिणामकारक प्रकाशचित्रे''[१९]



छायाचित्रकार: अर्नोल्ड न्यूमन



पाब्लो पिकासो, वल्लौरिस, फ्रान्स, १९५४



Max Ernst, New York City, 1942


मॅक्स अर्न्स्ट, न्यूयॉर्क शहर, १९४२

छायाचित्रकार: सेसिल बीटन



चार्ल्स जेम्स संध्याकाळचे कपडे, न्यूयॉर्क, १९४८

छायाचित्रकार: डोनाल्ड मॅक्लिन




खाली आणि बाहेर, लंडन, १९७३




U.S. Marines with wounded comrade, Hué, 1968


यु.एस. मरीनस सोबत जखमी कॉम्ग्रेड, ह्यू, १९६८







माउस मॅन, केंब्रिज,१९७८






Wounded child being rescued by army medic, Hué, 1968

जखमी मुलाची सुटका लष्कराने केली, ह्यू, १९६८

छायाचित्रकार: हेन्री ब्रेसन



कॅथरिन अन पोर्टर, १९४६




आंद्रे पायरे डे मंडियर्ग्यूज आणि बोना–१९७२


छायाचित्रकार: हेनरी कार्टियर–ब्रेसन, भारतात




उत्तर भारत, १९४७, मुस्लिम शरणार्थी ट्रेन दिल्ली ते लाहोर,
पाकिस्तान, कुंकशाहा स्थानकातून जात होती




केरळ राज्यातील त्रिवेंद्रमजवळ एका माजी चर्चमध्ये, १९६६ ला थूंबा रॉकेट इक्वेटोरियल
लॉन्चिंग स्टेशन येथे लॉन्चची तयारी करत आहेत



ट्रॉम्बे, बॉम्बे जवळ, १९६६, अणु उर्जा संयंत्र.




दिल्ली १९४८, माउंटबॅटेनसोबत पंडित नेहरू गव्हर्मेंट हाऊसच्या बाहेर



80 Cheruthuruthi, Kerala, 1950. A teacher of Kathakali dance drama at Kalamandalam school massages one of the pupils with his foot.

केरुथुरुठी, केरळ, १९५०, कलामंडलम शाळेतील कथकली नृत्य नाटकाच्या शिक्षकाने एका विद्यार्थ्याची पायाने मालिश केले




66 Madurai, southern India, 1950.

मदुराई, दक्षिण भारत, १९५०.



44 Delhi 1948. Crowds wait to pay their last respects as the funeral cortège approaches the cremation ground.


दिल्ली १९४८, अंत्यसंस्कार कॉर्टेज स्मशानभूमीजवळ येताच लोक शेवटचे श्रद्धांजली वाहण्याची प्रतिक्षा करतात.



16 Baroda 1948. The second Maharani of Baroda in the Laxmi Vilas Palace, wearing a gold-embroidered sari in honour of her husband's birthday.

बडोदा १९४८, लक्ष्मी विलास पॅलेसमधील बडोद्याच्या दुसऱ्या महाराणीने पतीच्या वाढदिवसाच्या सन्मानार्थ सोन्याच्या भरतकामाची साडी परिधान केली.

छायाचित्रकार: जूलिया मार्गरेट



बेरेटसह सर जॉन हर्शेल, १८६७


छायाचित्रकार: मॅन रे



La Marquise Casati at the Beaumont Ball, 1927


१९२७ मध्ये ब्यूमॉन्ट बॉलवर ला मार्क्वेस कॅसॅटि


छायाचित्रकार: पीटे टर्नर



वृक्षातील स्त्रिया, स्वीडन, १९६८

छायाचित्रकार: थॉमस हॉपकर





Muhammad Ali, Chicago, 1966


मुहम्मद अली, शिकागो, १९६६



Crippled beggar, Quincy, Illinois, 1964

अपंग भिकारी, क्विन्सी, इलिनॉय, १९६४

''प्रथम महायुद्ध (World War I)''[२०]



Below: A mass grave for some of the 80,000 French soldiers who died during the Marne fighting.

that there were no Anglo-French forces facing his right flank but Joffre had actually been creating a new force near



मार्नच्या लढाईदरम्यान मृत्यू पावलेल्या ८०,००० फ्रेंच सैनिकांपैकी
काहींसाठी एक सामूहिक कबर



Above: A German messenger dog captured in mid-air as it races to the rear to deliver a message.

एक जर्मन मेसेंजर कुत्रा संदेश घेऊन जात असताना पकडला गेला कारण तो निरोप देण्यासाठी धावत आहे



Above: Colonial forces, such as these Senegalese and Indian troops, were an important part of both the French and British war efforts.

the initiative on the Western Front had wholly passed to the Allies. Foch, the architect of the Allied victory, was created Marshal of France on 6 August.



Above: British troops advance towards the top of Messines Ridge – many of its German defenders were too dazed to offer much resistance.

everywhere. Their attempts to push the British off the ridge continued but with less ferocity until the 14th by which point

standards of the conflict, the Battle of Messines had been an overwhelming success for the



Above: A detachment of Indian troops on anti-aircraft watch with a Lewis machine-gun.

भारतीय सैन्यांची तुकडी, अँटीक्राफ्टवरती लुईस मशीनगनच्या सहाय्याने पाहताना

Below: Battleships from the Anglo-French fleet line up across the entrance to the Dardanelles.

Western Front would cost too many lives and that Germany might be more easily defeated

Anglo-French operation at the end of the month. The Royal



Below: A German soldier gives a wounded Russian soldier a drink on a Galician battlefield, June 1915.

The main, two-pronged


was against a great salient that included eastern Russian



एक जर्मन सैनिक जखमी रशियन सैनिकाला गॅलिशियन बॅटलफील्डवर जून १९१५ मध्ये एक पेय देतो

Below: The badly damaged centre of Ypres pictured in early 1915 after several months of bombardment.

were to clear the salient, taking high ground that would give their troops a local advantage,



१९१५ च्या सुरुवातीच्या काळात अनेक महिन्यांच्या बॉम्बस्फोटानंतर वायप्रेसचे दुरावस्थेतील केंद्राचे चित्र

२.४.३ छायाचित्रांची दुसरी बाजू

''आता पर्यंत आपण जमेची बाजू पहिली. प्रकाशचित्रांचे अफाट सामर्थ्य आपण अनुभवले. प्रकाशचित्रांना दुसरीपण बाजू असते हे देखील आपल्याला विसरून चालणार नाही. एकविसाव्या शतकात छायाचित्रकारांवरचे वाढते तणाव, जबाबदाऱ्या, स्पर्धांचे स्वरुपच अत्यंत वेगळे आहे. जीवघेण्या माध्यमस्पर्धेमुळे छायाचित्रकारावरील अवास्तव अपेक्षांचे ओझे त्यांनी स्वत: आणि आपणही वाढवत नेले आहे. शिवाय तांत्रिकतेचा विस्फोट. कॅमेऱ्याला कोणी फसवू शकत नाही असं एकेकाळी म्हणत असत. छायाचित्रकारांनी आपल्याला सत्य दाखवावे अशी एक मूलभूत अपेक्षा असते. मात्र आताच्या फोटोशॉप आणि डिजिटल युगात या म्हणण्यात फारसे तथ्य उरले नाही. लोकांची छायाचित्रकार आणि छायाचित्रांकडे बघण्याची दृष्टी बदलली. छायाचित्रांचा वाढता गैरवापर, तांत्रिकतेवर जास्तीतजास्त विसंबण्याची वृत्ती, व्यावसायिकतेचं भयावह रूप, एकंदरीतच गढुळलेले समाजमन या सगळ्यातून आता छायाचित्रणाची कला आपल्यातील विशुद्धता, संवेदनशीलता, सौंदर्य, सत्य दाखवण्याची क्षमता किती प्रमाणात अबाधित राखू शकते हे पहाणं महत्त्वाचं ठरेल.''[२१]

''तांत्रिकीकरणाच्या झपाट्याने आणि छायाचित्रलेखनाच्या उपयुक्तते संदर्भातील अर्थकारणामुळे छायाचित्रं सत्यापासून दूर गेली. 'दिसते हेच सत्य' पासून 'दिसते ते सत्य नाही व नसणारच' यापर्यंत झालेला प्रवास, सत्य, आभासी सत्य, रचित सत्य, सत्य–सदृश्य, सत्याचा एक तुकडा, अर्ध सत्य, असत्य अशा निरनिराळ्या छटांच्या अनुषंगाने, वेगवेगळ्या नैतिक–अनैतिक पेचांच्या काठांवर आपटत पुढे जात राहिला. स्क्रोलमधील बातमी आलेसीओ मामोया इटालियन फोटोग्राफरच्या मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशात चित्रित केलेल्या छायाचित्र मालिकेविषयी होती. 'ड्रेमिंग फूड' या शीर्षकाखाली त्याने दारिद्र्याने ग्रासलेल्या मुलांनी स्वत:चे चेहरे झाकलेत आणि त्यांच्या समोर सजवलेले खाद्यपदार्थ टेबलावर ठेवलेत असे फोटो काढले.



खाली, तुम्हाला काय खायला आवडेल याचे स्वप्न बघा, अशा आशयाचा संदेश लिहिला होता. २०१८च्या 'वर्ल्ड प्रेस फोटो' या प्रसिद्ध जागतिक स्पर्धेमध्ये या मालिकेला दुसरे बक्षीस मिळाले. ती छायाचित्रं 'हंगर पॉर्न', 'पोवर्टी पॉर्न' आहेत अशी टीका झाली. दारिद्र्य ने ग्रासलेली मुलेच का दाखवली? टेबलवर खोटे कृत्रिम खाद्यपदार्थ का ठेवले? त्या मुलांनी कधीही न पाहिलेले पाश्चात्त्य पदार्थ किंवा वाइन ग्लास इत्यादी का ठेवले? वंचित मुलांच्या परिस्थितीचे संवेदनशील दृष्टिकोनातून प्रदर्शन मांडले, असे अनेक आक्षेप या मालिकेविरुद्ध घेतले गेले. ईट्स ॲन एक्सप्लोटॅटीव गझे; हेन्स पॉवर्टी पॉर्न' अशा आशयाच्या टीकेला हे दारिद्र्य सत्य नाही का? असा प्रतिवाद मामोने केला. 'पाश्चिमात्य देशात ज्या प्रमाणावर अन्न फेकले जाते त्यावर भाष्य करण्यासाठी मी ही मालिका केली. ज्या देशात छोटी मुलं कुपोषणाचे बळी ठरतात त्यांना समोर ठेवून हा विरोधाभास मी उभा करण्याचा प्रयत्न केला.' असा खुलासाही मामोने दिला. गरीब लोक हे वस्तू (प्रॉप्स) नाहीत; स्वत:ला बक्षीस मिळावे या हेतूने, गरीब आणि वंचित बहजनांना वस्तू म्हणून वापरणं क्रूर चेष्टा आहे, अशी निर्भत्स्सना वर्ल्ड प्रेस फोटो फाऊंडेशनला सहन करावी लागली.

सॅली मान नावाच्या अमेरिकन फोटोग्राफरने आईच्या भूमिकेतून तिच्या मुलींची छायाचित्र ती अगदी लहान असल्यापासून घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीची तिची ही साधी

भूमिका १९८५ साली बदलली. तिच्या मुलीच्या एक डोळ्याला किडा चावल्याने तिचा चेहरा सुजला. फोटो ७ (अ) + (ब)




फोटो ७ (अ)

फोटो ७ (ब)

गोड निरागस चेहऱ्यामागची वेदना दाखवणारे चेहरे तिला जास्त आकर्षक वाटू लागले. जवळजवळ ११५ छायाचित्राच्या 'इमेडियट फॅमिली' या तिच्या मालिकेवर जोरदार टीका झाली. चाइल्ड पोर्नोग्राफी आरोपही झाला – ही मुलं तिची स्वतःची होती तरी! स्वतःच्या मुलींना 'नाही' म्हणण्याची मुभा न देता त्यांचा वापर केला, आई आणि मुलं या नात्यामधल्या परावलंबित्वाचा तिने गैरवापर केला इत्यादी बरेच मुद्दे लोकांकडून उठवले गेले. 'जी मी नाही, तीच मी' अशी प्रतिमा समाजात सजवण्याची संधी छाया लेखनातील विकसित तंत्रामुळे सहजी शक्य झाली. त्यासाठी त्या क्षेत्रात कुशल असण्याचीही गरज नसते. याचसंदर्भात विकसित तंत्राचा किती वापर करावा हा अजून एक नवा मुद्दा समोर येतो. 'ओव्हर–सॅच्युरेटेड' फोटो काढणं हा कलात्मक निर्णय झाला की वास्तवाशी छेडछाड? मूळ छायाचित्रात किती फेरफार करावेत याचे काही नियम नाहीत. असेल अडम्स नावाचा छायाचित्रकार 'डार्करूमविझर्ड' म्हणून प्रसिद्ध होता. छायाचित्रं डेव्हलप करण्याच्या प्रक्रियेत तो विलक्षण बदल करायचा.

म्हणजे फोटोमध्ये निगेटिव्हच्या काळातही आमूलाग्र बदल करू शकत होते. आता तर काय, विनासायास 'होत्याचे नव्हते' होऊ शकते. 'फोटोशॉप' नावाचे सॉफ्टवेअर थॉमस आणि जॉन नोल या अमेरिकन भावांनी १९८७मध्ये तयार केले; ते ॲडोब नावाच्या कंपनीला विकले. त्यामुळे मूळ छायाचित्रात काहीही बदल करू शकण्याची ताकद संगणकामध्ये एकवटली. असलेली माणसं नाहीशी झाली आणि असलेली प्रकट पावली. ओबामा 'द इकॉनॉमिस्ट वरील एक छायाचित्र त्यांच्या शोकाकुल मन:स्थिती दर्शक म्हणून महत्त्वाचे ठरले; परंतु त्यासाठी मूळ छायाचित्रातून दोन माणसं पुसली गेली होती फोटो १५ (अ) + (ब).



ओबामा आणि मिशेलच्या भारतभेटीमध्ये मोदी आणि जसूबेन जोडीने प्रकट झाले (फोटो १६).



फोटो १६

मूळ चित्र हे भारतभेटीच्या वेळीचे नव्हतेच. मात्र फोटोशॉपचा खरा जनक स्टॅलिन! या विशेषणाचा, क्रियापदासारखा वापर लीलया करून छायाचित्रातील (आणि प्रत्यक्षातही) माणसं गायब करण्यात तो माहीर होता. फोटो१७ (अ) + (ब)



फोटो १७ (अ)

फोटो १७ (ब)


मरणशय्येवर असलेला उत्तर कोरियाचा राजा किम जाँग इल हा अचानक लष्करी अधिकाऱ्यांसोबत अवतीर्ण झाला. आलबेल असल्याचा प्रजेला जो संदेश जायला हवा होता तो गेला. (फोटो १८)



शब्दांशिवाय तपशिलाने गोष्ट सांगू शकण्याच्या सामर्थ्यामुळे फोटोफेकरी राजकीय हेतूने वापरली गेल्याचे अनेक दाखले इतिहासात मिळतील. गेली चार वर्षं तर भारतात पद्धतशीरपणे आणि सातत्याने 'खोटे हेच खरे' हे लोकांवर बिंबवण्यासाठी फोटोफेकरीचे महाअस्त्र जनतेवर चालवले जात आहे. फोटो १९ (अ) + (ब) + (क) + (ड)



फोटो १९ (अ)



फोटो १९ (ब-१)

फोटो १९ (ब-२)



अशा केविलवाण्या फोटोफेकरीचे द्योतक ठरावे, ज्यात वीररसापैकी हास्य, अद्‌भुत, भयानक, बीभत्स असे सगळे रस ओतप्रोत भरलेले आहेत.''[२२]

''न्यूयॉर्क टाईमचा फोटोग्राफर मायकल काम्बेर याने साल २०१५ मध्ये 'अल्टर इमेजेस' या नावाने ४०फोटोंचं प्रदर्शन न्यूयॉर्क येथील ब्रोनक्स डॉक्युमेंटरी सेंटर येथे भरवले. ज्यामध्ये जगभरातील मूळच्या फोटोमध्ये छेडछाड करुण, बदल करून, फोटोंच्या सत्यतेलाच गालबोट लावण्यात आले होते. फोटोमध्ये फोटोशॉप वापरून, दोन फोटो एकत्र करून, क्लोन टूल वापरून छायाचित्रामधला काही भाग मुद्दाम काळा केलेला. अशा फोटोंचे प्रदर्शन भरवलं. बऱ्याचदा फोटोंची कॅप्शन देखील चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आली होती. फोटोग्राफर ऑन लोकेशन असतात त्यावेळेस ते फोटोमधील विषयाला मार्गदर्शन करून आपापल्या पद्धतीने फोटोमधील वस्तूविषय किंवा व्यक्ती यांना योग्य त्या जागी ठेवून त्यांचा फोटो काढतात.

सगळ्यात पहिला फोटोतील फेरबदल १९८२ मध्ये नॅशनल जिओग्राफी या प्रतिष्ठित मासिकाने केलं. त्यांनी इजिप्तच्या पिरॅमिडचा फोटो आणि त्याच्या पुढे उंटावरून मार्ग शोधात प्रवास करणारे प्रवासी. असे त्या छायाचित्रातील काही भाग कापून ते चक्क उभे छायाचित्र फेब्रुवारी १९८२ त्यांच्या मुखपृष्टावरती छापण्यात आले.

लॉस एंजलिस टाइम्सने मार्च २००३मध्ये एका ब्रिटिश सोल्जरचा फोटो आणि त्याच्या समोर एका लहान मुलाला हातात घेऊन एक इराकी नागरिक येत आहे. अशा दोन वेगवेगळ्या फोटोंचा एक फोटो बनवून वापरला. तो फोटो दुसऱ्या दिवशी जगभरातल्या सगळ्या प्रतिष्ठित वृत्तपत्रानी व मासिकांनी वापरला. नंतर वृत्तपत्रांच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर त्या फोटोग्राफरला त्वरित कामावरून काढण्यात आले.

अध्यक्ष लिंकन यांचा एक फोटो असाच दोन फोटो एकत्र करून बनवलेला आहे. अध्यक्ष लिंकन यांचा चेहरा सेनाटर जॉनकालहवंस यांच्या शरीरावर लावण्यात आला आणि अशा पद्धतीने दोन फोटो एकत्र करून तो फोटो तयार करण्यात आला.

१९९४ साली चक्क टाइम्स मासिकाने देखील फुटबॉल खेळाडू ओ. जे. सिम्पसोन याने जेव्हा त्याच्या बायकोचा खून केला, त्यावेळेसचे त्याचे स्वतःचे प्रकाशचित्र टाइम्स मुखपृष्टावर वापरण्यात आलं. त्या वेळेस त्याचा चेहरा जसा दिसतो, त्यापेक्षा जास्त काळा करण्यात आला.

सन २००६मध्ये रॉयटर्स न्यूज एजेन्सीच्या एका फोटोग्राफरने इस्रायलने जेव्हा बैरुटवर बॉम्ब टाकला त्यावेळेस त्या फोटोमध्ये छेडछाड करून त्या फोटो मधला धूर खूपच काळपट केला. त्याची दाहकता जास्त वाढावी हे त्यामागचं कारण होतं. हे जेव्हा रॉयटर्स न्यूज एजन्सीच्या लक्षात आले तेव्हा त्वरित त्या फोटोग्राफरला कामावरून काढून टाकण्यात आले.

त्याच प्रमाणे सन २००८ मध्ये एक असोसिएटेड प्रेस एजन्सीचा फोटोग्राफर जेव्हा काम करत होता तेव्हा त्याने एका इराकी सैनिकाच्या पुढ्यातला व्हिडिओ कॅमेरा फोटोतून फोटोशॉपच्या मदतीने गायब केला आणि फक्त तो सैनिकच त्या गन सोबत फोटोमध्ये दाखवला. या कृत्यामुळे कालांतराने फोटोग्राफरला त्याची नोकरी गमवावी लागली. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे साल २०१५ मध्ये जगातील सगळ्यात मोठी फोटो स्पर्धा 'वर्ल्ड प्रेस

फोटो या जागतिक स्पर्धेत' स्पर्धेमध्ये जवळपास सिलेक्ट झालेले २०% छायाचित्रेही बाद करण्यात आली. कारण की त्या फोटोमध्ये छेडछाड करण्यात आली होती.''[२३]

अशा पद्धतीने फोटोशॉप आणि तांत्रिक बाबींचा उपयोग किती, कोणत्या, कशा, पद्धतीने करावा, कुठल्या कामाकरता करावा, हे ज्याचे त्याने ठरवायला हवे. कोणत्याही छायाचित्रकाराने वृत्तपत्रांकरता काढलेल्या फोटोमध्ये एक सत्यता असते. बातमीचं वार्तामूल्य असतं, बातमीचा विषय असतो, त्याला सत्याची चौकट असते, त्यामुळे त्या फोटोमध्ये फेरफार करू नये. कारण तो फोटो क्षणार्धात कित्येक करोड लोकांपर्यंत पोहोचणार असतो. वाचकांना तो फोटो पाहून त्या बातमीचं गांभीर्य, घटनेचे गांभीर्य लक्षात येते. त्यामुळे नैतिकतेची बाब म्हणून कुठलाही फोटो काढताना देखील फोटोग्राफरची भावना शुद्ध असायला हवी, त्याच प्रमाणे ज्या विषयाचा तो फोटोग्राफर फोटो काढत असेल त्या विषयाबद्दल अगोदरचे त्याच्या मनात काहीच पूर्वग्रह, राग–रोष नसावेत. त्याने सत्य परिस्थिती समाजापुढे ठेवावी. ज्यामुळे फोटोची विश्वासार्हता टिकेल आणि त्याच्या कलेचाही मान राखला जाईल.

२.४.४ लघुपट, माहितीपट आणि चित्रपट यांच्यातून घेतलेला आढावा

प्रकाशचित्रण ही दृककला आहे. चित्रपट आणि प्रकाशचित्रण हे सारखेच आहे. चित्रपटाची चित्रफिती २४ फ्रेम एका सेकंदाला रेकॉर्ड करते आणि त्या प्रक्षेपकाद्वारे आपल्या नजरेसमोरून फिरतात ज्यामधे चोवीस प्रकाशचित्रेच असतात, म्हणून ती आपल्याला हलती दिसतात. जिथे सगळ्या कला एकवटल्या जातात तो आहे चित्रपट. चित्रपट हे दृकश्राव्य माध्यम आहे. म्हणजेच त्याच्यात दृक कलेचाही अंतर्भाव आहे आणि श्राव्य माध्यमाचा देखील अंतर्भाव आहे. दृश्य आणि ध्वनी यांचा तो मिलाप आहे. चित्रपटांचा परिणाम मानवी मनावर त्वरित होतो. घरभर पुस्तक वाचून जेवढे ज्ञान संपादन होणार नाही, ते ज्ञान छोट्याशा काही मिनिटांच्या लघुपटाने, माहितीपटाने किंवा एखाद्या तीन तासाच्या चित्रपटाने प्रेक्षक वर्गाला त्वरित होते. इतकी अफाट शक्ती चलचित्रांमध्ये आहे. त्यामुळे चित्रपट हे समाज घडवण्याचे, समाजापर्यंत माहिती पोहोचवण्याचे, समाजाचे मनोरंजन करण्याचे, त्याचबरोबर समाजात बदल घडवण्याचे फार मोठे प्रभावी माध्यम आहे.

२.४.४.१ चित्रपट

''चित्रपट हे मूलत: मुद्रण करणारं माध्यम असल्यामुळे इतर माध्यमांपेक्षा अधिक सक्षम ठरलं. सतत बदलत जाणाऱ्या या जगातल्या घटना आणि माहिती यांची कायमची नोंद करता यावी, ती साठवता यावी असं मनुष्यप्राण्याला कायमच वाटत आलेलं आहे. एखाद्या घटनेची आठवणही नेहमीच अस्थीर असते. स्मृतीचं कायमस्वरूपी जतन करण्यासाठी ती घटना मुद्रित करणं हे उत्तम साधन आहे. आरेखन हे रंगरेषा, आकार जतन करण्याचं साधन आणि बोललेली भाषा जतन करण्यासाठी लेखन अशी मुद्रण साधनं माणसाच्या सांस्कृतिक विकासात खूपच आधी आलेली आहेत. प्रकाशचित्र मुद्रण, त्यातून पुढे चलचित्र मुद्रण आणि ध्वनिमुद्रण हे सगळं एकोणिसाव्या शतकात आलं. खऱ्याखुऱ्या दृक-श्राव्य जगतातले बारकावे अतिशय नजाकतीनं टिपणारं, हुबेहुब चित्रण करून सर्व ज्ञानेंद्रियांना अनुभूती देणारं एक माध्यम म्हणजे चित्रपट.''[२४]

''२८ डिसेंबर १८९५ रोजी सिनेमाचा जन्म झाला – इतिहासकारांनी नोंद केली. लुई ल्युमिए आणि ऑगस्ट ल्युमिए यांची 'चलचित्रांचे जनक' म्हणून नोंद झाली. 'सिनेमा' हे नाव पडले तेही ल्युमिए बंधूंच्या 'सिनेमॅटोग्राफ' वरून.''[२५]

''मे १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी मुंबईत आपला 'राजा हरिश्चंद्र' हा पूर्णलांबीचा मूकपट प्रदर्शित केला. भारतात तयार झालेला हा पहिला भारतीय चित्रपट. दादासाहेब फाळके हे भारतीय सिनेमाचे जनक ठरले. हा चित्रपट इतर देशांतही प्रदर्शित करण्यात आला.''[२६]

''नानूक ऑफ द नॉर्थ (यु एस/१९२२/ब्लॅक ॲण्ड व्हाइट/७५ मिनिटे मूक /माहितीपट) कलावंत– नानूक, नायला, अली, कुनयू, निर्मिती आणि छायांकन– रॉबर्ट फ्लॅट आणि कार्लस्टार्स, संकलन– रॉबर्ट व फ्रान्सिस फ्लॅहेर्टी, दिग्दर्शन– रॉबर्ट फ्लेहेर्टी. कथासार: सिनेमा आपल्या रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असतानाच, १९२० मध्ये रॉबर्ट फ्लॅहेर्टीने अशा एका अनोख्या प्रांतात पाऊल ठेवले, जिथे तोवर प्रवेश करण्याचे धाडस कुणाही निर्माता–दिग्दर्शकाने केले नव्हते. कॅनडाच्या हडसन बे प्रांतात, एस्किमोंच्या सहवासात दहा वर्षे घालवल्यानंतर, त्याने जे नवे अनुभव घेतले, त्यांची नोंद चित्रपटाच्या रूपात करायचे त्याने ठरवले. असे करताना आपण इतिहास घडवतो आहोत याचा त्याला कल्पनाही नसावी. त्याने कॅमेऱ्याला स्टुडिओतून बाहेर काढले. शून्य अंशाखाली जिथे तापमान असते, अशा दूरवरच्या ठिकाणी तो कॅमेरा घेऊन गेला, तिथला रहिवासी नानूक आणि त्याच्या कुटुंबीयांना त्याने त्यांच्या वास्तवातल्याच भूमिका करायला लावल्या. एखाद्या काल्पनिक कथेतल्या भूमिका साकार कराव्यात, तशाच समरसून सर्वांनी या वास्तवातल्या भूमिका केल्या. एस्किमोंची मासेमारी, शिकार करणे, वॉलरसची शिकार करणे, बर्फाचे घर–इग्लू बांधणे अशा सर्व गोष्टी कॅमेऱ्यात कैद करणे आणि जगापुढे मांडणे हा त्याचा ध्यास होता आणि त्याने तो पुरा केला.

या चित्रपटाने सिनेमाच्या विश्वात माहितीपटांची मुहूर्तमेढ रोवली. एक नवा अध्याय सुरू करून देऊन फ्लॅहेर्टीने इतिहास घडवला. स्वप्नातदेखील जिथे पाऊल ठेवता येणार नाही, असा परिसर त्याने सामान्य माणसापुढे जिवंत केला. 'नानूक ऑफ द नॉर्थ' हा सिनेमाच्या प्रवासातील मैलाचा दगड. आजही त्याचे सिनेमाच्या इतिहासातील स्थान अढळ आहे. आज, नवनवी क्षेत्रे धुंडाळून आपल्यापुढे ठेवणारे शेकडो, हजारो माहितीपट निर्माते आपल्या मध्ये आहेत. परंतु माहितीपटांच्या या चळवळीचा जनक हा फ्लॅहेर्टी, हे निर्विवाद सत्य होय! आज 'नानूक ऑफ द नॉर्थ' प्रदर्शित होऊन ८० वर्षे झाली आहेत. भारतातील विविध फिल्म सोसायट्या वेळोवेळी जी चित्रपट रसग्रहण शिबिरे या चित्रपटाने सिनेमाच्या विश्वात

माहितीपटांची मुहूर्तमेढ रोवली. एक नवा अध्याय सुरू करून देऊन फ्लॅहेर्टीने इतिहास घडवला. स्वप्नातदेखील जिथे पाऊल ठेवता येणार नाही, असा परिसर त्याने सामान्य माणसापुढे जिवंत केला. 'नानूक ऑफ द नॉर्थ' हा सिनेमाच्या प्रवासातील मैलाचा दगड. आजही त्याचे सिनेमाच्या इतिहासातील स्थान अढळ आहे. आज, नवनवी क्षेत्रे धुंडाळून आपल्यापुढे ठेवणारे शेकडो, हजारो माहितीपट निर्माते आपल्या मध्ये आहेत. परंतु माहितीपटांच्या या चळवळीचा जनक हा फ्लॅहेर्टी, हे निर्विवाद सत्य होय! आज 'नानूक ऑफ द नॉर्थ' प्रदर्शित होऊन ८० वर्षे झाली आहेत. भारतातील विविध फिल्म सोसायट्या वेळोवेळी जी चित्रपट रसग्रहण शिबिरे आयोजित करतात, त्यात 'नानूक ऑफ द नॉर्थ'ला मानाचे स्थान असते. सिनेमाच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता यावा म्हणून नॅशनल फिल्म अर्काइव्ह ऑफ इंडियाने आपल्या सर्व शाखांतून या चित्रपटाची १६ एमएमची प्रिंटस् उपलब्ध करून दिलेली आहेत. आता हा चित्रपट डिव्हिडीवरही उपलब्ध आहे.''[२७]

आताच्या घडीला जगामध्ये जवळपास १००च्या वर माहितीपटांचे प्रेक्षपण करणाऱ्या विविध दूरचित्रवाणी वाहिन्या आहेत. त्यामधले भारतातल्या देखील काही वाहिन्या आहेत. दूरदर्शन नॅशनल, डी. डी. भारती, झी डॉक्युमेंटरी, झिंग त्याचबरोबर एम. टीव्ही, इंडिया या भारतीय वाहिन्यांवरून आपण वेगवेगळ्या माहितीपटांच्या आस्वाद घेऊ शकतो.

नॅशनल जिओग्राफी, डिस्कवरी, हिस्टरी, बीबीसी वर्ल्ड, या सर्व वाहिन्यांनी फोटोग्राफी आणि फोटोग्राफर या करता खूप मोठे काम केलेले आहे असे म्हणावे लागेल. होरायझन ही ब्रिटीश टीव्ही मालिका आहे. त्यात एकूण वेगवेगळ्या विषयांवरती १२०० महितीपट (डॉक्युमेंटरी) आहेत. त्या बीबीसी या वाहिनीवरून प्रसारित केल्या जातात. अगदी सामान्यातल्या सामान्य विषय ते माणसाचे चंद्रावरचे पहिले पाऊल, आकाशातील माणसाची झेप, पाण्याखालचं जीवन, शारीरिक आजार, निसर्ग व वन्यजीवन, संशोधन अशा जवळपास सगळ्या गोष्टींवर १२०० माहितीपट बीबीसी ने बनवलेत. माहितीपटांचे माध्यम हे सत्यघटना प्रेक्षकांच्या समोर मांडण्याचे एक उत्तम व्यासपीठ आहे.

नॅशनल जिओग्राफीने तर निसर्गाचा ठेवा आपल्या सर्वांकरता छायाचित्रांतून आणि चलचित्रनातून जतन केला आहे, असेच म्हणावे लागेल. फोटोग्राफी वर नॅशनल जिओग्राफीने काही फिल्म खूपच वाखाण्याजोग्या आहेत. त्यामध्ये काही फिल्म कमी वेळेच्या आहेत. त्यामध्ये

फोटोचा समाजावर झालेला परिणाम, फोटोमुळे घडलेला इतिहास, त्या फोटोग्राफरने जीवावर बेतून केलेले काम, त्या फोटोने समाजामध्ये केलेली क्रांती, त्या फोटोने समाजाला पाडलेली भुरळ, त्या फोटोने देशावर, जगावर केलेला परिणाम, या सगळ्या गोष्टी नॅशनल जिओग्राफीने काही छोट्याशा त्यांच्या लघुपटामध्ये (शॉर्ट फिल्म) दाखवलेले आहेत. त्यामधल्या काही फिल्म अंगावर शहारे आणणाऱ्या आहेत. फोटोची दाहकता व्यक्त करणाऱ्या आहेत. यातील जवळपास बहुतेक छायाचित्रकारांना या क्षेत्रातला खूपच मानाचा असा 'पुलित्झर पुरस्कार' देखील मिळालेला आहे. त्याचप्रमाणे 'वर्ल्ड प्रेस फोटोग्राफीचा' देखील मानाचा पुरस्कार मिळालेला आहे. ते सर्व छायाचित्रकारांच्या जीवनावरचे चित्रपट, लघुपट आपण फक्त एका क्लिकवर पाहू शकतो. त्याचं शीर्षक खालील प्रमाणे आहे:

१.'द पॉवर ऑफ फोटोग्राफी टू विटनेस'

२.'द पॉवर ऑफ फोटोग्राफी मी टू सेलिब्रेट'

३.'इट व्हॉट कॅन आय डू' ए फोटो जर्नालिस्ट जर्नी थ्रू हॉरर अँड जॉय

४.'द मून शॉट'

५.'हाऊ फोटो जर्नालिस्ट कॅप्चर द मोमेंट'

६.'लिमसे आधार यु लेन्स फ्रन्टलाइन'

७.'ग्लोबल जर्नालिस्ट: कॅरल गझी पुलित्झर विनिंग फोटो जर्नालिस्ट '

हे सर्व लघुपट (शॉर्टफिल्म) पाहिल्या नंतर त्या छायाचित्रांची दाहकता, त्यांची शक्ती, त्यांचा इतिहास कळतो. त्याच प्रमाणे त्या प्रकाशचित्रकाराने तो क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त करण्यासाठी किती दिवस, किती महिने, किती वर्ष सातत्याने मेहनत घेतली हे पाहून त्याच्या कामाला नमस्कार केल्याशिवाय राहवत नाही. काही फोटो पाहून खूप संताप येतो, तर काही फोटो पाहून आपोआप डोळ्यांत अश्रू वाहू लागतात, हे सर्व नॅशनल जिओग्राफीने आपल्या पुढे ठेवलेल्या दृकश्राव्य माध्यमामुळे शक्य झाले आहे.

२.४.४.२ नॅशनल जिओग्राफी

नॅशनल जिओग्राफीने त्यांच्या बारा छायाचित्रकारांवर छायाचित्रणासंदर्भात १२ माहितीपट (डॉक्युमेंटरीज) बनवलेल्या आहेत. तो एक माहितीपट साधारणपणे १ तासाचा आहे. यामधून त्यांनी फोटोचे महत्त्व, फोटोची रचनाकृती, फोटोचा वस्तू विषय, त्यांच्या फोटोग्राफरने तो फोटो घेण्याकरता केलेले कष्ट, घालवलेला वेळ, त्याला आलेल्या अडचणी, त्याच बरोबर नवीन फोटोग्राफरने आपली फोटोग्राफीची कला जपण्यासाठी व ती वाढविण्यासाठी काय काय करायला हवे? या पद्धतीचे मार्गदर्शन केलेले आहे. खूपच अप्रतिम असे हे माहितीपट आहेत.

याव्यतिरिक्त २० 'फँटॅस्टिक फोटोग्राफी डॉक्युमेंटरी' म्हणून देखील माहितीपट नॅशनल जिओग्राफीने बनवलेले आहेत. त्या सगळ्या माहितीपटातून प्रकाशचित्रणा विषयी, त्या प्रकाश चित्रकारांविषयी सखोल माहिती देण्यात आलेली आहे.

नॅशनल जिओग्राफीच्या मासिकांनी तर संपूर्ण जगात खूप मोठी क्रांती केली आहे. समाजावर त्यांनी खूप मोठा परिणाम केलेला आहे. २२ सप्टेंबर, १८८८ पासून नॅशनल जिओग्राफी यांनी त्यांचे मासिक प्रकाशित करण्याला सुरुवात केली. त्याचप्रमाणे पुढे त्यांनी माहिती देणाऱ्या वाहिन्या सुरू करून निसर्गाच्या संबंधित, मानवाच्या संबंधित, भौगोलिक गोष्टींचा त्याच बरोबर वेगवेगळ्या संशोधनात्मक गोष्टींच्या माहितीचा साठा प्रेक्षकांपर्यंत पोहचवला. निसर्गाशी असलेले मानवाचे आणि प्राणी–पक्षी यांचे नाते वेगवेगळ्या माहितीपटांमधून जगासमोर आणले.

२.४.४.३ आनंद पटवर्धन यांचे योगदान

''दर्जेदार माहितीपट बनवताना भारताचे उदाहरण द्यायचे झाले तर सर्वात पहिले नाव डोळ्यापुढे येते ते म्हणजे आनंद पटवर्धन यांचे.

आनंद पटवर्धन हे प्रख्यात लघुपट निर्माते आहेत. त्यांच्या 'जयभीम कॉम्रेड' या माहितीपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. नुकताच यांच्या 'विवेक' या माहितीपटाला केरळमधील थिरुवअनंतपुरम येथे सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय माहितीपट आणि लघुपट महोत्सवात प्रदर्शित करण्यासाठी केरळ उच्च न्यायालयाने हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोलकर, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड गोविंद

पानसरे, कन्नड विचारवंत आणि लेखक एम. एम. कलबुर्गी यांच्या हत्याप्रकरणावर आधारित 'विवेक' हा माहितीपट आहे.

पॅरिसमध्ये सन २०१३ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय माहितीपटांच्या महोत्सवात त्यांच्या १० माहितीपटांच्या एका विशेष दालनाचा समावेश करण्यात आला होता. 'सिनेमा द रिअल' असे या महोत्सवाचे नाव होते. महोत्सव २१ ते ३१ मार्च दरम्यान झाला. महोत्सवात पटवर्धन यांच्या 'मास्टर क्लास'चे ही आयोजन करण्यात आले. भारतीय माहितीपट दिग्दर्शकासाठी हा फारच मोठा सन्मान ठरला.

'सिनेमा द रियल' या महोत्सवाशी आनंद पटवर्धन पूर्वीपासूनच जोडले गेले आहेत. १९८६ साली त्यांच्या 'बॉम्बे अवर सिटी' या माहितीपटाला परीक्षकांच्या विशेष पारितोषिकाने गौरवण्यात आले होते. यावर्षी आनंद पटवर्धन यांचे १०माहितीपट दाखवण्यात आले.

निवड करण्यात आलेले माहितीपट:

'क्रांती की तरंगे', 'जमिर के बंदी', 'टू द चिल्ड्रन ऑफ स्वाट फ्रॉम द चिल्ड्रन ऑफ मंडाला', 'हमारा शहर बॉम्बे', 'उन मित्रों की याद प्यारी', 'राम के नाम', 'पिता पुत्र और धर्मयुद्ध', 'जंग और अमन', 'वुई आर नॉट युवर मंकी' व 'जय भीम कॉम्रेड'.''[२८]

चित्रपटांनी समाजाला फार मोलाचे योगदान दिलेले आहे. काही चित्रपटांची जादू मनाला भुरळ घालते, अचंबित करते, तो पाहताना आपल्याला खिळवून ठेवते. या सगळ्या गोष्टींच्या मागे कॅमेरा या माध्यमाचा खूपच मोठा वाटा आहे, हे विसरून चालणार नाही. चित्रपट हा असंख्य प्रकाशचित्रे मिळून तयार झालेला असतो हे लक्षात घ्यायला हवे. जगामध्ये गाजलेले आणि कित्येक वर्ष लोकांच्या मनावर राज्य करणारे काही भारतीय तसेच जागतिक चित्रपटांचा येथे नक्कीच उल्लेख करावा लागेल.

राजा हरिश्चंद्र, संत तुकाराम, कुंकू, माणूस, श्वास, पथेर पांचाली, अपराजितो, अपूर संसार, माया बाजार, मधुमती, मुघल–ए–आझम, चारुलता, भुवन शोम, संस्कार, अंकुर, गर्म हवा, प्यासा, कागज के फूल, साहिब बीवी और गुलाम, नवरंग, दो आँखें बारह हाथ.

सिटीझन केन, ब्रीफ एन्काऊंटर, रोम ओपन सिटी, कॅमेरा बफ, बायसिकल थीव्हज, राशोमान, सेव्हन सामुराई,'हिरोशिमा, मॉन अमॉर', ब्रेथलेस, शिंडलर्स लिस्ट, नायकन, सिनेमा पॅराडीसो, चिल्ड्रन ऑफ हेवन, लाईफ इज ब्युटीफुल, कॅरेक्टर, पोस्टमेन इन द

माउंटन्स, ऑल अबाउट माय मदर, द कप, कंदाहार, ओसामा, ब्यूटीफुल बॉक्सर, खामोश पानी, बफेलो बॉय, इत्यादी चित्रपट पाहयाला हवेत. कारण या सगळ्यांमध्ये कॅमेऱ्याने जी किमया साधलेली आहे ती महत्त्वाची आहे. अमृत मंथन या चित्रपटासाठी व्ही. शांताराम यांनी बॉलिवूडच्या इतिहासात पहिल्यांदा क्लोजप लेन्स वापरली.

प्रकरण दुसरे : क

संशोधनपद्धती

२.५.१ संशोधन नमुना निश्चिती

२.५.२ साहित्य – कलांचे क्षेत्र व संशोधन

२.५.३ संशोधनाचे प्रकार

२.५.४ माहिती संकलन करण्यासाठी वापर केलेली साधने व तंत्रे

प्रकरण दुसरे : क : संशोधनपद्धती

२.५.१ संशोधन नमुना निश्चिती

''विषयाच्या समस्येची मांडणी करून झाल्यावर पुढील अभ्यासासाठी कोणत्या माहितीच्या आधारे हे संशोधणं पूर्ण करावे लागेल हे सर्व लक्षात धरून संशोधकाने नमुना पद्धत निवडली. आपल्याकडे संशोधन म्हणजे ऐतिहासिक वा पुराणवस्तू–संशोधन असा संकेत रूढ झाला होता. त्याप्रमाणे पाश्चात्त्य देशात संशोधन म्हणजे औद्योगिक वा यांत्रिक (इंडस्ट्रियल रिसर्च) संशोधन, असाच संकेत प्रामुख्याने रूढ झाला होता.''[२९]

२.५.२ साहित्य – कलांचे क्षेत्र व संशोधन

''संशोधनाचे तिसरे क्षेत्र म्हणजे कलांचे व वाङ्मयाचे. मानवी जीवनात वाङ्मयांचे व कलेचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी मनाचा, विचारांचा, भावनांचा, आत्म्याचा आविष्कार म्हणून वाङ्मय व कला निर्माण झालेल्या आहेत. मानवी मनाची धारणा, विचारांचे स्वरूप, संवेदनात्मकतेची जाणीव व मानवी आत्म्याला लागलेल्या कळा ह्या जितक्या सामाजिक आहेत तितक्याच त्या व्यक्तिगत आहेत. त्यांच्यातील व्यक्तिगतता, सामाजिकता व सार्वत्रिकता ह्या सर्वकाळ चिंतनाचा, चर्चेचा, विवेचनाचा विषय राहणार आहेत. ह्या क्षेत्रातील गूढता व अगम्यता निर्माण होण्यास व वाढण्यास आणखी एक कारण झालेले आहे. ह्या क्षेत्राचा एक अतिशय प्रबळ अशा मानवी प्रवृत्तीशी विशेष जवळचासंबंध आहे. किंबहुना त्या प्रवृत्तीच्या आविष्कारातूनच साहित्य व कला संभवलेल्या आहेत. ती प्रवृत्ती म्हणजे सर्जनशीलता. ह्या सर्जनशीलतेच्या जोरावर मानवी प्रज्ञेने प्रतिभा साकार केली आणि तिच्या साह्याने साहित्याचे व कलांचे विलोभनीय विश्व माणसाने निर्माण केले. संस्कृतीच्या प्रारंभापासून हे काम तो करीत आलेला आहे व पुढेही ते अखंड चालू राहणार आहे. वैज्ञानिक शास्त्रे ही धारणेने वस्तुनिष्ठ आहेत. सामाजिक शास्त्रे त्यांच्या नावाप्रमाणे समाजाधिष्ठित आहेत तर कला व वाङ्मय ही यापेक्षा अगदी वेगळी, मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ व सर्जनप्रधान आहेत. एवढे मात्र खरे की, प्रत्येक क्षेत्रांतील संशोधनाचे स्वरूप जरी भिन्न असले तरी त्यामागील वृत्ती वा भूमिका ही समान आहे.''[३०]

२.५.३ संशोधनाचे प्रकार

''संशोधन वेगवेगळ्या क्षेत्रात, वेगवेगळ्या प्रकारे होत असते. संशोधनाच्या सर्वसाधारण स्वरुपानुसार संशोधनाचे काही ठळक प्रकार आढळून येतात.

१) वर्णनात्मक संशोधन

२) विश्लेषणात्मक संशोधन

३) अभिजात अथवा मूलभूत अथवा विशुद्ध संशोधन

४) उपयोजित संशोधन

५) गुणात्मक संशोधन

६) संख्यात्मक संशोधन

७) संकल्पनात्मक संशोधन

८) अनुभवाधिष्ठीत संशोधन

संशोधकाने वरील पद्धतीपैकी दोन पद्धतींचा या संशोधनासाठी वापर केला आहे.

हे संशोधन बरेचसे गुणात्मक (Qualitative) पद्धतीचे असल्यामुळे संशोधकाला पूर्णपणे अलिप्त राहणे शक्य झालेले नाही, मात्र प्रत्येक कलाकाराची माहिती वस्तुनिष्ठपणे मांडणे आणि त्याबाबत पुरावा देणे याची काळजी येथे घेतली आहे. तथापि ६०० व्यक्तींचे सर्वेक्षण हे पूर्णपणे संख्यात्मक (Quantitative) पद्धतीने म्हणजे सांख्यिकी रीतीने नमुना निवड करून आणि प्रश्नावली विकसित करून केले गेले आहे, ज्यामुळे माहितीचे विश्लेषण आणि निष्कर्ष यांना योग्य ती शास्त्रीय बैठक मिळाली आहे.

१) गुणात्मक संशोधन (Qualitative) : या प्रकारच्या संशोधनाचा हेतू एखाद्या वर्तनामागील प्रेरणा काय असू शकेल हे पाहाणे हा असतो. जसे लोककला का लोप पावत चाललेल्या आहेत, त्यामागची कारणे काय आहेत याचे संशोधन केले आहे.

२) संख्यात्मक संशोधन (Quantitative Reserch): यामध्ये संख्या मापन म्हणजे एखादी गोष्ट कितीवेळा किती प्रमाणात घडते यांचा समावेश होतो. यात संख्येला, आकडेवारीला विशेष महत्व असते.

संख्यात्मक संशोधांनामध्ये घटनांचे स्पष्टीकरण, संख्याविषयीक सामग्री, गणितीय आधारपद्धती सांख्यिकी या बाबी महत्वाच्या असतात.''[३१]

गुणात्मक संशोधन, आणि संख्यात्मक संशोधन या पद्धतीची निवड केल्यानंतर या दहा लोककलाकारांचे विशिष्ट घटक म्हणून केस स्टडी स्वरुपात अभ्यास केला.

''इतिहास हे प्राचीन जीवनाची पाहणी करणारे शास्त्र आहे; तर मानसशास्त्र हे माणसाच्या मनाची पाहणी करणारे आधुनिक शास्त्र आहे. मानसशास्त्र अलिकडे, एवढे विकसित झालेले आहे की, त्याची प्रायोगिक मानसशास्त्र ही एक शाखा निर्माण झालेली आहे व तिच्यातले संशोधन जवळजवळ विज्ञानशास्त्रांच्या पद्धतीने चालते. इतिहासाच्या संशोधनात ज्याप्रमाणे साधन–चिकित्सेला विशेष स्थान आहे त्याप्रमाणे मानसशास्त्राच्या संशोधनात अलिकडे एक विशेष स्वरूपाचे संशोधनआयुध निर्माण झालेले आहे. त्याचे नाव ''केस स्टडी'' ऊर्फ विशिष्ट घटकाभ्यास.

हा घटक व ही 'केस' हा एक वयोगट असेल, व्यक्ती असेल, एखादी जमात असेल, एखाद्या विशिष्ट वयाचा, प्रकृतीचा समुदाय इत्यादी असेल. निवडलेल्या घटकांची सखोल चिकित्सक पाहणी (इन्टेन्सिव्ह इन्व्हेस्टिगेशन) करणे हे ह्या पद्धतीचे मर्म होय. निवडलेल्या घटकांबाबत प्रथम विशिष्ट प्रकारचे निदान करू, त्या दृष्टीने पाहणीसाठी, योग्य पद्धतीचा अवलंब करून, सर्व प्रकारच्या अंगोपांगांचे निरीक्षण करणे हे घटक निरीक्षणात मुख्य काम असते. ही एक दृष्टी आहे, कित्येकदा ती पद्धती असते. काही ठिकाणी ते एक तंत्रही ठरते. थोडक्यात संशोधनातील ते नवे परिमाण आहे.''[३२]

२.५.४ माहिती संकलन करण्यासाठी वापर केलेली साधने व तंत्रे

डॉ. प्रदीप आगलावे सर त्यांच्या संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे या पुस्तकात तथ्यांचे प्रकार दोन आहेत असे सांगतात. ते दोन प्रकार स्त्रोत आणि स्वरूप या आधारावर आहेत.

(१) प्राथमिक तथ्य

(२) द्वितीयक तथ्य

(१) प्राथमिक तथ्य: संशोधन करता स्वतः अध्ययनक्षेत्रात जाऊन त्या विषय किंवा समस्येच्या संबंधात जिवंत व्यक्तींकडून मुलाखत, अनुसूची किंवा प्रश्नावलीच्या सहाय्यतेने किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारा जी माहिती किंवा तथ्ये जमा करतो. त्यास प्राथमिक तथ्य असे म्हणतात. संशोधन कर्ता स्वतः तथ्य संकलनाच्या तंत्राद्वारे तथ्यांचे संकलन करतो. प्राथमिक तथ्ये ही स्वतः संशोधनकर्त्याने एकत्रित केली असल्यामुळे ती अधिक वस्तुनिष्ठ असतात. जिवंत व्यक्ती आणि निरीक्षण हे प्राथमिक तथ्यांचे दोन स्त्रोत आहेत.

पहिल्या स्त्रोताअंतर्गत अशा व्यक्तींचा समावेश होतो की, ज्यांना अध्ययन विषयाच्या संबंधात ज्ञान असते. किंवा बऱ्याच काळापासून त्याचा त्या विषयाशी जवळचा संबंध असतो. पामर यांच्या मते, अशा व्यक्ती केवळ एका विषयाच्या विद्यमान, परिस्थिती सांगण्याचीच योग्यता ठेवत नाही तर सामाजिक प्रक्रियामध्ये अंतर्भूत महत्त्वपूर्ण पायऱ्या आणि निरीक्षण योग्य प्रवाहाच्या संबंधाकडे देखील संकेत करू शकते. अशा व्यक्तीची निवड करताना विशेष सावधगिरी बाळगायला पाहिजे. विविध व्यवसाय व व्यापारामध्ये असलेल्या व्यक्ती, त्या क्षेत्रातील पूर्वीचे रहिवासी, नेता इत्यादीकडून तथ्ये संकलित केल्यास, ते अध्ययन कार्याचे महत्त्वपूर्ण अंग बनू शकतात.

(ब) प्राथमिक तथ्यांचा दुसरा स्त्रोत हा निरीक्षण आहे. निरीक्षणाद्वारे एका समुदाय किंवा समूहाच्या जीवनासंबंधी अनेक महत्त्वपूर्ण तथ्यांना एकत्रित केले जाऊ शकते. परंतु त्याकरिता निरीक्षण करताना संशोधनकर्त्याने पक्षपात करता कामा नये. तसेच कोणताही पूर्वग्रह ठेवू नये. व्यक्तींच्या व्यवहारासंबंधी तथ्यांना एकत्रित करण्याकरिता प्रत्यक्ष निरीक्षण हा एक अतिशय चांगला स्त्रोत आहे. सहभागी निरीक्षणाद्वारे तर सामुदायिक जीवनाशी संबंधित आंतरिक आणि गोपनीय गोष्टींना सुद्धा जाणून घेता येते.

(२) द्वितीयक तथ्य: प्राथमिक तथ्ये ही स्वतः संशोधनकर्ता संकलित करतो. परंतु द्वितीयक तथ्ये मात्र संशोधनकर्ता स्वतः संशोधनक्षेत्रात जाऊन संबंधित व्यक्तीकडून गोळा करीत नाही. द्वितीय तथ्ये ही इतर व्यक्तींनी पूर्वीच गोळा केली असून ती लिखित स्वरूपाची असतात. संशोधनकर्ता ह्या तथ्यांचा आपल्या संशोधनासाठी उपयोग करतो. द्वितीयक तथ्येही प्रकाशित व अप्रकाशित प्रलेख, अहवाल, सांख्यिकी, हस्तलिखिते, पत्रे, दैनंदिनी इत्यादींपासून संशोधनकर्ता प्राप्त करतो. संशोधन कार्य आपल्या अध्ययन विषयाशी संबंधित माहिती द्वितीय स्रोताद्वारे गोळा करतो. द्वितीयक तथ्ये दोन स्रोताद्वारे मिळविले जाते. म्हणून द्वितीय तथ्यांचे दोन प्रमुख स्त्रोत आहेत. पहिला स्रोत म्हणजे व्यक्तीगत प्रलेख होय. आत्मकथा, दैनंदिनी, पत्रे इत्यादींचा समावेश व्यक्तिगत प्रलेख यामध्ये होतो. दुसरा स्रोत म्हणजे सार्वजनिक प्रलेख होय. सार्वजनिक प्रलेखांमध्ये रेकॉर्ड, पुस्तके, जनगणना, अहवाल विविध आयोग आणि समितीचे अहवाल, वृत्तपत्रे, साप्ताहिके इत्यादीचा अंतर्भाव होतो, लुंडबर्ग यांच्या मते, शीलालेख, स्तूप, उत्खननातून सापडलेले मानवी सापळे, भौतिक वस्तू इत्यादी ऐतिहासिक स्रोतातून प्राप्त तथ्ये देखील द्वितीयक तथ्ये होत.''[३३]

लोककला ह्या लोकांच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहेत. म्हणून प्रत्यक्ष त्या लोककलावंतापर्यंत पोहचून योग्य ती माहिती मिळवून घेणे हे खूप महत्त्वाचं काम आहे. ती सर्व माहिती गोळा करावी व त्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष त्या कलाकाराला भेटणे आवश्यकच आहे. त्यांच्याशी, त्यांच्या परिवाराशी मुलाखातीद्वारे व निरीक्षणाद्वारे हे शक्य होऊ शकते.

१) मूळ माहिती : लोककलाकारांना व त्यांच्या परिवाराला भेटून मूलाखतीद्वारे, त्यांना प्रश्न विचारून, त्यांचं निरीक्षण करून, त्यांची प्रकाशचित्रे काढून, त्यांचा कार्यक्रमांचं प्रकाशचित्रण व चलचित्रण करून संशोधकाने माहिती मिळवली.

२) दुय्यम माहिती : त्या लोककला व ते लोककलावंत यांच्यावर उपलब्ध असलेली पुस्तके, त्यांचा बायोडेटा, जुने ग्रंथ, मासिके, प्रसिद्ध झालेले लेख, आत्मचरित्र व जीवनचरित्र, नियतकालिके, वृत्तपत्रे, त्या लोककलाकारांकडे असलेली पत्रे, या सर्वांमधून त्याने माहिती मिळवली.

३) **संगणक** : इंटनेटचा उपयोग करून जी माहिती ऑनलाइन आहे ती सर्व माहिती एकत्र घेऊन आवश्यक माहिती त्याने अभ्यासली.

४) **त्याचबरोबर युट्युब सोबतच बाकीच्या दूरदर्शन व इतर वाहिन्यांवर** जी माहिती, जे फुटेज उपलब्ध आहे ते सर्व त्याने पहिले. विषयासंदर्भात असंख्य लघुपट, महितीपट व चित्रपट त्याने पहिले.

प्रकरण तिसरे

लोककलाकारांचा जीवनप्रवास आणि त्यांची भेट

३. प्रस्तावना

३.१ घटकाभ्यास क्रमांक: १ (केस स्टडी) : मीरा उमप

३.१.१ मीराबाई उमप यांचा जीवन प्रवास

३.१.२ मीराबाई उमप यांची भेट

३.२ घटकाभ्यास क्रमांक : २ राधाकृष्ण कदम

३.२.१ राधाकृष्ण कदम यांचा जीवन प्रवास

३.२.२ राधाकृष्ण कदम यांची भेट

३.३ घटकाभ्यास क्रमांक : ३ देवानंद माळी

३.३.१ देवानंद माळी यांचा जीवन प्रवास

३.३.२ देवानंद माळी यांची भेट

३.४ : घटकाभ्यास क्रमांक : ४ राजू बाबा शेख

३.४.१ राजू बाबा शेख यांचा जीवन प्रवास

३.४.२ राजू बाबा शेख यांची भेट

३.५ घटकाभ्यास क्रमांक : ५ निरंजन भाकरे

३.५.१ निरंजन भाकरे यांचा जीवन प्रवास

३.५.२ निरंजन भाकरे यांची भेट

३.६ घटकाभ्यास क्रमांक : ६ विठ्ठल उमप

३.६.१ विठ्ठल उमप यांचा जीवन प्रवास

३.६.२ विठ्ठल उमप यांची भेट

३.७ घटकाभ्यास क्रमांक : ७ अंबुदेवी बुधगावकर

३.७.१ अंबुदेवी बुधगावकर यांचा जीवनप्रवास

३.७.२ अंबुदेवी बुधगावकर यांची भेट

३. ८ घटकाभ्यास क्रमांक : ८ सत्यपाल विश्वनाथ चिंचोलीकर

३.८.१ सत्यपाल विश्वनाथ चिंचोलीकर यांचा जीवन प्रवास

३.८.२ सत्यपाल विश्वननाथ चिंचोलीकर यांची भेट

३.९ घटकाभ्यास क्रमांक : ९ शाहीर बापूराव विभूते

३.९.१ शाहीर बापूराव विभूतेंचा जीवन प्रवास

३.९.२ बापूराव विभूते यांची भेट

३.१० घटकाभ्यास क्रमांक : १० उद्धव शिंदे

३.१०.१ उद्धवजी शिंदे यांचा जीवन प्रवास

३.१०.२ उद्धवजी शिंदे यांची भेट

प्रकरण तिसरे : लोककलाकारांचा जीवनप्रवास आणि त्यांची भेट

३. प्रस्तावना

लोककला या लोकांच्या दैनंदिन जगण्याचा अविभाज्य भाग आहेत हे विसरून चालणार नाही. लोककलावंतांनी आजवर त्यांच्या कलेद्वारे समाज प्रबोधन केले. लोकांना काही क्षणासाठी का होईना त्यांचं दुःख विसरायला भाग पाडले. स्वतःचं दुःख लपवून, लोकांना हसवले. महाराष्ट्र राज्यात लोककला विविध असल्या आणि त्या सादर करणारे कलावंतही संख्येने भरपूर असले तरी महाराष्ट्रात या कला व त्याचे सादरकर्ते कलावंतांचे म्हणावे तसे डॉक्युमेंटेशन अद्याप झालेले नाही. त्यातही जे संग्रहीकरण थोड्याफार प्रमाणात झालेले आहे, ते मुख्यतः लेख–स्वरूपात झालेले आहे. म्हणजे ते वर्णनात्मक आहे. प्रकाशचित्रणातून या कला व त्याचे सादरकर्ते कलावंत यांचे संग्रहीकरण कोणी फारसे केलेले नाही. या अभ्यासातून ते करण्याचा प्रयत्न आहेच, सोबत त्या कलावंतांचे जीवनही या अभ्यासातून मुखरित होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या अभ्यासात कॅमेरा हे माध्यम आहे, पण त्यामागची दृष्टी ही संशोधकाची आहे.

३.१. घटकाभ्यास क्रमांक : १ (केस स्टडी)

मीरा उमप

३.१.१ मीरा उमप यांचा जीवन प्रवास

मीरा उमप यांचा जन्म बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातील आंतरवाली येथे, फारच गरीब कुटुंबात झाला. त्यांचे वडील वामनराव उमप आणि त्यांच्या आई रेश्माबाई हे दोघेही भिक्षा मागत असत. त्यांचे आजोबा–पणजोबा देखील कलाकार होते. वडील कलाकार, त्यांची आई कलाकार, त्यांचे धाकटे काका देखील कलाकार, म्हणजे गेल्या सात पिढ्यांपासून एकतारी ही कला, त्यांच्या घराण्यात चालत आलेली आहे. मग ती कला त्यांच्या आजोबांकडे आली. शिडी, बचन, टाकसळ, काही अभंग, गवळणी, भजन असे कथासार मीराबाईंचे आजोबा म्हणत असत. त्यांचा वारसा मीराबाईंच्या वडिलांनी उचलला. त्यांच्या वडिलांपासून त्यांच्या काकांनी उचलला. त्या सर्वांमध्ये मीराबाई एकुलत्या एकच होत्या. मीराबाईंना वयाच्या सहाव्या वर्षी, त्यांचे आई–वडील त्यांना सोबत भिक्षा मागायला गावात घेऊन जायचे. त्यांचे आई–वडील व काकाही त्यावेळेस खंजिरी वाजवायचे.

मीराबाईंना छंद लागला की, एखादी ताटली घेऊन वाजवायची, एखादा डबा घेऊन वाजवायचा, त्या पाण्याला निघाल्या, तर ते भांडं घेऊन वाजवायचे. त्यावेळेस लोखंडाच्या घागरी असायच्या, काही मातीच्या घागरी असायच्या. ती घागर वाजवत वाजवत, त्या पाणी आणायला जात असत. कारण जाताना घागर मोकळी असायची. असं करता करता एक दिवस त्यांच्या आईने त्यांना पाहिले आणि त्यांना विचारले का ग बाई, तू खंजिरी शिकती का? एखादी कलाकार बनतीस का? आपल्या समाजात नाही हे, मुलीने कलावंत बनायचं. मग त्यांचे बाबा आईला म्हणाले, ''का? का? कलावंत नाही बनायचं का? माझी मुलगी जर शिकली, तर तुला काही अडचण आहे का?'' मग त्यांचे बाबा स्वतः सुताराकडे गेले आणि त्यांनी मीराबाईंना एक खंजिरी बनवून आणली. ती घोरपडीच्या कातड्याने मढवली. पण तेव्हा मीराबाई लहान असल्यामुळे त्यांना ती खंजिरी झेपत नव्हती. ती फार मोठी व जड होती. मग ती छातीला लावून, त्या वाजवायच्या. त्यांचे बाबा जे एकतारी वाजवायचे, त्यांच्या तालावरती त्यांनी खंजिरी वाजवायला सुरुवात केली. तेव्हा मीराबाईंचे वय फक्त ७ वर्ष होते. मग त्यांचे

बाबा म्हणाले,''खंजिरी हातात घ्यायची बेटा, नाही झेपत, तर मांडीवरती घेऊन वाजवायची.'' अशी सुरुवात होता होता, मीराबाईला थोडासा धीटपणा आला. त्यांचे आई-बाबा पंढरपूरच्या वारीला जात असत. आई-वडिलांसोबत भिक्षा मागता मागता बालपण कधी गेले आणि कधी लग्न झाले हे मीराबाईंनाच कळले नाही.

मीराबाई यांचं सासर 'घनसावली' या गावी होते. मीराबाईंना नात्यामध्येच आत्याच्या मुलाला दिले होते. त्यांच्या पतीचं पहिलं लग्न झालेलं होतं. मीराबाईंना पहिला मुलगा झाला. त्यांच्या पतीला, मीराबाईंची ही कला आवडत नव्हती. ते फारच दारू देखील पीत होते. मीराबाईंना मात्र त्यांच्या या कलेशिवाय जगणे अशक्य होते. म्हणून त्यांच्या पतीचे मीराबाईंशी पटत नव्हते आणि एक दिवस त्यांच्या पतीने त्यांना सोडून दिले. ते पुढील १० वर्षं मीराबाई यांना भेटायला आलेच नाहीत. पुन्हा दहा वर्षं मीराबाई, त्यांच्या आई-वडिलांबरोबर भिक्षा मागत फिरल्या.

गेवराई तालुक्याच्या बाजारामध्ये मीराबाई व त्यांचे वडील यांनी भिक्षा मागता मागता एक तारीवरती भजन म्हणायला चालू केले. तेथे चोहोबाजूंनी लोकं उभे होते. कोणी रुपया, कोणी दोन रुपये, कोणी पाच रुपये, असे चोहोबाजूंनी लोकं पैसे फेकत होती. पुण्याला दारूबंदी अधिकारी असलेले तावडे साहेब यांची नुकतीच जालना येथे बदली झालेली. ते बीडला काही कामानिमित्त चालले होते. त्यांची गाडी बिघडली होती. ते ड्रायव्हरला म्हणाले, ''आवाज कोणाचा येतोय? आपण पहिली आपली गाडी गॅरेजला लावूया आणि नंतर तो जो आवाज येतोय तेथे जाऊया.''

ते येईपर्यंत, मीराबाईंचा कार्यक्रम संपत आलेला. शेवटचं एकच कडवं फक्त शिल्लक राहिलं होतं. 'हाती दारू गोळा हर हर मणी, तुळशीला पाणी मीरा घाली...' तावडे साहेब आले अन् त्यांचा कार्यक्रम बंद झाला. मीराबाईंनी पैसे गोळा केले. तितक्यात त्यांच्या बाबांना तावडे साहेबांनी बोलावलं. ते म्हणाले, ''बाबा इकडे या, थोडा चहा घेऊ आपण.'' मीराबाईंच्या वडिलांना तावडे साहेबांनी चहा पाजला आणि म्हणाले, ''बाबा कार्यक्रम आहे बीडला, येताय का?'' मीराबाईंचे वडील थोडावेळ थांबले आणि म्हणाले, ''येतो साहेब.'' मग थोड्याच वेळात सर्वजण गाडीत बसले. मीराबाईंचे वडील हे तेव्हा गांजा ओढायचे. तो गांजाचा वास तावडे साहेबांना आला. मग ते म्हणाले, ''बाबा आजपासून तुम्ही गांजाला आणि बिडीला स्पर्श

करायचा नाही आणि मीराबाई आजपासून तुम्ही भिक्षा मागायची नाही.'' त्या म्हणाल्या, ''सर मग काय खायचं?, आमच्याकडे शेतीवाडी नाही. आमचे बहिण भाऊ लहान लहान आहेत. त्यांना नोकरी नाही. त्यांना कोण खायला देणार आहे?'' त्यावर तावडे साहेबांनी सांगितले, ''तुम्ही आता आमचे दारूबंदी विभागाचे कार्यक्रम करायचे.''

तावडे साहेबांनी तेव्हा मीराबाई आणि त्यांच्या वडिलांचा बीडला कार्यक्रम घेतला. पुढे जालना जिल्ह्यातले ५० रुपये एक गाव असे, १० कार्यक्रम त्यांनी मीराबाई आणि त्यांच्या वडिलांना दिले. जेव्हा ५०० रुपये मीराबाईंच्या हातात पडले. तेव्हा त्यांचा जीव फार खूश झाला. त्यांना फारच पैसे मिळाले, असे वाटले. नंतर २०० रुपयाने एक गाव, असे कार्यक्रम मिळाले. नंतर येथेच सरस्वती भवनात भारत सरकारची एक कार्यशाळा होती. भारत सरकारच्या त्या कार्यशाळेमध्ये विजयकुमार गवई हे होते. तेथे त्यांनी सांगितलं,''एक बाई आहे. जी जालन्याला दारूबंदी विभागासाठी कार्यक्रम करतेय. तिला तेवढा निरोप द्या आणि तिला भेटायला बोलवा.''

पण कोणीच मीराबाईंला ही माहिती दिली नाही. अखेर शेवटी मीराबाईंचेच पेटीमास्तर अप्पा, यांनी मीराबाईंना सरळ सरस्वती भवनात कार्यक्रमाला नेलं. तिथे त्या कार्यशाळेमध्ये, मीराबाईंचा पोशाख पंजाबी ड्रेस, फेटा आणि हातात डफ घेऊन पोवाडा झाला. तेथे गवईसाहेबांनी पाहिल्याबरोबर म्हणाले, ''मीराबाई मी तुम्हाला किती दिवसांपासून शोधतो आहे.'' त्या हात जोडून म्हणाल्या, ''साहेब मला काहीच माहिती नाही. जिकडे मला कलाकार घेऊन जातात, तिकडे मी जाते. जिथं कार्यक्रम करायचा तेथे केला.'' गवई साहेब म्हणाले, ''तुम्ही भारत सरकारचं ऑडिशन द्या.'' मीराबाईंनी विचारलं,''ते कोठं असतं.'' ते म्हणाले, ''नगरला''. मीरा बाईंनी विचारले, ''कधी आहे?'' ते म्हणाले, ''आले, आता दोन महिन्यांत ते ऑडिशन आलं.'' मग साहेबांनी त्यांना पत्र पाठवलं की, ''मीराबाई, तुम्ही नगरला कार्यक्रमाला या.'' मग मीराबाई गेल्या. तेथे ऑडिशन त्यांनी दिले. तेथे त्यांना दारूबंदी वरील कार्यक्रम सादर करण्यासाठी ७०० रुपयाने एक गाव असे मानधन ठरवण्यात आले.

देव–देवतांचं म्हणाल, तर कृष्णाचा पाळणा आहे, रामाचा पाळणा आहे, कृष्णाची चेंडूफळी आहे, त्याच्यात महादेवाची भिलीण आहे. ती दीड तास मीराबाई सादर करतात. ती अशी आहे.....

"हर हरा की, शिवशंकरा केळकरा शिव दिगंबरा,

हर हरा की, शिवशंकरा केळकर की परमेश्वरा

ब्रह्म, विष्णू, महेश्वरा, पार्वती शक्ती सुंदरा

दोघं जण, बसून डोंगरावरती ती हवाशीर

पुढे होणार, भविष्य ब्रह्मा त्याच्या शोधाल...

ऐका कीर्तन जी... जी..."

याला त्या कथा म्हणतात.

शासनाकडून एक कलाकार म्हणून मीराबाईंना अजूनही काहीच मानधन मिळत नाही. त्या म्हणतात, **"ज्याला टाळही वाजवता येत नाही, जो कलाकार नाही, त्याला मात्र शासन पगार देते, मानधन देते. म्हणजे खरं जे आहे, ते बाजूला ठेवलंय अन् खोटं जे आहे ते पुढे आणून ठेवलंय. हे असं का? "**

त्यांनी सचिवालयात, कलाशाखेत त्यांची सर्व कागदपत्रं पाठवली. त्याचं शिक्षण नाही. त्यांना लिहायला–वाचायला जमत नाही. त्यांचे जावई त्यांना मदत करतात. महाराष्ट्रात जवळजवळ सर्वच गावी मीराबाईंनी फिरून कार्यक्रम सादर केलेले आहेत. त्या दिल्लीमध्ये १० दिवस राहिल्या. तेथे कार्यक्रम केले. कार्यक्रमाला कैक हजार लोकं जमतात. त्यातून एखादा माणूस म्हणतो, ''मीरा मॅडम, खूप छान कार्यक्रम झाला.'' तोच माणूस दुसरीकडे कोठेही भेटला तर तो मीरा बाईंना म्हणतो, ''मॅडम ओळखलं का मला?'', त्यावर मीराबाई म्हणतात, ''आम्ही कोणाकोणाला ध्यानात धरायचं. हजारो पब्लिक आपल्या कार्यक्रमाला असते. लक्षात राहत नाही.''

मीराबाईचं कपाट कागद–पत्राने पूर्ण भरलेय. मीराबाईंनी प्रत्येक गावाचा सही–शिक्का त्या गावातून आणला. प्रत्येक कार्यक्रमात त्या भारावून जातात. कारण की, लोकांचा प्रतिसाद त्यांना तसा मिळतो. जी लोकं त्यांच्या कार्यक्रमाला असतात, ती लोकं टाळ्या वाजवतात, शिट्या वाजवतात, फेटे वर उडवतात, टोप्या उडवतात, त्यांच्यावरती पैशांचा पाऊस पाडतात.

त्या सतत त्यांच्या कार्यक्रमात खूश राहतात. आजपर्यंत एकाही कार्यक्रमाला त्या नाराज नाही झाल्यात. कोणताच कार्यक्रम आतापर्यंत त्यांचा फेल गेलेला नाही, असे मीराबाई अभिमानाने सांगतात. त्या म्हणतात, ''माहिती नाही आतापर्यंत किती कार्यक्रम केले. आकडा नाही सांगू शकत. पण एवढे खरं की, माझ्या भजनाने, माझ्या कार्यक्रमाने कैक गावांमधल्या दारुड्यांची दारू मी सोडवली आहे.''

मीराबाईंना मिळालेले काही पुरस्कार

१) **महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार,**

२) **महाराष्ट्र शासनाचा व्यसनमुक्ती पुरस्कार,**

३) **रमाई प्रकाशनाचा पुरस्कार,**

४) **महाराष्ट्र शासनाचा संत गाडगेबाबा पुरस्कार,**

५) **महाराष्ट्र शासनाचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार,**

६) **परिवर्तनाचा वादळ वारा पुरस्कार, (नाशिक),**

७) **जागर पुरस्कार (नाशिक),**

८) **राजीव गांधी लोककला पुरस्कार (औरंगाबाद),**

९) **जनादेश संदेश गौरव पुरस्कार,**

१०) **भीम फेस्टिवल पुणे महानगरपालिकेचा पुरस्कार,**

११) **लक्ष्मीबाई कोल्हापूरकर पुरस्कार (पुणे),**

१२) **परिवर्तन साहित्य पुरस्कार,**

१३) **लावणी सम्राट,**

१४) **राज्यस्तरीय अंधश्रद्धा निर्मूलन पुरस्कार**

३.१.२ मीराबाई उमप यांची भेट

संशोधक, १२ जून, २००७ रोजी शाहीर नंदेश उमप यांचा 'मी मराठी' हा कार्यक्रम बघायला गेला होतो. त्यावेळेस मीरा उमप यांचा एक अर्ध्या तासाचा कार्यक्रम 'सोंगी भारुड' येथे आयोजित करण्यात आला होता. 'मी मराठी' ने निवडक लोककलाकारांना कला प्रस्तुत करण्याची संधी दिली होती, त्यासाठी मीराबाई उमप, औरंगाबाद येथून मुंबईत आल्या होत्या. तेव्हा त्याच्या सोबत संदेश आणि नंदेश उमप हे दोघे देखील होते. त्याने मेकअप रूममध्ये जाऊन मीराबाई स्वतःचा मेकअप स्वतः करत असतानाचे फोटो काढले. त्यांच्या सोबत त्यांचा मुलगा वासुदेवाचा मेकअप करत होता, त्याचे फोटो काढले. त्याच बरोबर मीराबाईंच्या ग्रुपमधील एका मुलीला, त्या पोतराज बनवत होत्या आणि पोतराजाचा मेकअप चक्क मीराबाई उमप करत होत्या, ते फोटो काढले.

त्यानंतर तो स्टेजच्या समोर येऊन बसला. पुढील पाच मिनिटांनी मीराबाईंचे 'सोंगी भारुड' सुरू झाले. यामध्ये सुरुवातीला त्या खूप मोठे गाठोडे घेऊन स्टेजवर आल्या. ''सुया घे, दाभण घे, पोत घे, मनी घे ग बाई'', असं त्यांच्या शैलीमध्ये आवाज देऊन त्यांनी सोंगी भारुडाला सुरुवात केली. खूप छान पद्धतीने त्यांनी स्टेजवर एन्ट्री घेतली होती. सगळे प्रेक्षक कुतूहलाने त्यांच्याकडे बघत होते. मध्ये-मध्ये त्या खूप छान विनोद करत होत्या. त्यांच्या सहकाऱ्यांसोबत मध्ये मध्ये त्या म्हणत होत्या ''तेच म्हणलो रे.'' म्हणजे पुरुषाचा कणखर आवाज काढून, त्या पुरुषी अभिनय करत होत्या. नंतर त्या म्हणाल्या, ''मी भगवानचं गाणं म्हणते.'' त्यांचा सहकारी म्हणाला, ''तुला भगवंताचं गाणं म्हणायचं का? देवाचं गाणं म्हणायचं का? '' 'नाय रे' असं म्हणून त्या परत पुरुषाचा आवाज काढू लागल्या. नंतर त्यांनी गाणं म्हणायला सुरुवात केली. 'घे साडी, काळी पोत, मनी घे, तुझ्या बाळाला, घे ग माय. त्या कार्यक्रमांमध्ये त्यांची ओळख असलेली दिमडी म्हणजेच खंजिरी त्यांनी फार सुरेख वाजवली त्याचबरोबर अधूनमधून त्या खंजिरी तोंडाला लावून, खंजिरी वर फुंकर मारून एक वेगळा आवाज त्या काढत होत्या. लोकही त्यांना भरभरून दाद देत होती.




त्यांनी बुरगुंडा हे सोंगी भारूड सादर केलं. बुरगुंडा म्हणजे ज्ञान प्राप्ती होय. फार छान पद्धतीने त्यांनी त्यांचा अभिनय केला आणि समोरील प्रेक्षक वर्गाला प्रफुल्लित केलं. कार्यक्रमामध्ये त्यांनी त्यांच्या खंजिरीचा सुरेख उपयोग त्यांच्या सादरीकरणासाठी केला.





वयाची पन्नाशी गाठलेल्या, पण फारच चपळ हालचाल असलेल्या मीराबाई उमप त्याला त्या स्टेजवर पाहायला मिळाल्या. त्यानंतर कार्यक्रमाच्या शेवटी जेव्हा सर्वच कलाकार एकत्र येतात, तेव्हा शेवटच्या कोरससाठी 'शाहीर विठ्ठल उमप'हे मीराबाईंना सोबत घेऊन येतानाचा, एक मूड फोटो त्या कार्यक्रमात मिळाला. अशा तऱ्हेने त्याने दादरच्या रवींद्र नाट्यमंदिरात मीराबाई उमप यांचा पहिला कार्यक्रम त्याच्या कॅमेऱ्यात कैद केला.



मीराबाईंचा कार्यक्रम कल्याणमधील अशोक नगरच्या बौद्ध विहारामध्ये १३ मे, २०१७ रोजी होता. मीराबाई तिकडं खाजगी बस करून आल्या होत्या. त्यांची बस एका मोकळ्या पटांगणात उभी होती. तिथून कार्यक्रमाचे ठिकाण फारच जवळ होते. मीराबाईंनी एका खुर्चीवरती बसून बसच्या समोरच मेकअप करायला सुरुवात केली. त्यांचा स्वतःचा मेकअप त्या स्वतः करत होत्या. काजळ डोळ्यात भरून त्यांनी संपूर्ण चेहऱ्यावर देखील काजळाची एक वेगळ्या पद्धतीची नक्षी काढली.



मेकअप पूर्ण करून त्या कल्याणच्या अशोक नगरच्या बौद्ध विहारात गेल्या. त्यांच्यासोबत त्यांचा मुलगा, मुलगी, जावई, आणि साथ-संगतवाले पाच-सहाजण, अशी एकूण बारा लोकांची टीम होती. तेथे त्यांनी सुरुवातीला गौतम बुद्धांच गाणं गायलं. त्यानंतर त्यांनी 'बाबासाहेब आंबेडकरांवर' गाणं गायलं आणि तेथे त्यांच्या जावयाने देखील आंबेडकरांवर एक गाणं गायलं. त्यांच्या मुलीने देखील 'माता रमाई' वर एक गाणं गायलं.



त्यानंतर मीराबाईंनी सोंगी भारुड सादर केले. ज्यामध्ये त्यांनी त्यांचा आवडीचा 'बुरगुंडा' सादर केला. लोकांनाही तो बुरगुंडा फार आवडला.



असा हा कार्यक्रम संपवून तो जेवण करून मीराबाईंच्या बसमध्ये बसून कुर्ल्याच्या ठक्कर बाप्पा कॉलनीत यायला निघाला. कारण तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त संध्याकाळी ठक्कर बाप्पा कॉलनीमध्ये मीराबाई उमप यांचा भीम गीतांचा कार्यक्रम होता. कल्याणहून तो आणि मीराबाई उमप या ठक्कर बाप्पा कॉलनीमध्ये पोहोचले. प्रेक्षकवर्ग बराच वेळ मीराबाईंची वाट पाहत होता. कारण सर्वांना रस्त्यात ट्रॅफिक असल्यामुळे, तेथे पोहचायला थोडासा उशीरच झाला होता. मीराबाई तयार होऊन आल्या त्यानंतर सुरुवातीचं गाणं त्यांच्या जावयाने गायले. त्यानंतर त्यांच्या मुलीने गायले. नंतर मीराबाईंनी डॉक्टर 'बाबासाहेब आंबेडकरांवर' एक फार छान गाणं गायले. ते होते 'माझ्या भीमाची पुण्याई, आम्हा माणुसकी देई', त्या गाण्याने लोकांनी मीराबाईंना बक्षीस रूपात बरेच पैसे दिले. त्या गाण्याची लोकांनी 'वन्स मोर'ची पण मागणी केली. कार्यक्रमामध्ये रंगत आली होती. त्यानंतर त्यांच्या मुलाने देखील एक गाणं गायलं. नंतर आलटून–पालटून त्यांच्या टीम मधील काही लोकांनी गाणी गायली. त्यानंतर मीराबाईंनी दहा मिनिटं त्यांच्या खंजिरी मधून, वेगवेगळे आवाज काढून समोरील प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलं. त्यांच्या खंजिरीच्या आवाजाला तोड नाही. अप्रतिम खंजिरी मीराबाईंनी वाजवली. प्रेक्षकांनाही त्यांची हि खंजिरी वाजवण्याची कला फारच आवडली. पुन्हा

एकदा प्रेक्षकांनी त्यांना 'वन्समोर' ची मागणी केली आणि पुन्हा एकदा पुढील तीन मिनिटं लोकांनी त्यांची खंजिरी ऐकली. खूप सुरेख असे वेगवेगळे आवाज मीराबाईंनी त्यांच्या खंजिरी मधून काढले. त्यानंतर मीराबाई उमप यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे आणखीन एक सुंदर गाणे गायले.

"पहाट झाली प्रभा म्हणाली

भीम जयंती आली,

चांदचि चांदणी घेऊन खाली,

वारा भिमाला घाली"

लोकांनी त्यांच्या या गाण्याला छान प्रतिसाद दिला. तेवढेच पैसे देखील लोकांनी बक्षीस म्हणून मीराबाईंना दिले. मीराबाईंचा आवाज आणि त्यांच्या खंजिरीचा आवाज या दोघांनी लोकांच्या मनाचा ताबा घेतला होता. नयनरम्य आणि श्रवणीय कलाविष्कार पाहण्याची संधी ठक्कर बाप्पा कॉलनीतील लोकांना मिळाली. त्यानंतर शेवटचं गाणं मीराबाईंच्या जावयांनी गायलं आणि कार्यक्रम संपला. हा कार्यक्रम सगळ्यांच्या मनामध्ये घर करून गेला.



त्यानंतर संशोधक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी मीराबाईंच्या घरी गेला. त्या चिकलठाणा, औरंगाबाद येथे राहतात. त्या अगदी सामान्य घरामध्ये राहतात... १०बाय १०च्या

झोपडीमध्ये. मीराबाई ह्या स्वतःची कामे स्वतः करतात. केरकचरा काढणे, भांडी घासणे, जेवण बनवणे, नातवंडांची तयारी करणे आणि दिवसभरातली सगळी कामे मीराबाई करतात. त्याने, मीराबाईंना सांगितलं की, ''पुढील दोन दिवस, तुमच्या घरी राहून तुमचे फोटो शूट करणार आहे आणि व्हिडिओ शूटिंग देखील करणार आहे.'' ''तुम्ही एवढ्या लांबून माझ्यासाठी आलात'' असं त्या म्हणाल्या. त्यांच्याशी गप्पा मारता मारता, मीराबाईंच्या बाबतीतल्या बऱ्याच गोष्टी कॅमेऱ्यात त्याने टिपल्या. त्यांनी नंतर जेवण बनवायला सुरुवात केली तेव्हा चुलीमध्ये झालेला धूर फुकताना त्यांच्या डोळ्यातून पाणी आले.



मीराबाईंनी खूप छान भाकर बनवली. अशा संपूर्ण कुटुंबासाठी त्यांनी आठ ते दहा भाकरी बनवल्या. त्यानंतर त्यांनी चिकनचे कालवण देखील त्याच चुलीवरती बनवले. नंतर सकाळचा नाश्ता करून उरलेली जी भांडी होती ती देखील त्यांनी घासली. जवळपास दुपारपर्यंत मीराबाईंनी घरातली सगळी कामं आटपली. त्यानंतर सर्व जेवायला बसलो. तो थोडा उशिराने बसला कारण त्याला मीराबाईंच्या संपूर्ण परिवाराचा जेवतानाचा फोटो काढायचा होता. पण सर्वपरिवार एकत्र बसला नाही. मीराबाईंचे भाऊ, त्यांच्या वहिनी आणि काही छोटी मुले जेवायला एकत्र बसलेली. त्या सर्वांचा एकत्र फोटो काढला. त्यानंतर मीराबाईंचे ही काही फोटो काढले. जेवण झाल्यानंतर मीराबाईंनी परत जमलेली सगळी भांडी घासून काढली. घरामधील

साफ–सफाई त्यांनीच केली. त्यानंतर घरामध्ये एक वासरू आले. ते वासरू उन्हातून आलेलं. मीराबाईंना समजले की, त्या वासराला तहान लागलेली असेल. म्हणून लगेच त्यांनी त्याला प्यायला पाणी ठेवलं. त्याच्याजवळ जाऊन त्याला पाणी पाजण्याचा प्रयत्न केला.



थोड्या वेळाने मीराबाई घराबाहेरील सार्वजनिक नळावर पिण्याचे पाणी आणण्यासाठी हंडे घेऊन गेल्या. तो सार्वजनिक नळ पंचवीस–तीस घर सोडून लांब होता. एवढ्या लांब जाऊन त्यांनी पिण्याच्या पाण्याचे एकावर एक असे दोन हांडे आणले. त्यांच्याकडे असलेल्या माठात ओतले. अशा एक दहा–पंधरा खेपा मीराबाईंनी केल्या आणि घराबाहेर असलेला ड्रम देखील पाण्याने भरला ते झाल्यावरती त्यांनी स्वतःचा मेकअप करायला सुरुवात केली.



मेकअप करून तयार झाल्यावर त्यांनी एकतारीवर काही अभंग गायले, काही गवळणी गायल्या, किर्तन केले, त्यांना साथ-संगत त्यांच्या जावयाने ढोलकी वाजवून दिली. त्यांच्या मुलीने देखील पेटी वाजवून साथ संगत दिली. मीराबाईंनी एका हातात चिपळ्या, दुसऱ्या हातात एकतारी आणि मुखाने हरिनाम घेत एकामागून एक असे तीन ते चार अभंग गायले.



मध्येच त्यांनी चिपळ्या खाली ठेवून, दिमडी म्हणजेच खंजिरी वाजवली. दिमडी तोंडाला लावून तिच्यावर फुंकर मारून, एक वेगळा आवाज तिच्यातून मीराबाईंनी काढला. त्यांच्या जावयाने ढोलकीवर त्यांना साथ दिली आणि त्यांच्या मुलीने कोरस देताना पेटी देखील वाजवली. मैफील फारच छान रंगली.



मीराबाईंच्या मुलीचे नाव कविता कांबळे आहे आणि त्यांचे शिक्षण सातवी पर्यंत झालेय. मीराबाईंसोबत कार्यक्रमांमध्ये त्यांची मुलगी कविता, ह्या पोतराजचे पात्र साकारतात, लावण्या गातात, गवळणी करतात. त्यांच्या आईनेच त्यांना हे सर्व शिकवले. मीराबाईंनी कविताला वडिलांची कमी कधी भासू दिली नाही. कविताने त्यांच्या वडिलांना कधीच बघितलं नाही. बापाचे प्रेम आणि आईचे प्रेम हे दोन्ही त्यांना त्यांच्या आईकडून मिळाले. मीराबाईंचे संपूर्ण

आयुष्य त्यांनी त्यांच्या मुलांसाठीच वाहिले. कविता ह्या वयाच्या १०व्या वर्षांपासूनच मीराबाईंसोबत कार्यक्रम करत आहेत. कविता या ही कला कुठेही शिकायला गेल्या नाहीत. सगळं आईचे पाहून पाहून त्या शिकल्या. कविता भक्तीगीत म्हणतात, अभंग म्हणतात, जिजाऊंची गीते म्हणतात, शिवरायांचा पोवाडा देखील त्या म्हणतात. कविता म्हणाल्या की, ''आईच्या खांद्याला खांदा लावून मी कार्यक्रम करणार. ही माझी जिद्द आहे.'' कविता यांची मुलगी देखील आता आठवीला आहे, ती देखील कार्यक्रम करते.

दुसऱ्या दिवशी तो पुन्हा सकाळीच मीराबाईंच्या घरी गेला. पहिल्या दिवसासारखीच मीराबाईंची संपूर्ण दिनचर्या त्याने कॅमेऱ्यात कैद केली. मीराबाई यांच्या घरामध्ये पाळीव कबुतर आहेत. ती कबुतरे मीराबाईंच्या अंगाखांद्यावर खेळत होती. त्याने मीराबाईंना कबुतरांसोबत त्यांच्या दरवाज्याजवळ नेऊन, तेथे त्यांना कबुतरे आकाशात उडवायला सांगितली, ती कबुतरे आकाशात उडताना आणि एक कबुतर मीराबाईंच्या खांद्यावर बसलेलं आहे, असा फोटो काढला.



मीराबाईंनी संध्याकाळी त्यांना मिळालेली प्रशस्तीपत्रक आणि सगळे पुरस्कार त्याला दाखवले. त्याचप्रमाणे, त्यांच्याबद्दल जे जे लेख वृत्तपत्रात, मासिकांत छापून आलेले आहेत ते सर्व दाखवले. संध्याकाळी साधारणतः साडे पाचच्या आसपास त्याने सर्वांना घराबाहेर जमवले आणि मीराबाई यांच्या संपूर्ण परिवाराचा एक फोटो काढला.



त्याच संध्याकाळी त्यांचे जावई मीरा बाईंच्या घरी आले. जे त्यांच्या बाजूलाच राहतात. ते म्हणाले, 'आधी आपण थोडासा कार्यक्रमाचा रियाज करतानाचे व्हिडिओ शुटिंग करूया नंतर तुम्ही मुलाखत घ्या. 'त्यानंतर मीराबाई तयार होऊन आल्या आणि दिमडी घेऊन त्यांनी काही भक्तीगीते म्हटली, काही अभंग गायले, एक गवळण म्हटली आणि एक बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरती गीत गायले. त्यांची कला त्यांनी त्याच्यासमोर सादर केली. त्यानंतर त्याने मीराबाईंची मुलाखत देखील घेतली. हे सर्व रात्री अकरा वाजेपर्यंत चालले.

३.२ घटकाभ्यास क्रमांक : २

राधाकृष्ण कदम

३.२.१ राधाकृष्ण कदम यांचा जीवन प्रवास

राधाकृष्ण कदम यांचा जन्म १५ फेब्रुवारी, १९२० रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव कृष्णाबाई व वडिलांचे नाव राजारामबापू कदम होते. या दोघांना राधाकृष्ण कदम हे एकुलते एक अपत्य होते. म्हणून लहानपणापासूनच राधाकृष्ण कदम हे फारच लाडात वाढले. राधाकृष्ण कदम यांची ही गोंधळामधली पाचवी पिढी. त्यांचे वडील राजारामबापू हे गोंधळ सम्राट होते. ते फारच कडक स्वभावाचे होते. राजारामबापूंनी अवघ्या ४थ्या वर्षापासूनच राधाकृष्ण कदम यांना संबळाचे शिक्षण दिले. ते रोज पहाटे ५ ते ८ आणि सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत रोज न चुकता राधाकृष्ण कदम यांना गोंधळाचे शिक्षण देत असत. राजारामबापूंनी राधाकृष्ण कदम यांना कधी कठोर होऊन तर कधी मायेने जवळ घेऊन, कधी लाकडाने बडवून शिक्षण दिले. या शिक्षणामध्ये हळूहळू मग विविध कथासार जसे पांडवप्रताप, हरीविजय, देवी भागवत, विक्रम पुराण, राजा हरीश्चंद्राची व्याख्यानं, स्कंद पुराण, शिवलीला अमृत, जांभूळ आख्यान, कार्तिक पुराण गेंदन फुल, नवनाथ सार, बहीण भावाची कहाणी वगैरे अशा विविध प्रकारे शास्त्राची, कथांची माहिती राजारामबापू राधाकृष्ण यांना देत असत. ते देत असताना अभिनयदेखील ते शिकवत. हात वारे, मुद्रा अभिनय राजारामबापू त्यांना करून दाखवत आणि त्यांच्याकडून करवून घेत. राजारामबापूंचा स्वभाव एवढा कडक की, ते ज्या दिवशीचे काम त्याच दिवशी पूर्ण करुन घेत. त्यात काही चूक झाली की, राजारामबापू राधाकृष्ण यांना दिवसभर उपाशी ठेवत असत.गरिबीचे चटके लहानपणापासूनच राधाकृष्ण कदम यांच्या वाट्याला आले. राजारामबापूंनी घेतलेल्या सर्व कठोर परीक्षेत राधाकृष्णजी अगदी तरबेज निघाले. मग प्रवास सुरु झाला तो दोघांचा सोबत एकत्र कार्यक्रम करण्याचा.

इंग्रजांच्या काळापासून गोंधळ हा लोककला प्रकार सादर होत होता. त्या काळी मराठवाड्यात निजामाची राजवट होती. रजाकार अकादमीच्या काळात या सर्वांना खूप हाल सोसावे लागले. बऱ्याचदा गोंधळाच्या कार्यक्रमावर बंदी आणली जायची. कार्यक्रम करू दिला जायचा नाही. गोंधळाची पगडी ही नेहमीच निजामांना खटकायची. म्हणून वेळ प्रसंगी गोंधळ

करणाऱ्यांना मारहाण देखील होत असे. पण राधाकृष्ण कदम यांनी केव्हाच हार मानली नाही. त्यांची कला त्यांनी इंग्रजांच्या काळातही सादर केली.

सुरुवातीच्या काळामध्ये चार ते पाच लोक ज्या घरी गोंधळ असेल त्यांच्या घरी जायचे. रात्री नऊ वाजता गोंधळ सुरू व्हायचा, तो सकाळी सूर्य नारायणाचे दर्शन होईपर्यंत म्हणजे साधारणपणे सहा वाजेपर्यंत सुरू राहायचा. सूर्य नारायणाचे दर्शन झाले की, देवीची आरती व्हायची व गोंधळ संपायचा.

रात्रभर गोंधळ करून तेव्हा राजारामबापूंना फक्त सव्वा रुपया मिळायचा. त्याही मध्ये चार ते पाच लोक भागीदार असत. ही साधारणपणे १९५० सालची गोष्ट आहे. तेव्हा दळणवळणाची कोणतीही साधने नव्हती. सर्वच प्रवासासाठी पायपीट करावी लागे. एका गावाहून दुसऱ्या गावी, दुसऱ्या वरून तिसऱ्या गावी तिसऱ्या गावावरून आणखीन पुढच्या गावी. असे तीन– चार महिने ही सगळी गोंधळी मंडळी वेगवेगळ्या गावात फिरत असायची. तीन –चार महिने त्यांचा घरी पत्ता नसायचा. साधारण घट बसल्यावर दुसऱ्या माळेपासून ते गोंधळ सादरीकरणाला जायचे, ते थेट रंगपंचमी म्हणजे शिमग्याच्या दिवशी घरी यायचे. ते रात्रभर गोंधळ करायचे आणि सकाळच्या वेळेस माधवगिरी म्हणजेच भिक्षा मागायचे.

वयाच्या १२व्या वर्षापासून राजारामबापूंनी राधाकृष्णजी यांना कार्यक्रम करण्यासाठी आपल्या सोबत घेऊन जायला सुरुवात केली. बरेच गोंधळाचे कार्यक्रम या दोघांनी मिळून केले. राधाकृष्ण कदम हे पुढे अभिनयात, संबळ वादन, गोंधळातून प्रबोधन करण्यात फारच पारंगत झाले.

वयाच्या १३ वर्षी राधाकृष्ण कदम यांचं वत्सलाबाई यांच्याशी लग्न झालं. वत्सला यांचं गाव परभणीमध्ये 'बोरी' हे आहे. कालांतराने राधाकृष्ण कदम यांचं गिताबाई यांच्याशी दुसरे लग्नही झाले. विशेष म्हणजे राधाकृष्ण कदम यांचे वडील राजारामबापू कदम यांनाही दोन बायका होत्या. गीताबाईंना मुलं झाली नाहीत. वत्सलाबाईंच्या पोटी चार पुत्र जन्मले तेव्हा कुटुंब प्रमुख म्हणून राधाकृष्ण कदम यांनीच सर्व जबाबदाऱ्या पार पाडत चारही मुलांना शिकवले. त्यांनी स्वतः शिक्षण घेतले नव्हते.

राधाकृष्ण कदम, जेव्हा तरुण होते त्यावेळेस त्यांच्या घरी मोठी लोकं, मोठमोठे नेतेमंडळी गाड्या घेऊन येत असत. मोठमोठे हारतुरे घेऊन येत असत आणि त्यांना कार्यक्रमाचं निमंत्रण देत असतात. पण त्यांना त्या लोकांनी पैसा दिला नाही. कार्यक्रम देत गेले पण हवा तेवढा पैसा मिळाला नाही. त्यामुळे ते शेवटपर्यंत गरीबच राहिले. पण त्यांनी कला जोपासली कलेकरता उपाशी राहिले.

मुंबईमध्ये त्यांचा पहिला कार्यक्रम १९८१ मध्ये झाला. त्यावेळेस एकाच व्यासपीठावर ४ पिढ्यांनी मिळून तो कार्यक्रम पार पाडला. याच मुंबईकरांनी देखील भरभरुन कौतुक केले. इथूनच खऱ्या अर्थाने पिता–पुत्राची दखल वृत्तपत्रांनी घेतली आणि या पिता–पुत्रांचा आंतरराष्ट्रीय प्रवास सुरु झाला. तसेच, देवघरापुरता मर्यादित असलेला गोंधळ अज्ञात लोकांनी समोरील सूज्ञ लोकांपर्यंत पोहोचवला. राजारामबापूंना कोणी शिक्षण विचारले कि ते अंगठा दाखवत असत. म्हणजे त्यांचे शिक्षण काही झालेलं नव्हतं पण विशेष म्हणजे परंपरेत ते खूपच पारंगत होते. त्यांना ४ वेद, ६ शास्त्र, १८ पुराण हे सगळं तोंडपाठ होते. एखादा ग्रंथ ते घेऊन बसले तर तंतोतंत तेच आख्यान, तेच पुराण ते तसेच्या तसे रंगवत असत. जर ते शिकले नव्हते तर मग एवढे ग्रंथ, एवढे पुराण, एवढी शास्त्र, त्यांना कसे काय पाठ झाले? हाच खूप मोठा प्रश्न आहे. नंतर गल्लीचा गोंधळ दिल्ली पर्यंत गेला. दिल्लीतून त्यांनी मराठी मातीतला गोंधळ विदेशात नेऊन पोहचविला.

१९८२ पंढरपूर येथे आयोजित केलेल्या भक्ती संगीत महोत्सवाचे उद्घाटन करण्याचा मान या पिता–पुत्रांना मिळाला. पुणे, औरंगाबाद, जळगाव आकाशवाणी तसेच दूरदर्शनवरील कार्यक्रमांनी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र दणाणून सोडला.

तसेच, राष्ट्रीय स्तरावर भोपाळ, जयपूर, लखनऊ, दिल्ली, कोलकत्ता, मद्रास, बेंगलोर, हैद्राबाद, पणजी अशा मेट्रो सिटीला देखील महाराष्ट्राच्या लोककलेचे वेड लावले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर १९८६ मध्ये पॅरीस (फ्रान्स), हॉलंड येथे त्यांनी युरोपमध्ये जवळ पास २ महिने कार्यक्रम केले. फ्रान्सचे अध्यक्ष यांनी या पिता–पुत्राचा खास गौरव तर केलाच परंतु राजारामबापूंचा १०० वा वाढदिवस पॅरिस मध्ये साजरा केला.

१९८९ मध्ये मुंबई येथे अपना उत्सव भरवण्यात आला. भारताच्या कानाकोपऱ्यातील विविध कलाकार यांनी आपली कला सादर केली. परंतु या राष्ट्रीय महोत्सवाच खास आकर्षण राहिलं ते या महाराष्ट्रातील गोंधळ. खुद्द भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी या पिता–पुत्राची भेट घेऊन गौरव केला. राजारामबापूंना जेव्हा महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर झाला तेव्हा राजारामबापू अंथरुणावर पडून होते तेव्हा तो पुरस्कार राजारामबापूच्या वतीने राधाकृष्ण कदम यांनी स्विकारला. राजारामबापूंचा वारसा देखील स्वीकारला. १६ डिसेंबर १९९० ला राजारामबापू स्वर्गवासी झाले. त्यावेळेस त्यांच्या घरची परिस्थिती खूपच गरिब होती. त्यांना अग्नी देण्यासाठी स्मशानातून लाकडे विकत घ्यायला देखील पैसे नव्हते.

राजाराम बापू जर एखाद्या ब्राह्मण समाजामध्ये किंवा पुणे, मुंबईसारख्या मेट्रो सिटीमध्ये जन्माला आले असते तर राजारामबापूंना केव्हाच भारतरत्न देण्यात आला असता. तेव्हा त्यांच्या नावाने मोठमोठ्या अकादमी ओपन झाल्या असत्या आणि या अकादमी मधून कित्येक हजार रुपयांचे पॅकेज सरकारने दिलं असतं. त्यांच्या या अकादमीमध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती व परंपरा ही जगात दाखवून दिली असती. पण राजारामबापू परभणी सारख्या मागास जिल्ह्यात जन्मले. गोंधळी समाजातल्या मागास जाती मध्ये जन्मले. या दोन गोष्टींमुळे राजारामबापू यांची अधोगती झालेली आहे. असं त्यांच्या परिवाराची सातवी तरुण पिढी सांगते.

राजाराम बापूंच्या पश्चात राधाकृष्ण हे आपल्या आंतरराष्ट्रीय कला संचाचे प्रमुख बनले आणि त्यांनी देखील राजारामबापूंच्या पावलावर पाऊल ठेवून तोच ६० मीटरचा अंगरखा तसेच १५० हाताचे मुंडासे (पागोटे), त्याच झुपकेदार मिशा आणि तोच पहाडी आवाज घेऊन ते संपूर्ण भारत फिरले. लोकांना आश्चर्य वाटायचे बापू तर गेले, मग हे कोण? अशा प्रकारे राधाकृष्ण कदम यांनी राजारामबापूंना देखील जिवंत ठेवले आणि त्यांची कला देखील जिवंत ठेवली.

सन १९९७ मध्ये परभणी येथे ६८ वे आखील भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले यामध्ये श्री राधाकृष्ण कदम यांनी गोंधळ कलेचे सादरीकरण केले.

राधाकृष्ण कदम यांचा दिनक्रम अगदी पहाटे सकाळी पाचला सुरू व्हायचा. दुपारी चारला ते त्यांच्या १४ नातवंडांना त्यामध्ये आठ मुले व चार मुली. या सर्वांना एकत्र घेऊन संबळ, तुणतुणं, स्वर म्हणजेच ताल सूर व आवाज याचे शिक्षण द्यायचे. ते सर्व शिक्षण चार वाजल्यापासून सात वाजेपर्यंत सुरू असायचे. एक तास ताल शिकवायचे, एक तास सूर शिकवायचे, एक तास स्वर शिकवायचे. जेव्हा हे सगळे होईल तेव्हा सर्व नातवंडांना जेवायला मिळायचे. चुकले तर काठीचे फटके खायाला लागायचे. हे सगळे शिकवून झाल्यावर त्या सर्व नातवंडाना जवळ घेऊन रामायण, महाभारत, यातील वेगवेगळ्या वीर पुरुषांच्या कथा आख्यानाच्या स्वरूपात राधाकृष्ण हे सांगायचे. त्या सर्व कथांमध्ये सर्व नातवंडांना रमू द्यायचे आणि तेदेखील रमायचे. अशा पद्धतीने ते नातवंडांना गुरु–शिष्य परंपरेतून शिक्षण देत असत.

सन २००० मध्ये आकाशवाणी केंद्र औरंगाबाद तसेच परभणी येथे कदम यांनी त्यांच्या गोंधळाचे अनेक भाग सादर केले. सन २००४ मध्ये औरंगाबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये बापूंना त्यांचा आवडता अभिनय अर्थात 'राधाविलास' सादर करुन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

गोंधळ सम्राट राधाकृष्ण कदम आंतरराष्ट्रीय कलासंचाने आपली परंपरा, संस्कृती तर जपलीच आहे. त्याच बरोबर परंपरेतून अनेक ज्वलंत विषयावर समाज प्रबोधन देखील केलेले आहे. जसे दारु बंदी, हुंडा बंदी, स्त्री भ्रूण हत्या अशा अनेक विषयावर जनजागृती केलेली आहे. राधाकृष्णजी कदम यांनी असे सगळे मिळून आजपर्यंत जवळपास २५००० कार्यक्रमाचा टप्पा पार केला आहे. सन २००० मध्ये परभणी येथे दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र नागपूर व गोंधळ सम्राट कै. राजारामबापू कदम सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गोंधळ कार्यशाळेचे आयोजन श्री राधाकृष्ण कदम यांनी करुन त्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना गोंधळाबाबत मार्गदर्शन केले.

सन २००७–२००८ मध्ये दक्षिण मध्य सांस्कृतिक क्षेत्र नागपूरच्या वतीने परभणी येथे गुरू शिष्य परंपरेचे आयोजन करुन श्री राधाकृष्णजी कदम यांनी १०० विद्यार्थ्यांना गोंधळ या लोककलेचे प्रशिक्षण दिले.

गोंधळ महर्षी राधाकृष्ण राजारामबापू कदम यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

१. १९८९ मध्ये अपना उत्सव मुंबई येथे महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल मा. श्री. के. ब्रह्मानंद रेड्डी तसेच तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी विशेष सन्मानपत्र देऊन राधाकृष्णबापूंचा गौरव केला.

२. आंतराष्ट्रीय स्तरावर फ्रान्स येथील सेक्रेटरी जनरल मार्टिन वेस्टफल यांनी राधाकृष्णबापूंना विशेष सन्मानपत्र देऊन गौरविले.

३. पॅरिस येथे भारताचे उच्च आयुक्त मा. श्री आय. एच. लतिफ यांनी भारत सरकारच्या वतीने राधाकृष्णबापूंना विशेष प्रमाणपत्र बहाल करुन त्यांचा गौरव केला.

४. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार २००९चे ते मानकरी ठरले. मुंबई विद्यापीठाच्या वतीने राधाकृष्णबापूंचा विशेष गौरव करण्यात आला.

५. कर्नाटक (बेंगलोर) येथे राधाकृष्णबापूंना विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

६. आंध्रप्रदेश येथील हैद्राबाद येथे भरलेल्या लोक आलाप महोत्सवामध्ये राधाकृष्णबापूंना विशेष सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

७. दूरदर्शनवरील धीना धीन धाच्या परिक्षक इंदुमती लेले व सदानंद राणे यांनी राधाकृष्णबापूंचा विशेष गौरव केला.

अशा प्रकारे गोंधळ महर्षी राधाकृष्णजी राजारामबापू कदम यांच्या कलेची दखल घेऊन महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी, अनेक देशांनी, अनेक जगप्रसिद्ध कलाकारांनी व विविध पत्रकारांनी, मीडियाने, लेखकांनी, त्यांच्या कलेचा गौरव केला. अशा या महान गोंधळ महर्षी राधाकृष्णजी कदम यांची प्राणज्योत १८ जानेवारी, २०१६ रोजी मालवली.

३.२.२ राधाकृष्ण कदम यांची भेट

२९ एप्रिल, २००६रोजी, मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर मध्ये लोककला मोहत्सव भरवण्यात आला होता. गोंधळी राधाकृष्ण कदम यांचा कार्यक्रम तेथे ठेवण्यात आला होता. त्यांची राहण्याची व्यवस्था मुंबई विद्यापीठात लोककला विभागात करण्यात आली होती. तेथे संशोधक दुपारी पोहोचला. छान पद्धतीने फेटा घालून, गळ्यामध्ये कवड्याची माळ घालून, राधाकृष्ण कदम जमिनीवरच जेवायला बसले होते. त्यांची दोन नातवंडे मागे खुर्चीवर बसून राधाकृष्ण कदम यांच्या मुलासोबत जेवत होती. खुर्चीवर बसून त्यांना जेवायला बरोबर जमत नाही म्हणून ते जमिनीवर बसले होते.



जेवण झाल्यावर ते सर्वजण मुंबई विद्यापीठातील राहण्याची व्यवस्था केलेल्या खोलीमध्ये आले. त्या खोलीमध्ये त्या तीन पिढ्यांचा एकत्र फोटो त्याने काढला. म्हणजेच राधाकृष्ण कदम, त्यांची दोन मुले व त्यांच्या मुलांची दोन मुले. अशा या तिन्ही पिढ्या त्या एका खोलीमध्ये कॅमेऱ्यात बंदिस्त झाल्या.

त्यानंतर राधाकृष्ण कदम खाटेवर पडून थोडासा आराम करत होते तेवढ्यात त्यांचा नातू त्यांच्याजवळ गेला आणि त्यांना म्हणाला 'धोतर बांधून द्या'. राधाकृष्ण कदम हे पटकन उठले व क्षणाचाही विलंब न करता त्यांनी त्यांच्या नातवाला धोतर बांधायला मदत केली. एका पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे ती कला स्थलांतरित होत आहे, असा तो फोटो मिळाला.



त्याच रुममध्ये नंतर सर्वांना एकत्र घेऊन त्यांचा संबळ, तुणतुणे व दिमडी या वाद्यांसोबत तीन्ही पिढ्यांचा एकत्र फोटो काढला.



त्यानंतर राधाकृष्ण कदम कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण हॉलमध्ये आले आणि एवढ्या वृद्ध वयातही त्यांनी वजनदार अंगरखा घालून कार्यक्रमाला आरंभ केला. फार छान गोंधळ त्यांनी तेथे सादर केला. त्यांची मुलं आणि नातवंडे मागून संबळ, एकतारी, टाळ, दिमडी अशी विविध वाद्य वाजवून त्यांना साथ देत होती. तसेच ते सर्व अधूनमधून गोंधळ देखील सादर करत होते.

त्यांचा पिढ्यागत चालत आलेला गोंधळ मुंबईच्या लोकांनी अनुभवला. असा हा गोंधळ फारच रंगात आला आणि राधाकृष्ण कदम यांच्या वेगवेगळ्या भावमुद्रा त्याच्या कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त झाल्या.



वयाची पर्वा न करता राधाकृष्ण कदम यांनी म्हातारपणीही जी शक्ती, जी ताकद, जो कलाविष्कार लोकांपुढे सादर केला तो फारच वाखाणण्याजोगा होता.



पुढे एक वर्षानंतर म्हणजेच १५ जानेवारी, २००७ रोजी संशोधक मुंबई विद्यापीठामध्ये लोककला महोत्सव पाहण्यासाठी गेला. त्या वेळेस त्याला विठ्ठल उमप आणि राधाकृष्ण कदम या दोन्ही दिग्गज कलाकारांना एकत्र पाहण्याची संधी मिळाली. गोंधळ हा मुळात राधाकृष्ण कदम यांचाच कलाप्रकार. त्यांच्या वडिलांपासून म्हणजेच राजारामबापू कदम यांच्या पासून तो गोंधळ राधाकृष्ण कदम यांनी आत्मसात केला आणि ती कला पुढे नेली. पुढे तोच गोंधळ

लोकशाहीर विठ्ठल उमप यांनी 'जांभूळ अख्यान' या दोन अंकी नाटकातून एक वेगळ्या रूपाने लोकांपुढे आणला. असे हे दोन महान कलाकार मुंबई विद्यापीठात गळाभेट करताना दिसले आणि तो क्षण त्याने कॅमेऱ्यात बंदिस्त केला.



मुंबई विद्यापीठामध्ये इतर राज्यांच्याही लोककला सादर होणार असल्यामुळे बाकीच्या राज्यांमधून देखील लोककला पथके तेथे आली होती. ओडिशाच्या एका लोककला पथकामध्ये छोट्या छोट्या लोककलाकारांचाही समावेश होता. त्या सर्व छोट्या मुलांनी तेथे मुलींचा वेष परिधान केला होता. स्टेजच्या मागे ते सर्व छोटे कलाकार राधाकृष्ण कदम यांच्याशी गप्पा करण्यात रंगले होते. राधाकृष्ण कदम हे जणू काही त्या मुलांमध्ये त्यांच स्वतःच बालपण शोधत होते.



त्यानंतर राधाकृष्ण कदम यांनी त्यांचा गोंधळ हा लोककला प्रकार मुंबई विद्यापीठात सर्वांसमोर सादर केला. अप्रतिम कलाविष्कार वयाची तमा न बाळगता त्यांनी श्रोत्यांना दाखवला. पुन्हा एकदा तीन पिढ्या एकत्र एका स्टेजवर येऊन त्यांनी हा गोंधळ सादर केला.



१६ मार्च, २००७ रोजी संशोधक राधाकृष्ण कदम यांच्या गावी म्हणजेच परभणीला, गोंधळी वाडीत गेला. राधाकृष्ण कदम यांना भेटावे व जास्तीत जास्त त्यांच्या कलेविषयी जाणून घ्यावे, दोन–तीन दिवस त्यांच्या सोबत राहून त्यांच्या वरती प्रकाशचित्रणातून काम करावे. त्यांची मुलाखत घेण्यासाठी तो त्यांच्या परभणी येथील घरी गेला. त्यांच्या बऱ्याच वेगवेगळ्या विषयावर गप्पा झाल्या. त्यानंतर त्यांची दिनचर्या त्याने कॅमेऱ्यात चित्रित केली.



त्यांच्या राहत्या जागी त्यांना मिळालेले पुरस्कार व प्रशस्तीपत्रके, खूप छान पद्धतीने भिंतीवर टांगून ठेवली होती. तेव्हा ते सर्व कुटुंब जवळपास चाळीस लोक एकत्र रहात होते. खूपच साध्या पद्धतीचा, खूप मोठा असा वाडा त्यांचा होता. ते त्याचं सर्व जेवण चुलीवर बनवत होते. वेगवेगळी ३–४ मोठी रांजण पिण्याच्या पाण्याकरिता त्यांनी घरात भरून ठेवली होती. एकीकडे त्यांची सून गरम गरम भाकऱ्या करत होती आणि राधाकृष्ण कदम तेथे बसून त्यांच्या नातीला खेळवत होते. त्यांच्या या सगळ्या भावमुद्रा कॅमेऱ्याने टिपल्या.



राधाकृष्ण कदम यांच्या घरी तो पुढील दोन दिवस राहिला. त्या दोन दिवसात राधाकृष्ण कदम यांच्या वेगवेगळ्या दिनचर्या कॅमेऱ्यात बंदिस्त केल्या. राधाकृष्ण कदम आरशामध्ये पाहून मिशीवर ताव मारताना, त्याच्या बाजूला त्यांना मिळालेले असंख्य पुरस्कार आणि यामध्ये त्यांच्यासोबत दिसणारा शंकर देवाचा फोटो.



दुपारच्या वेळेस राधाकृष्ण कदम लोखंडी खाटेवर पडून आराम करतानाचा फोटो त्याने काढला. सोबत कालनिर्णय कॅलेंडरवर २००७ हे वर्ष दिसत होतं. म्हणजेच तो फोटो त्याकाळात घेऊन जात होता. असे वेगवेगळे फोटो त्याने राधाकृष्ण कदम यांच्या सोबत दोन दिवस राहून काढले.



शेवटच्या दिवशी संध्याकाळी त्यांनी परभणी मध्य एका मंदिरात त्यांचा गोंधळाचा कार्यक्रम सादर केला. नंतर १७ मार्च, २००७ रोजी तो सकाळी पुन्हा राधाकृष्ण कदम यांच्या घरी गेला. त्यांचे काही फोटो काढले आणि दुपारी पुन्हा मुंबईला परत यायला निघाला.

३.३ घटकाभ्यास क्रमांक : ३

देवानंद माळी

३.३.१ देवानंद माळी यांचा जीवन प्रवास

शाहीर देवानंद माळी यांचा जन्म २८मे, १९७१ साली, माळी समाजात, सांगली येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना गाण्याची आवड होती. देवानंद हे इयत्ता ३ री ला असताना वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी पहिला पोवाडा गायला. त्यांचं नावच देवानंद होते, म्हणून त्यांना सर्वजण 'देवा' अशीच हाक मारायचे.

देवानंद हे सखुबाई यांच्या पोटी जन्माला आले. त्यांच्या आई अशिक्षित आहेत. वडील हमाली करायचे, नंतर ते क्लिनर झाले, ड्रायव्हर झाले. वडिलांचे तुटपुंजे येणारे पैसे, आईचा भाजीचा धंदा. लहान–लहान तीन भावंडे. राहण्यासाठी अगदीच छोटीशी दहा बाय दहाची एक जुनी वडिलोपार्जित खोली. देवानंद यांची आई तेव्हा भाजी घेऊन विकायला जायची. या वाडीतून त्या वाडीत, त्या वाडीतून दुसऱ्या गल्लीत. मग रात्रीचे दहा वाजले की त्यांची ती माऊली घरी यायची, घरी आल्यावरती चुलीवरती जेवण बनवायची. मग त्यांना सर्वांना ते जेवण रात्रीच्या अकराला मिळायचे.

देवानंद हा ४थी इयत्तेत असताना, त्यांच्या आईंनी त्यांना पहिला पोवाड्याचा कार्यक्रम बघायला नेले, तोही तिकीट विकत घेऊन. कारण तेव्हा शाहिरीचे कार्यक्रम तिकिटाने पाहायला मिळत असत. त्या वेळेस देवानंद याला पोवाडा गायला येत होता. तो सारखा आईला हट्ट करू लागला की, मी स्टेजवर जाऊन पोवाडा म्हणू का? आईने त्याला नाही सांगितले, पण तो काहीच ऐकेना म्हणून कार्यक्रमाचा मध्यांतर झाल्यावरती त्याची आई त्याला म्हणाली की, 'जा'. देवानंद स्टेजवर गेला आणि शाहिर बाबासाहेब देशमुख यांच्या परवानगीने त्याने तेथे एक पोवाडा गायला. देशमुख छोट्या देवानंद याचा पोवाडा ऐकून फारच खूश झाले. शाहिरीचा कार्यक्रम पाहून देवानंद घरी आला. तो पोवाडा गुणगुणायला लागला. नंतर तो पोवाडे पाठ करायचा. बाकी घरचे ताटल्या, डब्बे वाजवून, देवानंद याला साथसंगत करायचे. नंतर देवानंद सारखेच पोवाडे गाऊ लागला आणि पुढे देवानंद याला शाहिरीचे कार्यक्रम पाहायला जाण्याची सवयच लागली. आईच्या मदतीने तो नेहमी शाहिरीच्या कार्यक्रमाला जात असे.

ज्या काळी देवानंद याने पोवाडे गायला सुरुवात केली, तो काळ बापूराव विभूते, क्रांतीशाहीर गणेश दत्तात्रय दिक्षित, पिराजीराव सरनाईक, शाहीर रमजान बागणीकर, शिवशाहीर बाबासाहेब देशमुख, शाहीर साबळे, कुंडलिक फरांदे, लोकशाहीर विठ्ठल उमप, शेख जैनू चांद, शाहीर वाईकरांचा,जंगम स्वामींचा, श्रीपादराव लोखंडे, महिला शाहीर अंबुताई विभूते, अनुषाबाई शिंदे या सर्व दिग्गज शाहिरांचा तो काळ होता.

एका दिवशी बापूराव विभूते यांच्या शाहिरीचा कार्यक्रम बुधगाव, सांगली येथे होता. देवानंद व त्याची आई सखुबाई, तो कार्यक्रम पाहायला गेले होते. तेथे बापूराव विभूतेंनी सखुबाई यांना विचारले, 'हा मुलगा कोणाचा आहे?' तेव्हा सखुबाई म्हणाल्या, 'त्याच्या वडिलांचे नाव महादेव आहे, मी त्याची आई आहे. बापूराव देवानंद याला म्हणाले 'तू तयार होणार का? तुला मी काकण बांधतो, मग दुसऱ्या दिवशी देवानंद यांच्या घरी सर्वांनी कार्यक्रम मांडला, स्वयंपाक केला. सन १९८३ साली बापूराव विभूते देवानंद माळी यांच्या घरी गेले. त्यांना म्हणाले 'बाळा तू आता एक कवन मला म्हणून दाखव'. देवानंद यांनी ते कवन म्हणायला सुरुवात केली. तेव्हा चाळीतले लोक घरी गोळा झाले ते कवन ऐकायला. नंतर बापूराव विभूते यांनी देवानंद यांना काकण बांधले व शिष्य बनवले. तसेच देवानंदचा शिष्य म्हणून ५१ वा नंबर आहे असे त्यांनी सांगितले. एवढे शाहीर देवानंद याच्या अगोदर बापूरावांनी तयार केले होते. बापूराव विभूते यांनी जेवण केले आणि ते त्यांच्या घरी बुधगावला निघून गेले.

देवानंद यांनी पहिला पोवाडा १९८५ साली गायला. शाहिर बापूराव विभूते यांनीच देवानंद यांना पहिला पोवाडा गायला दिला. तो असा होता..... **'बंधुराजे गाईच्या सुता गातो शिव गाथा ऐकावी कथा, ऐकावी कथा आन ठेवा शांतता सभास्थानात, कुजबुज नका लागू कवनास माळी शाहीर गातो इतिहास, जी जी, माळी शाहीर, गातो इतिहास जी, जी.'** अशा या पोवाड्याने देवानंद माळी यांचा प्रवास सुरू झाला. तो सांगलीच्या खंद भागात. देवानंद सारखे पोवाडे म्हणायला लागले, अनेक ठिकाणी कार्यक्रम करायला गेले. त्या वेळेला देवानंद यांच्याकडे काहीही वाद्य नव्हती. पण जेथे कार्यक्रमाला ते जायचे तेथे सगळी वाद्य असायची. एका कार्यक्रमात देवानंद गेले, तेव्हा एका दुसऱ्या मुलाकडे त्याने ढोलकी मागितली. त्या मुलाने ती सर्व वाद्ये आणि साहित्य घेऊन आतल्या खोलीत नेऊन ठेवली आणि म्हणाला, 'तुझ्याजवळ साहित्य नाही आहे, तर तू कार्यक्रम कशाला करतोस?', हे वाक्य देवानंद यांच्या

बाजूला उभ्या असलेल्या त्याच्या वडिलांना सहन झाले नाही. मग पुढील काही दिवसातच त्यांनी जाऊन थोडी थोडी वाद्ये गोळा केली. त्या नंतर देवानंद छोटे-छोटे असे कार्यक्रम करू लागले. सलग तीन दिवस त्यांनी सांगलीच्या चौकात पोवाडा गायन केले आणि तीन दिवसानंतर त्यांना त्या काळातली बिदागी ५१ रुपये मिळाली. त्या कार्यक्रमामध्ये देवानंद माळींसह पाच कलावंत होते. देवानंद यांच्या आईला आणि सर्वांला खूपच आनंद वाटला. घरी कोणी नसले की देवानंद व त्यांचे दोन भाऊ असे तिघेही पोवाडा म्हणायचे आणि त्यांच्या मागे मागे त्यांची आई पण पोवाडा म्हणत असे.

१९८९ साली देवानंद हे इयत्ता नववीत असताना, बापूराव विभूतेंसोबत फिरायचे. त्यावेळी महाराष्ट्र शासनाचा 'अपना उत्सव' होता. दिवंगत माननीय पंतप्रधान 'राजीव गांधी' यांनी त्या अपना उत्सवाचे आयोजन केले होते. मुंबईतल्या त्या लोककला अपना उत्सवासाठी संपूर्ण भारतामधून लोककलावंत आले होते. तेव्हा देवानंद देखील त्यांच्या गुरुंसोबत मुंबईला पोवाडा म्हणायला गेले. पुढील ४५ दिवस ते मुंबईत राहिले. माटुंगा, दादर, सायन, कुलाबा, घोडबंदर, गिरगाव चौपाटी, जुहू, नरिमन पॉईंट रोज संध्याकाळी एक पोवाडा मग बापूसाहेबांचा पोवाडा, त्यांचा फटका तेथे होत असे. तो फटका....

'येगळं मला दिसतया र बाबा येगळं मला दिसतया,

असं बोलायचं नसतया र बाबा येगळं मला दिसतया'

२०१० साली त्यांचा झी मराठीवर 'मराठी पाऊल पडते पुढे', हा जो कार्यक्रम सुरू झाला, त्याची रितसर जाहिरात निघाली. टीव्हीला ती जाहिरात पाहून देवानंद हे कोल्हापूरला ऑडिशनसाठी गेले. पहिल्याच राऊंडला माळी यांच्या पथकाची निवड झाली. पुन्हा दुसरा राऊंड आणि मग तिसरा राऊंड मुंबईला झाला. झी च्या त्या कार्यक्रमाचे निर्माते होते 'नितीन देसाई'. त्यांनी देवानंद माळी यांना पहिली संधी 'मराठी पाऊल पडते पुढे' या लोककलेच्या कार्यक्रमामध्ये दिली. त्यांचा पोवाडा सुरू झाला.'ही मराठी महाराष्ट्राची, माझ्या देशाची, साधू संतांची, गर्जती सह्याद्रीचे कडे आणि मराठी पाऊल पडते पुढे' हे कवन देवानंद यांनी गायले. नितीन देसाई यांना ते खूप आवडले.

'धन्य धन्य तानाजी खरा, धन्य धन्य तानाजी खरा नी भंगला हिरा, वीर मालुसरा अजरामर कीर्ती नांदे जगतात, अजरामर कीर्ती नांदे जगतात, कोंडाणा घेतला जाऊन रातोरात, जीवाची केली खैरात, जी हा जी जी जीवाची केली त्यानं खैरात जी हा जी जी, असे देवानंद यांनी ३२ भागांमध्ये ३२ शाहीर तयार केल्यामुळे ते टिकले, त्यांना संधी मिळाली तेव्हा त्यांनी एका भागात पिराजी सरनाईक, दुसऱ्या भागात बापूसाहेब विभूते, तिसऱ्या भागात बाबासाहेब देशमुख, शाहीर विठ्ठल उमप, निवृत्ती पवार, कुंडलिक फरांदे, असे प्रत्येक भागात वेगवेगळे शाहीर, असे एकूण ३२ भाग सादर केले. सहा महिने कार्यक्रम होता झी मराठीचा पण देवानंद यांनी त्या कार्यक्रमाचे नाविन्य टिकवून ठेवले. या मालिकेचे ते विजेते ठरले. जो शाहीर कोणालामाहिती नव्हता, तो शाहीर फक्त जिल्हा नाही? राज्य नाही? देश नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचला.

त्यांच्या कलेचा मोठा गौरव झाला. मग त्यांना फक्त जिल्ह्यामध्ये नव्हे , राज्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही पोवाड्यासाठी जावे लागले. मग ते राजस्थान, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेश, दिल्लीला गेले. रसिकांनी देवानंद माळी यांच्या पाठीवरती जी आशीर्वादाची थाप दिली, त्यावरच ते मोठे झाले.

देवानंद यांना २०१२ साली महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार शासनाच्या वतीने मिळाला. शासनाने दिलेला देवानंद यांच्या आयुष्यातला तो पहिला पुरस्कार होता. त्यांच्या कलेचा, त्यांच्या शाहीरीचा गौरव झाला. पुन्हा त्यांना लोकशाहीर भूषण, लोकशाहीर विभूषण, लोकशाहीर रत्न, शाहीर, समाजभूषण आणि आता हिंदवी स्वराज्य संस्था ग्रुप, शिरोळ यांनी देवानंद माळी यांना शाहीर सम्राट किताब दिला.

तो पुरस्कार माळी यांनी न घेता तो त्यांच्या गुरुजींच्या चरणी अर्पण केला, कारण तेच खरे शाहीर सम्राट होते. माळी यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार मिळाले. त्यांच्या घराण्यामध्ये त्यांचे संपूर्ण कुटुंबच शाहीरी कला सादर करते. त्यांची पत्नी, त्यांच्या दोन मुली, त्यांचा लहान १०वर्षाचा मुलगा पृथ्वीराज, त्यांची मेहुणी वंदना, त्यांचे दोन भाऊ रवी आणि रघू यांच्यासोबत त्यांच्या आईसुद्धा पोवाडा म्हणतात. विशेष म्हणजे त्यांच्या आई, आज ७० वर्षाच्या आहेत, या वयात सुद्धा त्या मुलांसोबत पोवाडा म्हणतात, साथ करतात, जी जी म्हणतात.

त्यांना कल्पना नव्हती की, त्यांची पत्नी कल्पना पोवाडा म्हणेल म्हणून. त्याच कल्पनाचे आता महिला शाहीर म्हणून अख्या महाराष्ट्रात नाव गाजतेय. देवानंद माळी यांनी या शाहीरीला नवे वळण दिले. बाज तोच आहे. आपण म्हणतो ना जुनं ते सोनं. हार्मोनियम, ढोलकी, डफ, दिमडी, संबळ, इत्यादी वाद्य प्रभावीपणे देवानंद माळी हे वाजवतात.

देवानंद यांना अभिमान वाटतो की, त्यांना स्वतःला कोणत्याही गोष्टीचे व्यसन नाही. खऱ्या अर्थाने देवानंद माळी हे आज शाहीर झाले आहेत. त्यांना जे पाहिजे होते ते गतवैभव आता प्राप्त झाले आह, असे म्हणावे लागेल. त्यांची आता अशी इच्छा आहे की, शाहीरी व लोककला अकादमी स्थापन करून, नवीन नवीन लहान–लहान बालशाहीर निर्माण करायचे, जे भविष्यात देशाची आणि समाजाची सेवा करतील. म्हणून त्यांनी अकादमीची स्थापना करण्याचा संकल्प केला आहे. दुसरा संकल्प देवानंद माळी यांचा आहे. 'आज कितीही मोठा कलाकार असला तरी, उतार वयामध्ये त्याचे खूपच हाल होतात. त्याचे हाल होऊ नयेत, म्हणून शाहीर कलाकार व इतर काही लोककलावंत यांच्या सर्वांसाठी देवानंद माळी एक वृद्धाश्रम काढणार आहेत. जेणेकरून गुरूकुल पद्धतीचे शिक्षण, ते तेथे देऊ शकतील. त्या कलाकारांना कामही मिळेल, कामाचं दामही मिळेल, अशी देवानंद यांची एक संकल्पना आहे. त्या करिता जे वयस्कर वृद्ध शाहीर असतील, ते शाहीरी शिकवतील, जे वादक असतील, ते वाद्य शिकवतील, जे गायक असतील ते कलाकार गायन शिकवतील, असे एक कलेचे विद्यापीठ करण्याचा मानस माळी यांनी केलेला आहे.

आतापर्यंत त्यांनी घरचा प्रपंच केला. पण आता त्यांना त्यांच्या कलाकारांचा प्रपंच करायचा आहे. त्या कलाकारांची मुलं–बाळं, माळी यांना घडवायची आहेत. त्यांच्या परिवाराने अशा चांगल्या कामाला साथ द्यायचे ठरवलेले आहे. या देशाला आज लहान लहान शाहीर पाहिजेत. या महाराष्ट्राला, देशाला एक, दोन, तीन, चार शाहीर पुरणार नाहीत. शाहीरीची अशी एक फळी निर्माण झाली पाहिजे. शाहीरी जोमाने वाढली पाहिजे. आज शाहीरीतून फक्त शिवाजी महाराजांचे गुणगाण गातो, असे देखील नाही. समाजामध्ये आज अनेक समस्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्या रोखण्यासाठी ते कवन लिहित आहेत. पोवाडे लिहित आहेत. व्यसनमुक्ती असेल, आरोग्य असेल, लेक वाचवा असेल, लेकीला शिकवा असेल

हुंडाबंदी कायदा असेल, तंटामुक्ती असेल या सगळ्याचा विचार, प्रचार आणि प्रसाराचं, काम देवानंद हे शाहीरी कलेतून करत आहेत.



शाहिर देवानंद माळी यांच्या थोडक्यात कार्याचा तपशील व मिळालेले मान–सन्मान

जवळपास भारतभर फिरून देवानंद माळी यांनी त्यांची कला सादर केली.

- सन १९९७, ९८, ९९ या तिन्ही वर्षात शासनाच्या जिल्हा व्यसनमुक्ती कार्यक्रमात देवानंद माळी यांनी सतत प्रथम क्रमांक मिळवला.
- १५ जानेवारी, १९९९, नांदेड येथे झालेल्या 'राज्यस्तरीय कला महोत्सवात' देवानंद माळी यांचा प्रथम क्रमांक आला.
- भारत सरकारच्या नभोवाणी (आकाशवाणी) केंद्रावर १९८३ ते २०१४ पर्यंत लोकसंगीत या कला प्रकारामध्ये 'बी हाय ग्रेडचा कलामंच' म्हणून निवड. आतापर्यंत तीस ते पस्तीस पोवाडे आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून देवानंद माळी यांनी प्रसारित केले. तसेच दूरचित्रवाणी व विविध वाहिन्यांवरही देवानंद माळी पोवाडे सादर केले.
- भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील व केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री अंबिका सोनी यांच्या उपस्थितीत २६ जानेवारी, २००८ रोजी, प्रजासत्ताक दिनानिमित्त, दिल्ली येथे झालेल्या लोक तरंग या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी शाहिरी पोवाडा सादरीकरण करण्यासाठी, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर यांच्यावतीने देवानंद माळी यांची

महाराष्ट्र राज्यातून एकमेव निवड करण्यात आली.

- १४ एप्रिल, २००८ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या 'राज्यस्तरीय शाहिरी स्पर्धेत' देवानंद माळी हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले. त्यांना रोख रक्कम २१००० रुपये, स्मृतिचिन्ह व मानपत्र देण्यात आले.
- आषाढी वारी निमित्त आळंदी ते पंढरपूर या पायी यात्रेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य व स्वच्छता विभागातील लोकांसोबत गेली अनेक वर्ष समाज प्रबोधनाचे कार्यक्रम सादर करण्यात देवानंद माळी अग्रेसर आहेत.



- तसेच 'देऊळ' या चित्रपटासाठी पार्श्वगायनासाठी २०१२ सालचा झी गौरव पुरस्कार.
- कोल्हापूर येथे होणाऱ्या 'दसरा महोत्सवात' शाहीर स्पर्धेमध्ये सलग तीन वर्ष प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देवानंद माळी यांनी पटकावले.
- महाराष्ट्र शाहीर परिषद, पुणे यांचा, 'युवा शाहीर पुरस्कार' देवानंद माळी यांना मिळाला.
- महाराष्ट्र शासन, जिल्हा व्यसनमुक्ती कार्यालयाचा, जिल्हा व्यसनमुक्ती जिल्हास्तरीय पुरस्कार देवानंद यांना मिळाला.
- राजधानी दिल्लीतील 'सुवर्ण महोत्सवात' पोवाडा सादर करण्याचा मान शाहिर देवानंद माळी यांना मिळाला.

३.३.२ देवानंद माळी यांची भेट

२६ डिसेंबर, २०१८ रोजी संशोधक सांगलीला गेला. तिथे काही लोककलाकारांची छायाचित्रे काढायची होती. त्याच दिवशी संध्याकाळी शिवलीला सांस्कृतिक कला मंच, यांनी शाहीर देवानंद माळींचा पोवाड्याचा कार्यक्रम विष्णुदास भावे नाट्यगृहात ठेवला होता. शाहिरी सोबत इतरही लोककला प्रकार तेथे सादर होणार होते. त्या संपूर्ण कार्यक्रमाला शिवलीला सांस्कृतिक कला मंच यांनी 'महाराष्ट्रीय लोककला महोत्सव' हे नाव दिले होते. संध्याकाळी सात वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. कोल्हापूरच्या एका लोककलाकाराने पहिले सोंगी भारुड सादर केले. त्यानंतर शाहीर देवानंद माळी यांचा शाहिरीच्या कार्यक्रम सादरीकरणाला सुरुवात झाली. शाहीर देवानंद माळी हे त्यांच्या संपूर्ण परिवारासोबत स्टेजवर आले. त्यामध्ये त्यांची पत्नी, अडीच वर्षाचा मुलगा पृथ्वीराज, देवानंद माळी यांचा समावेश होता. त्यांचे दोन भाऊ, एक पेटी वाजवायला बसला व दुसऱ्या भावाने ढोलकीचा ताबा घेतला. तडफदार आवाजाचे शाहीर देवानंद माळी यांनी त्यांच्या डफावर थाप मारून कणखर आवाजात डफ वाजवायला सुरुवात केली. साधारण तीन मिनिटे डफ वाजवून झाल्यावरती त्यांनी 'ओम नमो नमः श्री गणा, ओम नमो नमः श्री गणा, या गीताने कार्यक्रमाला आरंभ केला. देवानंद यांच्या पत्नी कल्पना यांनी देवानंद यांच्या मागे उभे राहून कोरस दिला. त्यांचा अडीच वर्षाचा मुलगा पृथ्वीराज याने त्याच्या नाजूक हातात खंजिरी घेऊन वडील देवानंद यांच्या बरोबरीने ताल द्यायला सुरुवात केली. सर्व प्रेक्षक वर्गाचे लक्ष त्या चिमुकल्याकडेच लागले होते. माळी परिवाराने हे छान गीत गाऊन लोकांच्या टाळ्या मिळवल्या.

त्यानंतर शाहीर देवानंद माळी यांनी दुसरा पोवाडा जिजामातेचा गायला. तो असा... 'धन्य ती जिजाऊ माऊली जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती देशाचा उद्धार करी'. त्यानंतर शाहीर देवानंद माळी यांनी शाहिस्तेखान आणि शिवाजी महाराज या दोघांच्या भेटीवर आणि शिवाजी महाराजांनी कसा शाहिस्तेखानाचा वध केला हे पोवाड्यातून फारच छान पद्धतीने व पहाडी आवाजात गाऊन दाखवले. शाहीर देवानंद माळी यांच्या पहाडी आवाजाची झलक समोरील रसिकांनी अनुभवली. असा छान कार्यक्रम त्याने कॅमेऱ्यात कैद केला व चलचित्रण सुध्दा केले.



पुढील चार दिवसांनी म्हणजेच ३०डिसेंबर, २००८ रोजी, तो शाहीर देवानंद माळी यांच्या घरी गेला. ते सांगलीमध्ये एका चाळीत राहत होते. त्यांच्या घरी त्यांचे आई–वडील, त्यांचे दोन भाऊ, त्यांची पत्नी, त्यांच्या दोन मुली व एक मुलगा असे सर्व एका छोट्याशा खोलीत राहत होते. तो जेव्हा गेला तेव्हा देवानंद माळी हे घरात एकटेच होते. तो शाहीर देवानंद माळी यांना भेटला, त्यांच्याशी बऱ्याच वेळ गप्पा मारल्या. तितक्यात त्यांची मुलगी आली, ती तेव्हा इयत्ता आठवीत शिकत होती. तिला वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये बरीच बक्षिसे मिळाली होती. प्रशस्तीपत्रके देखील मिळाली होती. ती हे सर्व घेऊन आली आणि तिने तिच्या वडिलांना फारच आनंदात या सगळ्या गोष्टी दाखवल्या. देवानंद माळी यांनी तिला मिळालेले पुरस्कार, तिला मिळालेली प्रशस्तीपत्रके पाहायला सुरुवात केली. दोघांच्याही आनंदी मुद्रा तेव्हा त्याच्या कॅमेऱ्यात कैद करता आल्या.



संध्याकाळी देवानंद माळी यांचा संपूर्ण परिवार घरी आला. तेव्हा त्यांच्या संपूर्ण परिवाराचा फोटो त्याच्या कॅमेऱ्यात टिपता आला.



थोड्या वेळाने त्यांचा अडीच वर्षाचा मुलगा पृथ्वीराज हातामध्ये एक डब्याचे झाकण घेऊन डफासारखे वाजवू लागला. देवानंद माळी यांनी देखील एक मोठी पितळी हातात घेऊन, डफासारखी वाजवायला सुरुवात केली. दोघा बापलेकांची ही जुगलबंदी घरातल्या सर्वांनीच अनुभवली.




शाहीर देवानंद माळी हे त्या वेळेस रिक्षा चालवत होते. तसेच सांगलीमध्येच त्यांचे फुलाचे व हाराचे दुकानात देखील होते. त्याने देवानंद माळी हे त्यांच्या मुलींना शाळेतून रिक्षाने घरी घेऊन येतानाचा फोटो काढला. तेव्हा देवानंद माळी हे रिक्षा चालवत होते व पृथ्वीराज त्यांच्यासोबत पुढे रिक्षाची स्टेअरिंग पकडून बसला होता.

३० डिसेंबर, २०१० रोजी सकाळी तो शाहीर देवानंद माळी यांच्या फुल-हाराच्या दुकानावर गेला. ते त्या दुकानात हार बनवत बसले होते. त्यांच्यासोबत त्यांची पत्नी कल्पना ह्या देखील होत्या. त्याने हार बनवताना, शाहीर देवानंद माळी यांचे काही फोटो काढले.



त्यानंतर देवानंद माळी चहा पितानाचे काही फोटो काढले. तेथून तो त्यांच्या सोबत त्यांच्या चाळीत असलेल्या घरी गेला आणि तेथे काही फोटो काढले.



२२ जानेवारी, २०१० रोजी मुंबईमध्ये गेटवे ऑफ इंडियाला 'सप्तरंग महोत्सव' हा लोककलेचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यामध्ये महाराष्ट्रातून आलेले वेगवेगळे लोककलाकार कला प्रस्तुत करणार होते. शाहीर देवानंद माळी यांचा देखील पोवाड्यांचा कार्यक्रम तेथे सादर होणार होता. सुरुवातीला चंदाबाई तिवारी यांचे सोंगी भारुड सादर झाले. त्या नंतर एक लावणी सादर झाली आणि नंतर कमलाबाई शिंदे यांचा जागरण गोंधळ याचे सादरीकरण झाले. त्या नंतर शाहीर देवानंद माळी यांनी त्यांचा पोवाडा गायला सुरवात केली. त्या कार्यक्रमात देवानंद माळी यांनी शिवाजी महाराजांचा पोवाडा त्यांच्या पहाडी आवाजात गायला. समोरील प्रेक्षक फारच खूश झाले. त्यानंतर एक फटका देखील देवानंद माळी यांनी गायला. तो होता... 'वेगळं मला दिसतया रे बाबा, वेगळं मला दिसतंय, बोलायचं नसतं रे बाबा, वेगळं मला दिसतंया' हा त्यांचे गुरू बापूराव विभूते यांनी रचलेला फटका शाहीर देवानंद माळी यांनी गायला. कार्यक्रमात फारच रंगत चढली. त्यांच्या या फटक्याला लोकांनी वन्समोर अशी जोराची हाक दिली आणि शाहीर देवानंद यांनी पुन्हा तो फटका गायला.



दिनांक १३ फेब्रुवारी, २०१६ रोजी तो पुन्हा सांगलीला गेला. तेव्हा तो शाहीर देवानंद माळी त्यांना भेटला. तो सुरुवातीला त्यांच्या हाराच्या दुकानावर गेला, तर तिथे देवानंद माळी हे त्यांच्या कुटुंबियांसोबत हार तयार करत होते. त्या सर्वांचा एकत्र हार बनवतानाचा फोटो काढला. काही वेळ त्यांच्या गप्पा झाल्या. दुपारी शाहीर देवानंद माळी त्यांनी दुकान बंद केले.



त्यानंतर तो शाहीर देवानंद माळी यांच्या नवीन घरी गेला. त्यांचं नवीन घर एका बिल्डिंगमध्ये दुसऱ्या मजल्यावर होते. संशोधनाकरता शाहीर देवानंद माळी यांची मुलाखत त्याला घ्यायची होती. त्यासाठी तो त्यांच्या घरी गेला. दुपारचं जेवण झाल्यावर त्याने, शाहीर देवानंद माळी यांची मुलाखत घ्यायला सुरुवात केली. देवानंद माळी यांनी स्वतःबद्दलची बरीचशी माहिती त्या मुलाखतीद्वारे सांगितली. त्याने ती चलचित्र कमेऱ्यात चलचित्रीत केली, मध्ये-मध्ये काही छायाचित्रे देखील काढली.



त्यानंतर त्याने शाहीर देवानंद यांची बायको कल्पना यांची देखील छोटीशी मुलाखत घेतली. तसेच देवानंद माळी यांच्या आईची देखील छोटीशी मुलाखत घेतली. त्यावेळेस त्यांचा मुलगा पृथ्वीराज हा १०वर्षांचा होता. त्याने डफ वाजवला, दिमडी वाजली, एक पोवाडा गायला आणि दोन गाणी गायली.

नंतर शाहीर देवानंद माळी देखील फार छान पद्धतीने डफ, दिमडी आणि एक तारी वाजवून त्याला दाखवली. या सगळ्या गोष्टी कॅमेऱ्यात टिपल्या. सर्व शूट करून झाल्यावर तो सांगलीच्या शासकीय विश्रामगृहात आला.

३.४: घटकाभ्यास क्रमांक : ४

राजू बाबा शेख

३.४.१ राजू बाबा शेख यांचा जीवन प्रवास

रियाजोद्दीन अब्दुलगणी शेख उर्फ राजूबाबा शेख यांचा जन्म दिनांक १७ एप्रिल, १९४२ रोजी बीड जिल्ह्यातील वडवणी या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अब्दुलगनी होते. ते मुलाणी होते. ते संपूर्ण गावात फिरून बकरे कापत असत. संपूर्ण गाव त्यांना मुलाणी म्हणूनच ओळखायचं. राजूबाबांची आई पठाण घराण्यातील होती व वडील शेख घराण्यातील होते. राजू बाबांचे वडील जेव्हा ५५ वर्षाचे होते. तेव्हा त्यांना रजाकार चळवळीत गोळी लागली व त्यानंतर ते आजारी पडले, काही दिवसातच ते स्वर्गवासी झाले. त्यांची आई मुलांना घेऊन त्यांच्या मामाच्या आश्रयाला गेली त्यामुळे ती सुखरूप राहिली. राजू बाबांचे आजोबा दगडूमियाँ हे शासकीय सेवेत कोतवाली करायचे. राजू बाबांचे शिक्षण झालेले नव्हते.

राजूबाबांना लहानपणापासूनच हिंदू धर्माची फारच आवड होती. गंध लावणे, बुक्का लावणे, माळ घालणे देवाची पूजा करणे, तुळशीला प्रदक्षिणा, पाणी घालणे, दररोज मारुतीच्या देवळात पाया पडायला जाणे. तेथे गेल्यावरती त्या मंदिरात जो दिवा असायचा, त्या दिव्याची काजळी घेऊन राजू बाबा ती बुक्का म्हणून कपाळाला लावत. त्यांना हे सर्व करताना खूप आनंद व्हायचा.

राजू बाबा लहानपणी रानामध्ये दिवसभर गाई सांभाळायचे. त्यावेळी ते ८ वर्षाचे होते. मालकाकडेच जेवायचे, पुन्हा काम करायचे. त्या वेळेस मारुतीच्या मंदिरात रामायण लागत होते. रामायणची कथा राजू बाबांनी गावातील मुलांकडून वाचून घेतली. तेव्हा त्यांना खूपच आनंद झाला. रामाची सेवा करावी, पूजा करावी असे राजू बाबांना वाटले. त्यावेळेस योगायोगाने रामायणग्रंथ वाचन 'केज' या राजू बाबा यांच्या गावी मारुतीच्या मंदिरात सुरु झाले. रात्रभर भजन, कीर्तन व्हायचे.

ग्रंथामध्ये जसे लिहिले आहे की, राम वनवासाला गेले. त्यांनी १४ वर्ष वनवास केला तसा आपण पण १४ दिवस तरी वनवास करुन यायचा अशी प्रथा असते. त्यांच्यासोबत गावातली काही लोकं वनवासाला निघाली. त्या वेळेस राजूबाबाही वनवासाला गेले. राजूबाबा त्यांच्या 'केज' या गावातून संत एकनाथ महाराजांच्या पैठणला पायी चालत आले. दिवसभर श्री राम, जय राम म्हणायचे. संध्याकाळी मुक्कामाच्या ठिकाणी कथा करायची, रामायण वाचायचं. तिथे पण भजन–कीर्तन होत असे. १४ दिवस उपवास धरायचे. जेवण करायचे नाही. पायात चप्पल घालायची नाही, पायी चालायचे. फिरत फिरत जंगलातच जायचं. गावात कुठेच राहायचे नाही. चुकून मुक्काम केला, तर मारुतीच्या मंदिरात मुक्काम करायचे जे गावाच्या बाहेरच होतं. हे सर्व राजूबाबांनी ते मुसलमान असूनही केले. राजू बाबा वनवासाला जाऊन आल्यावरती गावकऱ्यांनी त्यांचा छळ करायला सुरुवात केली. इतकेच नाही तर, घरच्या लोकांनी देखील त्रास दिला. गावातली मुसलमान मंडळी राजूबाबांच्या घरी यायची. त्यांच्या मोठ्या भावाला सांगायचे, 'तुझ्या भावाला काही सांग, तो वनवासाला का गेला? हिंदू धर्माचं आचरण का करतो? '



लहानपणापासूनच सर्वांचा विरोध झुगारून, हातातला कामधंदा सोडून, राजू बाबा दिंडीसोबत पंढरपूरला जायचे. तेथून त्यांनी पुस्तक आणली. बखर स्वामींची भजनी मालिका आणली, मामा दांडेकरांची मालिका आणली. दोन्ही मालिका घेऊन राजू बाबा आले. सुनी या गावी राहणारा रसिक हा केजला शाळा शिकायला येत होता. त्याच्याकडूनच राजूबाबा लिहायला–वाचायला शिकले. दिवसभर जनावरांमागे, गाईमागे, गुरेराखत असताना पंचरत्न हरिपाठ, बारा अभंग, भूपाळी मालिका असे सगळे पाठांतर केले. एकादशीला तेच पुस्तक आणि वीणा घेऊन रात्रभर पुस्तक समोर ठेवून रामकृष्ण हरी पासून जे सुरुवात करायचे ते आरती होईपर्यंत सगळं पुस्तक वाचून काढायचे. दिवस निघेपर्यंत एकट्यानेच वीणा घेऊन त्या पुस्तकाचे पाठांतर राजू बाबा करत असत. अशी राजू बाबांची दोन्ही पुस्तक संपूर्ण पाठ झाली. मग ते रोज वेगवेगळे अभंग, रोज नवीन नवीन अभंग त्यांच्या भजनात म्हणायचे.

लहान असताना राजू बाबा लोकांची कीर्तनं, भजनं नेहमीच ऐकत असत. बरेच लोकं कीर्तन ऐकता ऐकता मध्येच उठून जात असत हे राजू बाबांना खूप लागायचं, ते त्यांना आवडत नव्हते. मग काय करावे, असा विचार करता नाचून कीर्तन करावे असे राजू बाबांना वाटले. मग नुसते नाचणे पण नको, त्यात काहीतरी पाहिजे? लोकांनी पाहण्यासाठी, त्यांना रस निर्माण होण्यासाठी, मग राजू बाबांनी थाळी नृत्याचा प्रयोग केला, समई ठेवून त्याच्यावर घागर ठेवून प्रयोग केला. नंतर घागर, समई, पराती वरचे नृत्य हे कीर्तनात राजू बाबांनी मनानेच बसवले. रानातून पाणी आणत असताना, हे सगळे खेळ राजू बाबा खेळत होते. ही माहिती भजन मंडळींपर्यंत पोहोचली. हा मुलगा रानात काहीतरी कला सादर करतोय. शंकर पाटील यांना राजू बाबांचीही माहिती मिळाली. मग एक दिवस त्यांनी राजू बाबांना भजनातच जवळ बोलवले आणि म्हणाले, 'अरे तू रानात तुझी कला दाखवतो का? रानात असे करतो का? गावात कर, माणसात कर. माणसात केल्यावरती तुला बक्षीस मिळेल. लोक खूष होऊन, तुला काहीतरी बक्षीस देतील. तुझे चांगले होईल.

'त्यावेळेस तिथे घुंगरू, वगैरे काही नव्हते. मग त्यांनी सुरुवातीला बैलांच्या गळ्यात बांधायचे घुंगरू आणले, त्याला चकाळे म्हणतात. दोन्ही चकाळे, दोन पायांमध्ये बांघले. राजू बाबांना घालायला, नेहरु शर्ट दिला. पाटलांनी फेटा बांधला. कंबर बांधली, वीणा दिली आणि भजन मंडळींपुढे राजूबाबांना उभे केले. राजू बाबांनी पण भीत–भीत राम कृष्ण हरी पासून कार्यक्रम सुरु केला आणि पार पाडला. कार्यक्रमात लागणारं सगळं साहित्य हे पाटील यांनीच जमा करून आणून दिले होते. हा कार्यक्रम १९५७ मध्ये राम मंदिरात झाला होता. खूप लोकं, समाज या कार्यक्रमाला जमला होता. आनंदाच्या भरात कोणी चार आणे, एक आणा, अर्धा आणा, एक पैसा, दोन पैसे असे राजू बाबांना बक्षीस दिले. त्यावेळेस राजूबाबा १५ वर्षांचे होते. ८व्या वर्षापासून १५ वर्षांपर्यंत राजू बाबा ही कला शिकतच होते. राजू बाबा सात वर्ष ही कला शिकले. नंतर त्यांनी हा कार्यक्रम केला. पहिल्याच कार्यक्रमाला त्यावेळेस ८० रुपये बक्षीस मिळाले. राजू बाबा तेव्हा महिन्याला मालकाकडे काम करून एक रुपया कमवत होते. हे ८० रुपये फक्त २–३ तासांत जमा झाल्यामुळे, राजू बाबांना खूपच आनंद झाला. इतके पैसे त्यांनी कधीच पाहिले नव्हते.

कष्टकरी जनता कीर्तन ऐकण्याचा कंटाळा करते, कीर्तन ऐकताना झोपा काढते, या गोष्टीचे बाबांना फार वाईट वाटते. कीर्तनात लोकांना रस वाटावा, यासाठी बाबांनी कीर्तन वेगळ्या पद्धतीने सादर करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्याच्या कीर्तनामध्ये थाळी नृत्य, समई नृत्य, घागर नृत्य, परातीवरचे नृत्य यांचा समावेश केला. नवनवीन प्रयोग करत जोमाने त्यांचे कीर्तन सादर केले.

मग संपूर्ण 'केज' तालुक्यातील खेडेगावात जेथे जेथे ओळखी आहेत, तेथे कार्यक्रम करायला ते जायला लागले. स्वतःहून राजू बाबा कोठेही जायचे. लोकांना ते आपणहून सांगायचे मी कीर्तन करतो, अभंग गातो, परातीवर नृत्य करतो. असं सगळं ते पटवून द्यायचे. त्या लोकांना ते आवडायचे आणि ते त्याच संध्याकाळी राजू बाबा शेख यांचा कार्यक्रम ठेवायचे. ती लोकं राजू बाबांच्या कार्यक्रमाची गावात दवंडी द्यायचे. बरेच लोकं कार्यक्रम बघायला यायचे. राजू बाबांना आनंद व्हायचा. बरेच पैसेही मिळायचे. चारधामला ते गेले असता, त्यांच्या काही ओळखी झाल्या होत्या. बारा वर्ष राजू बाबांनी चारधाम केले. वर्षातून दोन–तीनदा राजू बाबा चारधामला जायचे. असे बारा वर्षात ३०–३५ वेळा चारधाम केले. प्रत्येक गावातून चारधामला आलेली लोकं त्यांच्या ओळखीची असायची. कोण म्हणायचं 'आमच्या गावाला या'. कोणी म्हणायचं 'आमच्या गावाला तुझा कार्यक्रम करुया'. तेव्हा राजू बाबा सगळ्यांचे पत्ते घेत असत व त्या पत्त्यावरून ते सर्व गावी जात असत.

नमाजासोबत पूजाही करणारे, दर्ग्यात जाणारे आणि भगवतगीताही वाचणारे राजू बाबा अभंगही म्हणायचे. राजू बाबांनी त्यांच्या कीर्तनाला चक्रीभजन असे नाव दिले होते. हिंदू–मुस्लिम धर्माच्या ऐक्याची महती सांगताना दोन्ही धर्माचा सुवर्णमध्य साधणारे राजू बाबा शेख हे अख्या महाराष्ट्राचा कुतुहलाचा विषय आहेत. राजू बाबा हे मुस्लिम असूनही त्यांनी समाज प्रबोधनासाठी कीर्तनाच्या माध्यमाचा फार सुंदर पद्धतीने उपयोग केलेला आहे. धर्माच्या वादळात राजू बाबांचे कुटुंब आणि राजूबाबा हे नेहमी सापडले. पण तटस्थ भूमिका घेऊन, शांत राहून, राजूबाबा या सगळ्या परिस्थितीला नेटाने सामोरे गेले.

राजू बाबा शेख हे राम आणि रहीम या दोघांनाही देवस्थानी मानणारे असे कलावंत. राजू बाब शेख यांनी वारी नृत्य नावाचा प्रकार हा मराठी संस्कृतीत आणला. वारी नृत्याद्वारे ते समाज प्रबोधन करतात आणि विविध संतांची भारुड, अभंग, गवळणी ते सादर करतात.

राजूबाबांना लग्न करायचं नव्हतं. पण त्यांच्या आईने फारच हट्ट धरला आणि शेवटी राजूबाबांनी नाईलाजास्तव लग्नाला होकार दिला.

लग्नानंतर राजूबाबांना चार मुली आणि दोन मुले झाली. राजूबाबांच्या पहिल्या मुलीचे नाव सयदा आहे, तिचा जन्म १९८४ साली झाला. १९८६ साली दिलदार ह्या मुलाचा जन्म झाला. या दोघांच्या नंतर मुमताज, नशरीनिशा व यास्मिन या तीन मुली राजूबाबांना झाल्या व नंतर जाहेद नावाचा मुलगा झाला. अशी एकूण ६ मुलं राजूबाबांना झाली.



श्रीरामपूरच्या गोविंदराव आदिकांनी आपल्या 'भूले–बिखरे' संस्थेमार्फत राजूबाबांचा मुंबईला कार्यक्रम ठेवला. तो राजू बाबांचा मुंबईमधील पाहिलाच कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमाला राष्ट्रपती शंकर दयाळ शर्माही आले होते. कार्यक्रम संपल्यावरती त्या वेळेस राजेश खन्ना, सुनील दत्त, आशा पारेख, प्रभा राव, रामराव आदिक असे बरेच हिरो–हिरोईन व मंत्री राजू बाबांच्या कार्यक्रमाला हजर होते. नाना पाटेकर तेव्हा फारच लहान होते. कार्यक्रम संपल्यावर त्या हॉलमध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. राजू बाबा की जय, राजू बाबा की जय म्हणून प्रेक्षकांनी सारख्या टाळ्या वाजवल्या. कार्यक्रम संपल्यावर राजू बाबा पडद्याच्या मागे ड्रेसिंग रूममध्ये गेले. तेवढ्यात सुनील दत्त पडद्याच्या मागे स्टेजवरती आले. त्यांच्या पाठीमागून येऊन राजू बाबांना

सुनील दत्त यांनी उचलून खांद्यावर घेतले आणि सरळ स्टेजवर आले. त्यानंतर राजू बाबा की जय, राजू बाबा की जय असं म्हणून नाचत स्टेजवरच उड्या मारु लागले. मग राजेश खन्ना पण आले. त्यांनी राजू बाबांचा हात हातात घेतला. अनुप जलोटा देखील राजू बाबांचा कार्यक्रम बघायला आले होते. ते ही स्टेजवर आले. त्यांनीही राजू बाबांचा हात हातात घेतला. ते हिंदीतून म्हणाले, ''तुमने तो बम्बई को दिवाना बना दिया।'' असे कार्यक्रम होत–होत एकमेकांच्या सांगण्यावरुन माहिती मिळवत मिळवत संपूर्ण भारतभर राजू बाबांचे कार्यक्रम झाले.





राजूबाबांनी अनेक शहरांमधील कार्यक्रमांमध्ये आपली कला सादर केली. यापैकी मुंबईतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (१९८८), कालनिर्णय लोकोत्सव (२००४), लोकोत्सव नांदेड (२००४) आणि नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, नवी दिल्ली द्वारा आयोजित भारत रंग महोत्सव (२०००) यांचा समावेश आहे. त्यांनी ऑल इंडिया रेडिओ, बीड आणि डीडी सह्याद्री, मुंबई येथे देखील काम केले आहे. राजूबाबांना लोकनाट्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल, बालगंधर्व पुरस्कार (१९८८), महाराष्ट्र सरकारचा 'राज्य पुरस्कार' (२०००)



आणि व्ही.के. पाटील कलागौरव पुरस्काराने (२००२) इत्यादी पुरस्कारांनी गौरविण्यात आले. महाराष्ट्रातील लोककला क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना भारताचे राष्ट्रपती श्री. प्रणव मुखर्जीच्या हस्ते वर्ष २०१३ चा 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' ११ एप्रिल, २०१४ रोजी प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनानेही राजूबाबांचे बरेच कार्यक्रम महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर ठेवले. गेल्या जवळ जवळ २० वर्षांपासून राजू बाबा शासनाचे कार्यक्रम करत आहेत. ७०० रुपये महिना महाराष्ट्र शासनाचे मानधन राजू बाबांना मिळते. आता केंद्र सरकारचेही मानधन मिळते.

डोक्यावर घागर घेऊन नाचणारे, ७१ वर्षांचेहे वारकरी २०११ साली अचानक प्रकाशझोतात आले. 'मराठी पाऊल पडते पुढे' या कार्यक्रमातून हे वारकरी घराघरात पोचले. या कार्यक्रमांच्या महाअंतिम फेरीत या ७१ वर्षाच्या कलावंताने तरुणांना टक्कर दिली. या त्यांच्या कलेबाबत त्यांना विजयी घोषित करण्यात आले. तसेच त्यांना एक लाख रूपये आणि मानचिन्ह प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ अभिनेते रमेश देव व सीमा देव यांच्या हस्ते राजू बाबांना हा पुरस्कार देण्यात आला.

शेवटच्या क्षणाला राजू बाबांना डायबिटीसचा आजार झाला होता. त्यांचा स्वर्गवास होण्याच्या पंधरा दिवस अगोदर, राजू बाबांनी जळगावला त्यांचा कीर्तनाचा कार्यक्रम सादर केला. त्यांची तब्येत त्यावेळी फार चांगली नव्हती. पण त्यांचा शेवटचा मुलगा जाहिद याला त्याच्या शिक्षणासाठी पैसे हवे होते. म्हणून ते वयाने आणि शरीराने जरी थकलेले होते, तरी त्यांनी आपले आजारपण कलेच्या आड येऊ दिले नाही. अशा या महान लोककलाकाराची प्राणज्योत ९ फेब्रवारी, २०१८ रोजी मालवली.

३.४.२ राजू बाबा शेख यांची भेट

मे २००३ ला आर्ट जत्रा नावाचा तीन दिवसांचा कला महोत्सव पुरुषोत्तम बेर्डे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुलुंड येथील, कालिदास मंदिर येथे भरवला होता. यामध्ये वेगवेगळी कला प्रदर्शने, नाटके, चर्चासत्रे आणि लोक कलाकारांचे कला प्रकार या सर्व गोष्टी तीन दिवस चालणाऱ्या या कला महोत्सवात भरवण्यात आल्या होत्या. या कला जत्रेमध्ये कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विजय तेंडुलकर यांच्याशी वार्तालाप आणि इतर नाटकंदेखील मुलुंडकरांना आणि रसिकजणांना पाहण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी कालिदास नाट्य मंदिरामध्ये हृदयनाथ मंगेशकरांचा कार्यक्रम झाला तसेच विठ्ठल उमप यांचा पोवाड्यांचा कार्यक्रम झाला. शेवटच्या दिवशी म्हणजेच २६ मे रोजी लोककलाकार राजूबाबा शेख यांचा 'कीर्तन रुपी घागर नृत्य' हा लोककला प्रकार सादर होणार होता. पुरुषोत्तम बेर्डे सरांनी हा कार्यक्रम उघड्या मैदानामध्ये ठेवला होता. कोठेही पडदे लावून तो बंद करण्यात आला नव्हता. कारण त्याला लोककलेचा फील यावा म्हणून. लोककला ज्याप्रकारे लोकांच्यामध्ये स्टेज उभारून उघड्या मंचावर सादर केल्या जातात त्याच पद्धतीचा कार्यक्रम मुलुंडमध्ये सादर व्हावा ही पुरुषोत्तम बेर्डे सरांची इच्छा होती. संपूर्ण मैदानात छानपैकी पताक्या लावण्यात आल्या होत्या. मैदानाच्या मध्यभागी छोट्या उंचीचा स्टेज बांधण्यात आला होता. तो सर्व बाजूने उघडा होता.

राजूबाबांचा नाचू कीर्तनाचे संगे हा कार्यक्रम चालू झाला. राजू बाबांचे सादरीकारण अप्रतिम झाले. संशोधक पहिल्यांदा हा कलाप्रकार पहात होता. राजूबाबांनाही पहिल्यांदाच त्याच्या कॅमेऱ्यात टिपले. राजूबाबा त्यांच्या सहकाऱ्यांसोबत आणि दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या त्यांच्या दिलदार या मुलासोबत हा कार्यक्रम सादर करण्यासाठी आले होते. राजूबाबांनी तेथे संत एकनाथ यांची रचना असलेला माझे माहेर पंढरी हा अभंग सादर केला.

माझे माहेर पंढरी ।
आहे भीवरेच्या तीरी ।।१।।
बाप आणि आई ।
माझी विठ्ठल रखुमाई ।।२।।
पुंडलिक आहे बंधू ।

त्याची ख्याती काय सांगू ।।३।।

माझी बहीण चंद्रभागा ।

करितसे पाप भंगा ।।४।।

एका जनार्दनी शरण ।

करी माहेरची आठवण।।५।।

त्यानंतर राजू बाबांनी दोन–तीन अभंग गायले. तसेच अभंगावर नृत्य केले. त्यानंतर त्यांनी पंधरा किलो वजनाची पाण्याने भरलेली पितळाची घागर डोक्यावर घेतली आणि ते पुन्हा कीर्तनाच्या चालीवर घागरीचा तोल संभाळत नाचू लागले. त्यानंतर घागर आणि राजू बाबांच डोकं यामध्ये एक समई घेऊन त्यावर पाण्याने भरलेली १५ किलोची पितळी घागर ठेवून राजू बाबांनी पुन्हा कीर्तनाच्या चालीवर नृत्य करायला सुरुवात केली. त्यावेळेस त्यांनी आणखीन एक अभंग सादर केला. तो होता.....

रात्र काळी घागर काळी

रात्र काळी घागर काळी ।

यमुनाजळें ही काळी वो माय ।।१।।

बुंथ काळी बिलवर काळी ।

गळां मोतीं एकावळी काळीं वो माय ।।२।।

मी काळी काचोळी काळी ।

कांस कांसिली ते काळी वो माय ।।३।।

एकली पाण्याला नवजाय साजणी ।

सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ।।४।।

विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी ।

कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ।।५।।

मे महिना असल्यामुळे राजू बाबांना घाम खूप येत होता आणि त्यांची तहान भागवण्याचे काम त्यांचा दहावी इयत्तेत शिकणारा मुलगा दिलदार हा स्टेजवरती बसून करत होता. जेणेकरून राजू बाबांना ऊर्जा मिळेल आणि त्यांच्या कार्यक्रमांमध्ये खंड पडणार नाही. त्यानंतर राजू बाबांनी, जी समई डोक्यावर घेतली होती. त्याच समयीवर निरंजन ठेवली आणि

निरंजनावर ती १५ किलो पाण्याने भरलेली घागर ठेवली. प्रेक्षक वर्गातून एकाला बोलवून ती समई पेटवली देखील. या सगळ्या गोष्टी राजू बाबांच्या डोक्यावर असताना देखील ते तोल सांभाळून, फार सुंदर बॅलन्स करून, फारच छान पद्धतीने राजू बाबा अभंगावरती नाचू लागले. राजू बाबांचे अभंग, कीर्तन चालू असताना प्रेक्षक वर्ग आश्चर्यचकित होऊन त्यांची ही आगळी वेगळी कला पहात होते. त्यानंतर राजू बाबांनी सात पराती एकत्र ठेवून त्या परातींच्या कडेवरती उभे राहून त्या पायाने वेगवेगळ्या केल्या. त्या परातींचे वेगवेगळे आकार लोकांपुढे सादर केले. हे करताना जमिनीवर पाय न टेकवता परतीच्या काठावर त्यांनी तोल सांभाळून परात नृत्य केले. अभंगावर सुरेख ठेका धरला. इतकेच नाही तर एका परातीवरून दुसऱ्या परातीवर, दुसरी वरून तिसरीवर, अशा सर्वच परातींवर उड्या मारून नृत्य केले. कार्यक्रम फारच रंगला. बऱ्याच लोकांना एक वेगळ्या कलाकाराची ओळख झाली. तेव्हा राजूबाबांचे वय ६१ वर्ष होते. एवढे वय असून देखील राजूबाबा कार्यक्रम सादरीकरणाला कुठेही कमी पडत नव्हते. अशा पद्धतीने राजू बाबांनी दोन तास त्यांचा हा आगळा वेगळा कलाप्रकार सादर केला. कार्यक्रम संपल्यावर सर्वांनी राजू बाबांची स्तुती केली. राजू बाबांना घेराव घातला, त्यांच्याशी हात मिळवले, फारच सुंदर कार्यक्रम आपण सादर केला असे सांगितले. त्यानंतर प्रत्येकाने त्याच्याकडून राजूबाबांसोबत फोटो काढून घेतले. त्यानंतर खूप दिग्गज कलाकार लोकशाहीर विठ्ठल उमप हे देखील त्या कार्यक्रमाला आले होते. ते राजू बाबांला भेटायला आले आणि दोन मोठ्या कलाकारांचा तो क्षण कॅमेऱ्यात कैद झाला. अशा प्रकारे त्याचा लोककलाकारांचे प्रकाशचित्रण करण्याच्या कार्याला सुरुवात झाली. या विषयावर काम करायचे तेव्हाच त्याने ठरवून टाकले. या लोककलाकारांचे आयुष्य जगात पोहचवण्याची खरी धडपड या फोटोनंतरच सुरु झाली. पहिल्यांदाच त्याने राजू बाबांसारख्या एवढ्या मोठ्या कलाकाराला कॅमेऱ्यात शूट केले होते. एक वेगळी कला आणि कलाकार त्याने अनुभवला.



१५ डिसेंबर, २००५ला 'जोगेश्वरीच्या समता नगरमध्ये' राजू बाबांचा कार्यक्रम संध्याकाळी साधारणतः सात नंतर सुरू होणार असतांनाही, तो तेथे चक्क ५ वाजून ४० मिनिटांनी पोहोचला. कारण त्याला राजूबाबांना भेटण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली होती. तसेच राजूबाबा कार्यक्रमाच्या अगोदर जो काय मेकअप करतात, त्यांच्या घागरीची जी काही सजावट करतात ते क्षण कॅमेऱ्यात टिपायचे होते. पण राजूबाबा तिथे त्याच्या अगोदर आले होते. तिकडच्या श्रीदत्त मंदिरात राजू बाबांना तयारी करण्यासाठी तिकडच्या लोकांना सांगितले होते. राजूबाबांनी साधारण सव्वा सहा नंतर तयारी करायला सुरवात केली. राजूबाबा जेथे तयारी करत होते त्या मंदिरात छोटी मुलं मोठ्या प्रमाणात जमली होती. राजूबाबा करत असलेल्या सर्व गोष्टी ही मुले पाहत होती. संत जसा पहेराव करतात, तसाच पेहराव राजूबाबा करत होते. त्यांच्या कापडी थैलीतून वेगवेगळे टिळे काढून, त्यांच्या कपाळाला तर लावलेच. पण दोन्ही बाजूला गालाला देखील लावले. राजूबाबांनी जो टिळा लावलेला त्याच टिळाच्या रंगाचा लेप दोन्ही बाजूच्या गालाला देखील लावला. त्याच प्रमाणे कानाच्या दोन्ही पाळ्यांना देखील लावला. ह्या सगळ्या गोष्टी करताना तेथे जमलेली छोटी मुले त्यांच्याकडे कुतूहलाने पाहत होती. राजूबाबा जेव्हा त्यांची पाण्याने भरलेला पंधरा किलोची घागर सजवत होते. त्यांनी घागरीला झेंडूची फुले लावून घागर छान सजवली. त्यावर सजवलेला मंगलकलश ठेवला. राजूबाबांनी पांढराशुभ्र पेहराव केला

होता. गळ्यामध्ये दहा विभिन्न रंगाच्या रुद्राक्षाच्या माळा त्यांनी घातल्या होत्या. कमरेला नारंगी रंगाचा एक फडका घट्ट बांधलेला होता. डोक्यावरती पुणेरी पेशवाई टोपी त्यांनी घातली होती.



राजूबाबांनी त्यांच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यापूर्वी सांगितले की, 'या घागरीचा आणि कीर्तनाचा काहीच संबंध नाही, मी ही घागर फक्त तुमच्यासाठीच या कीर्तनात समाविष्ट केलेली आहे. तुम्हाला कंटाळा येऊ नये, म्हणून मी हे घागर नृत्य आणि परातीवरील नृत्य तुमच्यापुढे सादर करतोय.' सुरुवातीला राजूबाबांनी काही अभंग गायले. त्यानंतर कार्यक्रमाला रंग चढू लागला आणि वेगवेगळे अभंग, वेगवेगळ्या गवळणी, राजू बाबा सादर करू लागले. राजूबाबांनी हे करताना छोटीशी वीणा उजव्या हातात घेतली होती, डाव्या हातात चिपळ्या घेतल्या. पायामध्ये घुंगरू तर बांधले होते. तोंडाने अभंग गात होते. त्यानंतर राजूबाबांनी त्यांचा मुख्य कला प्रकार सादर केला. सुरुवातीला त्यांनी डोक्यावर चुंबळ न घेता पंधरा किलोची पाण्याने भरलेली घागर घेतली आणि अभंगावरती नृत्य करायला, त्यांनी सुरुवात केली. राजूबाबा त्यांच्या भक्ती रंगात आले होते. त्यानंतर राजू बाबांनी डोक्यावर समई घेतली, त्यावर निरंजन ठेवला, समई मध्ये तेल टाकले. समई पेटवली आणि त्यावर पंधरा किलोची पाण्याने भरलेली ती घागर घेऊन राजू बाबा अभंगाच्या तालावर नाचू लागले. त्यांनी संत मीराबाईची रचना असलेली गवळण गायला सुरुवात केली. ती गवळण.....

पग घुंघरूं बांध मीरा नाची रे।।

मैं तो मेरे नारायण की आपहि हो गै दासी रे।

पग घुंघरूं बांध मीरा नाची रे।

लोग कहै मीरा भ बावरी न्यात कहै कुलनासी रे।

पग घुंघरूं बांध मीरा नाची रे।

बिष का प्याला राणाजी भेज्या पीवत मीरा हाँसी रे।

पग घुंघरूं बांध मीरा नाची रे।

मीरा के प्रभु गिरधर नागर सहज मिले अबिनासी रे।

पग घुंघरूं बांध मीरा नाची रे।



ते फक्त या गवळणीवर नाचत नव्हते तर ते हे सगळं घेऊन उड्या मारत होते. पाण्याने भरलेली घागर खूप छान पद्धतीने ते बॅलन्स करत होते. ते पाहून बक्षीस रूपात बरीच रक्कम लोकांनी राजू बाबांला दिली. शांतपणे ती रक्कम स्वीकारून ते पुढचा अभंग सादर करत होते. त्यानंतर राजूबाबांनी परातीवरचे नृत्य सादर करायला सुरुवात केली. राजूबाबा ७ परातीवरती नृत्य करतात. त्या पराती सुरुवातीला एकत्र असतात. त्या ते वेगवेगळ्या करून, त्याची वेगवेगळी चिन्ह तयार करतात. त्यामध्ये शंख, धनुष्य, फुले, स्वास्तिक, इत्यादी आकार, ते पराती वेगळ्या करून करतात. नंतर त्या पराती, ते पुन्हा एकत्र करतात. त्या परातीच्या काठावर उभे राहून पाय जमिनीवर न ठेवता त्या सगळ्या पराती वेगवेगळ्या केल्या. हे सर्व करताना तोंडाने ते अभंग गात होते. त्या अभंगाच्या तालावर, ठेक्यावर ते पराती वेगवेगळ्या करत होते. या सर्व वेगवेगळ्या केलेल्या परातींचे, त्यांनी वेगवेगळे आकार तयार केले. त्या सगळ्या पराती जेव्हा वेगवेगळ्या केल्या तेव्हा राजू बाबा एका परातीवरून दुसऱ्या परातीवर, दुसऱ्या परातीवरून तिसऱ्या परातीवर, तिसऱ्या परातीवर चौथ्या परातीवर, असे सातही परातींच्या कडेवरती उड्या मारून ते नाचत होते. राजूबाबा परातीवर नाचत असताना त्यांच्या घुंगरांचा आणि परतीचा एक वेगळा नाद, संगीत स्वरूपात लोकांना अनुभवता आला. नाचत असताना त्यांचा पाय एकदाही जमिनीला लागला नाही. त्यांनी एवढ्या छान पद्धतीने हे आगळे वेगळे परात नृत्य सादर केले. हातामध्ये तीन तारी घेऊन हे सगळं राजूबाबा करत होते. नृत्य करता करता पुन्हा त्या पराती एकात एक करून ठेवल्या. अशी आगळी वेगळी नृत्य भक्ती, समता नगरच्या प्रेक्षक वर्गाने अनुभवली. कार्यक्रम संपल्यानंतर बऱ्याच लोकांनी राजूबाबांचा सत्कार केला. राजूबाबांना साथमसंगत करणारे तबला वाले, पेटीवाले, हे देखील फार खुश होते. कारण लोकांनी राजूबाबांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची फार स्तुती केली. राजूबाबांना पैशाच्या स्वरूपात बरीच बक्षीसे दिली. राजूबाबा कार्यक्रम संपल्यावर स्वतःचा मेकअप उतरवून, कार्यक्रमाचा ड्रेस काढून, आपला पांढरा शर्ट आणि धोतर घालून परत लोकांसमोर आले. राजूबाबांनी सर्व लोकांना हात जोडून, मानवाकवून नमस्कार केला. राजूबाबांवर प्रेम करणारे असंख्य लोक या समता नगरमध्ये त्याने पाहिले. राजूबाबांनी वयाची तमा न बाळगता फार चांगला कार्यक्रम या लोकांपुढे सादर केला. असा हा राजूबाबांचा दुसरा कार्यक्रम त्याच्या कॅमेऱ्यात बंदिस्त झाला.



त्याच्या घरी काही दिवस राहण्याचे आमंत्रण त्याने राजूबाबांना दिले. ते त्यांनी स्विकारले व २२ मार्च २००७ रोजी ते त्याच्या घरी आले. त्या दिवशी दोघांनी लोककलेशी संबंधित चर्चा केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजूबाबा खूप पहाटे उठले. त्या दिवशी तोही राजूबाबांमुळे फार लवकर उठला. कारण त्याला राजूबाबांचा दिनक्रम कॅमेऱ्यात टिपायचा होता. घड्याळात पहिले तर पाच वाजले होते. मग राजूबाबांनी पूजा करायला सुरुवात केली. त्यांची पूजा बराच वेळ चालली. पूजा झाल्यावर राजूबाबांनी नमाज देखील पडला. पहिल्यांदा पूजा आणि लगेच नमाज. ते दोन्ही क्षण कॅमेरात कैद झाले. ते झाल्यावर राजूबाबा आणि त्याने मग बाहेर जाऊन फेरफटका मारला आणि चालता चालता गप्पा देखील मारल्या. यामध्ये राजूबाबांनी त्याला त्यांच्या घराबद्दल, त्यांच्या मुलांबद्दल–मुलींबद्दल, त्यांच्या बायकोबद्दल काही गोष्टी सांगितल्या. त्याचं त्यांच्या संपूर्ण कुटुंबावर फारच प्रेम होते हे त्यांच्या बोलण्यातून त्याच्या लक्षात आले. राजूबाबांला त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची फारच काळजी होती. त्यांच्या मुलींच्या लग्नाची देखील काळजी होती.

फेरफटका मारून आल्यावर राजूबाबा अंघोळ करायला गेले. आंघोळ झाल्यावर राजू बाबांनी, त्यांच्या कापडाच्या थैलीतून टिळा काढून त्यांच्या कपाळावर टिळा लावला. त्याचबरोबर कानाला देखील टिळा लावला. राजूबाबांच्या गळ्यामध्ये असलेल्या वेगवेगळ्या मण्यांच्या माळी त्यांनी व्यवस्थित करून देवाची भक्ती केली. नंतर त्यांनी नमाज पडला. नंतर राजू बाबा नाश्ता करायला बसले. तेव्हा ते बशीतून चहा पीत होते. तेव्हा त्याने त्यांचा एक

वेगळ्या पद्धतीने बशीमध्ये चहा ओतून ते पितानाचा फोटो काढला. राजूबाबा त्याच्या घरी येणार होते, हे अगोदर माहिती असल्यामुळे त्याने त्यांच्या समता नगर मधल्या कार्यक्रमाचे काही फोटो अगोदरच मोठे करून, त्याच्या प्रिंटस काढल्या होत्या. ते फोटो राजूबाबांचा नाश्ता झाल्यावर त्याने दाखवले. राजू बाबांना फारच आनंद झाला. ते फोटो दाखवताना बऱ्याच गोष्टी त्याने राजूबाबांना विचारल्या.





त्याच्या बद्दलची माहिती असलेला एक मुलुंड नागरिक पाक्षिक मधला लेख त्याने राजू बाबांना दाखवला. राजू बाबांनी तो लेख हातात घेऊन पूर्ण वाचला. तो आवाकच झाला, शाळा न शिकलेल्या माणसाने पूर्ण लेख कसा वाचून काढला?

त्याच्या आईने राजूबाबांना विचारलं, ''बाबा तुम्हांला दुपारी जेवायला भाजी काय बनवायची?, तुमची काही आवड असेल तर सांगा'',राजू बाबा म्हणाले, ''मला भाजी वगैरे काही नको. आज दुपारी मी दूध चपाती खाईल. '' राजूबाबांनी त्या दुपारी चक्क दुधात चपाती चुरून खाल्ली. त्यांना भाजी खायची नव्हती. कारण दोन-तीन दिवस ते सतत भाजीच खात होते.



राजूबाबांच जेवण झाल्यावर, तो बाबांना म्हणाला, 'बाबा आपण तुमचा एक कार्यक्रम आमच्या सोसायटीत ठेवू या का? बाबा म्हणाले, 'हो चालेल ना. 'तो म्हणाला, 'बाबा, आज रात्री ठेवूया का?' बाबा म्हणाले, 'मी साथमसंगत करणाऱ्यांना विचारून सांगतो. 'तो म्हणाला, 'तुम्ही गावी फोन करणार का? 'बाबा म्हणाले, 'नाही, काही साथमसंगत करणारे माझे सहकारी जोगेश्वरीला, मुंबई मध्येच राहतात. त्यांना मी फोन करून विचारतो. राजू बाबांनी त्यांच्या साथीदारांकडे विचारणा केली.'

बाबांचे सगळे साथीदार संध्याकाळी सहा वाजता घरी आले. त्यांना साथ देणाऱ्यांमध्ये तबला वाद्य वाजवणारे, पेटी वाजवणारे, टाळ वाजवणारे, चिपळ्या वाजवणारे आणि कोरस देणारे अशी ही सगळी मंडळी होती. थोड्या वेळाने डेकोरेटरचे कॉन्ट्रॅक्ट ज्याला दिले होते ते देखील घरी आले. सतरंजी टाकून घेतली. ताडपत्री टाकली आणि साऊंड सिस्टिम कुठे ठेवायची?, स्पीकर कुठे असावेत? या सगळ्या गोष्टी त्याने डेकोरेटर्सला सांगितल्या. त्या पद्धतीने त्याने देखील सगळं नियोजन केले. एक मोठा कलाकार आपल्या भेटीला आला आहे, आपल्या सोसायटीत आला आहे अशा पद्धतीची अनाउन्समेंट वारंवार करून लोकांनी बिल्डिंग खाली येऊन त्या कलाकाराची कला पाहावी, अशी विनंती त्याने मायक्रोफोनवरून वारंवार केली. कार्यक्रम आठ वाजता सुरू होईल असे सांगितले. राजूबाबांनी त्यांची तयारी करायला सुरुवात केली. राजूबाबा आणि त्यांचे सहकारी तयार होऊन, चक्क आठ वाजता कार्यक्रम जिथे आहे तेथे म्हणजेच त्याच्या मुलुंडच्या घराच्या बाहेरच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत आले. राजूबाबांचा कार्यक्रम सुरू झाला. एकामागून एक अभंग राजूबाबा गाऊ लागले.

त्यांनी त्यांचा खूप चांगला कार्यक्रम सादर केला. सगळ्या गोष्टी त्यांनी त्यांच्या सादरीकरणामध्ये दाखवल्या. त्यांनी सांगितले की, 'माझ्या ह्या घागरीत भगवंत सामावलेला आहे. मी वरती बघून घागर नृत्य करतो, तेव्हा मी त्या घागरीकडे बघत नाही. तर त्या भगवंताकडे बघतो आणि भक्तीरुपे मी भगवंताची आराधना करतो.' त्यांच हे घागर नृत्य, परातीवरचं नृत्य, अभंग, गवळणी, या सगळ्या गोष्टी पाहून सोसायटीतले रहिवाशी फार खुश झाले. एक वेगळी कला अनुभवली, असे त्यांना वाटले. त्या सर्वांनी राजूबाबांना खूप बक्षीस दिले. बरेच पैसे राजूबाबांना त्या सादरीकरणातून मिळाले. राजूबाबा फारच आनंदित झाले. राजूबाबांना वाटलं नव्हतं की, इथे आपला कार्यक्रम होऊ शकतो आणि लोक एवढ्या संख्येने

येतील व आपल्याला बक्षीस देतील. हे सगळं घडलं होतं. ते सर्वच क्षण त्याच्या कॅमेऱ्याने टिपले होते. राजूबाबांनी नंतर जमा झालेली बक्षिसाची रक्कम मोजली, ती रक्कम साधारणतः बारा हजाराच्या घरात होती. राजूबाबांना फारच आनंद झाला. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना त्यातले काही पैसे दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळीच त्याच्या दरवाज्याची बेल वाजली. त्याने दरवाजा उघडला, पाहतोय तर त्याचे मित्र विलास परुळेकर जे 'मुलुंड नागरिक' या पाक्षिकाला पत्रकार म्हणून काम करतात ते त्याच्या घरी आले. ते म्हणाले, 'मला मुलुंड नागरिक पाक्षिकाकरता राजूबाबांची मुलाखत घ्यायची आहे. मी त्यांचा रात्री संपूर्ण कार्यक्रम पाहिला. राजूबाबांना मला संपूर्ण मुलुंडच्या लोकांपर्यंत पोहचवायचे आहे.' मग त्याने राजूबाबांना विलासजी परुळेकरांचा परिचय करून दिला. राजूबाबा आणि विलास परुळेकर यांच्या गप्पा सुरू झाल्या एकामागून एक असे असंख्य प्रश्न विलास परुळेकर यांनी राजूबाबांना विचारले आणि राजूबाबांनी त्यांच्या शैलीमध्ये त्याप्रश्नांना उत्तरे दिली. जवळ जवळ राजूबाबांचं संपूर्ण आयुष्यच त्याला त्या वेळेस विलास परुळेकर यांनी घेतलेल्या मुलाखतीवरून कळाले. पुढील दोन दिवसांनी त्यांचा कार्यक्रम सांगलीला होणार होता. म्हणून ते मला म्हणाले की, 'आज मला कुठल्याही परिस्थितीत गाडीत बसून दे.' त्यांना त्याने एसटी बसमध्ये बसवून दिले. असा हा दिग्गज कलाकार चार दिवस त्याच्या येथे राहिला आणि असंख्य आठवणी मागे ठेवून गेला.



सन २००८ मध्ये राजूबाबांच्या घरी जाऊन त्यांचे राहणीमान, त्यांची दिनचर्या, त्यांचा संघर्ष, ते सादर करत असलेले कलाप्रकार, ते जिथे प्रोग्राम करतात, तिथे फिरून त्यांच्यावर प्रकाशचित्रणातून काम करायचे त्याने ठरवले. त्यासाठी राजूबाबा शेख यांच्या केज या गावी २२ डिसेंबरला तो गेला. सकाळी साडे अकरा वाजता राजूबाबांच्या केज या गावी पोहचला. राजू बाबांच्या घरी पोहोचल्यावर राजूबाबांना फार आनंद झाला. त्यांच्या घराच्यांची ओळख करून दिली. राजूबाबांचे घर तसे बरेच मोठे होते. एक माळ्याचा छान पैकी बंगला राजू बाबांनी बांधला होता. त्यामध्ये चार खोल्या होत्या. राजूबाबांचा परिवार फार मोठा होता. चार मुली आणि दोन मुलं, राजूबाबा आणि त्यांची बायको. राजूबाबांच्या मुलींची मुले खेळत होती. राजूबाबा देखील त्या सर्व मुलांसोबत खेळत होते. काही वेळानंतर राजूबाबा मुलांमध्ये मुलं होऊन खेळताना, बागडताना त्याने पाहिले.



त्याच बरोबर राजूबाबांची दिनचर्या, त्यांची प्रार्थना, त्यांचा नमाज, त्यांच्या घरात त्यांचं वावरणं, त्यांच सर्वांशी एकरूप होणे, या सगळ्या गोष्टी त्याने सातत्याने कॅमेर्यात काढत गेला. त्याने राजूबाबांना अगोदरच सांगून ठेवले होते की, 'आज आपण तुमच्या आवडीच्या जागी तुमचा कीर्तनाचा कार्यक्रम ठेवू या.' राजूबाबांनी जागा पाहून ठेवली होती. ती जागा होती, त्यांच्या गावातलं श्रीराम मंदिर. त्या मंदिरात आम्ही रात्री कार्यक्रम करणार होतो. ठरल्या प्रमाणे त्या संध्याकाळी, राजूबाबांनी त्यांच्या कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य, त्याचबरोबर त्यांच्या त्या पाण्याने भरलेल्या घड्यावर सजवायला लागणारी पानं राजूबाबांनी जमवली. ती पान व्यवस्थित आकाराने कापायला सुरुवात केली.



एकीकडे राजूबाबा त्यांच्या हाताने झाडाची पानं कापतात आणि दुसऱ्या टोकाला त्यांची मोठी मुलगी स्वतःचा मेकअप आरशामध्ये पाहून करत आहे, असे ते छायाचित्र त्याने टिपले. त्याला शंका होती कार्यक्रमाला लोक जमतील की नाही?, कार्यक्रम कसा होईल?, आपण कार्यक्रम ठेवलाय, पण लोक नाही आली तर? पण तसे काहीच घडले नाही. कार्यक्रम सुरू होण्याच्या, दहा मिनिटे अगोदर गावातली सर्व लोकं आपल्या बायका–मुलांसोबत राजूबाबांच्या कार्यक्रम पाहायला आले. राजूबाबा आणि त्या सर्वांसाठी हे काही नवीन नव्हते. छोट्या मुलांचा भरणा त्यामध्ये बराच होता. राजूबाबांनी मंदिरात त्यांच्या कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यांचा कला प्रकार पुन्हा एकदा त्यांच्या गावातील श्रीरामाच्या मंदिरात सादर केला गेला आणि तो कलाप्रकार लोकांनी अनुभवला. राजूबाबांनी तेथे संत तुकारामांच्या अभंगाने कार्यक्रमाला सुरुवात केली. तो अभंग होता.....

यारे नाचू प्रेमानंदे, विठ्ठल नामाचिया छंद ।। धृ ।।

जाऊ म्हणती पंढरीची वाटे, कळीकाळा भयं वाटे ।। १ ।।

चंद्रभागे घडले स्नान, याम लोकी पडली हान ।। २ ।।

झाली पुंडलिक भेटी, पूर्वज आनंदले वैकुंठी ।। ३ ।।

आता राऊळासी जाता, झाली जीवाची मुक्तता ।। ४ ।।

विष्णुदास नामा म्हणे, आता नाही येणे जाणे ।। ५ ।।



जरी राजूबाबा वयाने जास्त असले तरी त्यांचा उत्साह हा त्यांच्या कीर्तनातून, त्यांच्या अभंगातून, त्यांच्या गवळणीतून लोकांपर्यंत पोहोचत होता. त्यांनी घागर नृत्य फार छान पद्धतीने सादर केले. लोकांनीही त्यांना फार दाद दिली. राजूबाबांचा कार्यक्रम सुरू असताना आणि कार्यक्रमानंतर बरीच बक्षीसे राजू बाबांना मिळाली. राजूबाबा फार खूश झाले. त्यांनी गावकऱ्यांचे आभार मानले. रात्री साधारण अकरा वाजता राजू बाबांचा कार्यक्रम संपला. राजूबाबांनी तेथे जवळपास दोन तास कार्यक्रम सादर केला. एवढ्या कठीण परिश्रमानंतर देखील राजूबाबा दमलेले जाणवत नव्हते किंवा थकवा राजूबाबांच्या चेहऱ्यावर जाणवत नव्हता. एक कलावंत म्हणून राजूबाबा फारच प्रोफेशनल होते. तितकेच प्रेमळ देखील होते. त्यांना त्या गावातील प्रत्येक व्यक्ती ओळखत होती. राजूबाबा संपूर्ण गावाला ओळखत होते.





राजूबाबांचा संपूर्ण परिवाराचा एक फोटो त्याला हवा होता. त्याकरता राजूबाबांच्या बंगल्याच्या गच्चीवर त्याने सर्वांना उभे केले. त्यामध्ये राजूबाबांच्या चार मुली, त्या मुलींची मुले आणि राजूबाबांचा मोठा मुलगा, असा सर्वांचा ग्रुप फोटो त्याने काढला.



त्यानंतर राजूबाबा आणि त्यांच्या पत्नीचा एक फोटो त्याला हवा होता. त्यासाठी तो काहीतरी वेगळी जागा शोधत होतो. थोड्या वेळानंतर एक जागा त्याला दिसली आणि त्याने ठरवलं येथे त्यांचा चांगला फोटो घेऊ शकतो. मग तो त्या जागी राजूबाबांना आणि त्यांच्या पत्नीला घेऊन गेला. ती जागा होती त्यांचा आरसा. बाहेरच्या पडवीमध्ये असलेल्या जागेत, तो आरसा एका भिंतीला लावलेला होता. त्या दोघांना आरशासमोर उभे करून, फोटो घेण्यासाठी तो त्यांच्याशी गप्पा करू लागला. त्यावेळेस राजूबाबांच्या पत्नीने त्यांच्या नातीला कडेवर घेतलं होतं. त्यानंतर राजूबाबांना त्याने योग्य जागी उभं केलं आणि आरशामध्ये पाहायला सांगितले. राजूबाबा आरशामध्ये पाहून फारच छान हसले. त्याने राजूबाबांशी गप्पा मारता मारता, त्यांचे फोटो काढले. गप्पा रंगल्या आणि एका फोटोमध्ये राजूबाबांचा हात टोपी नीट करायला जात आहे आणि त्यांची पत्नी त्यांच्याकडे आनंदी मुद्रेने पाहत आहे, असा दोघांचाही आनंदी मुद्रेचा फोटो छोट्याशा छकुली सोबत म्हणजे त्यांच्या नातीसोबत त्याच्या कॅमेर्यात कैद झाला. तो संपूर्ण दिवस राजूबाबांची दिनचर्या, राजूबाबांचे कार्य, राजूबाबांचे फोटो, राजूबाबांच्या आठवणी, राजूबाबांची प्रशस्तीपत्रके, राजूबाबांना मिळालेले पुरस्कार, या सगळ्या गोष्टी पाहण्यात गेला. त्या सगळ्या गोष्टी आपोआपच त्याच्या कॅमेऱ्यात कैद होत गेल्या.



दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने राजू बाबांना नमस्कार केला आणि राजू बाबांची रजा घेतली.

३.५ घटकाभ्यास क्रमांक : ५

निरंजन भाकरे

३.५.१ निरंजन भाकरे यांचा जीवन प्रवास

निरंजन भाकरे यांचे मूळ गाव शिरूर हे आहे, ते वैजापूर तालुक्यात आहे. त्या गावात दुष्काळ पडल्यामुळे निरंजन यांची पिढी रहिमाबाद या गावामध्ये आली. हे गाव औरंगाबाद जिल्ह्यातील 'सिल्लोड' या तालुक्यात आहे. निरंजन यांच्या घराण्यामध्ये मागील चार–पाच पिढ्यांपासूनच गाण्या–वाजवण्याचा छंद चालत आलेला आहे. निरंजन यांच्या वडिलांचे आजोबा म्हणजे त्यांचे पणजोबा 'धोंडूशेठ जैन' (धोंडिबा जैन) हे स्वतः चैत्राच्या वार्षिक उत्सवातून दशावतारात सोंग घ्यायचे जो उत्सव खेड्यापाड्यातून होत असे. नंतर त्यांचे चिरंजीव किसन शिंपी यांनी देखील दशावतारात, रात्रभर ग्रामदेवतेच्या जागरणात सोंगे घेतली. तीच परंपरा पुढे चालून निरंजन यांच्या वडिलांकडे म्हणजेच मुरलीधर किसन जैन यांच्याकडे आली. निरंजन भाकरेंच्या वडिलांना गाण्या–बजवण्यांमधून राग–रागिणी, पोवाडे, भजन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची क्रांतिकारी भजन इत्यादींचा नाद जडला. शिलाईकाम हे पूर्वीच्या पिढ्यांमध्ये हातावरती करायचे. त्यांचे वडील हे यात्रेतले मोठ्या–मोठ्या दैवतांचे जे तंबू शिवले जात होते, त्या तंबूचे हाताने शिवणकाम करायचे व फावल्या वेळात गाणे–बजावणे करायचे.

निरंजन भाकरे यांचा जन्म, औरंगाबाद जिल्ह्यातील, सिल्लोड तालुक्यातील, रहिमाबाद नावाच्या छोट्याशा गावात, मुरलीधर किसन जैन यांच्या घरी झाला. घरची परिस्थिती खूप हालाखीची. निरंजन हे ज्यावेळी त्यांच्या आई, कस्तुराबाईंच्या पोटात होते त्यावेळीच ते जन्म घेऊ नये यासाठी त्यांना काढून टाकण्याची तयारी सुरू झाली होती. निरंजन भाकरे ज्यावेळेस आईच्या पोटात होते, त्या अगोदर त्यांच्या आईची सात अपत्ये जन्मताच देवाघरी गेलेली. निरंजन भाकरेंचे दादा शाहीर सुमतीनाथ आणि यांची बहीण अमृत यांच्यानंतर जवळजवळ सात वर्षांनंतर निरंजन भाकरे जन्माला आले. त्यांच्या मोठ्या दादांमध्ये आणि त्यांच्यात १३ वर्षांचे अंतर आहे. त्यांच्या आईला दहाव्यांदा गर्भधारणा झाली. भाकरेंच्या वडिलांचा त्यांच्या आईवर फार जीव होता. कस्तुराबाईंची तब्येत पाहता डॉक्टरांनी त्यांच्या वडिलांना बाजूला बोलावून विचारलं आपणास पत्नी हवी की पोटातलं बाळ? त्यांच्या आईची प्रकृती किरकोळ व बांधा

ठेंगणा असल्यामुळे, पोटातलं मूल मेलं तरी चालेल पण पत्नी नाही मेली पाहिजे असे विचार, त्यांच्या वडिलांचे होते. म्हणून निरंजन भाकरे पोटात असतानाच, त्यांना मारून टाकण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी डॉक्टरांनी गर्भपाताची वेगवेगळी इंजेक्शने दिली.

निरंजन भाकरेंच्या येथे एक स्वातंत्र्यसैनिक होते. त्यांचं नाव चंपालालजी खंडेलवाल. ते निरंजन भाकरेंच्या वडिलांचे परममित्र. त्याच चंपालालजींनी निरंजन भाकरेंच्या आईच्या पोटातला गर्भ पाडण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे उपाय केले. निरंजन भाकरेंच्या गावाच्या जवळ एक 'अनवी' नावाचं गाव आहे. त्या छोट्याश्या गावात हवालदार 'बुड्ढा' नावाचा एक मुसलमान राहत होता. त्याच्या खांद्याला नेहमी बंदूक लावलेली असायची. कारण त्याला शिकारीचा छंद होता. जंगलात शिकारीला गेला की, जडीबुट्टी आणून त्याची आयुर्वेदिक औषधी तो बनवत असे. त्याच्याकडे निरंजन भाकरेंचे वडील गेले आणि त्याला सांगितले की, 'गर्भाचा कालावधी जास्त झालाय. आम्ही इंजेक्शन्स देऊन पाहिले, गोळ्या देऊन पाहिल्या परंतु तो गर्भ पडला नाही. आता तुमच्याकडे काही असेल तर दया.' मग तो बुड्ढा दवाखान्यात आला आणि त्याने निरंजन भाकरेंच्या आईला एक औषधी दिली आणि सांगितले की, 'कस्तुराबाई, 'अगर तुम्हारे पेट में लोखंडका भी गोला हुआ तो गिर जायेगा। फिकर नहीं करना।' तरी त्याच्याही औषधीचा त्या गर्भावरती निरंजन भाकरे यांच्या आईवरती कोणताही असर झाला नव्हता. बाळंतपणाचा त्रास सुरू झाल्यानंतर निरंजन भाकरे यांचा जन्म औरंगाबादच्या दवाखान्यात झाला.

काही कारणावरून निरंजन हे लहान असताना त्यांच्या वडिलांनीच त्यांना खाटेवरून खाली फेकले व त्यामुळे निरंजन हे ५० टक्के अपंग झाले. परिवाराचा भार इतका कठीण होता की ७२–७३चा दुष्काळ पडल्यानंतर शेतीचं काम देखील निरंजन भाकरेंच्या कुटुंबियांकडून होत नसे कारण ते शेतकरी कुटुंबातले नव्हते. म्हणून निरंजन भाकरे यांची मंगल नावाची बहीण आणि सुमतीनाथ नावाचा भाऊ हा अगदी सात वर्षांचा असताना, या दोघांनाही गाण्याचा लळा लहानपणापासूनच लागला होता.

काही कारणावरून निरंजन हे लहान असताना त्यांच्या वडिलांनीच त्यांना खाटेवरून खाली फेकले व त्यामुळे निरंजन हे ५० टक्के अपंग झाले. परिवाराचा भार इतका कठीण होता की ७२–७३चा दुष्काळ पडल्यानंतर शेतीचं काम देखील निरंजन भाकरेंच्या कुटुंबियांकडून होत नसे कारण ते शेतकरी कुटुंबातले नव्हते. म्हणून निरंजन भाकरे यांची मंगल नावाची बहीण

आणि सुमतीनाथ नावाचा भाऊ हा अगदी सात वर्षांचा असताना, या दोघांनाही गाण्याचा लळा लहानपणापासूनच लागला होता.

निरंजन यांच्या गावात अजिनाथ शेठ नावाचे त्यांचे एक चुलत मामा राहत होते. त्या अजिनाथ मामाच्या हाताखाली निरंजन भाकरे यांचे मोठे भाऊ सुमतिनाथ यांनी टेलरकामाच प्रशिक्षण घेतलं आणि त्यांच्या प्रपंचासाठी दोन पैसे कमवण्याची व्यवस्था त्या काळात झाली.

निरंजन भाकरेंच्या घरामध्ये एक ॲल्युमिनिअमची वाटी होती. ती वाटी ते दिमडीसारखी वाजवायचे. त्या वाटीमुळे ते खंजरी शिकले आणि गाणं गायला त्या दुष्काळामुळे शिकले. त्यांच्या दादांनी ते गाणं असं लिहिलं...

छुम छुम छुम छुम छुम ठुमकत चाले
बैलाची जोडी, आली सुगडीची गाडी.
बारा वाजायच्या टायमाला सुगडीची गाडी येती आणि
हा बघा पांड्या, तो बघा धोंड्या एक–एक वाटी घेई.

ती वाटी घेतल्यानंतर त्यांचं जे विदारक चित्र होतं, तेच गाणं निरंजन यांनी त्यांच्या बहिणीला घेऊन त्या जागी गाईले.

निरंजन यांना नाटकाचा छंद होताच कारण गावात गुढीपाडव्याला त्यांची चार नाटकं व्हायची. त्या नाटकात स्त्रीची भूमिका करण्याचा मान भाकरेंकडेच होता. कारण गावात कोणी स्त्रीपात्राचा अभिनय करत नव्हते. ती स्त्रीची भूमिका करण्याची वेळ भाकरेंवर आली.



निरंजन यांच्या लग्नाची गोष्ट तर वेगळीच आहे. निरंजन यांच्या बायकोचं लग्न आधीच जमलेलं होतं आणि ते तुटलेलं लग्न, भाकरेंच्या नशिबी आलं. ज्यावेळी ते लग्नाला गेले, त्यावेळी अगोदरच्या नवरदेवाच्या मापाचे कपडे जे त्याला शिवलेले, तेच भाकरेंना घालायला दिले होते. भाकरेंच्या लग्नात कुठलीही हौसमौज नव्हती. त्यांची सफारी हातापेक्षा एक वीत लांब होती. भाकरेंना सफारी कशी घालावी याची माहिती नव्हती. निरंजन हे जेव्हा फेरे मारायला उठले, तेव्हा ते वाकडे चालायला लागले. समोरील लोकांना वाटले याचं काही तरी दुखतंय. त्या काळात पँटला काही चैनी नव्हत्या. पँटला चैनीच्या ठिकाणी बटनच असायचे. लग्नाच्या धुंदीत निरंजन यांच शर्टाचं बटन पँटच्या बटनाला लागलं आणि शर्ट ताणला गेला. अशी ती नवरदेवाची कथा.


लग्न विचित्र झालं, पण मोठ्या घराण्यातली सुशिक्षित बायको घरात आली. तिच्याबरोबर तिची बहीण 'प्रमिला' जेव्हा त्यांच्या मातीच्या घरात आली तेव्हा ती अक्षरशः रडली. कारण निरंजन यांची बायको 'शांताबाई' फार लाडात वाढलेली मुलगी आहे, पण तिला आता आयुष्यभर हे मातीचं घरं सारवायला लागेल, लोकांच्याकडं मजुरीनं जावं लागेल, असे प्रमिला यांना वाटले असावे. निरंजन यांची बायको देखील नाराज, त्यांच्या माहेरचा परिवार पण नाराज होता.

शेवटी निरंजन हे त्यांच्या बायकोच्या भावाच्या पाया पडले. बायकोला सांगितलं की, 'तुझ्या भावाला सांग की मला काहीतरी टेलरिंग शिकव म्हणून.' त्यांचा मेहुणा त्यांच्या बायकोपेक्षा लहान. त्याच्याकडे टेलरिंग शिकायला गेले. पहिल्याच दिवशी ज्यावेळी ते शिवायला बसले, फॅशनेबल कसं असतं हे त्यांना माहितीच नव्हतं. शर्टच्या हाताचा कफ जोडताना, त्या हुकाला त्यांना तो जोडता येईना. तेव्हा ते मेव्हण्याला म्हणाले, 'दीपक मला येत नाही रे, तू सांग समजावून.' दिपक म्हणाला, 'भाऊजी तुम्ही लायकीचे नाहीत, तुम्ही गावाकडं जा आणि २ बकऱ्या घ्या.' निरंजन भाकरे यांनी तोही अपमान सहन केला.

दिपक यांच्या शेजारी एका आंध्रप्रदेशच्या टेलरचं दुकान होते. त्याच्याकडे भाकरे कारागीर म्हणून राहिले. पुढे सहा महिने त्याच्याकडेच निरंजन राहिले. दुकानातच राहणं, दुकानातच त्या टेलरचा उरलेला डबा खाणं, रात्री दुकानातच झोपणे, अशा प्रकारे जिद्दीनं

टेलरकाम शिकले. आज त्यांच्यासारखा 'पँटमेकर' त्यांच्या अख्ख्या सिल्लोडमध्ये नाही असे ते सांगतात. निरंजन हे 'नेहरू सदरा' याचे देखील स्पेशलिस्ट आहेत.

आज नाटकाचं सगळे ड्रेसिंग ते स्वतः शिवतात. जिद्दीनं ते टेलर झाले. टेलर म्हणून भाकरे जेव्हा पुन्हा त्यांच्या गावात आले तेव्हा त्यांचं नाव फॅशन टेलर म्हणून पडलं. त्यांच्याकडे चांगले कपडे शिवायला लोकं यायचे. निरंजन यांच्याकडे काम होते पण त्यांच्या घरात लेकरांना खायला नव्हते.



अशोकजी परांजपेंनी निरंजन यांना भारुड शिकवले. निरंजन यांच पहिलं भारुड त्यांनी माटुंगा कल्चरल सेंटर, मुंबई येथे ठेवले. भाकरे यांचा कार्यक्रम संपल्यावर लोकांनी, मुंबईकरांनी त्यांच्या भारुडाचं एवढं कौतुक केलं. निरंजन यांना वाटलं की, 'मी किती मोठा झालो?' कारण त्यांचा 'नंदीबैल' त्यावेळी मुंबईकरांनी अनुभवला होता. त्यांचा 'वासुदेव' पाहिला होता. अशोकजी परांजपे यांनी निरंजन यांच्या पाठीवर थाप मारली. त्यावेळी कमलाकर सोनटक्के यांनी अशोकजींना विचारलं की, 'हा हिरा तुला कोठे भेटला?' अशोकजी म्हणाले, 'अरे हा तुझ्या तालुक्यातला आहे.' नंतर कमलाकर सोनटक्केंनी भाकरेंना, वांगणीला एक हजार मुलांना भारुड शिकवण्यासाठी आय.एन.टी. संस्थेतर्फे नियुक्त केलं. निरंजन यांनी सर्व मुलांना भारुड शिकवलं. यशस्वीरीत्या सर्व मुले शिकली. नंतर पुढे अनेकांना निरंजन यांनी भारुड शिकविले. निरंजन हे नंतर अनेकांना स्वत:बरोबर कार्यक्रम करायला घेऊन गेले. त्यांच्या गावातले देखील अनेक कलावंतांना ते दिल्ली, देहू, दमन, गोवा, पंजाब, गुजरात, हरियाणापर्यंत घेऊन गेले. इतकेच काय तर आकाशवाणी व दूरदर्शनलाही ते बऱ्याच कलाकारांना सादरीकरणासाठी घेऊन गेले.

एक विषय तर खूप महत्त्वाचा आहे. बँकेचं काम करताना बँक अधिकारी बँकेचा अहवाल कधी वाचतात? कधीच वाचत नाहीत. देवगिरी नागरी सहकारी बँक औरंगाबादची, त्या बँकेचा दर गुरुवारी कर्मचाऱ्यांसाठी एक शो हा करमणुकीचा असतो. त्या बँकेमधील व्यवस्थापकांनी एक दिवशी भाकरे यांना फोन केला, 'भाकरे तुमचं भारुड आमच्या बँकेत पाहिजे.' भाकरेंना सवय होती पॉइंट घेऊन कार्यक्रम करायची. भाकरे म्हणाले, 'तुम्ही तुमचे पॉइंट द्या साहेब, ज्या विषयावर कार्यक्रम करायचा त्या विषयावरती मी करतो.' त्या साहेबांनी भाकरेंकडे त्यांच्या बँकेचा वार्षिक अहवालच पाठवला. वार्षिक अहवाल भाकरेंच्या पुढे आल्यावरती त्यांनी विचार केला, 'आता याच्यावर कार्यक्रम करायचा तर काय करायचं?' पण ज्यावेळेस निरंजन भाकरे पोवाडा लिहायला बसले, तर पूर्ण वार्षिक अहवालाचा पोवाडाच त्यांनी लिहिला. ज्यावेळी बँकेत कार्यक्रम सादर केला, त्या कार्यक्रमाचा एक वेगळा इफेक्ट झाला. तो परिणाम असा झाला की आज त्यांच्याकडे सगळ्या बँकेचे वार्षिक अहवाल येतात आणि दरवर्षी

त्या अहवालाचा निरंजन यांचा कार्यक्रम सादर होतो. भाकरे यांनी 'देवगिरी नागरी सहकारी बँकेचा' अहवाल सादर केला. औरंगाबाद, 'जालना ग्रामीण बँकेचा' कार्यक्रम सादर केला. त्यांनी 'चिखली अर्बन बँकेचा' वार्षिक अहवाल सादर केला. यासोबतच 'बुलढाणा अर्बन बँकेचा', 'नांदेड अर्बन बँकेचा' वार्षिक अहवालही सादर केला.



भाकरेंना कल्पना नव्हती की पुढे दोन जण त्यांच्या आयुष्यात येणार आहेत. ती पहिली व्यक्ती होती 'अशोक हांडे'. त्यावेळी भाकरेंना अशोक हांडे कोण आहेत, हेच माहिती नव्हतं. अशोक हांडे यांचा 'मराठी बाणा' निर्मितीच्या वाटेवर होता. दुसरा योग त्यादिवशी आला, ज्या दिवशी भाकरे यांच्या जीवनात 'अशोकजी हांडे' आले. अशोक हांडेंनी ज्यावेळेस भाकरेंचा बुरगुंडा पाहिला, ती गर्दी पाहिली त्यावेळेस अशोक हांडेंनी भाकरे यांना मिठी मारली आणि त्यांच्या मराठी बाणामध्ये भाकरे यांचा प्रवेश झाला.



मराठीबाणा हाऊसफुल चालायला लागला. मराठी बाणा पाहून कोणीही आला तर तो बुरगुंड्याचीच चर्चा करत असे. त्यांच्या बुरगुंड्यावरती भरभरून प्रेम करत असत. मुंबईनं पुढे भाकरे यांना भरभरून प्रेम दिलं.

दुसरे अशोकजी, ज्यावेळी भाकरे यांच्या जीवनात आले. त्यावेळी या ग्रामीण भारुडाला नागरी रंगमंचावर प्रतिष्ठा मिळवून दिल्याबद्दल भाकरे यांना महाराष्ट्र शासनाचा लोककला पुरस्कार मंजूर झाला. सगळ्यांच्या साक्षीने निरंजन भाकरेंनी व त्यांच्या पत्नीने तो पुरस्कार स्वीकारला. बांधकाम मंत्री अनिल देशमुखांच्या हस्ते नागपूरला तो पुरस्कार त्यांना मिळाला.

तिसरी व्यक्ती 'अशोकजी पत्की' भाकरे यांच्या जीवनात आली. त्यांनी त्यांचं बुरगुंडा भारुड हे ना. धों. महानोरांकडून लिहून घेतले आणि भाकरे यांना त्यांच्या 'करता–करविता' या चित्रपटामध्ये गायला लावले. सध्या निरंजन भाकरे मराठी बाणामध्ये भारुड सादर करतात. नाटकाचे कपडे असतील तर स्वत: डिझाइन करतात.

निरंजन भाकरे यांचा परिचय

कार्यरत पद: डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती सदस्य.

संस्थापक अध्यक्ष: निरंजन भाकरे सांस्कृतिक लोककला व शिक्षण संस्था रहिमाबाद.

सांस्कृतिक उपक्रम, आंतरराष्ट्रीय पातळीवरील सादरीकरण:

दिनांक: २३/०७/२००११ ला शिकागो (अमेरिका) येथे पार पडलेल्या बृहमहाराष्ट्र मंडळाच्या १५ व्या अधिवेशनात यशस्वी भारुड सादरीकरण.

राष्ट्रीय पातळीवरील सादरीकरण:

- साक्षरता अभिनयाद्वारे महाराष्ट्र, सिल्वासा येथे प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच आय. जी. स्टेडियम, नवी दिल्ली, येथे वीस राज्यातून प्रथम क्रमांकाचे मानकरी.
- भारत सरकार गीत व नाटक प्रभाग, नवी दिल्ली, चे 'अ' दर्जाचे कलाकार.
- हरियाणा येथील आंतरराष्ट्रीय सुरजकुंड फेस्टिवल २००६ मध्ये सहभाग.
- म्हैसूर (कर्नाटक) अखिल भारतीय लोकनृत्य महोत्सव सहभाग.
- महाराष्ट्रासह अनेक राज्यात सामाजिक प्रबोधनाचे किमान ४००० यशस्वी कार्यक्रम.
- मुंबई विद्यापीठ लोककला विभाग तसेच नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा नवी दिल्ली येथे

विद्यार्थ्यांना लोककला प्रशिक्षण दिले.

- सिल्वर (आसाम) येथे संगीत नाटक अकादमी नवी दिल्ली आयोजित नृत्यांगना कला फेस्टिव्हलमध्ये सादरीकरण, २०१८.

राज्य पातळीवरील सादरीकरण:

- आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रावरून अनेक कार्यक्रमांचे सादरीकरण.
- महाराष्ट्र व मुंबईसह कोकणात सन १९८५ पासून आजपर्यंत व्यसनमुक्तीसाठी कायम प्रबोधन.
- एड्स नियंत्रण प्रबोधनाचे महाराष्ट्रभर जाहीर कलापथकाद्वारे जनजागरण.
- सोंगी भारुड कलापथकाद्वारे दलित वस्ती सुधार प्रबोधन, पाणलोट व्यवस्थापन, कुष्ठरोग निर्मूलन, अपंगासाठी प्रबोधन, बालमजुरी निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, महिला सबलीकरण, हागणदारी मुक्ती, ग्रामस्वच्छता, कुपोषण निर्मूलन, माता व बालसंगोपन, स्त्री भ्रूण हत्या, बचपन बचाव, पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता, बचतगट चळवळ इत्यादी सामाजिक प्रबोधनाचे हजारो यशस्वी कार्यक्रम.
- अनुसूचित जाती व जमाती, भटक्या विमुक्त, आदिवासी आदींच्या वस्तीत जाऊन शाहू–फुले–आंबेडकरी विचारांची प्रसिद्धी, जलसा, लोककला, जादूचे प्रयोग, पोवाडा, लोकगीते इत्यादींद्वारे जनजागरणाचे कार्यक्रम सादर करणे.
- १९९६ ते २०००व्यसनमुक्त पहाट अभियानांतर्गत प्रथम क्रमांकाची अनेक बक्षिसे.
- मुंबई फेस्टिव्हल, वेरूळ अजिंठा महोत्सव, औरंगाबाद, अखिल भारतीय साहित्य संमेलन, अखिल भारतीय नाट्यसंमेलने इत्यादी अनेक ठिकाणी सहभाग.
- महाराष्ट्र शासनातर्फे राज्यात अनेक ठिकाणी शाहिरी व लोककलेचे सहप्रयोग व्याख्याने.

व्याख्याता:

- प्रयोगसिध्द कला (शायरी, कीर्तन व नाट्य) सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई.
- महाराष्ट्र शासनाच्या अवयवदान अभियान रॅलीमध्ये यशस्वी प्रबोधन, २०१६.
- वॉटर ऑर्गनायझेशन ट्रस्ट, बायप मित्र संस्था, नाबार्ड, पाणी फाउंडेशन यासारख्या अनेक संस्थांच्या अंतर्गत, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम यशस्वी जनजागृती.

टि.व्ही. शो तसेच रियालिटी शो:

- मुंबई दूरदर्शनवरील 'धिना धिन धा' या लोककला विषयक कार्यक्रमातून प्रभावी सादरीकरण.
- मुंबई दूरदर्शनवरील 'तीच मैफिल रंगलेली' या कार्यक्रमात मुलाखत.
- झी मराठीवरील 'माझीया प्रियाला प्रित कळेना' या मालिकेमध्ये सप्तपदी सादर.
- कलर्स मराठी वरील 'गर्जा महाराष्ट्र' या कार्यक्रमातून भारुड सादरीकरण.
- कलर्स मराठी वरील 'तुमच्यासाठी काय पण' या संदीप पाठक यांच्या कार्यक्रमामध्ये भारुड सादरीकरण तसेच मुलाखत.
- झी टॉकीज वरील 'नसते उद्योग' या प्रसाद ओक यांच्या कार्यक्रमांमध्ये भारुड सादरीकरण तसेच मुलाखत.
- कलर्स मराठी वरील 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमामध्ये भारुड सादरीकरण.
- कलर्स मराठी वरील 'अवघा रंग एक झाला' या कार्यक्रमामध्ये भारुड सादरीकरण.
- झी मराठीवरील 'मराठी पाऊल पडते पुढे' या कार्यक्रमांमध्ये १० चांदीच्या कड्यांचे मानकरी.

उल्लेखनीय कार्य:

- ९० मीटर कापडाचा ७५ मीटर घेर असलेला २० किलो वजनाचा पायघोळ अंगरखा स्वतः शिवून १४ फेब्रुवारी, २०१५ ला व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी तरुण मुला–मुलींच्या प्रबोधनासाठी मुंबईच्या गिरगाव चौपाटी येथे आय. एन. टी. च्या सहकार्याने अनेक मान्यवरांच्या समक्ष तो अंगरखा परिधान करून अडीच तास रसिकांची मने जिंकत विश्वविक्रम केला.

शासकीय तसेच निमशासकीय पुरस्कार:

- महाराष्ट्र शासनाचा राज्य सांस्कृतिक लोककला पुरस्कार प्राप्त साल २००७.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा भूषण पुरस्कार.
- जीवनगौरव पुरस्कार साल २००२, हस्ते मंगेशजी पाडगावकर.
- के. लोटुपाटील नाट्य गौरव पुरस्कार.
- युवा शाहीर गौरव पुरस्कार.

- समता सेवाभावी पुरस्कार.
- शाहीर गौरव पुरस्कार.
- पठ्ठे बापूराव बापूसाहेब जिंतीकर पुरस्कार.
- साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे गौरव राज्यस्तरीय पुरस्कार.
- महाराष्ट्र चित्रपट महासंघ मुंबई यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०१८.

३.५.२ निरंजन भाकरे यांची भेट

१ डिसेंबर, २००५ या दिवशी दया पवार प्रतिष्ठान यांच्या वतीने, गडकरी रंगायतन, ठाणे येथे, लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये निरंजन भाकरे यांचं सोंगी भारुड ठेवण्यात आलं होतं. त्याकरता संशोधक ठाण्याच्या गडकरी कलादालनामध्ये पोहोचला. निरंजन भाकरे सोंगी भारुड सादर करत होते. त्यांनी सुरवातीला आंधळ्या–पांगळ्याचं सोंग घेऊन सोंगी भारुडाची सुरुवात केली.

"आंधळ्या–पांगळ्यांचा, एक विठोबा दाता"

यात निरंजन यांनी सांगितले की, आजचा समाज विवेकाने पांगळा व बुद्धीने आंधळा झालेला आहे. त्या समाजाला कळत असूनही वळत नाही. निरंजन भाकरे यांनी यातून व्यसनाधीन झालेल्या तरुणांचे प्रबोधन करायला सुरुवात केली. यातून रक्तदान, नेत्रदान, देहदान हे दान किती मोलाचे आहे, हे निरंजन यांनी त्यांच्या भारूडातून सांगितले.



त्या सोंगी भारुडानंतर निरंजन यांनी पोतराज त्यांच्या भारूडातून साकारला. यातून निरंजन यांनी काही अंधश्रद्धेची उदाहरणे देऊन ती अंधश्रद्धा किती विकोपाला गेलेली आहे व

ती समाजासाठी कशी धोकादायक आहे. हे समोरील श्रोत्यांना त्यांनी सादरीकरणातून वेगवेगळी उदाहरणे देऊन पटवून दिले.

शेवटी निरंजन यांनी 'बुरगुंडा' भारुड सादर केले. बुरगुंडा म्हणजे ज्ञान प्राप्ती होणे. निरंजन भाकरे यांचा बुरगुंडा हा बऱ्याच लोकांना आवडला. त्याने तेथे त्या कार्यक्रमाचे काही फोटो काढले.



कार्यक्रम संपल्यानंतर त्याने डिजिटल कॅमेऱ्यावर ते फोटो निरंजन भाकरे यांना दाखवले. निरंजन भाकरे फार खूश झाले आणि म्हणाले 'मला हे फोटो केव्हा पाठवणार'? तो म्हणाला 'लवकरच पाठवतो'. कारण त्यांना ते फोटो फार आवडले होते. पुढच्या दोन दिवसाने त्याने काही चांगले फोटो निरंजन भाकरे यांना त्यांच्या गावी पोस्टाने पाठवले.

पुढील दहा दिवसाने, म्हणजेच ११ डिसेंबर, २००५ रोजी अशोक हांडे, यांच्या 'मराठी बाणा' या कार्यक्रमांमध्ये निरंजन भाकरे यांना त्यांचे सोंगी भारुड दाखवण्याचा दैवयोग चालून आला. संशोधक त्या कार्यक्रमाला गेला. निरंजन भाकरे यांचे मेकअप करतानाचे फोटो त्याने काढले. छान पद्धतीने साडी नेसून, कडेवरती छोटी बाहुली घेऊन आणि डोक्यावरती मोठे गाठोडे घेऊन त्यांचा मेकअप सुरू होता. असा फोटो काढला.



निरंजन यांचा कार्यक्रम सुरू झाल्यावरही त्याने काही फोटो काढले. निरंजन भाकरे यांनी त्यांचा बुरगुंडा तेथे सादर करायला सुरुवात केली. 'बुरंगुडा' म्हणजे ज्ञान प्राप्ती. ती सर्वाना व्हावी म्हणून निरंजन भाकरे यांनी उदाहरण दिले की, जन्मलेल्या मुलाला जन्मताच आईचे दूध दिले पाहिजे, त्याला दुधाच्या बाटलीची सवय लावता कामा नये. लहानपणी जर त्या मुलाला बाटलीची सवय लागली तर तो मोठा झाल्यावर बाटली हातात घेतल्याशिवाय राहणार नाही. यातून आईचे दूध किती महत्त्वाचे असते आणि दारूही किती वाईट परिणाम शरीरावर करू शकते. हे निरंजन भाकरे यांनी त्यांच्या भारूडातून समोर जमलेल्या रसिकांना पटवून दिले.

निरंजन यांच्या बुरगुंडाचे सादरीकरण:

भाकरे: अनाधी सवे झाले स्वानंद

अनाधी नवल झाले, स्वानंद तुकडा सवे घेऊनी आले.

प्रेमाचे कुंकू भारी...

साथीदार: अरे काय कुंकू घेऊनी आलास तू? आज काय आमच्या आया, बहिणी काय कुंकू लावतात? सगळ्याच टिकल्या लावतात. म्हणजे जसा साडीचा रंग तसा टिकलीचा रंग.

भाकरे: मग मॅचिंग म्हणा ना? अरे पण मॅचिंग जीवनामध्ये करताना वरच्या रंगाचं मॅचिंग तर कधी पण करता येईल. परंतु प्रपंचामध्ये खरा आनंद, खरं सुख भोगायचं असेल तर नेचर मॅचिंग असावं की नाही? नेचर मॅचिंग असलं तर यावरच्या रंगांना महत्त्व आहे. मी म्हणत नाही, आई माझं कुंकू लाव अन् तुझी टिकली लावू नको. परंतु टिकलीच्या रूपानं सौभाग्याचं दान किती ठिकाणी वाटत फिरते. बाथरूमला गेलं की बाथरूमची भिंत सौभाग्यवती भव, आरशापुढे बसलं की आरसा सौभाग्यवती भव. मी म्हणत नाही आई माझं कुंकू लाव अन् तुझी टिकली लावू नकोस परंतु कुंकू लावण्याच्या मागे काहीतरी शास्त्रीय दृष्टिकोन आहे. कारण कुंकू हे चिंचुका आणि हळदीपासून बनवलं जातंय. ते कुंकू ज्यावेळी माऊली आपल्या स्वतःच्या कपाळावर लावते त्यावेळी आदमी आणि ब्रह्मरंध्र या दोन्हींच्यामध्ये जे पिट्युटरीग्लँड आहे, संवेदन केंद्र ज्याला म्हणतात. त्या संवेदन केंद्रावर कुंकू लावल्यामुळे महिलेचं मानसिक संतुलन कायम राहतेय. महिलेचं मानसिक संतुलन कायम राखावं. कारण अनेक प्रकारचं टेन्शन तिच्या डोक्यावरती असतंय. ते टेन्शन कमी व्हावे म्हणून कुंकू लावलं जातंय. महिलांनी कुंकू लावावं.

पुरुषाला पूर्वीच्याकाळी शेंडी होती. आता आहे का शेंडी? आता नाही शेंडी. शेंडी म्हणजे काय? लांब केस नाही. तर शेंडी म्हणजे माणसाच्या मेंदूरूपी टीव्हीमध्ये सदविचारांच प्रक्षेपण करणारा अँटिना. आता तो अँटिनाच राहिला नाही तर कसं रिमिक्स घुसणार नाही. रिमिक्स घुसले की वेगवेगळ्या प्रकारचे विषय डोक्यात घुसले की, व्यसनाधीन होतो माणूस. आजकालचा तरुण का भरकटला? योग्य प्रकारचं प्रक्षेपण त्याच्या मेंदूमध्ये होत नाही. योग्य प्रकारचे संस्कार त्याच्यावरती पडत नाही. कारण आजकाल संस्काराला महत्त्व आहे. मुंबई–पुण्यासारख्या ठिकाणी गेलो, तर धावतं जग निर्माण होतंय. या धावत्या जगामध्ये आई आणि वडिलांची ओळखच मुलांना नाही. कारण सकाळी उठलं की लेकराला आई आणि वडील

दिसतच नाही. सकाळी उठल्या उठल्या पहिलं त्याला मीडिया प्रभावित करते. सकाळी उठलं की पहिल्यांदा त्याला टीव्ही दिसतो. मुंबईमध्ये टीव्हीला काय म्हणतात? 'इडियट बॉक्स.' T.V.चा जर लाँग फॉर्म बघितला तर 'T' म्हणजे ताबडतोब आणि 'V' म्हणजे वाटोळं. ताबडतोब वाटोळं करायचं असेल तर टीव्ही लेकराला दाखवा. असे वेगवेगळ्या प्रकारचे विषय आम्ही त्यातून देतो आणि ती अँटिना म्हणजेच माणसांची शेंडी आणि आमच्या महिलेच्या डोक्यावरती असणारा केसांचा आंबाडा म्हणजेच डिश अँटिना. कारण वेगवेगळ्या प्रकारचे विषय तिच्या डोक्यामध्ये येतात. लेकरांचं संगोपन, मुलांचं शिक्षण, मुलींचं शिक्षण, घराचं व्यवस्थापन, नवरा ड्युटीवरून घरी आला की हसतमुखाने त्याचं स्वागत करणे, सासू–सासऱ्याची सेवा, हे सगळेच्या सगळे विषय योग्य प्रकारे प्रक्षेपित होण्यासाठी तिच्या डोक्यावरती जो केसांचा आंबाडा आहे तो डिश अँटिना आहे. आता मला सांगा त्या डिश अँटिनाच्या काड्या तिने जर ब्युटी पार्लरमध्ये जाऊन कमी केल्या तर तिच्या मेंदूरूपी टीव्हीच्या पडद्यावरती मुंग्या नाही येणार का?

असे हे 'बुरगुंडा' भारुड लोकांना फारच आवडले. त्या कार्यक्रमाला फार मान्यवर मंडळी आली होती. त्यांनी निरंजन भाकरे त्यांच्या बुरगुंड्याची फारच स्तुती केली. निरंजन भाकरे हे पहिल्यांदाच मराठी बाणामधून लोकांपुढे आले होते.



त्यानंतर १४ जानेवारी, २००६ रोजी दामोदर हॉल, परळ येथे कमलाकर सोनटक्के सर हे काही लोककलाकारांचं व्हिडिओ शुटिंग करणार होते, तेथे त्यांनी संशोधकाला बोलावले. तेथे सुरुवातीला कमलाबाई शिंदे यांच जागरण गोंधळ याचे चित्रीकरण सुरू होतं. संपूर्ण दामोदर हॉल कमलाकर सोनटक्के सरांनी चित्रीकरणासाठी भाड्याने घेतला हो. त्या संपूर्ण हॉलमध्ये तो, कमलाकर सोनटक्के, त्यांच्या चलचित्र कॅमेराचे कॅमेरामन आणि काही लोककलाकार एवढेच जण होतो.

तेथे निरंजन भाकरे यांच्या सोंगी भारुडाला सुरुवात झाली. निरंजन भाकरे यांनी सोंगी भारुड सादरीकरणात पहिला अभिनय हा भिकाऱ्याचा केला. कुठल्या कुठल्या गोष्टीची भीक मागावी आणि काय काय मागावे हे पटवून दिले. त्यानंतर त्यांनी दुसरं सोंग न्हाव्याचे घेतले. त्यात निरंजन यांनी त्यांच्या समोरील खुर्चीवर एका व्यक्तीला बसवून त्याच्या चेहऱ्यावरती कपडे धुण्याचा साबण लावला. नंतर त्या व्यक्तीची चक्क मोठ्या करवतीने दाढी करायला सुरुवात केली. दाढी करण्याची ही वेगळी सोंगी पद्धत त्याने पहिल्यांदाच पहिली.



अशाप्रकारे वासुदेव, जोशी, नंदीबैल, न्हावी, इत्यादी प्रकारची सोंग घेऊन निरंजन भाकरे यांनी जवळपास दोन तास त्याचं सोंगी भारुड सादर केलं.

नंतर निरंजन भाकरे यांनी त्यांच्या आवडीचा आणि सर्वांना हवाहवासा वाटणारा बुरगुंडा सादर केला. निरंजन भाकरे यांचा दोन तासांचा सोंगी भारुडाचा कार्यक्रम त्याने छायाचित्रित केला. हे सर्व कमलाकर सोनटक्के सरांमुळे शक्य झालं.

१५ डिसेंबर,२००८ रोजी तो निरंजन भाकरे यांच गाव रहिमाबाद, जे औरंगाबादमध्ये आहे तेथे गेला. त्याने निरंजन भाकरे यांच्यासोबत त्यांचे संपूर्ण गाव पाहिले. त्यांच्या गावातील लोकांशी गप्पा मारल्या, त्या लोकांचे फोटो काढले. त्याच दिवशी त्यांच्या गावात निरंजन

भाकरे यांचा सोंगी भारुडाचा कार्यक्रम ठेवायचं ठरलं, कारण तो कार्यक्रम त्याला छायाचित्रबद्ध आणि चलचित्रित करायचा होता.

दुपारचं जेवण झाल्यावर, संशोधकाने त्याची एक मुलाखत जी आयबीएन लोकमतवर सलाम महाराष्ट्रमध्ये झाली होती, ती त्याच्या लॅपटॉपवर सुरू करून संपूर्ण निरंजन भाकरे कुटुंबांना दाखवली. खुर्चीवर ठेवलेला लॅपटॉप आणि संपूर्ण परिवार त्याची ती मुलाखत पाहतोय आणि मागच्या भिंतीवर निरंजन भाकरे यांना मिळालेल्या असंख्य ढाली आणि त्यांची छायाचित्रे लावलेली आहेत असा एक वेगळा फोटो त्याने घेतला.



संध्याकाळी निरंजन भाकरे यांनी त्यांच्या गावाच्या देवळाच्या बाहेर त्यांच्या सादरीकरणाला सुरुवात केली. वासुदेवापासून, बुरगुंडापर्यंत सगळी सोंग त्यांनी त्यांच्या गावातील प्रेक्षकांसमोर सादर करायला सुरुवात केली. वासुदेव सादर करताना निरंजन सांगतात की, 'राम प्रहारामध्ये आला वासुदेव, टाळ वाजे छुन–छुना, झोपू नका तुम्ही गाणं ऐका जरा ध्यान देऊन.' हे वासुदेवाचं पहिलं गीत त्यांनी गायले. पुढे त्यांनी सांगितले की, जन्माला येताच प्रत्येकाच्या डोक्यावरती तीन कर्ज असतात. पहिलं कर्ज असतं आई–वडिलांचं. ज्या आई–वडिलांनी आम्हाला जन्म दिला त्या आई–वडिलांचं कर्ज त्यांची सेवा करून फेडावं. त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवू नये. दुसरं कर्ज असतं गुरुजनांचं. ज्या गुरुजींनी आम्हाला जीवनाचा मार्ग शिकवला अशा गुरुजींची गुरुदक्षिणा हे दुसरं कर्ज. सगळ्यात महत्त्वाचं तिसरं कर्ज ज्या

समाजामध्ये आम्ही जन्माला आलोय, जो समाज आमच्या सुख–दुःखात सहभागी होतोय अशा समाजाचं सामाजिक ऋण हे प्रत्येकाच्या डोक्यावरती आहे. ते प्रत्येकाने फेडण्याची गरज आहे. तेच समाजाचं ऋण भाकरेंच्याही डोक्यावरती आहे. ते समाजाचं काही देणं लागतात म्हणून प्रबोधनाच्या रूपाने का होईना हा वासुदेव तुमच्या दारात आलाय. या वासुदेवाला काय सांगायचंय. 'आमचा देशच मुळी माताप्रधान संस्कृतीचा आहे. जगाच्या पाठीवर कुठलाच देश असा नाही की, ज्याला माता म्हटलं जातं. अमेरिकेला माता म्हणतात? इंग्लंडला, थायलंडला, जपानला, ब्रिटनला, पाकिस्तानला, अफगाणिस्तानला, फक्त भारतालाच माता म्हटलं जातं. ओन्ली भारतमाता. या भारतमातेचे दोनच मुख्य डोळे आहेत, एक हिंदू आणि दुसरा मुसलमान. हे दोन डोळे जर चकचकीत असले तर कोणत्याही देशाची वाकडी नजर करून पाहण्याची ताकद आमच्या देशाकडे होणार नाही.' असे त्यांनी सादरीकरणातून सांगितले. पुढे निरंजन म्हणतात की, मुसलमान बांधवांचा महत्त्वाचा सण कोणता आहे?, 'रमजान' पवित्र महिना व पवित्र सण. हिंदू बांधवांचा सगळ्यात मोठा सण दिवाळी. जरा पेन घ्या, रमजान इंग्लिशमध्ये लिहून बघा. पहिली तीन अक्षरे काय येतात? RAM रमजानमध्ये राम आहे, आणि दिवाळीची शेवटची तीन अक्षरे बघा, ALI. रमजानमध्ये RAM आहे तर दिवाळीमध्ये ALI आहे. मग कशाला पाहिजेत भांडणं. आपण तर जाती–धर्मासाठीसाठी भांडण करतोय, जमिनीसाठी भांडण करतोय. भाकरे म्हणतात, 'भांडण नका करू'. कोणी म्हटलंय, 'ना जाने क्या करने आये थे, क्या कर बैठे?, अरे कही मंदिर बना बैठे, तो कही मस्जिद बना बैठे. हमसे तो परिंदे अच्छे, कभी मंदिर पे जा बैठे, तो कभी मस्जिद पे जा बैठे.' आणि म्हणून हा वासुदेव तुमच्या दारात आलाय. सगळ्यांना जागवण्यासाठी आलाय. या प्रकारे निरंजन यांनी समोरील प्रेक्षक वर्गाचे प्रबोधन तर केलेच पण त्यांचे कानही टोचले.



'महादेवाचा नंदी आला हो, सदाशिवाचा नंदी आला' सादरीकरण करताना निरंजन यांनी सांगितले की, महादेव म्हणजे मोठा देव आणि तो म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून तो आपला बळीराजा म्हणजेच 'शेतकरी' होय. तो सर्व जगाला अन्न पिकवून खाऊ घालतो. त्या शेतकऱ्याला कुठलेही निवृत्ती वेतन मिळत नाही, कुठलाही प्रॉव्हिडंट फंड मिळत नाही. काहीप्रसंगी तो आत्महत्या करतो, तेव्हा निरंजन यांनी सर्वांना आवाहन केले की, किमान आपण त्या शेतकरी व त्यांच्या मुलाबाळांसाठी प्रार्थना तरी करूया की, त्यांच्यावरती कधीही उपाशी राहण्याची वेळ येणार नाही.

गावच्या आज्या (वृद्ध महिला) निरंजन यांच्यावर फार खूश होत्या. थंडीमध्ये कुडकुडत गावच्या महिला निरंजन यांचा कार्यक्रम पाहात होत्या.



पुरुषांची संख्या त्यामानाने कमी होती. असा हा संपूर्ण कार्यक्रम त्याने छायाचित्रित केला व चलचित्रित देखील केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी निरंजन भाकरे यांनी मेकअप करायला सुरुवात केली. कारण त्याला त्यांची मुलाखत घ्यायची होती. त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या वेशभूषा करून त्याला मुलाखत दिली आणि त्या दरम्यान त्याने त्यांची काही छायाचित्रे देखील काढली.



मुलाखत संपल्यावर निरंजन भाकरे आणि तो संपूर्ण गावात फिरला त्यानंतर त्यांचं गाव त्याने छायाचित्रित केलं. आशा पद्धतीने चार दिवस त्यांच्या गावी राहून तो मुंबईला परतला.

दिनांक १४ फेब्रुवारी, २०१५ रोजी निरंजन भाकरे हे गिरगाव चौपाटी येथील बाबुलनाथ मंदिराजवळ आएनटी आदित्य बिर्लासेंटरमध्ये एक वेगळा व ऐतिहासिक असा कार्यक्रम करणार होते. निरंजन भाकरे यांनी स्वतः शिवलेला ९० मीटर कापडाचा पायघोळ तयार करून ७५ इंच घेर असलेल्या या पायघोळाच्या गिरकीची नोंद 'वर्ल्ड अमेझिंग रेकोर्डमध्ये' करण्यात येणार होती. या अंगरख्याचे वजन साडेआठ किलो होते. या कार्यक्रमासाठी वापरलेला अंगरखा आणि ड्रेपरीचे एकूण वजन तब्बल २० किलो इतके होते. तिथे तो गेला. निरंजन यांनी मेकअप करायला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी वासुदेवाचे पात्र साकारण्यासाठी वासुदेवाची टोपी घातली. त्या अगोदर त्यांनी त्यांचा लांब आणि वजनदार असा अंगरखा घातला.



तयार होऊन निरंजन भाकरे यांनी वेगवेगळी सोंग घेऊन त्यांचा सोंगी भारुडाचा कार्यक्रम लोकांपुढे सादर करायला सुरुवात केली. दोन तास निरंजन यांनी हा कार्यक्रम सादर केला. लोकांनीही त्यांना भरभरून दाद दिली. काही लोक तर त्यांच्या कार्यक्रमात नाचले देखील. त्यांचा बुरगुंडा लोकांनी डोक्यावर घेतला. कार्यक्रम संपल्यावर वर्ल्ड अमेझिंग रेकॉर्डच्या पदाधिकाऱ्यांनी निरंजन भाकरे यांना मानपत्र, प्रशस्तीपत्रक आणि मेडल स्टेजवर येऊन दिले. असा हा अविस्मरणीय क्षण त्याच्या कॅमेरात कैद झाला.



कार्यक्रम संपल्यावर काही वाहिन्यांनी व पत्रकारांनी निरंजन भाकरे यांची मुलाखत घेतली. बऱ्याच लोकांनी त्यांच्याशी हात मिळवला. सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. निरंजन भाकरे यांचा संपूर्ण परिवार हा तेथे आला होता, त्यांच्या संपूर्ण परिवाराचा एकत्र फोटो त्याने तो कार्यक्रम संपल्या नंतर काढला.

३.६ : घटकाभ्यास क्रमांक : ६

विठ्ठल उमप

३.६.१ विठ्ठल उमप यांचा जीवन प्रवास

विठ्ठल उमप हे १५जुलै, १९३१ला जन्मले. त्यांचे पूर्वज मूळचे नागपूरचे, पोटापाण्यासाठी त्यांचे वडील नगर जिल्ह्यातील चिकणी गावी स्थायिक झाले. तिथेही पोटापाण्याची काही व्यवस्था न झाल्याने त्यांनी मुंबईचा रस्ता धरला. त्यांचे वडील कुर्ला फलाटनंबर एक जवळ असलेल्या रेल्वेच्या कारखान्यात फिटर म्हणून नोकरीला होते. त्या काळानुसार त्यांच्या वडिलांना पगार मिळत असे, तो पगार विठ्ठल उमप यांच्या संपूर्ण कुटुंबाला पुरेसा होता. विठ्ठल उमप हे सर्वात थोरले असल्यामुळे त्यांचा खूप लाड व खूप कौतुक होत असे. ते सहा वर्षाचे झाल्यावर दादर नायगाव इथल्या मराठी शाळेत त्यांच नाव घालण्यात आलं. बालपणापासूनच विठ्ठल उमप यांना शाळेचा खूप कंटाळा होता. पुस्तकातले एकही अक्षर लहानपणी विठ्ठल उमप यांच्या लक्षात राहात नसे.

विठ्ठल उमप यांच्या बालपणी त्यांच्या वडिलांनी त्यांना ताडीच्या, दारूच्या गुत्त्यात नेलं, पण ताडीचा घोट त्यांना पाजला नाही. विठ्ठल उमप यांचे वडील हे नायगावचे दादा होते. ते खूप शूर वीर होते, कित्येक लोकांना एकटे ते भारी पडत होते. त्यांनी विठ्ठल उमप यांना श्रावण महिन्यात पोथ्या ऐकायला बसवलं, व्यायाम करायला लावला, निडर वागायला शिकवलं, त्यांनी विठ्ठल उमप यांच जीवन घडवलं. व्यायाम केल्याने विठ्ठल उमप यांच शरीर राकट बनलं होत. वयाच्या बाराव्या वर्षी ते मोठ्या माणसासारखे दिसत होते. पण विठ्ठल उमप यांना कधी भांडण करणं जमलं नाही. भांडण तर राहिले दूर पण कॅरम, विटी–दांडू, पतंग उडवणे, यापैकी काहीच विठ्ठल उमप यांना जमत नव्हतं. अन्याय सहन करायचा नाही, अशी त्यांच्या वडिलांनी पहिल्यापासून त्यांना शिकवण दिली होती. नायगावच्या बीडीडी चाळीत दहा बाय दहाच्या खोलीमध्ये त्यांचे वडील विठ्ठल उमप यांना लाठीकाठी शिक्षण देत असत. त्यांच्या घरची परिस्थिती बरी होती, पण नंतर त्यांच्या वडिलांना दारूचे आणि ताडीचे मोठ्या प्रमाणात व्यसन लागल्यामुळे त्यांच्या घरात दारिद्र्य डोकावू लागले. दारूसाठी त्यांचे वडील इतरांना पठाणाकडून कर्ज काढून देत असत. पुढे मात्र भट, सोलंकी, डिसूजा अशा त्यांच्या जिवलग

मित्रांचा घोळका विठ्ठल उमप यांच्या घरी जमू लागला. बाहेरच्या दारूच्या बाटल्या घरी आणल्या जाऊ लागल्या. विठ्ठल उमप यांच्या वडिलांचं पिणं वाढलं. मित्र वाढले तसे त्यांच्या घरची दैनाही वाढत गेली, घरच बेघर झालं.

विठ्ठल उमप यांची आई शेजारच्या लोकांकडून उसने पैसे आणून घरात स्वयंपाक बनवायची. पोटाची भूक भागवण्यासाठी विठ्ठल उमप यांची बहीण देखील भात–भाजी–भाकर बर्याचदा भिक्षा मागून आणायची. सर्वजण मिळून नंतर ते खात. हे पाहून विठ्ठल उमप हे खूप निराश होत. बऱ्याचदा आत्महत्या करण्याचा विचार विठ्ठल उमप यांच्या मनात येत असे पण आई त्यावेळेस विठ्ठल उमप यांना धीर देई.

विठ्ठल उमप यांनी खूप शिकावं इंग्रजीमध्ये बोलावं, असे त्यांच्या आईला नेहमी वाटे. पण वडिलांच्या दारूपायी व गरीब परिस्थितीच्या मुळे विठ्ठल उमप यांना सहावीत असतानाच शाळा सोडावी लागली. विठ्ठल उमप यांना त्यांच शिक्षण पूर्ण करता आलं नाही.

नोकरीसाठी वणवण भटकणे त्यांच्या नशिबी आले. ते नोकरीसाठी भटकतात हे त्यांनी त्यांच्या वडिलांना कळू दिले नाही. विठ्ठल उमप हे लहान असताना त्यांच्या यादव मामांनी त्यांना एक बुलबुल तरंग घेऊन दिला. सरावाने विठ्ठल उमप ते बुलबुल तरंग वाजवू लागले, गाणं गाऊ लागले. ते एका गुजराती चित्रपटातले गाणं बुलबुलवर वाजवत असत, तेव्हा त्यांच्या मामांना खूप आनंद व्हायचा. चाळीच्या बाहेर पटांगणात विठ्ठल उमप नेहमीच बँजो वाजवायचे. तेथून येणारे–जाणारे वाटसरू तेथे थोडावेळ थांबून विठ्ठल उमप यांच्याशी गप्पा मारायचे, त्यांना दोन चार आणे त्यावेळेस देत असत. मग पुढे विठ्ठल उमप अभंग गाऊ लागले. 'पोटापुरतं देईन विठ्ठला, लई नाही लई नाही मागणे', या अभंगाची रेकॉर्ड त्यांच्या मामांनी आणली होती. म्हणून विठ्ठल उमप यांनी तो अभंग पाठ केला होता. हे सर्व करताना त्यांचे वडील फारच नाराज होत असत. ते त्यांच्या मामाला सांगत 'यादवराव, याला गाणं बजावण नाही शिकायचं, याला शिकून मोठं व्हायचयं, त्याला शिकू दे', पण त्यांचे मामा काही ऐकत नसत.

विठ्ठल उमप यांचा लहानपणापासूनच आवाज गोड होता, त्यामुळे त्यांची बुलबुल तरंग वादन व गायन ही कला लोकांना फारच आवडायची. त्यांचे यादवमामा दरवर्षी शिमग्याची सोंग काढायचे, ते लोकांच्या घरोघरी जाऊन पोस्ट मागायचे. विठ्ठल उमप व त्यांची बहीण काळूबाई हे दोघे प्रत्येक नाचात हुशार होते. त्यांच्या मामांनी बाळकृष्णाचा वेष विठ्ठल उमप यांच्या अंगावर चढवला आणि विठ्ठल उमप यांना लोककलाकार बनवलं. दरवर्षी पोस्ट मागण्याचं, नाच–गाण्याचं व्यसन त्यांना जडलं. त्या काळानुरूप, विठ्ठल उमप यांचं वय वाढत गेलं, तसंच त्यांचं गाणं फुलत गेलं. यातून थोडाफार पैसा मिळत होता. या गाण्याच्या छंदापायी चित्रपटांच्या चालीवर विठ्ठल उमप हे गाणी लिहू लागले.



१९४८ साली विठ्ठल उमप हे नायगावच्या खोलीत राहायला आले. तेव्हा त्यांचे वडील नोकरीतून निवृत्त झाले होते. त्यांच्या वडिलांना सेवानिवृत्तीचे जे पैसे मिळाले ते सर्वच त्यांनी त्यांच्या ओळखीच्या नायगावच्या मारवाड्याकडे ठेवले. त्या मारवाड्याने ते सगळे पैसे काही दिवसातच लुबाडले.

वयाच्या सोळा–सतराव्या वर्षी विठ्ठल उमप यांचे लग्न त्यांच्या नात्यामधेच संगीता यांच्याशी त्यांच्या वडिलांनी करून दिले. ते ही फंडाच्या पैशातून, हाच काय तो विठ्ठल उमप यांना मिळालेला त्यांच्या वडिलांचा फायदा होता. विठ्ठल उमप यांच्या आई फार आजारी झाल्या, हाडीवरणाच्या आजाराने त्यांच्या आईची प्राणज्योत मालवली.

सन १९५२ साली विठ्ठल उमप यांना फ्लोराफाउंटन येथील सेंट्रल टेलिग्राफमध्ये तारवाला (मेसेंजर) म्हणून नोकरी मिळाली. तार ऑफिसात तारा पोहोचवण्याचे काम इमानेइतबारे विठ्ठल उमप करू लागले. सायकलवरून जाता–येता विठ्ठल उमप यांचं गाणं गुणगुणणं सुरूच होत, गाणं गाणं, ऐकणं हा त्यांचा नित्याचा छंद होऊन बसला होता. त्याच वर्षी विठ्ठल उमप यांच्या पत्नीला मुलगा झाला.

विठ्ठल उमप रात्रपाळीला असताना परळ, परळगाव, महालक्ष्मी, वरळी, काळाचौकी, पेडर रोड मलबार हिल अशा अनेक ठिकाणी तारा घेऊन जात असत. त्याचबरोबर तारेच्या पत्त्याबरोबर गाण्याची मैफल कुठे सापडते का ते नेहमी शोधत असत. त्याकाळी कुठे ना कुठे सत्यनारायणाच्या पूजा होत असत. पूजेला भजनाचे कार्यक्रम हमखास आसायचे, त्या ठिकाणी विठ्ठल उमप जाऊन सांगत, 'मला एकदोन भजन म्हणण्याची संधी द्या'. त्यांना संधी मिळाल्यावर विठ्ठल उमप भजन सादर करत असत. विठ्ठल उमप यांना अगोदरपासूनच कव्वालीचा छंद होता, कव्वालीच्या वेडापायी ते दोन–दोन दिवस घरी जात नसत. इस्माईल आजाद, जानीबाबू, अब्दुलरौबचाऊस अशा अनेक नामवंतांच्या कव्वाली कार्यक्रमाला विठ्ठल उमप उपस्थित राहून त्यांच्या कव्वाल्या ते घरी येऊन पाठ करत. त्यासोबत अभंग, भावगीत मोठ्या ठसक्यात ते म्हणत.

तार ऑफिसात शंकर किसन जाधव (निघोजकर) यांच्याशी विठ्ठल उमप यांचा परिचय झाला. ते नाट्यदिग्दर्शक होते. त्यांनाही गझल गायनाची भारी आवड होती. त्यांच्यासोबत विठ्ठल उमप हे गझल गायनाचे कार्यक्रम करत असत. शंकर जाधवांनी नायगावला विजय नाट्य मंडळाची स्थापना केली. नाटककार विष्णू शंकर जोशी यांच्या 'हरहर महादेव' या नाटकातून त्यांनी विठ्ठल उमप व शंकर जाधव यांना प्रसिद्धी मिळवून दिली. त्यानंतर 'जिंजीहून सुटका' हा खेळ त्यांनी बसवला. जिंजीहून सुटका हा नाटकाचा प्रयोग विठ्ठल उमप हे करत असताना, या नाटकाच्या शेवटच्या अंकात नाटकाचा हिरो विठ्ठल उमप आपल्या जखमी अवस्थेत

असलेल्या सखीला हातावर घेऊन येतो हे दृश्य पाहून विठ्ठल उमप यांच्या धाकट्या बहिणीला हसू अवरेना. ती हसता हसता गतप्राण झाली. ही दुःखद वार्ता कोणीतरी विठ्ठल उमप यांना विंगेत येऊन सांगितली. हे सत्यनाट्य बाजूला ठेवून खोट्या नाटकासाठी बहिणीच दुःख बाजूला ठेवून रसिकांना शेवटपर्यंत विठ्ठल उमप यांनी आनंद दिला.

विठ्ठल उमप यांच्या नायगावच्या खोलीशेजारी कवी गोपाळ कर्डकांच्या कव्वाली पार्टीमध्ये विठ्ठल उमप हे सहाय्यक म्हणून गात असत. नंतर गोपाळ कर्डक पार्टीतून विठ्ठल उमप यांनी वेगळेपण घेतलं व स्वतःची पार्टी तयार केली. 'रमेश गायन पार्टी' हे नाव विठ्ठल उमप यांनी त्यांच्या पार्टीला जाहीर केले.

कामाठीपुऱ्यातल्या अबचितपाड्याच्या दीडगल्लीत विठ्ठल उमप यांनी कव्वालीचा पहिला सामना जिंकला. त्यानंतर हजारो कव्वाली सामन्यात विठ्ठल उमप यांनी रंगबाजी केली.

कव्वालीच्या कार्यक्रमात गीताची कल्पना विस्ताराने सांगण्याच कसब विठ्ठल उमप यांना जमलं. तो कव्वाल क्षेत्रातील त्यांचा पहिला प्रयोग होता. विठ्ठल उमप यांच्या कलाजीवनात ते आधीपासून लोकगीत गात होते, पण पुढे पुढे काव्यगायनातला 'मुक्तछंद' हा काव्यप्रकारही कव्वालीमध्ये त्यांनी प्रथमच आणला.

विठ्ठल उमप यांना एक नामी संधी मिळाली. तार ऑफिसच्या गॅदरिंगला रामचंद्र दत्तात्रय काटदरे नावाच्या कारकुनाने तार ऑफिसचा पोवाडा लिहिला होता, तो विठ्ठल उमपांनी प्रस्तुत केला. तो त्यांच्या जीवनातला पहिला पोवाडा होता. पोस्ट आणि तार खात्याच्या दरवर्षी होणाऱ्या लोकगीत स्पर्धेत विठ्ठल उमप नेहमी भाग घेत असत. प्रतिवर्षी विठ्ठल उमप यांचा पहिला क्रमांक ठरलेला असे.



लोकगीत स्पर्धांसाठी कल्याणजी–आनंदजी, बुलोसीरानी, नौशासाहेब, शकील बदायुनी, जे. के. बॅनर्जी (काकजी), राजा बढे, सुधीर फडके अशी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

लोकगीत स्पर्धेची अंतिम फेरी वेगवेगळ्या प्रांतात असायची. अशावेळी विठ्ठल उमप हे हिंदी लोकगीत सादर करायचे. तिथे विठ्ठल उमप यांच्या मेहनतीने आणि थोरा–मोठ्यांच्या आशीर्वादाने त्यांना यशच मिळाले. सतत पाच वेळा भारतात विठ्ठल उमप यांनी पहिला क्रमांक यशस्वीरित्या मिळवला.




एकदा कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आकाशवाणीवर नायगावच्या कामगारांचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमात विठ्ठल उमप चाळीतल्या कांबळे मास्तर (जॉबर) यांनी विठ्ठल उमप यांना गायनाची संधी दिली. कामगार मंडळाच्या सौजन्याने कांबळे मास्तर यांच्या सहकार्याने विठ्ठल उमप आकाशवाणीवर प्रथमच गायले. नंतर रितसर आकाशवाणीवर लोकगीतांची परीक्षा विठ्ठल उमप पास झाले. सन १९५३ साली विठ्ठल उमप यांना पंधरा रुपये मानधन आकाशवाणीवर गाण्यासाठी मिळत असे. मुंबई आकाशवाणी पुणे, जळगाव, नागपूर येथे होणाऱ्या संगीत संमेलन कार्यक्रमासाठी विठ्ठल उमप यांना आकाशवाणीने पाठवलं.

विठ्ठल उमप यांचे वडील शरीराने अतिशय थकले तरी त्यांच्या वडिलांचं दारू आणि ताडी पिणं मात्र यथासांग चालूच होतं. पहिल्या मुलानंतर तब्बल चार वर्ष विठ्ठल उमप यांना मूल होत नव्हतं. विठ्ठल उमप यांना हे फार जिव्हारी लागत होतं. कारण त्यांच्या वडिलांना नात हवी होती. मुंबईतल्या जवळपास सर्वच इस्पितळात त्यांच्या बायकोने आणि विठ्ठल उमप यांनी तपासणी करून घेतली, पण काही फायदा झाला नाही.

सण १९६१ च्या एप्रिल महिन्यात सेंट जॉर्ज इस्पितळाच्या कामगार आवारात विठ्ठल उमप यांचा कार्यक्रम झाला. यात कर्मधर्मसंयोगाने तिथे त्यांची एका तरुणीशी ओळख झाली. ओळखीचं प्रेमात रुपांतर झालं आणि विठ्ठल उमप यांनी पुढे जाऊन ती तरुणी कविता हिच्याशी विवाह केला. त्यांनी दुसऱ्या लग्नासंबंधी त्यांची पहिली पत्नी संगीता हिला सर्व काही समजावून सांगितले. तिला हे मनोमन पटले स्वखुशीने तिने सही दिली आणि कायद्यानुसार विठ्ठल उमप यांचं दुसरे लग्न पार पडलं. पहिल्या बायकोला एका मुलानंतर मूल होणे शक्य नव्हते. त्यांच्या वडिलांना मात्र नात हवी होती. १९६२ साली विठ्ठल उमप हे दोन बायकांचे धनी झाले. विशेष म्हणजे त्यांच्या घराण्यात प्रत्येकाला दोन बायका होत्या. या दोन बायकांमध्ये भांडण कधी झाले नाही. कारण विठ्ठल उमप यांची पहिली बायको अडाणी तर दुसरी मॅट्रिकपर्यंत शिकलेली. पुढे दुसऱ्या बायकोला मुलगी झाली. विठ्ठल उमप यांच्या वडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

सात वर्षाच्या अथक प्रयत्नानंतर एक दिवस उजाडला. १९६२ साली कवी शांताराम पाटलांनी लिहिलेल्या 'आला नवा महाराष्ट्र' या गीताच रेकॉर्डिंग एचएमव्हीच्या रेकॉर्डिंग स्टुडिओमध्ये झालं. महाराष्ट्रभूषणाचं, शाहिरी परंपरेला साजेसं गीत विठ्ठल उमप यांना तेथे गायला मिळालं.

त्याच वर्षी स्वरचित विठ्ठल उमप यांच्या आवाजातलं 'ये दादा आवार ये' हे कोळीगीत रेकॉर्ड झालं. हे महाराष्ट्रातलं पहिलं रेकॉर्ड झालेलं कोळीगीत. विठ्ठल उमप त्यांच्या कार्यक्रमात हे कोळीगीत जर गायले नाहीतर तर रसिकांचं समाधान होत नाही. मुंबईपासून पालघर–मुरबाडपर्यंत प्रत्येक कोळीवाड्यात अनेकदा विठ्ठल उमप यांचे कार्यक्रम झाले. कोळीबंधूंनी या कोळीगीताचे कौतुक केलं, अत्यानंदाने विठ्ठल उमप यांच्यावर नोटांची उधळण केली.


A LEADGENT SINGER LATA MANGESHKAR (DIDI)
WITH LOKSHAHIR VITHHAL UMAP & HIS GROUP

सन १९६३ साली संत तुकाराम महाराजांच्या 'फू बाई फू' या भारुडाने विठ्ठल उमप यांना नावारूपाला आणलं. मराठी माणसांच्या घराघरात पोहोचलं. १९६७ साली विठ्ठल उमप यांचे वडील वारले. विठ्ठल उमप हे पोरके झाले. १९७५ सालात विठ्ठल उमप कन्नमवार नगर, विक्रोळी येथे राहायला आले. तेथे त्यांची ज्येष्ठ पत्रकार काकासाहेब पुरंदरे यांच्याशी ओळख झाली.

सन १९७७ ला पहिल्या प्रयोगासाठी श्रीनिवास खळे, स्वरसम्राज्ञी लतादिदी अशी दिग्गज मंडळी उपस्थित होती. जेव्हा 'फू बाई फू' भारुड विठ्ठल उमप यांनी सादर केलं तेव्हा लतादीदी पोट धरून हसत होत्या. अशोकजी परांजपे यांनी विठ्ठल उमप यांचं काम पाहून त्यांना आय.एन.टी. त प्रवेश दिला. आयटीच्या त्यांनी लिहिलेल्या 'अबक दुबक तिबक' या नाटकात विठ्ठल उमप काम करू लागले.

१९८९ सालामध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'अपना उत्सव' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर महाराष्ट्रातले आजी–माजी एकूण एक शाहीर व लोककलाकार तेथे उपस्थित होते. त्यात शास्त्रीय गानपंडित, श्रेष्ठ वादनकार, लोककलाकार व शाहीर म्हणून शाहीर साबळे यांचा समावेश होता. ठरल्याप्रमाणे राजीव गांधींच्या उपस्थितीत समाज कल्याण मंत्री श्रीमती माननीय प्रभा राव यांच्या हस्ते २०

कलाकारांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये विठ्ठल उमप यांचाही सत्कार करण्यात आला.

पोटाची खळगी भरण्याकरता एकदा विठ्ठल उमप यांनी मित्राच्या सांगण्यावरून, लोकांचे ज्योतिष्य सांगायला देखील सुरुवात केली. सतत गायनाचे कार्यक्रम होत असल्यामुळे शेवटी गाण्याकरता विठ्ठल उमप यांनी पोस्ट आणि तार खात्याच्या नोकरीला रामराम ठोकला.

पुढे विठ्ठल उमप यांना कार्यक्रम मिळेनासे झाले. त्यांची फारच आबाळ होऊ लागली. कार्यक्रम होत नसत आणि पोटापाण्याची खळगी भरण्याकरता पैसातर हवाच होता. मग त्यांचे मित्र वाघमारे आणि बेडेकर यांनी त्यांना सल्ला दिला की, दादा तुम्ही वहिनीला सांगून खानावळ चालू करा. माणसं आम्ही घेऊन येतो. आमच्याबरोबर बाकीच्यांची पण जेवणाची सोय होईल. मग फार विचार करून विठ्ठल उमप यांनी त्यांच्या दुसऱ्या पत्नीला विचारात घेऊन बी.डी.डी. चाळीत खानावळ सुरू केली. बघता बघता खानावळीत जम बसला आणि त्यांच्या दुसऱ्या बायकोच्या हाताची चव सर्वांना आवडली. पाहता पाहता खानावळीत जास्त लोक येऊ लागली. तसेच त्यांना पुढे कार्यक्रमही मिळू लागले. विठ्ठल उमप यांची पहिली बायको संगीता व दुसरी बायको कविता यांना सांभाळून घरखर्च भागवून त्यांच्या पहिल्या बायकोच्या मुलालाही विठ्ठल उमप पैसे देत होते. पुढे विठ्ठल उमप यांना त्यांच्या दुसऱ्या बायकोकडून ६ मुलं झाली.

'आई भिमाई' हा विठ्ठल उमप यांचा गीतसंग्रह विलास वाघ यांनी त्यांना आपणहून छापून दिला आणि पहिल्यांदा पुस्तक रूपानं विठ्ठल उमप यांना प्रकाशात आणलं. नंतरही विलास वाघ यांनी 'रंग शायरीचे' हे विठ्ठल उमप यांचे दुसरे पुस्तक देखील छापून दिले.

१ मे, १९८३ मध्ये परदेशी जाण्यासाठी सहार विमानतळावरून उमप यांच्या विमानाने झेप घेतली आणि दुसऱ्या दिवशी कॉर्कच्या सिटी हॉलमध्ये सादर होत असलेल्या लोकगीत–लोकनृत्याचा कार्यक्रमात अमेरिका, कॉर्क, पॅलेस्टाईन, भारत, अशा अनेक राष्ट्रांनी आपल्या मातृभाषेत आपल्या लोकसंस्कृतीचा कार्यक्रम सादर केला. विठ्ठल उमप यांच्या कार्यक्रमात गण, गवळण, भारुड, तुंबडी, कोळी अशा विविध मराठी मायबोलीच्या, भारतीय संस्कृतीच्या गीतांचा समावेश होता. प्रथम अशोकजी परांजपे हे प्रत्येक गीतासाठी इंग्रजीमध्ये निवेदन लिहून देत आणि तिथला निवेदक ते समोरील श्रोत्यांना वाचून दाखवी. मगच विठ्ठल उमप यांच्या कार्यक्रमाला सुरुवात होई. जोरदार टाळ्यांच्या आवाजात प्रत्येक गाणं संपे. विशेष म्हणजे 'फू

बाई फू' हे भारुड तेथे अत्यंत गाजलेलं. प्रत्येक गीताला व संपूर्ण टीमच्या नृत्याला भरभरून दाद मिळे. कारण भारताच प्रतिनिधित्व करणारे फक्त पाच कलाकार तिथे गेले. त्यात चंद्रकांत शेट्टीला मारून मुटकून टाळ्या वाजवण्यासाठी विठ्ठल उमप यांनी उभे केले होते. म्हणजेच भारताचे एकूण सहा कलाकार तर प्रत्येक देशाचे अडीचशे कलाकार. भारताच्या फक्त सहा कलाकारांनी तिथे निकराची झुंज दिली. कोळी गीत, वाघ्या–मुरळी, पोवाडा, फूबाईफू, इत्यादीचे सादरीकरण करून परदेशात वाहवा मिळवली. भारताचा झेंडा परदेशात उंचावला.

शेवटच्या दिवशी पारितोषिक वितरण सोहळ्यात कॉर्कच्या लोककला समितीने सर्वांचे आभार मानले. प्रत्येक राष्ट्राला पदक प्रदान केले. भारताचा प्रतिनिधी व्ही. जी. उमप इंडिया असा पुकारा झाला आणि कॉर्कच्या जॉन मॉन्टेग्यू या मेयरच्या हस्ते विठ्ठल उमप यांना मानचिन्ह देऊन गौरवण्यात आलं. विठ्ठल उमप यांनी आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले व २५ राष्ट्रांमधून भारत देशाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून दिले. सर्व राष्ट्रांनी भारतात खूप कौतुक केलं. प्रचंड कौतुक विठ्ठल उमप यांच देखील झालं. भारतीय लोककलेचा प्रदेशात झेंडा फडकवला तो अस्सल मराठमोळ्या लोकनृत्यानं–लोकगीतानं.

आय. एन. टी. च्या लोककला विभागाने केलेल्या नाटकातून काम करताकरता धंदेवाईक नाट्य क्षेत्राला विठ्ठल उमप यांची ओळख झाली. मुजरा घ्या सरकार, गुण्यागोविंदानं, बुद्धम्–सरणम्, अशा अनेक नाटकांतून विठ्ठल उमप हे काम करू लागले. दिनानाथ रेडकर लिखित 'हैदोस' नाटकात विठ्ठल उमप यांना काम मिळाले.

अरुण सरनाईक, मोहन कोठीवान, मधू कडू, राजन महाडिक, अशोक इंदुलकर, साधना पालांडे, रूही, सीमा ठाकूर, ज्योती शेवडे अशा मोठ्या कलाकारांन सोबत विठ्ठल उमप हे मारुतीबाबांची भूमिका करत. हैदोसनं मुंबईकरांना आनंद देता देता बाहेरगावच्या रसिकांनाही भारावून टाकलं.

'जांभूळ आख्यान' हे लोक महाभारत हा राजारामभाऊ कदम यांचा हातखंडा असलेला गोंधळाचा खेळ आय.एन.टी.ने स्वतः करण्याचं ठरवलं. सुरेश चिखले यांनी जुना बाज तसाच ठेवून ते नाट्यरूपात लिहिलं. या लोकधर्मी–लोकविधी नाटकाला अजित भगत हे दिग्दर्शक लाभले. तसेच हरहुन्नरी लोकसंगीताचे अभ्यासू अच्युत ठाकूर यांनी संगीताची बाजू सांभाळली. विठ्ठल उमप सूत्रसंचालन आणि द्रोपदी या दोन्ही भूमिका कराव्यात असं ठरलं. या नाटकर्ची या

दोन्ही भूमिका करणं हे विठ्ठल उमप यांच्यासाठी एक आव्हानच होतं. राजारामभाऊंसारखा अभिनय विठ्ठल उमप हे करतील का? पण विठ्ठल उमप यांनी होकार कळवला.

विठ्ठल उमप यांचा जांभूळ आख्यानाचा पहिला प्रयोग बाजी मारून गेला. दिवसेंदिवस खेळात रंगत वाढत होती. जांभूळ आख्यानाची खूपच मान्यवरांनी स्तुती, कौतुक केले. विठ्ठल उमप यांचा अभिनय सर्वांनीच डोक्यावरती घेतला.

विठ्ठल उमप जांभूळआख्यान या नाट्यात सूत्रसंचालन व द्रौपदीचे पात्र करताना डोईवर मोठी गोंधळी पगडी, गळ्यात कवड्याची माळ, कपाळावर कुंकवाचा मळवट, अंगावर ४३६वारचा पायघोळ अंगरखा, कमरेला कमरबंद, गळ्यात गुडघ्यापर्यंत सोडलेला पंचपात चाळ अशा पेहरावात विठ्ठल उमप सूत्रधारचे काम करीत असताना, क्षणात द्रौपदीची भूमिका करीत असत. नाटक संपल्यावर अनेक रसिकांनी त्यांच्या कामाचे प्रचंड कौतुक केले. जांभूळ आख्यानाचे असंख्य प्रयोग संपूर्ण भारतभर झाले.



विठ्ठल उमप हे उत्तम प्रकारचे लोकशाहीर तर आहेतच, पण त्याचबरोबर ते नायक, गायक व गीतकारदेखील आहेत. त्याचप्रमाणे कव्वाली, आंबेडकरी गीतांचा जलसा, कोळीगीते, लोकगीते, भारूड, भजन, गण–गवळण, लावणी, कवने, तुंबडी, बोबडी गवळण, धनगरी गीते, नंदीबैल, वासुदेव, पोतराज, डोंबारी, गोंधळी अशी अस्सल मराठमोळी गीते ते गात, ती गीते ते लिहित आणि त्यांच्या अभिनयातून ते ती अजरामर करत.

त्यांनी आतापर्यंत एक हजारापेक्षा जास्त गीते ध्वनिमुद्रित केली आहेत. जवळपास ४५ वर्षे ते आकाशवाणीवर गायले. त्यांनी दहा चित्रपटांमध्येही काम केले. ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरचा चित्रपट, 'टिंग्या' आणि 'विहीर' या चित्रपटांचा समावेश आहे. त्यांनी नेहमी त्यांच्या कलेद्वारे समाजशील संदेश देण्याचा प्रयत्न केला. 'अबक, दुबक, तिबक', 'अरे संसार संसार', 'खंडोबाचं लगीन' आणि 'जांभूळ आख्यान' ही त्यांची काही अविस्मरणीय नाटके आहेत.

त्यांचे 'फू बाई फू' जीवनचरित्र पुस्तक रूपाने लोकांसमोर आले. 'माझी वाणी भीमाचरणी' व 'रंग शाहिरीचे' ही पुस्तके त्यांनी काढली.



दि.२८ सप्टेंबर २०१० रोजी दिल्ली येथे महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते संगीत नाटक अकादमी पुरस्कार २००९ स्वीकारताना...

विठ्ठल उमप यांचा २६ नोव्हेंबर,२०१० मध्ये नागपूर येथे 'लॉर्ड बुद्धा' या दूरचित्रवाहिनीच्या उद्घाटन प्रसंगी जमलेल्या विराट जनसमुदायासामोरच मृत्यू झाला. विशेष म्हणजे ते त्यावेळी ही तेथे लोककलाप्रकारच सादर करण्यासाठी गेले होते. असे सर्वगुणसंपन्न कलाकार विठ्ठल उमप हे त्यांचा अमूल्य ठेवा रसिकजनांसाठी मागे ठेवून २६ नोव्हेंबर, २०१० रोजी आपल्यातून कायमचे निघून गेले.

३.६.२ विठ्ठल उमप यांची भेट

२६ मे,२००३ रोजी संशोधक याने लोकशाहीर विठ्ठल उमप यांचा पहिला कार्यक्रम मुलुंडला 'कला जत्रा' महोत्सवात पाहिला. त्यांचा हा कार्यक्रम पुरुषोत्तम बेर्डे आणि मुलुंडच्या काही कलाकार मंडळींनी ठेवला होता. त्यावेळेस वेगवेगळे लोककलाकार त्यांनी मुलुंडच्या पूर्वेला बोलवले होते. विठ्ठल उमप यांचा पोवाडा सादरीकरणाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. फारच सुरेख पद्धतीने,पहाडी आवाजात विठ्ठल उमप यांनी त्यांचे पोवाडे प्रस्तुत केले. सादरीकरण झाल्यानंतर विठ्ठल उमप तेथेच थांबले होते. कारण त्यानंतर राजूबाबा शेख यांचा घागर नृत्याचा कार्यक्रम तेथे होता. तो संपूर्ण कार्यक्रम देखील विठ्ठल उमप यांनी पाहिला. कार्यक्रम संपल्यावर विठ्ठल उमप हे राजूबाबा शेख यांना भेटायला गेले. राजूबाबा शेख यांच्या गळ्यात पडून विठ्ठल उमप यांनी राजूबाबा शेख यांची स्तुती केली. नंतर ते संशोधकाकडून फोटो काढून घेण्यासाठी उभे राहिले. दोन महान कलाकारांचा एकत्र असा फोटो त्याला तेव्हा मिळाला.



२ ऑक्टोबर, २००५ रोजी विक्रोळी येथील, विकास हायस्कूलमध्ये विठ्ठल उमप यांचा 'जांभूळ आख्यानाच्या' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तो तेथे पोहोचला त्यावेळेस त्या कार्यक्रमातील सर्व कलाकारांची तयारी सुरू होती. प्रत्येकजण आपापला पेहराव परिधान करत होते. एका कोपऱ्यामध्ये विठ्ठल उमप हे त्यांचा मुलगा नंदेश उमप याला फेटा बांधत होते. फेटा बांधण्याचा एक वेगळा फोटो त्याला तिथे मिळाला. खूप मोठ्या अर्थाचा फोटो आहे हा. ही कला एका पिढीकडून दुसऱ्या जनरेशनकडे घेऊन जात आहे, असा त्यामधून बोध होतो.



पुढे नंदेशनेही ते सार्थ करून दाखवलं. कारण आता नंदेश स्वतः 'जांभूळ आख्यान' मधून द्रौपदीची भूमिका करतो आहे. या कार्यक्रमांमध्ये सर्व तयारी करून विठ्ठल उमप रंगमंचावर आले. त्यांनी द्रोपदीचे सादरीकरण केले तसेच निवेदन देखील केलं. वेगवेगळ्या भावमुद्रा जांभूळ आख्यानांमधून साकारल्या गेल्या आणि त्या त्याच्या कॅमेरात बंदिस्त झाल्या.



८ ऑक्टोबर, २००५ला कालिदास मंदिर मुलुंड येथे तो हा विठ्ठल उमप यांचा जांभूळ आख्यानाचा कार्यक्रम पाहायला गेलो, तेथे तो त्यांच्या ड्रेसिंग रूममध्ये गेलो. त्यावेळेस विठ्ठल उमप यांनी त्यांचा पूर्ण पेहराव परिधान केला होता आणि ते इतर कलाकारांसोबत गप्पा मारत बसले होते. मध्येच कोणी एकाने विठ्ठल उमप यांना एनर्जी हे शीतपेय आणून दिलं. विठ्ठल उमप हे ती एनर्जी पिऊ लागले.



दिनांक ४ डिसेंबर, २००५ रोजी तो विठ्ठल उमप यांच्या घरी गेला. त्यावेळेस ते विक्रोळी कन्नमवार नगर येथे राहत होते. त्याने विठ्ठल उमप यांच्याशी बऱ्याच गप्पा मारल्या. त्यानंतर विठ्ठल उमप हे त्यांच्या नातीबरोबर खेळतानाचे काही फोटो त्याने काढले.




विठ्ठल उमप हे त्यांच्या घराबाहेर आले. त्यांच्या घराच्या बाजूला मुलं क्रिकेट खेळत होती. तिथे जाऊन त्यांनी क्रिकेटची बॅट हातात घेतली आणि मुलांमधील एक होऊन क्रिकेट खेळायला लागले.



नंतर पुन्हा विठ्ठल उमप हे त्यांच्या घरामध्ये गेले. त्यावेळेस त्यांना कोणाचा तरी फोन आला होता आणि ते फोनवर कार्यक्रमाची तारीख पक्की करत होते.



२४ डिसेंबर, २००५ रोजी एमआयजी कॉलनी, बांद्रा येथे विठ्ठल उमप यांचा लोककलेचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. तेथे संशोधक त्यांच्या सोबत पोहोचला. कार्यक्रम सुरु व्हायला वेळ होता. विठ्ठल उमप यांनी स्वतःची तयारी केली. नंतर विठ्ठल उमप स्टेजच्या मागे फेटा घालून उभे राहिले व स्टेजवर सुरु असलेला स्वागत समारंभाचा कार्यक्रम पाहू लागले.



स्वागत समारंभ संपल्यानंतर पुन्हा विठ्ठल उमप रंगमंचावर गेले आणि त्यांनी शिवाजी महाराजांचा सांगावा, बहिर्जी नाईक कसे सांकेतिक भाषेत सांगतात 'लग्नाला चला आता लग्नाला चला लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला' हा कला अविष्कार सादर केला.



पुढे एक वर्षानंतर ५ मार्च, २००६ रोजी विठ्ठल उमप यांनी जांभूळ आख्यान स्टुडिओ रेकॉर्डिंगद्वारे व्हीसीडीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्याचे ठरवले. त्याकरता एच.एम.व्ही. या कंपनीच्या माध्यमातून त्यांचं रेकॉर्डिंग वरळीला प्रभादेवीच्या एका स्टुडिओमध्ये सुरू झालं. सकाळी आठ वाजल्यापासून पुढील दोन दिवस तिथे रेकॉर्डिंग सुरू होतं. ते सर्व प्रकार चित्रीत करण्याकरता तो तिथे गेला. तेथे विठ्ठल उमप यांच्या वेगवेगळ्या भावमुद्रा त्याने छायाचित्रणाद्वारे टिपल्या.





रोहिणी हट्टंगडी व त्यांचे पती यांची 'कला आश्रय' ही संघटना आहे. ह्या संघटनेद्वारे एक आगळा-वेगळा कव्वालीचा कार्यक्रम २८ मे, रोजी आयोजित करण्यात आला होता. त्या कव्वालीच्या कार्यक्रमाची संपूर्ण आखणी ही विठ्ठल उमप यांनी केली होती. खूपच वर्षानंतर रसिक प्रेक्षकांना कव्वालीचा आस्वाद घ्यायची संधी मिळणार होती. तो कार्यक्रम दादरच्या यशवंतराव नाट्यगृहात ठेवण्यात आला होता. तेथे विठ्ठल उमप यांनी वेगवेगळ्या कव्वाल्या सादर केल्या. अप्रतिम पेहराव करून त्यांनी ह्या कार्यक्रमाच्या सादरीकरणाला सुरुवात केली. डोक्यामध्ये मखमली टोपी आणि जॅकेट घालून त्यांनी हा वेगळा कार्यक्रम सादर केला.



तो कार्यक्रम संपल्यानंतर रोहिणी हट्टंगडी व त्यांचे पती फारच खूष झाले. आनंदाच्या भरात ते विठ्ठल उमप यांना जाऊन भेटले आणि उमप यांना मिठी मारली.




त्या कार्यक्रमाला डॉली ठाकूर, सुलभा देशपांडे अशी फारच मान्यवर मंडळी आली होती. ते सर्व विठ्ठल उमप यांना भेटले.





अशा पद्धतीने खूप दिग्गज कलाकारांनी आणि समोरील रसिकांनी विठ्ठल उमप यांच्या कलेता एक वेगळा आविष्कार अनुभवला.

३ जून, २००६ रोजी 'जांभूळ आख्यानाचा' १००वा प्रयोग दादरच्या रवींद्र नाट्य मंदिरात होता. त्यावेळेस तेथे अनिल गेटले यांनी विठ्ठल उमप यांची फारच छान रांगोळी काढली होती. त्या रांगोळीमधून द्रौपदीची भूमिका साकारणारे विठ्ठल उमप हे हुबेहूब दिसत होते.



त्या कार्यक्रमांमध्ये वेगवेगळे मान्यवर जांभूळ आख्यानाचा शंभरावा प्रयोग पाहण्यासाठी तेथे आले होते. ज्यावेळेस मध्यांतर झाला त्यावेळेस सयाजी शिंदे हे मेकअप रूममध्ये आले आणि त्यांनी विठ्ठल उमप यांना घट्ट मिठी मारली. ते विठ्ठल उमप यांची स्तुती करू लागले. त्यांच्या सोबत त्यांची पत्नी देखील तेथे आली होती. त्यांची ओळख त्यांनी विठ्ठल उमप यांना करून दिली. दोन महान कलावंतांच्या भावमुद्रा आणि गळाभेट त्याच्या कॅमेरात कैद केली.



नंतर थोड्याच वेळाने तेथे क्रिकेटपटू अजित वाडेकर हे देखील आले. त्यांनी विठ्ठल उमप यांची स्तुती केली आणि अभिनय फारच छान झाला असे सांगितले. त्यांनी विठ्ठल उमप यांना हात मिळवला.



त्या नंतर अजय फणसेकर हे दिग्दर्शक तेथे आले. त्यांनी विठ्ठल उमप त्यांना घट्ट मिठी मारली आणि त्यांच्या अभिनयाची स्तुती केली. असे फारच दिग्गज मंडळी जांभूळ आख्यानाच्या शंभराव्या प्रयोगादरम्यान विठ्ठल उमप यांना भेटली.



२३ जून,२००६ रोजी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठामध्ये लोककला महोत्सव होता. तेथे विठ्ठल उमप यांच पोवाड्याचं सादरीकरण होतं. लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या सोबत संशोधक हा कोल्हापूरला गेला. विठ्ठल उमप यांनी तेथे दोन पोवाडे प्रस्तुत केले. तेथे त्यांच्यासोबत राहण्याची संधी त्याला मिळाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी जगदीश खेबुडकर, सुलोचना चव्हाण, विठ्ठल उमप हे तीन दिग्गज एकत्र भेटले. ते एकत्र 'कला' या विषयावर गप्पा मारू लागले. त्यावेळेस त्या तिघांचा एकत्र असा फोटो त्याने काढला.



१५ जुलै, २००६ ला विठ्ठल उमप यांचा लोककला गीतांचा कार्यक्रम दादरच्या रवींद्र नाट्य मंदिरात ठेवण्यात आला होता. तेथे अनिल गेटले या रांगोळी कलाकाराने दुसऱ्यांदा फार छान रांगोळी काढली होती. ज्यामध्ये विठ्ठल उमप हे कव्वालीच्या सादरीकरणाच्या ड्रेसमध्ये होते. त्याने त्या रांगोळी सोबत विठ्ठल उमप यांचा फोटो काढला.



त्याच दिवशी विठ्ठल उमप यांचा वाढदिवस देखील होता. त्यावेळेस मध्यंतरामध्ये विठ्ठल उमप यांनी 'फूबाईफू' हे त्याचं आत्मचरित्र बऱ्याच मान्यवरांना भेट दिले. ते त्यांच्या फूबाईफू वर स्वाक्षरी करत आहेत असा एक फोटो त्याने काढला.



४ फेब्रुवारी, २००७ रोजी विठ्ठल उमप यांच्या संपूर्ण परिवाराचा फोटो त्याने मुलुंडला काढला. १२ जून, २००७ ला विठ्ठल उमप यांचा ७७वा वाढदिवस त्यांच्या सर्व परिवाराने साजरा करायचे ठरवले. त्यासोबत त्यांच्या पत्नीचाही वाढदिवस त्याच दिवशी होता. त्या अनुषंगाने रवींद्र नाट्य मंदिर येथे विठ्ठल उमप यांचा लोककलेचा कार्यक्रम ठेवण्यात आला. त्या कार्यक्रमासाठी ज्योती भास्कर श्री जयंत साळगावकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलविण्यात आले. त्याचबरोबर त्यांचे भाऊ जयराज साळगावकर आणि वेगवेगळ्या कला क्षेत्रातील मंडळींना देखील बोलवण्यात आले.



तेथे त्यांनी वेगवेगळ्या लोकगीतांवर त्यांचा कला अविष्कार सादर केला. कोळीगीते, भक्ती गीते, पोवाडा, शायरी, बोबडी गवळण अशी वेगवेगळी गाणी गाऊन–नाचून त्यांनी रसिकांना तृप्त केले. मध्यांतर झाल्यावरती विठ्ठल उमप यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळेस विठ्ठल उमप आणि त्यांच्या पत्नीला फार मोठा पुष्पहार एकत्ररित्या घालण्यात आला.



२८ जून, २००८ रोजी 'मी मराठी'या पहिल्या कार्यक्रमाचा प्रयोग रवींद्र नाट्य मंदिरला ठेवण्यात आला. हा कार्यक्रम विठ्ठल उमप यांचा मुलगा नंदेश उमप याने बसवला होता.



येथे त्यांनी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या लोककला प्रकारांवर सादरीकरण करून प्रेक्षकांना तृप्त केले.





साल २००८ रोजी संपूर्ण उमप परिवाराचा फोटो त्याने मुलुंड येथे काढला.

३.७ : घटकाभ्यास क्रमांक : ७

अंबुदेवी बुधगावकर

३.७.१ अंबुदेवी बुधगावकर यांचा जीवनप्रवास

शाहीर अंबुदेवी बुधगावकर ह्या लिंगायत कोष्टी समाजात २९ जून, १९३९ रोजी जन्मल्या. त्यांचा जन्म मुक्काम पोस्ट बुधगाव, तालुका मिरज, जिल्हा सांगली येथे झाला. अंबुदेवी यांचे शिक्षण इयत्ता दुसरी पर्यंत झाले होते. त्यांचे वडील कै. विरुपाक्ष विभूते जे भेदिक गायक (कलगी पक्ष) होते. त्या लिंगायत कोष्टी असल्यामुळे विणकाम करणे हाच त्यांचा पूर्वीपासूनचा व्यवसाय होता. अंबुदेवी यांचे आई-वडील हे दोघेही बुधगावच्या राजवाड्यात कामाला जात होते. त्यांनी शाहिरी कलेची परंपरा त्यांचे भाऊ शाहीर बापूराव विभूते यांच्याकडून घेतली. अंबुदेवी बुधगावकर यांचा धाकटा भाऊ जगन्नाथ विभूते याच्या साथीने त्यांनी मोठ्या भावाला बापूराव विभूते यांना साथ-संगत करायला सुरूवात केली. भावालाच अंबुदेवींनी त्यांचा गुरू मानले पण कधी गंडा बांधला नाही. त्या शाहिरीची कला पाहून पाहूनच शिकल्या. गुरू असा त्यांनी केला नाही. वयाच्या आठ वर्षांपासूनच अंबुदेवी बुधगावकर या शाहिरीचे कार्यक्रम करत आहेत.

अंबुदेवी यांचे मामा हातमाग चालवत होते ते अंबुदेवी यांना म्हणाले,''तू चांगला पोवाडा म्हण तुला मी खूप मोठे बक्षीस देईन.'' अंबुदेवी बुधगावकर म्हणाल्या, ''मामा काय देणार तुम्ही?'' ते म्हणाले, ''तुला दोन रुपये देतो.'' ते दोन रुपये देतो म्हणाले म्हणून अंबुदेवी यांनी पोवाडा गायला सुरूवात केली. दुसरे एक मामा त्यांना म्हणाले, ''मी आज अंबुदेवीला तीन रुपये देणार, तुला गायला फार आवडते का?'' अंबुदेवी बुधगावकर 'हो' म्हणाल्या. तेथूनच अंबुदेवी यांची हिंमत वाढत गेली व त्या पोवाडा सादर करू लागल्या. पुढे त्या स्वतःच्या कलापथकासोबत पोवाडे सादर करू लागल्या. त्यांच्या कला पथकामध्ये आठ ते दहा लोकांचा सहभाग होता.

लग्नाच्या अगोदर अंबुदेवी यांना फारच भीती वाटत होती. त्यांनी जर लग्न केले तर त्यांचे होणारे पती त्यांना ही कला पुढे अशीच सुरू ठेवायला देतील का? की देणार नाही? नाही दिली तर अंबुदेवी यांच्या शाहिरीचं व कलेचं काय होईल? त्या वेळेस त्यांच्या वडिलांनी

त्यांना फारच मोलाची साथ दिली. त्यांनी ठरवलं की, जो माझ्या मुलीची कला शेवटपर्यंत घेऊन जाईल. तिला कुठलीही बंधने न घालता लग्नानंतरही तिची शाहिरी पुढे घेऊन जाईल अशा व्यक्तीलाच मी माझी मुलगी देईन. त्यानंतर आबासाहेब बुधगावकर यांच्या सोबत अंबुदेवी यांचे लग्न झाले आणि त्या रडायला लागल्या. तेव्हा आबासाहेब म्हणाले, '' तू का रडते आहेस?, काय झाले?'' अंबुदेवी यांनी सांगितले की, '' मला माझी शाहिरी कला सोडायची नाही, लग्नानंतरही मला ही कला पुढे सुरूच ठेवायची आहे.'' आबासाहेब म्हणाले, ''ठेव पुढे सुरू पण या शाहिरीचा झेंडा तू शेवटपर्यंत फडकवला पाहिजे, तू मधूनच ही कला सोडायची नाही. ही कला शेवटपर्यंत जोपासली पाहिजे. शाहिरी डफ हातात घेतलास तर त्याचे चीज केले पाहिजे. त्यातूनच तुझा मोठेपणा वाढेल व तुझ्या बरोबरीने माझाही मोठेपणा वाढेल.'' तेव्हापासून अंबुदेवी बुधगावकर यांनी शाहिरीला जोमाने सुरूवात केली. आबासाहेब हे बुधगावच्या शाळेमध्ये नाईक म्हणून कामाला होते. त्यांनी तेथे ४० वर्ष नोकरी केली. ते हार्मोनियम देखील वाजवायचे. अंबुदेवी बुधगावकर यांनीही त्यांच्या पोवाड्याच्या सादरीकरणात बरेच बदल केले. लोकांच्या आवडी-निवडी ओळखून त्या पोवाडा सादर करत असत. आबासाहेब यांनी होकार दिला नसता तर अंबुदेवी बुधगावकर यांची कला लोकांपर्यंत पोहोचली नसती, ती कला बहरली नसती.

अंबुदेवी यांचा नगर तालुक्यातल्या भोशा या गावी पोवाड्याचा कार्यक्रम होता. तेथील कार्यक्रम संपल्यावर तू फारच छान पोवाडा म्हणतेस, असे अंबुदेवी यांना बापुराव विभूते म्हणाले. तेव्हा अंबुदेवी यांना फारच आनंद झाला.

१९७६-१९७७ साली अंबुदेवी यांना राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मिळाल्यानंतर अंबुदेवी यांना अधिकच स्फूर्ती मिळाली. नंतर त्यांनी राजस्थान, नागालँड येथे जाऊन तेथेही पोवाडा सादर केला.

नागपूरच्या शाहिरी दौऱ्यासाठी पोवाडा गाण्यासाठी ३००-४०० कलाकारांमधून अंबुदेवी यांची निवड केली गेली. त्या कार्यक्रमासाठी भारताचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी हे नागपूरला आले होते. तेथे अंबुदेवी त्यांना कार्यक्रम सादर करण्यासाठी फक्त सात मिनिटांची वेळ दिली गेली होती. सात मिनिटांत कसे सादरीकरण करायचे? असा प्रश्न अंबुदेवी यांना पडला, पण त्यांनी लगेच होकार दिला. अंबुदेवी 'झाशीची राणी' हा पोवाडा तेथे सादर करत

असताना दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी फारच भारावून गेले. त्यांच्याच सांगण्यावरून अंबुदेवी यांना आणखी पाच मिनिटाचा वेळ वाढवून देण्यात आला. दिवंगत राजीव गांधी तेव्हा स्टेजवरच बसले होते. पोवाडा संपल्यावर राजीव गांधींनी अंबुदेवी बुधगावकर यांना 'प्रती झाशीची राणी' ही पदवी दिली.

पुढे अंबुदेवी यांना ठराविक अंतराने ६ मुले व १ मुलगी झाली. लग्नानंतर काही वर्ष अंबुदेवी यांची खूप गरीब परिस्थिती होती. त्यांनी लोकांची भांडी घासली. लोकांकडून साड्या मागून आणून घातल्या. काही दिवस माग विणायला घरून चालत चालत त्या माधव नगरला कामासाठी जायच्या. तेथे त्या गरोदर असतानाही कामावर हजर व्हायच्या. घरचे सर्व काम आवरून दोन मुलांना बरोबर घेऊन त्या सकाळी साडेसातला माधव नगरला चालत जायच्या.

अंबुदेवी यांच्या सर्वात मोठ्या मुलाचे नाव दिलीप, दुसर्याचे नाव प्रकाश, तिसर्याचे नाव अशोक, चौथ्या मुलाचे नाव किशोर होते. पाचव्या मुलासोबत अंबुदेवी यांना दोनजुळी मुले झाली, त्यातला एक मुलगा जन्मताच स्वर्गवासी झाला व जो जगला त्याचे नाव राजेंद्र होते. त्या सर्वांच्या नंतर अंबुदेवी यांना १ मुलगी झाली तिचे नाव विजया ठेवण्यात आले. या सर्वांना अंबुदेवी यांनी चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले. सोबत कलाही शिकवली. पहिला मुलगा दिलीप हा पुढे सीमा शुल्क अधिकारी झाला. त्या सोबत तो छान पेटी देखील वाजवत असे. अंबुदेवी यांना तो त्यांच्या कार्यक्रमात साथ संगत करायचा. दुसरा मुलगा प्रकाश हा खाजगी दुधाच्या डेअरीवर कामाला जायचा. तो ढोलकी फारच छान वाजवत होता. तो ही आईला साथ संगत करत असे. तिसरा मुलगा अशोक हा रिक्षा चालवत होता, त्याचबरोबर तो झांज वाजवून आईला कार्यक्रमातून साथ संगत करायचा. चौथा मुलगा हा डॉक्टर होता, तो त्वचारोग तज्ज्ञ होता. तो ही अंबुदेवी यांच्यासोबत कार्यक्रम करायचा व झांज देखील वाजवायचा. नंतरचा राजेंद्र हा खासगी कपड्याच्या दुकानात कामाला होता. तो कोंगो फारच छान वाजवायचा. या सर्वांच्या नंतर विजया नावाची त्यांची मुलगी कलाशाखेतून पदवीधर झाली. ती आई बरोबर पोवाडे सादर करू लागली.

अंबुदेवी यांचे बरेच कार्यक्रम महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर देखील झाले. त्या त्यांचा पोवाड्याचा कार्यक्रम तीन तास सादर करत असत. सन १९८९ ला 'अपना उत्सवात' देखील अंबुदेवी यांनी त्यांच्या पोवाड्याचे सादरीकरण केले. त्यांनी आजवर किती कार्यक्रम केलेत हे

त्यांना सांगता येत नाही. अंबुदेवी यांना १८ जून, १९८७ रोजी महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार मिळाला. तसेच पुढे त्यांना १९९० साली एक लाख रुपयांचा 'महाराष्ट्र शासनाचा जीवन गौरव पुरस्कार' मिळाला. तेव्हा त्यांना शाहिरी कला शिकल्याचं चीज झाले असे वाटले. त्यापैशाचे त्यांनी मुलांना घराची जागा घेऊन दिली. अंबुदेवी यांनी आकाशवाणी व दूरदर्शनवर देखील त्यांच्या पोवाड्यांचे सादरीकरण केले.

पुढे तुळजापूरला अंबुदेवी त्यांचा कार्यक्रम झाला. तिथले नगराध्यक्ष सुरेश दत्ता पाटील यांनी त्यांना चांदीचा डफ बक्षिस म्हणून दिला. विशेष म्हणजे 'अंबाबाई' म्हणून पदवी दिली. तुळजापूरला महिनाभर अंबुदेवी यांचे कार्यक्रम झाले. तुळजापूरची अंबाबाई म्हणूनच अंबाबाई ही पदवी त्यांनी अंबुदेवींना दिली.

पुढे खूपच मोठे दुःख त्यांच्या वाट्याला आले. त्यांची पाचही मुले एक एक वर्षाच्या अंतराने मरण पावली व त्या मधल्या काळात त्यांचे पती देखील स्वर्गवासी झाले. सर्व होत्याचे नव्हते झाले. त्यांची दोन मुले तर दिवाळीतच वारली. अंबुदेवी बुधगावकर यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांनी खूपच हालाखीत दिवस काढले. शाहिरी कलेची अंबुदेवी यांना फार आवड होती. मुलगा जाऊन फक्त महिनाच झाला होता तरीही अंबुदेवी यांनी पोवाड्याचा कार्यक्रम सादर केला. तो फक्त कलेची आवड आहे म्हणूनच. आजही कला हा अंबुदेवी बुधगावकरांचा जीव की प्राण आहे. पुढे अंबुदेवी यांची परिस्थिती फारच दयनीय झाली. खूपच संघर्षमय जीवन त्यांना जगावे लागले. तरी त्यांनी हार मानली नाही. त्यांनी त्यांची मुलगी विजया हिला सोबत घेऊन शाहिरी कला सुरूच ठेवली. त्यांचे दुःख लपवून त्यांच्या कलेने त्या लोकांना हसवत राहिल्या. समाजाचे प्रबोधन त्या करतच राहिल्या. त्यांनी आयुष्यात पैसा नाही मिळवला पण माणसं मिळवली. वयाच्या ६५ व्या वर्षीही त्या स्वतःची कामे स्वतः करतात. संपूर्ण आयुष्यात त्या खूपच कमी वेळा डॉक्टरकडे गेल्या. या वयातही अंबुदेवी यांचे दात चांगले आहेत व नजर देखील चांगली आहे. अशा या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला शाहीर २९ ऑगस्ट, २००७ या दिवशी स्वर्गवासी झाल्या.

३.७.२ अंबुदेवी बुधगावकर यांची भेट

संशोधक दिनांक २१ नोव्हेंबर, २००५ रोजी सांगलीच्या बुधगाव येथे शाहीर अंबुदेवी बुधगावकर त्यांना भेटायला गेला. सकाळी आठ वाजता तो अंबुदेवी यांच्या घरी पोहचला. तेव्हा त्या चहा बिस्किट खात होत्या. त्याचं वय तेव्हा जवळपास ६६ वर्षाच असावे.



संशोधकाने त्यांच्यावर छायाचित्रणाच्या माध्यमातून काम करायला आलो आहे, असे त्यांना सांगितले. त्यांच्याशी तासभर गप्पा मारून, उद्या सकाळी पुन्हा लवकर येतो असे सांगितले. नंतर दुसऱ्या दिवशी सकाळी तो अगदी पहाटे म्हणजे सकाळी साडेसहा वाजता अंबुदेवींना भेटायला गेला. पाहतो तर काय त्या उठून आंघोळ करून देवाची पूजा करत होत्या. अंबुदेवी जेथे पूजा करत होत्या तेथे असंख्य देव-देवतांचे फोटो लावलेले होते. त्या प्रत्येक फोटो कापडाने पुसत होत्या आणि नंतर प्रत्यक फोटोला हळद कुंकू लावत होत्या. हे सर्व करून झाल्यावरती त्यांनी एकतास डोळेबंदकरून प्रार्थना देखील म्हटली. नंतर पुन्हा सर्वच फोटोंना नमस्कार केला. अंबुदेवी यांनी जवळपास दीड तास पूजा केली. हे सर्व त्याने त्याच्या कॅमेऱ्यात कैद केले. ते खालील प्रकाशचित्रामधूनच व्यक्त होऊ शकते असे त्याला वाटते.



अंबुदेवी यांची पूजा झाल्यावर त्यांनी त्याच्याशी गप्पा करायला सुरुवात केली. दोघांनी साधारण ४० मिनिटे गप्पा मारल्या नंतर त्या अचानक रडायला लागल्या. त्याने त्यांना विचारले 'काय झाले, का रडताय?' तेव्हा त्यांनी फारच दुःखद गोष्ट सांगितली. त्यांनी सांगितलं की, त्यांच्या पाच मुलांपैकी त्यांची चार मुले एका-एका वर्षाच्या अंतराने मरण पावली. ती मुले वेगवेगळ्या कारणाने मरण पावली. त्या सर्वांची लग्न झालेली होती आणि त्या प्रत्येकांना परिवार देखील होता. एवढी मोठी मुले एकामागोमाग एक अशी मागील चार वर्षात मरण पावली. हे सर्व सांगताना त्या स्वतःचे डोळे साडीच्या पदराने पुसत होत्या.



ते सर्व सांगून झाल्यावर अंबुदेवी थोड्याशा दमल्या सारख्या त्याला वाटलं म्हणून तो त्यांना म्हणाला 'आपण थोडावेळ झोपा', त्यांनी होकार दिला आणि त्या लोखंडी खाटेवर जाऊन झोपल्या. त्यावेळेस त्यांची कला शाखेमध्ये शिकत असलेली मुलगी विजया ही त्यांच्याजवळ आली. अंबुदेवी यांचे डोके व पाय दाबू लागली. थोड्याच वेळात अंबुदेवी झोपी गेल्या.



विजया यांनी आईची साधारणतः अर्धा तास सेवा केली. अंबुदेवी झोपल्यानंतर ही विजया त्यांचे हात–पाय–डोके दाबत होत्या. थोड्या वेळानंतर विजया ह्या घरकाम करण्यासाठी निघून गेल्या. अंबुदेवी संध्याकाळी चार वाजता उठल्या. त्यांनी स्वतःचे केस स्वतःच्या हाताने

विंचरायला सुरुवात केली. केस विचरताना त्या त्याच्याशी गप्पा मारू लागल्या. त्याच संध्याकाळी अंबुदेवी यांचा शाहिरीचा कार्यक्रम जवळच्याच छोट्याशा गावात होता. त्यासाठी अंबुदेवी यांनी छान पांढरी साडी परिधान केली होती. त्या त्यांच्या मुलाची प्रकाश याची वाट पाहत होत्या कारण प्रकाश अंबुदेवी यांच्या सोबत ढोलकी वाजवतो. थोड्याच वेळाने अंबुदेवी यांची नात (मोठ्या मुलाची मुलगी) घरामध्ये आली आणि अंबुदेवी यांच्या चेहऱ्यावर फार मोठे हसू खुलले. त्यांच्या नाती सोबत त्यांनी गप्पा मारायला सुरुवात केली. तेव्हा त्यांची नात इयत्ता दहावी मध्ये शिकत होती. ती अंबुदेवी यांची फारच लाडकी होती. दोघी एकमेकांशी गप्पा करताना आनंदाचा क्षण त्याने कॅमेऱ्यात पकडला.

अंबुदेवी यांनी डफ हातात घेतला आणि वाजवायला सुरुवात केली. जणूकाही त्या संध्याकाळच्या कार्यक्रमाची तालीमच करत होत्या. त्यांनी शिवाजी महाराजांचा पोवाडा गायला. कोणीही साथ–संगत नसताना, कुठलाही कोरस नसताना, वयाच्या ६६व्या वर्षी अंबुदेवी यांनी घरामध्ये त्याच्यासमोर तो पोवाडा सादर केला. फारच ताकदीने त्यांनी डफ देखील वाजवला.

त्यानंतर त्यांचा मुलगा प्रकाशा घरी आला, त्याने देखील लगेच तयारी केली. नारंगी रंगाचा सदरा घालून त्यावर नारंगी रंगाचा फेटा बांधून तो ढोलकी घेऊन सर्वांच्या सोबत निघाला. संशोधक, विजया, अंबुदेवी, प्रकाश व त्याचे कुटुंब आणि त्यांच्या मोठ्या भावाची मुलगी असे सर्वजण जवळच्या गावामध्ये पोहोचलो. जिथे अंबुदेवी यांचा पोवाडा सादर होणार होता. अंबुदेवींचे वय झाल्यामुळे फार व्यवस्थितपणे चालता येत नसल्याकारणाने त्यांची मुलगी विजया त्यांना पकडून हळू हळू चालवत जेथे कार्यक्रम आहे तेथे घेऊन आली. त्यानंतर अंबुदेवी यांनी डफ हातात घेऊन पोवाडा गायला सुरुवात केली. डफावर थाप मारून वयाच्या साठाव्या वर्षी देखील त्यांनी न चुकता, कणखर आवाजात 'झाशीच्या राणी'चा पोवाडा सादर केला. मागे त्यांचा मुलगा प्रकाश हा ढोलकीवर त्यांना साथ देत होता. तसेच त्यांची मुलगी विजया ही टाळ वाजवून आवाजाने मागून कोरस देखील देत होती. हा सर्व कलाप्रकार समोरील रसिक मंडळी पहात होती, ऐकत होती. या वयात देखील अंबुदेवी यांचे सादरीकरण फारच सुरेख होते. फारच श्रवणीय पोवाडा अंबुदेवी यांनी गायला. गावकरी देखील फारच आनंदित झाले.



त्यानंतर साधारणतः एक वर्षानंतर संशोधक १९ नोव्हेंबर, २००६ रोजी अंबुदेवी बुधगावकर यांना भेटायला आणि त्यांच्या तब्येतीची चौकशी करायला त्यांच्या घरी गेला. त्यावेळेस अंबुदेवी यांनी थोड्याच वेळात त्याला ओळखले. म्हणजे वृद्ध वयातही त्यांची स्मरणशक्ती फारच चांगली होती. साधारणतः आठ–दहा इंचाच्या साईजमध्ये त्याने अंबुदेवींचे साल २००५ मध्ये काढलेले फोटो त्यांना दाखवले. तसेच काही फोटो त्यांना भेट म्हणून दिले. अंबुदेवी त्यांनी ते सर्व फोटो पाहिले आणि त्यांना फारच आनंद झाला. त्या खुश दिसत होत्या. कारण मागच्या एक वर्षाचा काळ संशोधकाने त्यांच्यासमोर जिवंत केला होता. त्यांनी नंतर त्याला सांगितले की आता वयाच्या मानाने त्या काहीच कार्यक्रम करत नाहीत. त्यांना चालायला त्रास होतो आणि आपण जो कार्यक्रम केलेला तोच त्यांचा शाहीरीचा शेवटचा कार्यक्रम होता.

३.८ घटकाभ्यास क्रमांक : ८

सत्यपाल विश्वनाथ चिंचोलीकर

३.८.१ सत्यपाल विश्वनाथ चिंचोलीकर यांचा जीवन प्रवास

सत्यपाल यांचे आई–वडील पिंपळगाव, जिल्हा बुलढाणा येथून सिरसोली गावात, जिल्हा अकोला येथे पोटापाण्याची खळगी भरण्यासाठी आले. सत्यपाल यांचा जन्म दवाखान्यात नाही झाला. तर गीताबाई नावाच्या, मातंग समाजाच्या बाईने त्यांच्या आईचे बाळंतपण सिरसोली याच गावी १६ मे, १९५६ रोजी केले. सत्यपाल यांचा जन्म अत्यंत दारिद्र्यात झाला. त्यांचे वडील विश्वनाथ किसन चिंचोळकर हे टेलरकाम करायचे. त्यांना लोक टेलरच म्हणत. त्यांच्या आई सुशिला विश्वनाथ चिंचोळकर यांचे लग्न लहानपणीच झाले. सत्यपाल यांचे आजी–आजोबा सत्यपाल हे लहान असतानाच वारले. म्हणून त्यांच्या आई–वडिलांचेही जीवन फार संघर्षमय होते. ते अर्धा पोते भांडी बांधून सिरसोली येथे आले, जेणेकरून प्रपंचाचा गाडा चालेल. मुंड गावच्या वसतीगृहात सत्यपालांना शिकायला ठेवलं. वसतिगृहासाठी मुलाच्या शिक्षणासाठी पैसे पाठवावे लागत, म्हणून त्यांची आई उपाशी राहात असे. दोन पैशांचे शेंगदाणे विकत घेऊन, सत्यपालांची आई शेतावर काम करायला जात असे. त्यांची आई फाटलेल्या तीन चार साड्या एकत्र करून तिची एक साडी शिवून घालत असे. एवढी प्रचंड गरीबी सत्यपाल यांच्या घरची होती.

लहानपणी शाळेत असताना सत्यपाल प्रार्थनेला उभे होते, त्यावेळेस त्यांचे कपडे फाटलेले असल्यामुळे गुरुजींनी त्यांना रांगेतून बाहेर काढले. या गोष्टीमुळे सत्यपालांना फार वेदना झाल्या. ती गोष्ट त्यांना फार जिव्हारी लागली आणि चक्क ते आत्महत्या करायला निघाले. त्यावेळेस त्यांच्या आईने त्यांची समजूत काढली. आईने सांगितले, ''तू चोरी तर केली नाहीस ना? आपलं आयुष्यच जर फाटलेलं असेल, तर त्याला गुरुजी काय करणार? तू आत्महत्या करून आपल्या दुर्देवाचा दशावतार थोडाच संपणार आहे? त्यासाठी आत्तापासूनच पोटापाण्यासाठी कमवायला शिक.'' हा बहुमोलाचा सल्ला त्यांच्या आईने तेव्हा त्यांना दिला. येथूनच सत्यपाल यांचं जीवन बदलायला सुरुवात झाली.

सत्यपाल इयत्ता चौथीच्या वर्गात गेले. त्यांना नाच–गाण्याची आवड होती. त्या वेळेस त्यांच्या दहा–बारा जिल्ह्यांत तुकडोजी महाराजांची भजन खूप चालत असत. तेथे गुरूदेव सेवा मंडळ होते. काही जागी खंजरी भजन व्हायचे. ज्यात खंजरी वाजवली जायची, त्याच्याबरोबरीने पेटी–तबलाही वाजवला जात असे. सत्यपाल हे भजनाला जाऊ लागले. तेव्हा त्यांना खंजरी वाजवण्याचा फारच मोह होत होता, पण भजनवाले त्यांना खंजरीला हात लावू देत नसत. मग सत्यपाल यांनी मातीचे छोटेसे मडके घेतले. जेव्हा सत्यपाल यांना मडके मिळायचे नाही, तेव्हा ते चक्क स्मशानात जाऊन मडके आणत असत. ते स्मशानातून जे मडके आणायचे त्याला वरच्या तोंडाला कागद लावून चिकटमातीने तो कागद जोडून घेत असत. मग ते सुकवायचे आणि सुकल्यानंतर ते वाजवायचे. थोडावेळ वाजवून झाले की, तो कागद फाटायचा. पुन्हा सत्यपाल नवीन कागद चिकटमातीने जोडायचे व पुन्हा वाजवायचे. मग त्यांनी मातीची खंजिरी केली. ती वाजवायला सुरुवात केली. काही दिवसाने त्यांच्या वडिलांनी त्यांना लाकडाची खंजिरी आणून दिली. एकीकडे त्यांच्या वडीलांचे शिलाईकाम चाले, दुसरीकडे सत्यपाल खंजिरी वाजवत. त्यावेळेस तुकडोजी महाराजांचे अभंग व गाणी सत्यपाल म्हणत असत. उदाहरणार्थ 'देव बाजारचा भाजीपाला नाही रे.'

त्यांच्या वडिलांकडे कपडे शिवायला येणारी लोकं सत्यपाल यांचे अभंग व गाणी ऐकत असत. एकदा काही कारणामुळे रागावून त्यांच्या वडिलांनी सत्यपाल यांची लाकडाची खंजिरी फोडून टाकली. सत्यपाल रडायला लागले, सत्यपाल हे तेंव्हा दुसऱ्याच्या घरात रहायला होते. तेथे जे जे त्यांच्या हाताला येत असे, ते सर्व सत्यपाल वाजवत असे. डब्बा, घमेले, पितळाचे डब्बे, टिफिनचे डब्बे, असे जे हाताला भेटेल ते वाजवत असे. हे पाहून त्यांच्या वडिलांनी त्यांना पुन्हा लाकडाची खंजिरी बनवून दिली, ती त्यांनी वाजवली. नंतर त्यांनी घोरपडीच्या चामड्याची खंजिरी वाजवली. मग कधी कधी घोरपडीचे चामडे भेटत नसे तेंव्हा त्यांनी बकऱ्याच्या चामड्यापासून बनवलेली खंजिरी वाजवली. बकऱ्याच्या चामड्याच्या खंजिरीमधून आवाज छान निघतात. तुकडोजी महाराजांनी दोन खंजिऱ्या एकत्र वाजवल्या होत्या. ''वाजला रे डंका घेऊ नको शंका, सुदरायला गाव सारे लोक लागले. सुदरायला गाव सारे लोक लागले.'' असं तुकडोजी महाराजांचं प्रत्येक भजन हे समाजाच्या जागृतीचं होतं. तू का मागतोस भिक, बाबा

काहीतरी शिक. अरे सुदरायला गाव सारे लोक लागले. तुकडोजी महाराजांची भजन हृदयालाही स्पर्श करून जात. ते चौथीच्या वर्गात शिकत असताना त्यांनी 'उद्योगी बना, काम करा, असा संदेश गाण्यातून दिला'.

इयत्ता सातवीमध्ये सत्यपाल सांस्कृतिक समारंभामध्ये महिलांचे पात्र साकारत असत. स्त्री पात्राची भूमिका ते खूप छान पध्दतीने करत असत.



वेगवेगळे पात्र ते साकारत. कधी ते राणी पण होत असत. सत्यपाल घुंगरू बांधून नाचत असत. सत्यपाल नाटकात पण काम करायचे. सत्यपाल यांना स्टेजवरती काम करायचं धाडस आले, हे त्यांना शाळेमुळे आले.

कलेच्या सादरीकरणातूनच सत्यपाल यांनी त्याचं शिक्षण पूर्ण केले. त्यांच्याकडे कीर्तन करण्याची कला होती. म्हणून फक्त सत्यपाल जगू शकले. सत्यपाल म्हणतात, गरिबीने मला शिकवलं आणि खंजिरीने घडवलं. ते म्हणतात, 'देव तर मी कधी पाहिलाच नाही, माझी आई हीच माझ्याकरता देव आहे. माझी आई फक्त दुसरीपर्यंत शिकली. पण तिने मला घडवलं, मला समाजात वागायला शिकवलं.

सत्यपाल महाराज यांचे दहावी पर्यंत शिक्षण पूर्ण झाले. त्यांच्या लग्नाची वेळ आली. त्यांच्या गावातल्याच, त्यांच्या घरापासून १०–१५ घर सोडून राहणाऱ्या सुनंदा नावाच्या मुलीशी त्यांनी लग्न करायचे ठरवले. मग सत्यपाल महाराज यांचे लग्न १९८१ साली ग्रामजयंती मध्ये

झालं. सत्यपाल यांनी सामुदायिक पद्धतीने लग्न केलं २१ नवरदेव–नवरी त्यांचा सोबत होते. त्यांच्या लग्नाला तेंव्हा १५०/– रुपये खर्च आला. त्यांच्या सासू–सासऱ्यांचा देखील सत्यपाल यांनी खर्च होऊ दिला नाही. ते स्वतः सासू सासऱ्याकडे गेले आणि सांगितलं की त्यांना नवीन



कपडे घेऊ नका. फारच साध्या पद्धतीने सत्यपाल यांचा विवाह झाला.

पुढे त्यांच्या भावाचा विवाह, पुतण्याच्या मुलीचा, दोन्ही मुलांचा, इतकेच काय तर त्यांच्या ड्रायव्हरचा विवाह देखील सामुदायिक पद्धतीने सत्यपाल यांनी केला. सत्यपाल त्यांच्या वाढदिवसाच्या वेळेस १००० जोडप्यांचा सामुदायिक विवाह ते स्वखर्चाने करतात.

एखाद्या दिवशी सत्यपाल यांच्या कार्यक्रमाला निघायची धावपळ असली तर, पाच ते सात साथीदारांचा स्वयंपाक सोबत घेवून जावे लागते. त्या वेळेस सत्यपाल हे स्वतः त्यांच्या बायकोला स्वयंपाक बनवण्यात मदत करतात.

१९८१ सालीच सत्यपाल यांनी फक्त पाच हजार रुपयात, आकोट या गावी जागा घेतली. सत्यपाल यांच्या संपूर्ण परिवाराने मिळून नाल्याचं पाणी चाळणीतून गाळूनच त्यांचा नवीन बंगला बांधला. एकूण २७ जणांचा परिवार एकत्र त्याच बंगल्यात राहतो.

जेव्हा 'म्युझिक क्राफ्ट', या रेकॉर्डिंग कंपनीने, मुंबईला सत्यपाल यांच्या कीर्तनाचे पहिल्यांदा स्टुडिओ रेकॉर्डिंग केलं, त्यावेळेस सत्यपाल यांचा बारा वर्षे वयाचा मुलगा

'धर्मपालने' त्या रेकॉर्डिंगमध्ये एक भजन गायलं. ते असे...' सज्जनाची नजर होती, दुर्जनाची नजर होती, आई म्हणूनी परत केली, अशी मर्द मराठ्याच्या शासनाची नजर होती'.

सत्यपाल हे महिन्यातले वीस–पंचवीस दिवस कार्यक्रमासाठी दौऱ्यावर असायचे, तेव्हा त्यांच्या मुलाची काळजी त्यांच्या पत्नीने घेतली. त्यांच्या पत्नी फक्त चौथीपर्यंत शिकलेल्या होत्या, पण त्या फार हुशार होत्या. त्या खूप चांगला स्वयंपाक बनवायच्या आणि दसरा–दिवाळीच्या सणाला फार छान फराळदेखील करायच्या. धर्मपाल देखील आईला फराळ बनवायला मदत करायचा. धर्मपाल लहान असताना, त्याला त्याच्या वडिलांची भीती वाटायची, पण आईची कधीच भीती वाटली नाही कारण ती खूपच प्रेमळ होती. धर्मपाल याने बारावी पर्यंतचे शिक्षण आकोट येथे घेतले आणि बीएएमएसचे शिक्षण 'पूर्णा' या गावी घेतले. तसेच, त्याने पुण्याला डीसीएचचा डिप्लोमा पूर्ण केला. धर्मपाल बालरोगतज्ज्ञ डॉक्टर आहे. त्याचा आकोट येथे छोटासा दवाखाना आहे. तो व्यसनमुक्तीचं काम करतो, देहदानाचं काम करतो, नेत्रदानाचं काम करतो, रक्तदानाचं काम करतो. आतापर्यंत गुरूदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून रक्ताच्या ५०० बाटल्या रक्तदान शिबिरातून जमवण्यात आल्या आहेत. आतापर्यंत गुरुदेव सेवा मंडळाच्या मदतीने देहदानासाठी ६००–७०० लोकांचे फॉर्म भरून घेतले आहेत. घरच्यांपासून ते बाहेरच्या लोकांपर्यंत अनेक मंडळी सत्यपाल यांच्यासोबत समाजकार्यासाठी जोडली गेली आहेत.

सत्यपाल हे गाऊन १ खंजिरी वाजवायचे. ती वाजवताना म्हणायचे,''कशाला काशी जातो रे बाबा, कशाला पंढरी जातो, कशाला काशी जातो रे बाबा, कशाला पंढरी जातो, संत सांगती ऐकत नाही, इंद्रियाचे ऐकतो, कीर्तनी मान डुलवितो परी कोंबडी बकरी खातो रे बाबा, कशाला काशी जातो रे बाबा, कशाला पंढरी जातो.'' मग एक खंजिरी वाजवता वाजवता दोन खंजिऱ्या वाजवू लागले. सत्यपाल यांनी खंजिरीतून ढोलकी वाजविली, लावणी वाजविली, मग दोन वाजवता वाजवता तीन खंजिरी वाजवल्या. वाटेवरी काटे वेचित चाललो, वाटले जसा फुलाफुलात चाललो, मग काही दिवसाने त्यांनी चार वाजवल्या. अशा खंजिरी वाजवताना, सुरुवातीला 'उलट्या खंजिरीवाला' म्हणून सत्यपालयांना लोकं नाव ठेवत. उलट्या वाजवतो, हा खंजिऱ्या. काही लोक तर म्हणत, 'हा खंजिऱ्यांचा अपमान करतो, उलट्या खंजिऱ्या जमिनीवर ठेवणे हा खंजिऱ्यांचा अपमान आहे.' असे काहीजण समजत होते, पण त्या खंजिऱ्या

सत्यपाल यांना सारख्याच उचलायला लागतात, म्हणून ते खंजीऱ्या उलट्या ठेवतात. पाच, सहा, सात अशा सत्यपाल वाजवत गेले. म्हणूनच सत्यपाल यांना 'सप्त खंजिरी वादक' म्हणतात. सातच्या लवकरच नऊ खंजिऱ्या सत्यपाल वाजवू लागले. त्याच खंजिरीवर ते पुढे एखादी कव्वाली देखील म्हणत. लोकांना त्यात हळूहळू आनंद वाटायला लागला. कधी कधी सत्यपाल हे खंजिऱ्यातून रेल्वेचा आवाज काढायचे. ते लोकांना सांगायचो आपलं स्टेशन येणार आहे बाबा, आपण मरणार आहोत, आपलं स्टेशन येणार आहे, म्हणून स्टेशन यायच्या अगोदर प्रवासात चांगली कामं करा.

सुरुवातीला गावामधून लोकं पायी चालत येऊन सत्यपाल यांचा कार्यक्रम ठरवत असत. सत्यपाल यांना गाडी भाड्याचा खर्च द्यायला यायचे, तारीख घ्यायला यायचे. आता मोबाइलच्या काळात, नेटच्या युगात, लोकांना येण्याची पण गरज नाही.

काही दिवसांनंतर सत्यपाल यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पुस्तक वाचले. मग त्यांच्या लक्षात आले की, आपण लोकांना काय सांगावे. सत्यपाल लोकांपुढे आधुनिक विचार मांडत. ते सांगतात की, ''क्या कहते हो, बात पुरानी, तुम ने नहीं जानी, ना हमने नहीं जानी, रावण को दस सीर बनाये, फिर वो तो बडे तपी कहलाये, फिर क्यों कियी ये बेमानी, क्या कहते हो बात पुरानी, अरे पोती से पोती झगडने लगी और प्रेमकी बात बिघडने लगी।'' हा विचार देत सत्यपाल यांनी त्यांच्या नऊ खंजिरी वादनाची सुरुवात केली.

सत्यपाल हे महाराष्ट्रातील समाजप्रबोधक कीर्तनकार आहेत. ते सप्तखंजिरीतून ग्रामस्वच्छतेचा संदेश देतात. एकाच वेळी ते नऊ खंजिरी वाजवतात. प्रबोधनाचा प्रयत्न, समाजातील अंधश्रद्धा, जुन्या रुढी–परंपरा, समाजातील जातीय वाद, हुंडा प्रथा, दारु व अंमली पदार्थ व्यसन मुक्ती, कुपोषण, शेतकरी आत्महत्या या विषयीची जनजागृती इत्यादी समाजातील बाबींवर ते त्यांच्या कीर्तनातून प्रकाश टाकतात. इतकेच नव्हे तर ते त्यांच्या कीर्तनातून लोकांमध्ये रक्तदान, नेत्रदान, वृक्षारोपण, पाणी आडवा पाणी जिरवा, महिलांचे सबलीकरण, साक्षरता मूल्यशिक्षण, स्वदेशीचा स्वीकार, सामुदायिक विवाह, इत्यादी चांगल्या गोष्टींसाठी जनजागृती करतात.

मनोरंजनाच्या अंगाने जाताना समोरच्याच्या डोळ्यात अंजन घालण्याचे सामर्थ्य त्यांच्या कीर्तनात, त्यांच्या भजनात आहे. समाजातील जातिवाद त्यांना मान्य नाही. जातीय वाद, विषमतेचा वाद कधीतरी संपायला हवा ही सत्यपाल यांची तळमळ आहे. कारण जातीयवादाचे बरेच चटके सत्यपाल यांनी जन्मापासूनच भोगलेले आहेत. लहानपणापासून आतापर्यंत बऱ्याच आठवणी याविषयी ते सांगतात. ते खालच्या जातीचे असल्याकारणाने कोणी त्यांना लग्न कार्यक्रमाला बोलवत नसत. लोकांची जात आपण संपवू शकत नाही. म्हणून ते नेहमीच अस्वस्थ असतात.

सत्यपाल यांची आई सुरवातीला अनेकदा त्यांना म्हणायची, ''तुला १ रुपया नाही देत रे कोणी?' पुढे तीच म्हणायची ''तू काय सरपंचाचं बियान आहेस? तू काय पोलीस पाटलाचं पोरगं आहेस? तू काय श्रीमंताचं लेकरू आहेस? तुला पुरस्कार मिळायला?''

सन २०१५ मध्ये आम्ही सारे फाऊंडेशन, अमरावती येथे, 'चंदूभाऊ वानखेडे' जे शेतकरी नेते आहेत. त्यांनी १लाखाचा पुरस्कार देऊन, सत्यपाल यांचा सन्मान केला. सत्यपाल यांचा संपूर्ण परिवार तिथे गेला होता. एक लाखाचा पुरस्कार घेताना, सत्यपाल यांनी त्यांच्या आईलाच पुढे केलं. सत्यपाल म्हणाले, तू म्हणतेसना १ रुपया देत नाही कोणी मला?, तुझ्या पोराला पहिला पुरस्कार एक लाखाचा भेटतोय. सत्यपाल यांच्या आईने तो पुरस्कार फारच आनंदाने स्वीकारला. हे एक लाख रुपये सत्यपाल यांनी स्वतःसाठी नाही घेतले. बक्षिसाच्या पुरस्काराच्या रकमेचा वापर त्यांनी त्यांच्या आश्रमासाठी केला. नंतर सत्यपाल यांना सरकारने देखील १लाखाचा 'समाजप्रबोधन पुरस्कार दिला'. सत्यपाल यांना महाराष्ट्र सरकारचा दलित मित्र पुरस्कार मिळाला. व्यसनमुक्तीसाठीचा पुरस्कार मिळाला, समाजप्रबोधनासाठीचा देखील एक लाख रुपयाचा पुरस्कार मिळाला. इतकेच नाही तर, अमेरिकेने देखील त्यांना पुरस्कार दिला. त्या पुरस्कारासाठी सत्यपाल यांचे नाव 'नरेंद्र दाभोळकरांनी' दिले होते. महाराष्ट्र फाऊंडेशनने देखील ५० हजाराचा पुरस्कार सत्यपाल यांना दिला. सत्यपाल यांना बाहेर देशात जाण्याची संधी आली. पण काही कारणांमुळे ते जाऊ शकले नाहीत. सत्यपाल यांचे झी मराठी, सह्याद्री वाहिनीवर कार्यक्रम झाले. झी मराठीने २ वेळा सत्यपाल यांना बोलावले. डॉ. प्रकाश आमटे यांचा चित्रपट काढणाऱ्या समृध्दी पोरे यांनी

'रिअल हिरो' या कार्यक्रमामध्ये सत्यपाल, अण्णा हजारे, सिंधुताई सपकाळ असे अनेक हिरे लोकांपुढे आणले.

सत्यपाल यांना आतापर्यंत हजारो पुरस्कार मिळाले. मानपत्र तर त्यांच्या घरात मावत नाहीत. सत्यपाल यांनी ती त्यांचा भाऊ गजानन व इतर नातलगांकडे ठेवायला दिलीत.

सत्यपाल यांना वाटते की, पुरस्कारासाठी कोणाच्याही मागे जाण्याची गरज नाही. पैशाच्या मागे जाण्याची गरज नाही. ते त्यांच्या कार्यक्रमातून मुलांना सांगतात की, ''सेल्फी काढण्यामध्ये ८ मुलं मेली, अशी सेल्फी काढा किंवा स्वतःचं जीवन स्वतःच बनवा. 'सेल्फ' तुम्हीच तुमचे उधारक आहात. आपल्या कष्टावरी जगावे. स्वखर्चाने राहावे साध्या घरी.'' सत्यपाल नाल्यात हात घालून पूर्ण नाला साफ करतात. सत्यपाल यांचा मुलगा धर्मपाल हा डॉक्टर असल्यामुळे म्हणतो, ''बाबा सांभाळून हा, नाल्यात हात घालायचा आहे तर, आमच्या डॉक्टर लोकांचा सल्ला घेत जा.'' लोक व्यायाम करण्यात वेळ घालवतात. सत्यपाल काम करण्याला वेळ देतात. सत्यपाल यांना काम करण्याचं, पायी चालण्याचं काहीच वाटत नाही. सत्यपाल म्हणतात की, ''ज्यांनी सेवा घेतली, ते फेल झाले आणि ज्यांनी सेवा केली ते दीर्घ आयुष जगले.'' ते, गाडगे बाबांचं उदाहरण देऊन म्हणतात की, ''गाडगेबाबा मंदिरात नाही गेले कारण मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी.''

सिंधुताई सपकाळ यांना मुलांमध्ये देव दिसला, मदर टेरेसा यांना लाखो मुलांमध्ये, दिन दुबळ्यांमध्ये देव दिसला, बाबा आमटेंना कुष्ठरोग्यांमध्ये देव दिसला.



पापडकर बाबा हे आकोट या गावापासून म्हणजेच सत्यपाल यांच्या घरापासून फक्त ६० किलोमीटरवर राहतात, ते १६९ मुला–मुलींचे वडील आहेत, १९मूकबधिर मुलं ते सांभाळतात. असा कर्मयोगी देव सत्यपाल यांना लोकांमध्ये बघायचाय. नाथरायांनी गाढवाला पाणी पाजलं, प्राणीमात्रांवर प्रेम केलं.

सत्यपाल यांनी आतापर्यंत पाच पुस्तक लिहिली. दोन भजनाची पुस्तकं, एक गाडगेबाबांच्या जीवनावरती. एका पुस्तकाचं नाव आहे 'माझा सत्यानाश'. बहुजन समाज, गोरगरीब समाज, अज्ञानी समाज का डुबतो, त्याची कारण त्यांनी लिहिली. 'गुरूवंदन सत्यशोधक' हा सत्यपाल यांचा आश्रम आहे. त्या आश्रमाच्या माध्यमातून लहान मुलांवरती संस्कार घडावेत, जसे सत्यपालयांचे खंजिरी वाजवणारे ३५ (पस्तीस) कलाकार तयार झाले तसेच आणखीही कलाकार या आश्रमातून देखील घडावेत, हा प्रयत्न सत्यपाल करतात. संदीप पाल महाराज, कुळंब्याचा आहे, सत्यपाल शिंप्याचा आहे. या भारतात बंधु–भाव नित्य वसू दे. संदीपपाल याने रामपाल याला तयार केला. तो रामपाल महाराज हा मराठ्याचा, पाटलाचा रामपाल, एक बंजाऱ्याचा पंकजपाल राठोड, सोनाराचा ऋषिपाल, शिंप्याचा उदयपाल, ठाकुराच्या खांदानीत पैदा झालेला तुषार सुर्यवंशी हा देखील कीर्तन करून खंजिरी

वाजवतो. अशी जात पात न मानता, सत्यपाल यांनी ३५ खंजिरी वादक निर्माण केलेत. सत्यपाल यांच्या वरती कुटुंबापासून ते सोयऱ्या धायऱ्यापर्यंत, समाजाच्या हिंदू, मुसलमान, बौद्ध, ख्रिश्चन, सोनार, अठरा प्रकारच्या जातींमधील लोकांनी प्रेम केले. मुसलमान तर त्यांना ऊरुसवर बोलावतात. बौद्ध, भिम जयंतीला बोलवतात. हिंदू हरिनाम सप्ताहात बोलावतात. महानुभाव पंथाच्या मठात त्यांचे कार्यक्रम होतात. ख्रिश्चनाच्या चर्चमध्ये त्यांचे कार्यक्रम होतात.

जातीयवादाचा सत्यपाल यांना तिरस्कार आहे. सत्यपाल हे तरुण मुला–मुलींना राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतात. जात नका पाहू, प्रेम करा, पण पहिले शिक्षण घ्या, प्रेम नंतर करा. जीवनात उद्योगी बना, असे सत्यपाल हे त्यांच्या कीर्तनातून सांगतात.

एवढंच नाही तर, आताही सत्यपाल त्यांच्या मुलाच्या दवाखान्यातलं वाया गेलेलं प्लास्टिकचं, सर्व सामान ते जमा करतात आणि त्यातली झाकणे ६० रुपये किलोने विकतात, प्लास्टिक १० रु. किलोने विकतात. का तर आपण केलं पाहिजे. प्रामाणिकपणाने उद्योगाला हात घातला पाहिजे. सत्यपाल म्हणतात 'शिक्षणाच्या वेळेस पैसा काढा, पैसे वाचवा'.

सत्यपाल महाराज यांचे कपडे, त्यांच्या चप्पला, त्याचं वागणं सगळं काटकसरीचं आहे. त्यांच्या घरातली कधी एक पोळीही शिल्लक राहत नाही. शिल्लक राहिली तर ती सत्यपालजी गुराढोरांना खायला घेऊन जातात. सत्यपाल यांची चप्पल फक्त ५० रुपयाची असते पण त्यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी नेहमीच ५०० ते १००० रुपये मुलांना ते पुस्तकासाठी वाटतात.

सत्यपाल यांची कार्य प्रणाली:

कीर्तन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, कर्मवीर गाडगेबाबा, फुले–शाहू–आंबेडकर, संत शिरोमणी तुकाराम महाराज, संत रविदास कबीर, संत नामदेव, संत सेना महाराज, शाहीर अण्णाभाऊ साठे, यांची विचार प्रणाली समाजातील लोकांपर्यंत मनोरंजनातून पोहचवण्याचे कार्य सत्यपाल यांनी केले व आताही मोठ्या प्रमाणात ते करत आहेत. एकाच वेळी नऊ खंजिरी वाजवून त्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, जातीयवाद, जुन्या अनिष्ठ रूढी–परंपरा, हुंडा प्रथा, तसेच माती आडवा पाणी जिरवा, कुपोषण, दारूबंदी, एड्स जनजागृती, शेतकरी आत्महत्या, या सर्व बाबींवर लोक जागृती करणे. तसेच रक्तदान, नेत्रदान, वृक्षरोपण, महिला सबलीकरण, स्वदेशीचा स्वीकार, साक्षरता अभियान, मूल्यशिक्षण, सामूहिक विवाह या बाबतीत देखील समाजकार्य करत आहेत.

तसेच गुरुवंदन बहुउद्देशीय संस्थेमधून त्यांची रुग्णवाहिका अनेक वर्षांपासून सुरू आहे. तसेच रोग निदान शिबीर, गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, यासारखे अनेक उपक्रम राबविणे देखील सुरु आहे. तसेच पंचायत राज्य, ग्रामसभा, ग्राम स्वच्छता अभियान या माध्यमातून माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंग यांच्या मार्फत मध्यप्रदेश विधान भवनामध्ये सत्यपाल यांनी त्यांचा कार्यक्रम सादर केला. पहिले अखिल भारतीय लोककला संमेलन मुंबई येथे सन २०१०, तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, मुंबई सन २०१०, तसेच झी मराठी अवार्ड २०१०, धिना धिन धा मध्ये नऊ खंजिऱ्या वाजवून सत्यपाल यांनी त्यांच्या कलेने लोकांला भुरळ पाडली.

आतापर्यंत अनेक वेळा आकाशवाणी केंद्र, अकोला, नागपूर, जळगाव, बीड, परभणी, तथा दूरदर्शन केंद्र, मुंबई, नागपूर, ई टीव्ही मराठी, झी टीव्ही मराठी, स्टार माझा यासाठी कार्यक्रमांचे सादरीकरण केले. मी मराठी, झी टॉकीज या वहिनींवर सप्तखंजिरी द्वारे जनप्रबोधन कार्यक्रम सादर केले. तसेच आतापर्यंत सत्यपाल यांच्या कार्यक्रमांच्या बारा भागात ऑडिओ कॅसेट, पाच भागात व्हिसीडी आणि डिव्हीडी एमपी३ कंपनीने प्रकाशित केलेल्या आहेत. आतापर्यंत समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचे जवळपास १४००० प्रयोग झाले आहेत. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, गुजरात यामध्ये देखील सत्यपाल यांचा मोठा चाहता वर्ग आहे. असे हे जनजागृतीचे तथा समाज प्रबोधनाचे कार्य सत्यपाल गेल्या चाळीस वर्षापासून अविरतपणे करत आहेत.

जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्र सत्यपाल यांनी पालथा घातलेला आहे. भारतामध्ये बऱ्याचशा जागी त्यांचे कार्यक्रम झालेले आहेत. सत्यपाल यांचे महिन्यातून साधारणतः २३ ते २६ दिवस कार्यक्रम चालतात.

३.८.२ सत्यपाल विश्वननाथ चिंचोलीकर यांची भेट

सन २००५ ला सत्यपाल यांचा सप्तखंजिरी वादनाचा कार्यक्रम नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये होता. इतरही लोककलाकार तिथे त्यांची कला सादर करणार होते. त्यांचा कार्यक्रम पाहण्याची संधी या स्वरूपात पहिल्यांदा संशोधकाला मिळाली. कार्यक्रमाला थोडी गर्दी कमी असल्यामुळे सुरुवातीला त्याने स्टेजच्या समोरच्या खुर्चीवर बसून फोटो काढले. त्यानंतर काही वेगळा अँगल घेण्याकरता संशोधक हा यशवंतराव चव्हाण सेंटरच्या बाल्कनीमध्ये गेला. बाल्कनीतून बरेच टॉप अँगलचे फोटो त्याने काढले. त्यांच्या खंजिरीची जादू पहिल्यांदा बऱ्याच लोकांनी तिथे अनुभवली. कार्यक्रम संपल्यावरती त्याने त्यांच्या काही व्हिडिओ सिडीज् आणि ऑडिओ सिडीज् विकत घेतल्या.

दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी संत रोहिदासांच्या जयंती प्रित्यर्थ सत्यपाल महाराजांचा कार्यक्रम गोरेगाव येथील रोहिदास नगरमध्ये ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाची वेळ संध्याकाळी सातची असल्याकारणाने तो त्या ठिकाणी साडेसहाला पोहचला. कार्यक्रम थोडा उशिराने म्हणजेच आठ वाजता सुरू झाला. त्यावेळेस सत्यपालांनी नेहमीच्या पद्धतीने प्रोग्राम चालू केला. कार्यक्रमाच्या ठिकाणी बरेच जण दारूच्या आहारी गेलेले दिसत होते. तोच धागा पकडून सत्यपालांनी तिकडच्या महिलांना दोन–तीन अभंग झाल्यानंतर प्रश्न विचारला, ''कोणाचा नवरा, कोणाचा मुलगा दारू पिऊन मेला का?'' त्यावर दोन तीन महिलांनी हात वरती केला. ते पाहून सत्यपाल यांनी त्या महिलांना स्टेजजवळ यायला सांगितले. त्या महिलांचा संदर्भ देऊन, 'दारू कसा संसाराचा नाश करते' हे सर्वांना पटवून दिले. पुढे आलेल्या महिलांना त्यांनी त्यांच्याजवळ असलेल्या साड्या दिल्या. त्यावर एक महिला ओक्साबोक्शी रडू लागली. कारण तिचा नवरा १ महिन्यापूर्वी दारुच्या आहारी गेल्यामुळे मरण पावला होता. तिचे रडणे काही थांबत नव्हते. सत्यपालांनी तिला सर्व लोकांसमोर धीर दिला आणि तिच्या मुलांकडे पाहून तिला जगायला हवे असे सांगितले. सत्यपाल यांनी तिच्या सासूला पुढे बोलावून घेऊन, ''संपूर्ण परिवाराची जबाबदारी आता तुम्हाला सांभाळायची आहे'', असे सांगितले. ''आपले आनंदी जीवन व्यर्थ घालवू नका, दारू पिऊन आपला संसार उध्वस्त करू नका, ढोंगी बाबांच्या नादी लागू नका, महापुरुषांचे विचार ऐका, ते विचार अंगीकारा'', असे सत्यपाल यांनी कार्यक्रमात सांगितले. त्यानंतर सत्यपाल यांनी छोट्या मुलांनादेखील बरेच प्रश्न

विचारले आणि ज्यांनी–ज्यांनी उत्तरे दिली त्या सगळ्यांना त्यांनी वेगवेगळ्या विषयावरची पुस्तके भेट दिली. इतकेच नव्हे तर, त्यांना लोकांनी बक्षीस म्हणून जे पैसे दिले होते, ते सर्व रुपये त्यांनी तिथे आलेल्या मुलांना दिले. मुलांना शाळेत पाठवा, मुलांना शिकवा, एक वेळ उपाशी रहा. पण मुलांच्या शिक्षणावरती पैसा खर्च करा. हा संदेश सत्यपाल यांनी तेथे दिला.



सत्यपाल यांचा बराच चाहता वर्ग त्या विभागात दिसला. त्यांचं कीर्तन लोकांच्या डोळ्यांत अंजन घालणारं होतं. आपल्या शैलीमध्ये त्यांनी विभिन्न साधुसंतांची, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची, महात्मा ज्योतिबा फुलेंची, सावित्रीबाई फुलेंची उदाहरणे देऊन लोकांना त्यांच्या कीर्तनामध्ये गुंतवून ठेवले. त्याचप्रमाणे डोक्यावर आग पेटवून लोकांना अचंबित केले. नंतर आग तोंडात घेऊन ती विझवली. ही आग आपण कशी विझवली आणि त्यांचे तोंड का भाजले नाही, ही गोष्ट लोकांना पटवून सांगितली. अशा पद्धतीने त्यांनी लोकांचे अज्ञान दूर केलं आणि अंधश्रद्धा निर्मुलनाचे धडे देखील त्यांच्या कार्यक्रमातून लोकांना दिले.



हा कार्यक्रम रात्री दहा वाजता संपला. लोकांच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद दिसत होता. लोकांना सत्यपाल महाराजांचं किर्तन आवडलं होतं.



१८ जानेवारी, २०१७ ला, संशोधक हा 'महालक्ष्मी सरस' हा खास ग्रामीण महिला बचत गटांचा कार्यक्रम वांद्रे रेक्लामेशनमध्ये पाहायला गेला. तेथे त्याला असे कळाले की, त्या संध्याकाळी तिकडे सत्यपाल यांचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. तो तेथेच थांबला आणि संध्याकाळचा तो कार्यक्रम पाहण्याचे त्याने ठरवले. संध्याकाळी सत्यपाल आले. त्याने २००५ साली त्यांचा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे छायाचित्रीत केला होता, असे सत्यपाल यांना सांगितले. खूप मोठा स्टेज 'महालक्ष्मी सरस' करता बांधला होता आणि छान पद्धतीने खुर्च्या टाकून लोकांच्या बैठकीची व्यवस्थादेखील करण्यात आली होती. सत्यपाल महाराजांचा कार्यक्रम साडेसात वाजता सुरू झाला. सत्यपाल त्यांच्या शैलीमध्ये कीर्तन सादर

करू लागले. वेगवेगळी गीते, वेगवेगळे अभंग सत्यपाल महाराजांनी येथे सादर केले. त्यांचा कार्यक्रम फारच रंगात आला होता, त्यावेळेस त्यांनी समोरील कॅमेरामनला पाहून खूप चांगलं विधान केलं. ते म्हणाले 'असं कर्तृत्व करा की कॅमेरामन तुमच्या मागे फिरला पाहिजे, तुम्ही त्यांच्या मागे फिरता कामा नये. ते पत्रकार, छायाचित्रकार तुम्हाला शोधत तुमच्या घरापर्यंत यायला हवेत. हे त्यांच्या शैलीत सांगताना, त्यांनी एक सुंदर पोज स्टेजवर दिली.



तिथे फार दर्दी लोक होते. त्यांचा कार्यक्रम शहरात होता, त्यामुळे बरीच मान्यवर मंडळी तो कार्यक्रम पहायला आली होती. खूप भरभरून लोकांची दाद त्यांना मिळाली. तिथे त्यांनी महिलांकरिता साड्या वाटल्या, मुलांना पुस्तके वाटली. अशा पद्धतीचा फार सुरेख कार्यक्रम लोकांना पाहायला मिळाला.



दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी संशोधक हा मोझरी येथे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा 'गुरुकुंज आश्रम' आहे तेथे गेला. तो आश्रम अमरावती जिल्ह्यामध्ये, तिवसा तालुक्यात आहे. '११ ऑक्टोबर' हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा स्मृती दिन असतो. त्याच दिवशी सत्यपाल यांचा कीर्तनाचा कार्यक्रम तिथे ठेवण्यात आला होता. त्यांच्यासोबत काही आणखी कीर्तनकार देखील तेथे त्या कार्यक्रमासाठी येणार होते. सत्यपाल यांचा कार्यक्रम संध्याकाळी सातच्या वेळेस ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाला बरीच गर्दी झाली होती. कार्यक्रम सुरु होण्याच्या काही काळ अगोदर अक्षरशा धो–धो पाऊस पडला. पूर्ण मैदान ओलं चिंब होऊन तेथे चिखल झाला होता. लोकांना चिखलात बसायला लागले होते. तरी लोकं, सत्यपाल यांना ऐकण्याकरता, त्यांचा कार्यक्रम पाहण्यासाठी तेथून हलली नव्हती. सत्यपाल यांचा कार्यक्रम सुरू होण्याअगोदर वेगवेगळ्या महाराजांची किर्तनं तेथे झाली. त्यानंतर सत्यपाल यांचा कार्यक्रम सुरू झाला. त्यांचा चाहता वर्ग बराच असल्याकारणाने त्यांच्या प्रत्येक अभंगाला

टाळ्या पडत होत्या. तेथील मैदानात मोठ्या प्रमाणात चिखल झाल्यामुळे, अनेकजण उभे राहून त्यांचा कार्यक्रम पाहत होते. तो आजूबाजूला लोकांचे फोटो काढायला फिरत होतो. तो लोकांचे चिखलाने भरलेले पाय बघत होता. मागच्या बाजूला जिथे लोकं उभी होती, तेथे तो गेला. स्टेजच्या उजव्या हातालाही काही लोकं उभी होती आणि त्यांच्यापुढे बसलेली लोकं सत्यपाल यांचा कार्यक्रम बघण्यात मग्न होती.



त्याने एका व्यक्तीला पाहिलं त्याचे दोन्ही पाय चिखलाने भरलेले. त्याची उंची कमी असल्यामुळे गाडीच्या एका मोठया टायरवरती तो उभा राहून कार्यक्रम पाहत होता. त्याचे चिखलाने माखलेले पाय, तो टायर आणि आजूबाजूच्या प्रेक्षक वर्गांचे चिखलाने माखलेले पाय असा तो फोटो त्याने काढला.



कार्यक्रमात त्याला सत्यपाल यांनी निर्माण केलेले बरेचसे शिष्य भेटले. त्यांनी आतापर्यंत ३५ जणांना सप्तखंजिरी वाजवायला आणि कीर्तन करायला शिकवले आहे. त्यातले बरेचसे कीर्तनकार तेथे आले होते. त्याच कार्यक्रमात सत्यपाल यांचा मुलगा धर्मपाल याने तबला वाजवला. कार्यक्रम संपल्यावर बऱ्याच लोकांनी सत्यपाल यांना भेटून त्यांच्या सोबत फोटो काढून घेतले.

त्याच रात्री कार्यक्रम संपल्यावरती सर्वजण जेवण आटपून सत्यपाल यांच्या गाडीमध्ये बसून त्यांच्या गावी जायला निघालो. सर्वांना त्यांचे गाव आकोटला पोहचायला साधारणत: सकाळचे पाच वाजले. सत्यपाल महाराजांचा मुलगा धर्मपाल चिंचोळकर याचं तिथे हॉस्पिटल आहे. त्या हॉस्पिटलमध्ये त्याची राहण्याची व्यवस्था सत्यपाल महाराजांनी केली.

चार तासाची झोप पूर्ण करून, तो सकाळी नऊ वाजता उठला. सत्यपाल यांनी त्याची त्यांच्या सर्व कुटुंबासोबत ओळख करून दिली. त्यांचा मुलगा धर्मपाल, सून, आई, चुलत भाऊ गजानन, गजानान भाऊंची संपूर्ण फॅमिली आणि त्यांचे इतर नातलग. त्यानंतर तो पूर्णवेळ सत्यपाल यांच्या सोबतच राहिला. त्यांची दैनंदिन कामे, त्याने कॅमेऱ्यात बंदिस्त करायला सुरुवात केली. सगळ्यात पहिलं सत्यपाल त्यांनी दाढी करायला सुरुवात केली. चेहऱ्याला साबण लावून ते पुढे आले आणि त्याला म्हणाले, 'तुला गरम पाणी हवे असेल, तर गिझर चालू

करतो. 'तो म्हणाला, ''काही नको.'' तिथे त्याला सत्यपाल यांनी चेहऱ्याला, दाढीचा साबण लावलेला एक वेगळा फोटो मिळाला.




त्यानंतर त्यांनी सांगितलं, 'मी नेहमीच गार पाण्याने अंघोळ करतो. कधीच गरम पाण्याने अंघोळ करत नाही. त्यामुळे मी खूप कमी प्रमाणात आजारी पडतो.' थोड्या वेळाने सत्यपाल यांची चिमुकली, अडीज वर्षाची गोरीगोमटी नात त्यांच्याजवळ आली. क्षणातच त्यांनी तिला उचलून घेतले. दोघे जण एकमेकांशी खेळू लागले.



थोड्यावेळाने त्यांची सून आली आणि त्या चिमुकलीला नाश्ता करण्यासाठी घेऊन गेली. त्यानंतर सत्यपाल यांनी स्वतःचा चहा स्वतः बनवला. त्याचबरोबर त्यांच्या आईला देखील चहा आणि टोस्ट नेऊन दिले. त्यांनी देखील, चहा आणि टोस्ट याची न्याहारी केली. त्यानंतर त्याला त्यांच्या आईला भेटायला घेऊन गेले. त्यांच्या आईचे वय ८१ वर्षे आहे. त्यांच्या आईची काळजी ते कशा पद्धतीने घेतात, ते सांगू लागले. त्यांनी सांगितलं की आतादेखील मी, माझ्या आईची अगदी मनापासून सेवा करतो. आईला आंघोळ घालतो, आईची पाठण घासतो, इतकेच काय तर, आईच्या साड्या देखील धुतो. हे सगळे त्यांची आई ऐकत होती आणि त्याच्याकडे बघून लाल ओठांनी हसत होती. त्यांचे ओठ लाल होण्याचे कारण त्या खूप पान खात होत्या. अशा पद्धतीने काही वेळ त्याने सत्यपाल यांच्या आईसोबत गप्पा मारल्या. त्यानंतर तो बाजूच्या खोलीत असलेले त्यांचे भाऊ गजानन आणि त्यांचा परिवार त्यांना जाऊन भेटला. सत्यपाल यांनी, त्यांचं संपूर्ण घर त्याला फिरून दाखवलं. त्यांना मिळालेले पुरस्कार, त्यांना मिळालेली प्रशस्तीपत्रके, अशा सगळ्या गोष्टी सत्यपाल यांनी दाखवल्या. त्यांचा मुलगा धर्मपाल याच्या दवाखान्यातही ते त्याला घेऊन गेले आणि धर्मपालचा संपूर्ण दवाखाना फिरून दाखवला. त्याने त्यांना विचारले, ''बाबा तुमचं जे मूळ गाव आहे? त्या गावाला आपल्याला भेट द्यायची आहे.

तिथे आपण जाऊया का?'' त्यांनी क्षणाचाही विचार न करता त्याला म्हणाले, ''जाऊया, आता थोडं ऊन आहे, संध्याकाळी आपण तिथे जाऊया.''

संध्याकाळी तो व सत्यपाल हे त्यांच्या मुलाची कार घेऊन त्यांच्या चिंचोली या गावाकडे जायला निघालो. थोड्या अंतरावर गेल्यावर सत्यपाल यांनी गाडी एका जागी थांबवली आणि त्याला गाडीतून उतरायला सांगितले. समोरच असलेला त्यांचा आश्रम दाखवला. एक मोठा आश्रम ते उभारत होते. तो समाजकार्याकरता, मुलांच्या शिक्षणाकरता, भजन–कीर्तनाकरता, समाजप्रबोधन करण्याकरता वापरायचा, असे त्यांनी सांगितले. 'या आश्रमासाठी मी माझा पैसा टाकतो आहे. तसेच, मिळालेल्या सगळ्या पुरस्कारांचे देखील सगळे पैसे याच आश्रमाकडे वळवून हा आश्रम बांधत आहे,' असे त्यांनी संशोधकाला सांगितले. त्याने त्या आश्रमाचे काही फोटो काढले, त्याच प्रमाणे त्या आश्रमाच्या पुढे सत्यपाल महाराज त्याच्या बरोबर बोलतात आणि फार स्मित हास्य देतात, असा एक फोटो काढला.



त्यानंतर त्यांचा मोठा भाऊ उकर्डाजी, त्या आश्रमात काम करत होता, त्या आश्रमाची देखरेख करत होता, त्यांची त्याच्याशी सत्यपाल यांनी ओळख करून दिली. चिंचोली गावात पोहचायला संध्याकाळचे सात वाजले. सत्यपाल ज्या घरात लहानचे मोठे झाले ते घर पाहिलं. त्यांचा गाईचा गोठा त्याने पाहिला. तो तिथे गावातल्या काही लोकांना भेटला. सत्यपाल यांनी त्याची

ओळख त्या लोकांना करून दिली. त्यानंतर ते तिथून निघाले. गावाला जाताना आणि परत येताना दोन्ही वेळेस सत्यपाल यांनीच कार चालवली. तेव्हा त्याला कळालं की, सत्यपाल दुचाकी, चार चाकी किंवा मोठी बस देखील चालवतात. अशा एकामागून एक गोष्टींचा उलगडा होत गेला.



त्यानंतर दोघेही सत्यपाल यांच्या आकोट या गावी आले. रात्रीचे जेवण गजानन भाऊ यांच्याकडे केले. जेवण झाल्यानंतर गजानन भाऊंच्या परिवारासोबत गप्पा मारल्या. त्यानंतर तिथे सत्यपाल यांचा एक छोटासा कीर्तनाचा कार्यक्रम देखील केला. कारण त्याला संपूर्ण परिवार कीर्तनामध्ये तल्लीन झालेला असा एक फोटो हवा होता. त्यामुळे त्याच्या सांगण्यावरून सत्यपाल यांनी, तो गजानन भाऊंच्या घरी कीर्तनाचा कार्यक्रम केला.

सत्यपाल महाराज, त्यांची सून आणि संशोधक, जिथे सायन्सच्या मुलांसाठी क्लास घेतात त्या क्लासरूम मध्ये गेला. सायन्स शाखेमध्ये शिकणारी बारा–पंधरा मुले त्या क्लासमध्ये होती. त्यांच्या सूनबाईने त्याला सर्व विद्यार्थ्यांची ओळख करून दिली. समोरील विद्यार्थ्यांना, त्याने स्वतःची ओळख करून दिली. त्यांच्या सूनबाईने सत्यपाल यांना, क्लासमधील मुलांना मार्गदर्शन करायला सांगितले. त्यांनी मुलांना मार्गदर्शन करायला सुरुवात

केली. खूप बहुमोल विचार सत्यपालांनी त्या मुलांना सांगितले. मुले फार लक्ष देऊन त्यांचे विचार ऐकत होते.



त्याने, सत्यपाल यांच्या राहत्या घरी मुलाखत घेतली. त्यावेळेस त्यांनी बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्यांनी एक फार जुने मडके त्याला दाखवले आणि सांगितले, या मडक्यामुळेच मी खंजिरी वाजवायला शिकलो. त्याने त्यांचा मडक्यासोबत एक फोटो काढला.



असं करता करता शेवटी त्यांच्या वडिलांनी त्यांना एक खंजिरी आणून दिली. पुढे तीच खंजरी सत्यपाल महाराज वाजवू लागले.



पुढे ते म्हणाले की, ते रोज थंड पाण्याने आंघोळ करतात, स्वतःची कामे ते स्वतःच करतात, जेवण बनवतात, होळीच्या दिवशी गावातला सगळा कचरा साफ करतात. तो कचरा एका जागी जमवून त्याची होळी करतात. गाडगेबाबांचे विचार आणि त्यांचे आचरण सत्यपाल स्वतःच्या कार्यातून पूर्ण करतात.

हे सर्व झाल्यावर तो आणि सत्यपाल यांनी जेवण केले आणि त्यांच्या आईला भेटायला गेले. त्यावेळेस सत्यपाल महाराज त्यांच्या आईच्या पाया पडले आणि आईने त्यांना आशीर्वाद दिला.



त्यानंतर सर्वजण कार्यक्रमासाठी दुसऱ्या गावाला जायला निघाले. तिथे रात्री सत्यपाल यांचा कार्यक्रम होता. बाहेर पाऊस पडत होता. कार्यक्रम होईल की नाही हे माहिती नव्हतं, पण तरी तिथे पोहचायचं होतं. कार्यक्रम आहे, तिथे सर्व पोहोचले.

पाऊस फारच झाला होता सुरुवातीला स्टेज शेतामध्ये होता, पण पावसाने चिखल झाल्यामुळे तो स्टेज दुसऱ्या जागी हलवण्यात आला होता. अगदी साध्या पद्धतीने तेथे स्टेज बांधण्यात आला होता. पण तरी तेथे प्रेक्षकांची गर्दी बरीच होती. लोक ओल्या मातीत बसून कित्येक वेळ सत्यपाल यांची वाट पाहत होते. महानुभाव पंथांच्या काही लोकांनी सत्यपाल यांच्या कार्यक्रमाचे आयोजन तेथे केले होते. सत्यपाल तेथे गेल्यावर त्या लोकांच्या जीवात जीव आला. कारण पाऊस जास्त असल्यामुळे सत्यपाल येतात की नाही, अशी प्रेक्षकांना आणि आयोजकांना शंका वाटत होती.



त्यांनी कार्यक्रम चालू केला, कीर्तनातून सत्यपालांनी लोकांचे कान टोचायला सुरुवात केली. कार्यक्रम चालू असतानाच नेहमी प्रमाणे काही मुलांना पुस्तक वाटली. ज्या आईचा मुलगा देशाची सेवा करण्याकरता सैन्यदलात आहे, ज्या स्त्रियांचे पती बॉर्डरवर लढा देत आहे, अशा दोन्ही महिलांना त्यांनी साड्या दिल्या. साधारण दहा-बारा महिलांना त्यांनी त्या कार्यक्रमात साड्या दिल्या. पंधरा-वीस मुलांना त्यांनी विविध विषयावरती पुस्तक दिली. व्यसन करू नये

यावरती त्यांनी छान भाष्य केले. तरुणांमध्ये देश प्रेम वाढावे, तसेच देशी दारूचे प्रेम कमी व्हावे म्हणून सत्यपाल म्हणाले की, ''पचास ग्राम मारू तो रस्ता भूल जाये, सो ग्राम मारू तो नाली मे गिर जाये । पुरी शिशिमारू तो लाथा खाजाये'' । म्हणून हा समाज कुठेतरी वाचला पाहिजे चांगल्या रस्त्याने गेला पाहिजे, म्हणून सत्यपाल यांनी त्यांच्या कार्यक्रमातून हा संदेश दिला, जनजागृती केली.



कार्यक्रम संपल्यावर सर्वांचे जेवण झाले. त्यानंतर सत्यपाल यांनी त्याला औरंगाबाद स्टेशनला सोडले. तीन दिवसाच्या आठवणी मनामध्ये साठवून ते क्षण त्याच्या कॅमेऱ्यात बंदिस्त करून तो मुंबईला परतला.



३.९ : घटकाभ्यास क्रमांक : ९

शाहीर बापूराव विभूते

३.९.१ शाहीर बापूराव विभूतेंचा जीवन प्रवास

शाहीर बापूराव विभूते हे लिंगायत कोष्टी समाजात जन्मले. शाहीर बापूराव विभूते यांचा जन्म ७ ऑक्टोबर, १९३० रोजी मुक्काम पोस्ट बुधगाव, तालुका मिरज, जिल्हा सांगली येथे झाला. शाहीर बापूरावांचे शिक्षण इयत्ता दुसरी पास पर्यंत झाले. त्यांनी शाहिरी कलेची परंपरा त्यांचे आजोबा कै. शिवाप्पा विभूते यांच्याकडून घेतली. ती पुढे त्यांचे वडील कै. विरुपाक्ष विभूते जे भेदिक गायक (कलगी पक्ष) होते, त्यांच्यासोबत पुढे चालू ठेवली. बापूराव हे लिंगायत कोष्टी असल्यामुळे विणकाम करणे हाच त्यांचा पूर्वीपासूनचा व्यवसाय होता. तो व्यवसाय करत करत बापूराव यांनी वयाच्या १२व्या वर्षापासून शाहिरी कला जोपासली. तेथूनच त्यांच्या भेदिक शाहिरीला सुरुवात झाली भेदिक शाहिरी हा खाली बसून मांडी घालून गाण्याचा प्रकार आहे. साधारण तीन ते चार तास तो चालतो.

माधवनगरला एके दिवशी गणेश दत्तात्रय दिक्षितांचा पोवाडा होता. बापूरावांनी वडिलांना विचारले व तो पोवाड्याचा कार्यक्रम बापूराव पाहायला गेले. तो कार्यक्रम बघून घरी आल्यानंतर त्यांना एक वेगळीच आवड लागली. ताट वाट्या असे जे काही हातात मिळेल ते बापूराव वाजवायचे. पोवाड्यांचा पक्का नाद तेव्हा बापूरावांना लागला होता. नंतर ग. द. दिक्षित गुरुजी काही कामासाठी आले होते, तेव्हा ते स्वतःहून बापूरावांच्या घरी गेले आणि बापूंना म्हणाले, ''काय रे तू पोवाडा म्हणतोस म्हणे बापू, असे मला कळले, जरा म्हण बरं एक–दोन गाणी'' मग बापूंनीही एक गाणे म्हणून दाखवले. ग. द. दिक्षित गुरुजी खुर्चीवरून पटकन उठले व बापूंच्या डोक्यावर हात ठेवून म्हणाले, ''तू पुढे माझ्यासारखाच शाहीर होशील. तुझे पुढे मोठे नाव लौकिक होईल'' यानंतर ते गुरुजींच्याकडे शिकायला व साथीला जाऊ लागले. गुरुजींपेक्षा त्यांच्या बायकोचा बापूरावांवर फार जीव होता. बापूरावांना त्या आपला मुलगाच म्हणत असत. भेदिक शाहिरीचे कार्यक्रम करता करता त्यांना वाटले की, आपण देखील ग. द. दीक्षितांसारखी समाज प्रबोधन करणारी शाहिरी करायला हवी. म्हणून त्यांनी लगेच ग. द. दिक्षितांकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व पत्करले आणि पुढे त्यांच्याच सोबत शाहिरीचे कार्यक्रम करू लागले. बापूरावांनी

आपल्या शाहिरीत बराचसा बदल करून घेतला. सादरीकरण देखील बदलले पण, नियतीला ते मंजूर नव्हते. सन १९५१ साली शाहीर ग. द. दिक्षित यांना स्वर्गवास झाला आणि अवघ्या एक वर्षाच्या गुरु–शिष्य परंपरेला पूर्णविराम मिळाला. बापूरावांनी मनोमनी निश्चय केला की, गुरुंनी दिलेली ही कला आपण जोपर्यंत जिवंत आहोत तोपर्यंत समाजापर्यंत पोहोचवायचीच. या कलेची ज्योत मात्र मावळू द्यायची नाही. बापूरावांनी नव्या जोमाने शाहिरीला सुरुवात केली. त्यांच्या शाहिरीमध्ये बराचसा फरक केला.

त्या काळी डफ हा मोजक्याच शाहिरीमध्ये वापरला जायचा. बापूरावांना याची खंत वाटली. ते लिंगायत कोष्टी घराण्यात जन्मले असल्यामुळे त्यांच्या समाजात करंडोल हे कर्नाटकी वाद्य वाजवलं जात असे. प्रत्येक सण, जयंती, उत्सव, सांस्कृतिक समारंभ या सर्वांमधून करंडोल या वाद्याचा सर्रास उपयोग केला जात असे. विभूते हे वाद्य वाजवण्यात फारच पारंगत होते. अथक परिश्रमानंतर त्यांनी करंडोलचे बोल डफात घातले व तेच बोल त्यांनी डफामध्ये काढायला सुरुवात केली.



शाहिरी ही डफाशिवाय नाही, हे बापूरावांनी ओळखले व त्यांच्या शाहिरीला डफाच्या बोलांची साथ दिली. पुढे बापूंच्या डफाचा महाराष्ट्रात कोणालाच हात धरता आला नाही. त्याचप्रमाणे चालींमध्ये भेदिक मधल्या काही चाली शाहिरी पोवाड्यांमध्ये आणल्या. बापूराव चार–पाच तास नव्हे तर कधीकधी दिवसभर भेदिक शाहिरीचा पोवाडा बसून गात असत. योद्धा

ज्यावेळेला लढत असतो, त्या वेळेला वीररसाचे गायन त्या ठिकाणी होणे आवश्यक आहे. तोच योद्धा जेव्हा धारातीर्थी पडतो, मृत्युमुखी पडतो तेव्हा करूण रस तिथे पोवाड्यातून गायला गेला पाहिजे. यामध्ये फार मोठा फरक असतो तो पुरेपूर बापूरावांना ठाऊक होता आणि त्याचप्रमाणे ते गात असत.

याच बापूराव विभूतेंनी त्यांच्या शाहिरीचा पहिला दौरा मात्र पायी चालतच केला. तासगाव ते औंध असा प्रवास सुरुवातीला बापूरावांनी केला. त्यांच्या पथकात सुरुवातीला त्यांची बहीण अंबुबाई, त्यांचा भाऊ जगन्नाथ व आणखी एक साथीदार असे चौघेचजण होते. लोक त्यांचा पोवाडा ऐकायला फार लांबून चालत आणि बैलगाडीतून येत असत. त्या काळात एकच माईक फक्त शाहिरीसाठी असायचा. ढोलकी, पेटी साथ–संगतीसाठी माईक मात्र नसायचा. कैक हजारो लोक बापूरावांचा पोवाडा ऐकायला येत असत. काही वेळेस तर माईकची व्यवस्था पण नसायची. त्यांच्यासमोर त्या वेळेस किती मोठा श्रोतावर्ग असला तरी बापूरावांचा आवाज शेवटच्या श्रोत्यापर्यंत पोहोचत असे. इतक्या मोठ्या पहाडी आवाजाची देणगी शाहीर बापूरावांना लाभली होती. त्यांचा एकच विषय ते पोवाड्यातून दीड ते दोन तास सादरीकरण करून मांडत असत. शाहिरीच्या बाबतीत त्यांना जे जे काही लिखाण लागायचे ते लिखाण ते स्वतः करत असत व तेच लोकांपुढे गात असत.



बापूराव यांनी ११ वर्ष वयाच्या कलावती यांच्याशी विवाह केला. त्यानंतर बापूराव विभूतेंनी खूपच हालाखीत दिवस काढले. बापूराव जेव्हा कार्यक्रम सादर करायला जायचे, त्यावेळेस त्यांचे दोन मित्र होते... बुवा व रामोशी. हे दोघेही गावात जाऊन भाकरी मागायचे. संध्याकाळी बापूरावांसाठी व त्यांच्या पत्नीसाठी दोन जास्त घरं फिरायचे व भाकरी मागून आणायचे. ती मागितलेली भाकरी ते चतकोर चतकोर बापूंना व त्यांच्या पत्नीला आणून देत असत. यावरती बापूंनी आपले जीवन जगवले. पण कोणाकडे कधीच हात पसरला नाही. परिस्थिती सुधारावी म्हणून नंतर ते हातमागावरती बसायचे. दिवसभरात एक नऊवारी साडी विणायचे. त्याचे त्यांना एका साडी मागे दोन रुपये मिळायचे.

शाहीर जेवढे वरून कडक होते तेवढेच आतून फारच प्रेमळ होते. शाहिरांना प्राण्यांची फारच आवड होती. जेव्हा ते हैदराबादला कार्यक्रमाला गेले, तेव्हा त्यांनी घरी पाळायला चक्क दोन माकडे आणली. नंतर महाराष्ट्रात एका कार्यक्रमाला गेले तेथून त्यांनी दोन ससाणे आणले, चिमण्या आणल्या, दुसरीकडे कुत्रे पाळले. त्यांचे माणसाप्रमाणेच प्राण्यांवरही खूपच प्रेम होते. नंतर हे सर्व त्यांनी शांतीनिकेतनला दान केले.

बापूरावांनी कधीच जातीभेद केला नाही. एक भाकरी खायला मिळाली, तर त्यातली चतकोर ते दुसऱ्याला देत असत पण, ती भाकरी कधीच ते झाकून ठेवत नसत. त्यांनी कधीच कुणाची मागून निंदा केली नाही. जे काय बोलायचे, ते प्रत्येकाच्या तोंडावर तिथल्या तिथे ते बोलत असत.

दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी बापूराव राहत असलेल्या चाळीच्या बाजूच्या गल्लीमधला, एक म्हातारा मृत पावला होता. बापूराव नुकतेच आंघोळ करून खुर्ची टाकून बाहेर बसले होते. त्यांना ही दुःखद घटना समजली. लगेच ते घरात गेले आणि पेन वही घेऊन लिहायला बसले. थोड्याच वेळात एक गीत लिहून त्यांनी बायकोला वाचून दाखवले,

''व्यर्थ ची पसारा

व्यर्थ सारी आशा

कारे प्रभू हा मांडला तमाशा

हेच ते अजरामर गाणं होतं.''

लिखाणामध्ये बापूराव विभूते यांचे योगदान फार मोठे आहे. त्यांनी १०४ पोवाडे लिहिले. ऐतिहासिक पोवाडे लिहिणे व गाणे ही त्यांच्या फारच आवडीची गोष्ट होती. याबरोबरच राष्ट्रीय राजकीय लोकांचे पोवाडे, धार्मिक विषयांवरचे पोवाडे बापूराव यांनी त्यांच्या लेखणीतून लिहिले.

अध्यात्मिक विषयांवरती चालणारे, महिलांसाठी त्यांनी २५ पाळणे लिहिले. त्यांच्या दोन तासांच्या पोवाड्या नंतरचा वेळ ते पाळणे सादर करण्यासाठी घेत असत. या पाळण्यातून ते महिलांचे प्रबोधन, त्याचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या कर्तव्याप्रती जागरूक करणे, जुन्या काळातील महिलांच्या शौर्याची आठवण करून देणे, हे त्यांच्या सादरीकरणातून ते करत असत.

ग्रामीण भागांमध्ये चालणारा नाटक हा लोकप्रिय प्रकार आहे. त्यांनी पाच ग्रामीण नाटके लिहिली. तमाशा क्षेत्रात चालणारा जो वग आहे, अशी सात वगनाट्य त्यांनी लिहिली. विशेष म्हणजे त्या काळात फारच प्रसिद्ध असणारे व तमाशामध्ये फारच मोठं नाव असलेले, काळू–बाळू यांच्यासाठी देखील विभूतेंनी सहा वगनाट्य लिहून दिली.

विभिन्न क्षेत्रातील लोकांना चिमटा काढणारे, सात फटके त्यांनी लिहिले. समाजाचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने ३ हजार समाज प्रबोधनपर गीते त्यांच्या लेखणीतून साकार झाली. इतकेच नव्हे, तर त्या काळात आणि आताही लोकांना वेड लावणाऱ्या २२ लावण्या त्यांनी लिहिल्या. एवढे मोठे भांडार त्यांच्या लिखाणात आहे.

बापूरावांचे शाहिरी हेच जीवन होते. शाहिरीसाठी जे साहित्य वाचायला हवे ते सगळे साहित्य बापूरावांनी वाचले. शाहिरीच्या संदर्भात बापूरावांनी लिहिले आणि आपल्या अंगी असलेल्या कलेतून प्रामाणिकपणे लोकांपुढे मांडले.

हे कार्यक्रम करत असताना, फार मोठ्या मोठ्या लोकांच्या बापूंच्या ओळखी झाल्या. मोठ–मोठ्या ठिकाणी त्यांचे कार्यक्रम झाले. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे मुख्यमंत्री होण्या अगोदर त्यांचे कार्यक्रम ठरवण्यासाठी, चक्क सायकलने बुधगावला बापूरावांच्या घरी येऊन कार्यक्रम ठरवून जात असत.

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर जेव्हा 'अपना उत्सवाचे' उद्घाटन करण्यात आले. तेव्हा तेथे भारताचे पंतप्रधान कै. राजीव गांधी उपस्थित होते. त्याप्रसंगी शाहीर बापूराव विभूतेंना कार्यक्रमाची सुरुवात करण्याचा मान देण्यात आला. बापूंनी पहाडी आवाजात पोवाडा प्रस्तुत करताच, त्यांच्या आवाजाने स्टेडियममध्ये जमलेली सर्व मंडळी मंत्रमुग्ध झाली. पोवाडा संपल्यावरती कै. पंतप्रधान राजीव गांधी स्वतः उभे राहिले व त्यांच्या पाठोपाठ सर्व मान्यवर उभे राहिले. त्यानंतर संपूर्ण जमलेल्या श्रोतावर्ग उभा राहिला आणि जो काय टाळ्यांचा आवाज घुमला तो काही मिनिटे थांबलाच नाही. सर्वांनी बापूराव विभूतेंचे असे कौतुक करून पोवाड्याला व कलेला दाद दिली.



वसंतदादा पाटील पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, त्यावेळेस त्यांनी बापूंना विचारले, "बापू, मी आता या महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री झालोय. आता तुमच्यासाठी काय करू?" बापूरावांनी शांत स्मितहास्य देऊन उत्तर दिले, "तुमचं माझ्यावरचे प्रेम आहे, ते शेवटपर्यंत तसेच ठेवा." बापूंचे हे वाक्य वसंतदादा पाटलांनी अगदी शेवटपर्यंत पाळले. पुढे वसंतदादांच्या महाराष्ट्रात

जेथे–जेथे सभा व्हायच्या, त्या सभेच्या अगोदर सुरुवातीलाच बापूराव विभूतेंचा कार्यक्रम व्हायचा आणि त्यानंतर वसंतदादांच्या सभेला सुरुवात होत असे. एक फटकाचे उदाहरण येथे फार गमतीदार आहे. त्यांच्याच एका सभेत बापूराव विभूतेंनी एक फटका गायला. तो असा,

'राजकारणात बसलाय गचका

पुढाऱ्यांचा पार उडालाय पचका

खातोय घावल त्यांचा हनतोय गचका

अन साऱ्यांचा बनलाय स्वभाव कुचका

हे करणार निंदा, दुसरा ना धंदा

हे घडी घडी नडतया

रं बाबा वेगळं मला दिसतया'

सन १९८१ साली इंडियन नॅशनल थिएटर संस्थेचे अशोकजी परांजपे यांनी जेव्हा बापूरावांची जपानची राजधानी टोकियो येथे पाच पोवाड्यांच्या कार्यक्रमासाठी निवड केली, तेव्हा मुंबईतील काही शाहीर मंडळी व शिष्टमंडळ फार नाराज झाले. ''कुठल्या खेडेगावच्या शाहिराला तुम्ही निवडले?'' अशी त्यांनी अशोकजी परांजपे यांच्याकडे तक्रार केली. त्या शाहिरी मंडळींना व शिष्टमंडळाला अशोकजींनी फक्त एकच सांगितले की, ''शाहीर बापूराव विभूते शाहिरी सादर करताना जो डफ वाजवतात त्यातला फक्त एक छोटासा तुकडा तुम्ही वाजवून दाखवा. मी बापूरावांची टीम रद्द करतो व तुमची टीम जपानला पाठवतो.'' सर्वांनी हे ऐकताच पाय मागे घेतले आणि तेथून निघून गेले असे डफामध्ये वेगळे वैशिष्ट्य निर्माण करण्याचे काम शाहीर बापूराव विभूते यांनी केले. त्या सर्व कार्यक्रमाची तयारी मुंबईत करून घेण्यात आली. टोकियो येथे बापूराव विभूते यांच्या शाहिरी कलेचे पाच कार्यक्रम झाले. शाहिरीचा झेंडा त्यांनी जपानमध्ये फडकवला आपल्या पहाडी आवाजाने व डफाने तेथील लोकांना मंत्रमुग्ध केले. तो बापूंचा आयुष्यातील एकमेव जागतिक दौरा होता.



सन १९८९ मध्ये जेव्हा मुंबईमध्ये 'अपना उत्सव' लोककलाकारांचा उत्सव भरवण्यात आला. तेथेही विभूतेंनी एक छान मजेशीर प्रसंग घडवून आणला. बापूंचा ज्या ठिकाणी कार्यक्रम होता तेथे पोलिसांचा खूपच मोठ्या प्रमाणात बंदोबस्त होता. तेथे पोवाडा गाऊन झाल्यावर त्यांनी फटक्यातलं एक कडवे गायले, ते असे....

'अहो साऱ्यांना दारूची सवय जडली

पट्टे वाल्याच्या घरात भिडली,

आमदार मंत्र्यांनी नाही ग सोडली

पोलीस खात्याची त्यात भर पडली'

हे सर्वांसमोर त्यांनी गायलं. पोलिसांनी हे ऐकून सर्वात आधी टाळ्या वाजवल्या. शाहिरी ही अशी एक निर्भीड असली पाहिजे. याचे जिवंत उदाहरण म्हणावे लागेल. जे समाजाला देणे गरजेचे आहे ते दिले पाहिजे त्यासाठी कच खाऊन चालणार नाही. जिथे गायला नको, तिथे गाणं आणि जिथे ज्यांच्यासमोर जायला नको, तिथे जाणं हेच दाखवून देणे गरजेचे आहे. हीच खरी शाहिरी.

बापूरावांना त्यांच्या कलेसाठी मान-सन्मान पदव्या बऱ्याच मिळाल्या. १९५६ साली कुडली श्रंगेरीचे श्री शंकराचार्य यांनी बापूंना कवी विशारद, शाहीर सम्राट ही पदवी बहाल केली.

तसेच १९९५ साली नानिवडेकर शाहिरी संगम तथागत दीक्षित लोककला विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून शाहीर तिलक ही पदवी मिळाली. त्याचबरोबर पुरस्कारांमध्ये

१) १९९२–९३ ला त्यांना पहिला महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला.

२) १९९८–९९ ला संत नामदेव पुरस्कार मिळाला.

३) १९९९– २००० चा शाहीर सगनभाऊ जेजुरीकर पुरस्कार त्यांना मिळाला.

४) २०००– २००१ ला त्यांना पठ्ठे बापूराव पुरस्कार पुणे मनपाने दिला.

५) २००३–२००४ त्यांना त्यांच्याच गावाने बुधगाव भूषण पुरस्कार देऊन गौरव केला.

६) ४–१–२००७ रोजी बालरंजन कला अकादमी, सांगली पुरस्कृत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील सर यांच्या हस्ते आदर्श लोककला सेवा मानपत्र देऊन बापूरावांचा गौरव करण्यात आला.

१९९९ साली कुपवाडला शाहिरीचा एक कार्यक्रम चालू असताना, बापूरावांना अर्धांगवायूचा झटका आला आणि पहाडी आवाजाचे शाहीर अंथरुणाला खिळले ते पुन्हा कधी अंथरुणातून उठलेच नाहीत. त्या आजारामुळे त्यांच्या मेंदूला देखील फटका बसला आणि बापूरावांची स्मरणशक्ती गेली. त्यांना हालचाल करणेही फारच कठीण झाले. पुढची सात–आठ वर्ष ते अंथरुणावर पडून होते. ते स्टेजवरती उभे असताना शाहीर म्हणून त्यांना जे प्रेम, इज्जत, मान–सन्मान मिळाले. तसे काहीच आजारी पडल्यानंतर त्यांना मिळाले नाही. समाजाने त्यांच्याकडे फारच दुर्लक्ष केले. कलाकार म्हणून त्यांनी उभे असताना जे सुख भोगले. त्याच्या कितीतरी पटीने दुःख त्यांनी अंथरुणावर पडल्यावर भोगले. हे त्यांचे दुर्दैवच म्हणावे लागेल.

बापूराव जरी आजारी होते तरी त्याचं कलेवरचे प्रेम कधीच कमी झाले नाही. ते त्यांच्या बायकोला किंवा मुलांना पोवाडा म्हणायला सांगत असत. त्यांनी तरुणपणी जी गाणी लिहिली होती, ती गाणी ते ऐकत असत. इतकेच नाही तर ते आजारी असताना देखील एक गाणं त्यांनी थांबून–थांबून म्हटले होते. हीच त्यांची जिद्द. हेच त्यांचं शाहिरी कलेवर प्रेम.



त्यांच्या घरच्यांनी विशेष करून त्यांच्या बायकोने व मुलांनी त्यांची आजारपणात फार मनापासून सेवा केली. त्यांचा बंद पडलेला डफ त्यांचा दुसऱ्या नंबरचा मुलगा आदिनाथ विभूते याने हाती घेतला व शाहिरी परंपरा पुढे चालू ठेवली. आता तीन तास शाहिरी कार्यक्रम आदिनाथ करतात. कलेची परंपरा आदिनाथचा मुलगा प्रसाद विभूते (पाचवी पिढी) याने देखील फारच छान सांभाळली आहे.



शाहिरीच्या ७२ चालींपैकी ५० चालींचे नोटेशन तयार करण्याचे फारच मोठे काम शाहीर आदिनाथ बापूराव विभूते यांनी केलेले आहे. त्यासाठी आदिनाथला पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राकडून अनुदान देखील मिळाले आहे. लवकरच या सर्व चाली नोटेशनच्या माध्यमातून पुस्तक रुपाने समाजापुढे येणार आहेत.



अशा या महान कलाकाराची प्राणज्योत ३ जुलै, २००७ रोजी मालवली. पहाडी आवाज कायमचा शांत झाला.

३.९.२ बापूराव विभूते यांची भेट

संशोधक दिनांक २१ नोव्हेंबर, २००५ रोजी दुपारी बारा वाजता सांगलीपासून जवळच असलेल्या बुधगाव येथे शाहीर बापूराव विभूते यांच्या घरी गेला. घरात गेल्यावर समोर एक चारपायी लोखंडी खाट होती. त्या खाटेवर एक वृद्ध व्यक्ती बसलेली होती आणि त्या व्यक्तीला एक वयस्कर महिला जेवण भरवत होती. त्या वृद्ध व्यक्तीने स्वेटर घातले होते. मान पुढे मागे करून दुसऱ्याच्या हाताने जेवण जेवण्याचा प्रयत्न ती व्यक्ती करत होती. थोड्या वेळानंतर त्याला समजले ही व्यक्ती अर्धांगवायुचा झटका आल्यानंतर १९९९ पासून अशाच पद्धतीने दुसऱ्यांच्या मदतीने आपलं कार्य करत आहे. समोर बसलेली आजी ही त्यांची अर्धांगिनी कलावती बापूराव विभूते होती. त्याला ज्यांची भेट घ्यायची होती तेच हे शाहीर बापूराव विभूते होते. समोर बसलेली त्यांच्या पत्नी त्यांना जेवण भरवत होत्या. बापूरावांना त्यांची कामे करता येत नव्हती. प्रत्येक गोष्टीसाठी बापूरावांना दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागत होते.



त्यांच्या पत्नीला त्याने त्याची ओळख करून दिली. नंतर बापूराव विभूतेंना पण त्याची ओळख करून दिली. त्यांनी त्याच्याकडे पहिले आणि ते गालात हसले. त्याला त्यांनी तुटक तुटक आवाजात विचारण्याचा प्रयत्न केला "नाव काय?, कुठून आलात?, कशाला आलात?" त्याने त्याची पुन्हा संपूर्ण ओळख त्यांना करून दिली. त्याला नंतर कळले की, त्यांना "आप्पा" म्हणतात. ते ज्या खाटेवर जेवत होते त्या खाटेच्या मागच्या बाजूला भिंतीवर असंख्य फोटो

फ्रेम लावलेल्या होत्या, या सर्व फोटो फ्रेम मध्ये बापूरावांचं शाहिरी आयुष्य दिसत होतं. कृष्णधवल फोटो त्यांच्या भिंतीची शोभा वाढवत होते. फोटोबरोबर बापूरावांना मिळालेली प्रशस्तीपत्रके देखील छान पद्धतीने प्रेम करून भिंतीला लावली होती.


थोड्याच वेळाने त्यांचा मुलगा शाहीर आदिनाथ विभूते, हा बाहेरून घरात आला. त्याच्यासोबत त्याला कार्यक्रमांमध्ये साथ–संगत करणारे बापूरावांचे जुने सहकारी देखील घरी आले. कामानिमित्त ते सर्व बाहेर गेले होते. त्याने त्या सर्वांना त्याची ओळख करून दिली. त्यांच्या शाहीर वडिलांवर डॉक्युमेंटेशन करायला आलेलो आहे हे सांगितल्यावर आदिनाथच्या आणि त्याच्या बऱ्याच गप्पा झाल्या. आदिनाथने त्यांच्या वडिलांबद्दल म्हणजेच बापूराव विभूते यांच्याबद्दलची बरीच माहिती सांगितली. एक खंत ही व्यक्तकेली "की बापूराव जेव्हा चांगले होते, त्यांचे पोवाडे जेव्हा चालत होते. तेव्हा भरभरून लोक त्यांना भेटायला घरी यायचे. पण जसे बापूराव अंथरुणाला खिळले, तेव्हा पासून त्यांच्याकडे लोकांनी मात्र पाठ फिरवली." गप्पा चालू असताना बापूराव विभूते संशोधकाकडे अगदीच निरखून पहात होते. त्याचप्रमाणे मध्ये–मध्ये मान देखील हलवत होते. बापूराव मध्ये–मध्ये खूप खोकत होते. त्यांना कफ आणि खोकला फारच झालेला होता. ते जिथे बसलेले होते त्यांच्या मागील बाजूस एक खिडकी होती (कोनाडा) त्यामध्ये बापूरावांची बरीचशी औषध ठेवलेली होती. थोड्यावेळाने बापूरावांची पत्नी बापूरावांच्या जवळ आली आणि त्यांना म्हणाली चला औषध पिऊन घ्या. कारण बापूरावांना खूप खोकला येत होता. त्यांच्या पत्नीने बापूरावांना औषध पाजले. नंतर त्यांना त्याच लोखंडी खाटेवर झोपवले. इकडे त्याच्या आणि आदिनाथच्या गप्पा छान रंगात आल्या होत्या. थोड्याच वेळात आदिनाथ यांचा छोटा मुलगा प्रसाद संशोधकासाठी चहा घेऊन आला. तेव्हा प्रसाद साधारणतः दहा वर्षाचा असेल, त्याने "आई" या विषयावर असलेलं गाण म्हणून दाखवलं. ते ऐकून त्याच्या आणि प्रसादच्या डोळ्यात पाणी आलं. एवढी ताकद त्याच्या गाण्यात होती. विशेष म्हणजे त्याच्या त्या गाण्याला कुठली ढोलकी, तबल्याची साथ संगत नव्हती. पण तरीही त्या गाण्यातील शब्द मनावर खोलवर आघात करणारे होते. ते गाणं असं **"चुकलं तुझं बाळ आई, रडत धाई धाई ग, तू येना माझे आई गं."**

इतिहास उलगडत गेला, बापूरावांचे जुने दिवस, बापूरावांची कला, बापूरावांच्या कार्यक्रमाला जमणारे लोक, बापूरावांच्या कार्यक्रमाची मजा, बापूरावांनी केलेले कार्यक्रम,

लोकांनी बापूरावांच्या शाहिरी कलेवरती केलेले प्रेम, या सगळ्या गोष्टी एकामागून एक आदिनाथने त्याला संगितल्या. गप्पा चालू असताना, बापूराव खाटेवरती पडून हे सगळं संभाषण ऐकत होते, ते झोपले नाहीत.

त्यांच्याच बाजूला राहणारे आणि त्यांना साथसंगत करणारे सर्जेराव दिनकर पवार यांनी सुद्धा संशोधकाशी गप्पा मारायला सुरुवात केली. त्यावेळेस बापूराव त्यांच्या बायकोच्या मदतीने खाटेवर उठून बसले. ते देखील गप्पा–गोष्टी ऐकत होते. सर्जेराव यांनी बापूरावांच्या जुन्या आठवणी त्याला सांगितल्या. त्यांनी सांगितले की, ज्यावेळेस फक्त तुणतुण्यावरची गाणी म्हटली जायची. त्यावेळेस बापूराव विभूते हे डोक्यावर डफ घेऊन, चालत आजूबाजूच्या गावा–खेड्यात जाऊन कार्यक्रम करायचे. शाहिरांचा पोवाडा म्हटलं की, आजूबाजूच्या गावातली लोक बैलगाडी घेऊन, पायपीट करत बुधगावच्या जत्रेला यायचे. तसेच आजूबाजूच्या गावात देखील बापूरावांचा कार्यक्रम पाहण्यासाठी लोक येत असत. बापूरावांचा तीन तासाचा पोवाडा लोक विस्मयतेने ऐकत असत. बापूराव एक गाणं म्हणायचे व्यर्थ ची पसारा व्यर्थ सारी आशा, कारे प्रभू हा मांडला तमाशा, त्यांच्या या गाण्याला खूप बक्षीस मिळायचं. एकामागून एक आठवणी ताज्या होत गेल्या. बापूरावांचा चेहरा स्मित हास्याने उजळून निघाला. बापूरावांच्या घरामध्ये त्यांचा एक खूप चांगला तरुणपणातील फोटो खूप मोठ्या फ्रेममध्ये भरून लावलेला आहे. त्या फोटोकडे पाहताच बापूराव विभूते यांचा रूबाब कळतो.

थोड्या वेळाने आदिनाथने बापूराव विभूतेंचा बायोडेटा त्याला आणून दिला. तो बायोडेटा हातात घेऊन पाहत होता, तोच बापूराव विभूतेंनी मला तो दे असे सांगितले. त्याने तो बायोडेटा लगेच बापूराव विभूतेंना दिला. पाहतो तर काय, बापूराव विभूते यांनी चक्क पंधरा ते वीस मिनिटे तो बायोडेटा वाचण्यात घालवले. तो वाचतानाची छायाचित्रे त्याने काढली. तो वाचतानाचा एक तल्लीनतेचा भाव, त्याला काढलेल्या फोटोत मिळाला. स्वतःचा बायोडेटा इतक्या मनापासून वाचणारा हा कलाकार खूप मोठा आहे. याची त्याला क्षणात कल्पना आली. त्यांचा बायोडेटा वाचून झाल्यावर, त्याला आप्पांनी तोच बायोडेटा वाचण्यासाठी दिला. तो एकटक आप्पांकडे पाहतच राहिला. फक्त इयत्ता दुसरी पर्यंत शिक्षण झालेल्या, या आप्पांच्या चिकाटीला व जिद्दीला त्याने मनातूनच सलाम केला.



सर्जेरावांच्या आणि त्याच्या गप्पा अशाच रंगात आल्या होत्या. तितक्यात बापूरावांना रडू कोसळले. कदाचित त्यांच्या जुन्या आठवणी, त्यांच्या मनामध्ये ताज्या झाल्या असाव्यात आणि आत्ताची परिस्थिती आहे ती त्यांना जाणवली असावी. एक कलाकार जेव्हा आजारी पडतो. तेव्हा त्याची काय अवस्था होते, हेच जणू त्यांच्या रडण्यातून दिसत होते. डोळे पुसत, स्वतःला सावरत बापूराव थोड्या वेळाने परत संशोधकाकडे बघू लागले. त्यांच्या बायकोने त्यांना समजावले. आदिनाथनेही त्यांची समजूत काढली. त्यानंतर बाबूराव विभूते हे शांत झाले.



सर्जेरावांनी जेव्हा त्याला त्यांचा डफाचा एक प्रसंग सांगितला. त्यावेळेस बापूरावांना खूप खूप आनंद झाला. बापूरावांना त्यांचे हसू लपवता आले नाही. ते खूप खदखदून हसले. तो एक आनंदाचा क्षण त्याच्या कॅमेरात कैद झाला.



त्याला बापूरावांचा एक फोटो हवा होता, बापूराव हातात डफ घेऊन बसलेले आहेत असा. त्याने आदिनाथला विनंती केली की, 'बापूराव हातात डफ घेऊ शकतात का?' आदिनाथ म्हणाला, ''हो! का नाही?'' आदिने लगेच डफ आणला आणि बापूराव विभूते यांच्या हातात दिला. त्याने बापूरावांना त्यांचा एक जुना फोटो आहे, त्याच्या पुढच्या बाजूला, हातात डफ घेऊन बसवले. डफाचा बादशहा त्याला हवा असल्याकारणाने तो फोटो अरेंज करणं भाग होतं. मग आप्पांचा डफासोबत एक सुरेख फोटो काढला. मागच्या बाजूच्या फोटोतील तरुण बापूराव देखील, त्याच्याकडे बघत आहेत असे त्या फोटोमधून दिसते. त्या फोटोच्या बाजूला हनुमान डोंगर घेऊन जात आहे अशी छोटीशी फ्रेम देखील त्या फोटोमध्ये दिसते.



१९ नोव्हेंबर, २००७ ला संशोधक, पुन्हा बापूराव विभूते यांना भेटायला दुसऱ्यांदा त्यांच्या बुधगावला गेला. तेव्हा त्याने पाहिले की, बापूराव विभूते यांच्या घराबाहेरील मागील अंगणात एका दगडावर बसले होते आणि त्यांची बायको त्यांना अंघोळ घालत होती. अंघोळ घालून झाल्यावर त्यांना त्यांच्या बायकोने लुंगी नेसवली. त्यानंतर त्यांच्या डोळ्यांवर चष्मा लावला आणि त्यांना हळूहळू चालवत त्यांच्या लोखंडी खाटेवर आणून बसवले. या सर्वांची छायाचित्रे त्याने काढली. बापूरावांनी परिधान केलेली पांढरीशुभ्र लुंगी त्यांना फारच शोभून दिसत होती. त्यांच्या गळ्यात असलेला मणी आणि काळा दोरा त्यांनी शर्ट न घातल्यामुळे त्याच्या कॅमेरात कैद झाला.



बापूरावांनी काही क्षण छताकडे पहिले. त्याला कळलं नाही की, अस ते का करतात? कदाचित ते त्यांच्या जुन्या आठवणीत गेले असावेत.



नंतर आदिनाथ आला आणि प्रसाद देखील आला. त्याने थोडा वेळ गप्पा मारल्या. सर्वांची विचारपूस केली आणि आदिनाथला सांगितले की, आज आपण परत बापूराव विभूतेंची थोडीशी माहिती जाणून घेऊया. आदिनाथ म्हणाले, काही हरकत नाही. आदिनाथला त्याने सरळ विचारले, ''बाबा आता गातील का?'' त्याला ते विचारताना थोडसं अवघडच वाटत होतं. कारण तेव्हा त्यांच्या बाबांची तब्येत तेवढी काही बरी नव्हती. आदिनाथ म्हणाला, ''आपण प्रयत्न करून बघू या. त्यांची स्मरणशक्ती किती चांगली आहे. त्यात त्यांनाही कदाचित आनंद मिळेल.'' मग आदिनाथने बाजूला राहणारे, तबला वाजवणारे साथीदार बोलवले. आदीनाथने खंजरी स्वतःच्या हातात घेतली. तीन खुर्च्या मांडून एका खुर्चीवर आदिनाथ बसला. मधल्या खुर्चीवर बापूराव विभूते बसले आणि बाजूच्या खुर्चीवर बापूराव विभूतेंची बायको बसली. मग आदिनाथने शिवरायांचा पोवाडा गायला सुरुवात केली. बापूराव विभूतेंची बायको त्या पोवाड्याला कोरस देत सहभागी झाली. थोड्या वेळाने चक्क बापूराव पोवाडा म्हणू लागले. थोडेथांबत थांबत का होईना पण बापूरावांनी पोवाडा गायला. बापूरावांना तो पोवाडा पूर्ण तोंडपाठ होता, तो ऐकल्यामुळे, तोही फार आनंदित झाला, कारण खूप वर्षानंतर एका कलाकाराला ऐकण्याची संधी संशोधकाला मिळाली होती. बापूंच्या घरातली सर्वच मंडळी फारच खूष झाली. कारण खूप दिवसानंतर बापूंना पोवाडा गाताना त्यांनी पाहिले होते.

थोड्या वेळाने बारा वर्षाच्या प्रसादने देखील, आई वरील एक गाणं त्याला दुसऱ्यांदा ऐकलं. नंतर तो रडू लागला कारण विचारलं असता त्याने काही न सांगता रडणं सुरू ठेवलं. नंतर प्रसादच्या आईने त्याला सांगितलं की त्याला त्याच्या भावाची आठवण आली, ते दोघं हे गाणं म्हणत असत. त्याचा भाऊ इयत्ता बारावीत असताना एका अपघातात मरण पावला. प्रसाद काही रडायचे थांबत नव्हता. नंतर त्याला त्याच्या वडिलांनी समजावले, इतकेच काय तर बापूराव विभूते यांनी देखील समजावले. मग थोड्या वेळाने प्रसाद शांत झाला.



संशोधकाच्या कलेने बापूरावांच्या आठवणींना उजाळा दिला होता. एक कलाकार म्हणून त्यांना घरात का होईना, त्यांना परफॉर्म करायला त्याने भाग पाडले होते. कित्येक वर्षाच्या त्यांच्या मनात दाटून राहिलेल्या आठवणी, त्याच्या कलेपुढे जिवंत झाल्या होत्या. त्यांचं खूप वर्षांपूर्वीचा हास्य त्याच्या कलेमुळे पुन्हा जिवंत झालं होत. एक तपस्वी कलाकाराच्या आठवणी त्याच्या कॅमेर्यात कैद झाल्या होत्या.

३.१० : घटकाभ्यास क्रमांक :१०

उद्धव शिंदे

३.१०.१ उद्धव शिंदे यांचा जीवन प्रवास

उद्धव शंकरबापू शिंदे (आपेगावकर) हे एका वारकरी आणि शेतकरी कुटुंबात ९ मार्च, १९५४ रोजी, आपेगाव, तालुका अंबेजोगाई, जिल्हा बीड येथे जन्मले. हे एक छोटे खेडेगाव आहे. त्यांचे वडील शंकरबापू मारुतीराव शिंदे (आपेगावकर) यांना त्यांच्या पखावज वादनासाठी भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार दिला आहे. उद्धवजींच्या पंजोबापासून ही पखावज वादनाची परंपरा त्यांच्या पिढीमध्ये चालू आहे. त्यांचे पंजोबा तुळजाराम शिंदे यांनी वारकऱ्याची माळ गळ्यात घालून पखवाजवर पहिली थाप मारली. त्यानंतर त्यांचे वडील शंकरबापू शिंदे यांनीही तेच केले. त्यामुळे वारकरी संप्रदाय आणि पखावज याचे संस्कार बालपणापासूनच उद्धवजी त्यांच्यावरती झाले. उद्धवजी हे त्यांच्या वडिलांना एकुलते एकच होते. त्यांच्याकडे ५० एकरची शेती आहे. जमीन फारच सुपीक असल्याने, शेती हाच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा मुख्य व्यवसाय आहे.

महाराष्ट्रातले जे जुने कीर्तनकार होते–वैकुंठराव देविलोडकर असतील, शंकर महाराज कंधारकर असतील, आताचे बाबा महाराज सातारकर असतील या सगळ्या महाराजांच्या कीर्तनातून बऱ्याचदा शंकरबापू शिंदे यांनी पखवाज वाजवले. मृदंग अर्थात पखावज हे केवळ भजन, कीर्तन आदींसाठी परिचित असलेले वाद्य आहे.

उद्धवजींच्या वडिलांचे शिक्षण फक्त चौथीपर्यंत झालेले. त्यांच्या वडिलांना सगळे बापू म्हणत असत. शिक्षणाचा कधीही विषय निघाला की बापू खंत व्यक्त करायचे की, 'माझ्या जीवनात मी शिकलो नाही.' म्हणूनच बापूंनी उद्धवजींना सर्वांचा विरोध पत्करून सांगितले की, 'अगोदर तू बी. ए. कर, अगोदर तू डिग्री घे, मग मी तुला ही विद्या शिकवतो. कारण ही विद्या घरची आहे. शिक्षणाचा फायदा तुला आत्ताच कळणार नाही. त्यामुळे तू पहिले शिक्षण घे आणि नंतर संगीत शिक.'

उद्धवजी ८ वी इयत्तेत शिकत असताना शाळेत जाण्यासाठी ते घरापासून १० किलोमीटर लांब असलेल्या, एका छोट्याशा गावात पायी जायचे आणि शाळा सुटल्यावर १० किलोमीटर पायी घरी यायचे. १९७० सालापर्यंत त्यांना चपला कशाला म्हणतात व बूट काय असतात हे सुद्धा माहिती नव्हते.

उद्धवजींनी त्याचं बी. ए. पर्यंतच शिक्षण पूर्ण केलं. वारकरी संप्रदायातल्या काही प्रतिष्ठित मंडळींनी शंकरबापूंकडे आग्रह धरला की, 'आता, तुम्ही उद्धवला पखावज शिकवायला पाहिजे.' शंकरबापूंनी लोकांचे ऐकले आणि उद्धवजींना गुरु-शिष्य परंपरेतून शिकवायला सुरुवात केली. भारतीय संस्कृतीमध्ये गुरु-शिष्य परंपरा ही फार मोठी देणगी आहे.

उद्धवजींचा रियाज खेडेगावात झाला, शेतावरती झाला. शंकरबापू सांगायचे, "तू रियाज कर, तू प्रामाणिकपणे अभ्यास कर. तू माळरानावरती जरी वाजवायला गेलास, तरी तेथे तुझा पखावज ऐकायला लोक येतील. तू तुझ्या गुरूशी, तुझ्या वाद्याशी, तुझ्या वारकरी संप्रदायाशी प्रामाणिक रहा, एकनिष्ठ रहा." मग उद्धवजी कोठेही, झाडाखाली, त्यांच्या उतरणीच्या खोलीत, शेतात असा चार-चार, पाच-पाच तास रियाज करायचे.

उद्धवजीं ज्यावेळेस पहिल्यांदा पखवाज वाजवायला बसले, त्या दिवशी पाडवा होता व सकाळी १०ची वेळ होती. जुनी जाणकार मंडळीही त्यांच्या समोर बसली होती. पखवाज वाजवायला बसल्यावर शंकरबापूंनी उद्धवजींना पहिला जो धडा दिला, तो फारच चकित करणारा होता. शंकरबापू म्हणाले की, "आजपासून तुझे आणि माझे हे फक्त गुरू-शिष्याचे नातं असेल. त्यामुळे आता हे माझे वडील आहेत, मला प्रेमानं शिकवतील, चुकलं तर माफ करतील हे सर्व मनातून तू काढून टाक."

उद्धवजींनी देखील त्यांच्या वडिलांचे हे शब्द पाळले. उद्धवजींनी वडील या नात्याने, शंकरबापू त्यांच्याकडे कधीच काही मागितले नाही. मग तो सादा बिस्किटचा पुडा असेल, नवीन कपडे असतील, वडील जे सांगतील ते, अगदी प्रामाणिकपणे उद्धवजी करत गेले. शास्त्रीय संगीतामध्ये एका धड्याचा रियाज दोन-दोन ते चार-चार महिने करावा लागतो. उद्धवजींना असं वाटायचं की, त्यांच्या वडिलांचा त्यांच्यावरती विश्वास नाही. शंकरबापू त्यांना शिकवण्यामध्ये काही कमीपणा दाखवतात. ही खंत उद्धवजींनी सन १९७७-१९७८ साली समाजातल्या काही मोठ्या मंडळींना बोलूनही दाखवली. लोकांनी बापूंना जाऊन विचारले, बापू

उद्धवची प्रगती कशी चाललीय? त्याला असे वाटतेय की, बापूचं त्याच्याकडे लक्ष नाही आहे. तेव्हा ते हसले आणि म्हणाले, ''मी त्याला जे शिकवतोय, त्याचं महत्त्व त्याला आत्ताच कळणार नाही. काही काळानंतर त्याला ते कळेल.'' फारच कठीण रियाज त्या काळी शंकरबापूंनी उद्धवजींकडून करून घेतला.

शंकरबापू सांगायचे की, "संगीत हा विषय डोक्याचा फार कमी आहे. एखादं गाणं बेसूर आलं, एखादा ताल चुकला तर अगदी सर्वसामान्यांना कळतं. हे झालं डोक्याचं संगीत. पण तीच चूक जेव्हा तुम्हाला दुरुस्त करायची असते तेव्हा तुमचं ज्ञान आवश्यक आहे. म्हणून डोक्यापेक्षा तुमचा रियाज फार महत्त्वाचा आहे." त्या काळात शंकरबापू हे उद्धवजींना सांगायचे, "गुरू जेव्हा सांगतो तेव्हा तो फार थोडं सांगतो. मग तुम्ही त्याचा विचार जास्त करायचा आणि त्याचा रियाज, त्याचं प्रॅक्टिकल खूप खूप जास्त करायचं."

शंकरबापू हे उद्धवजी यांना सांगायचे, "हे बघ, तू माझा मुलगा आहेस. घर, शेती, पैसा हे सगळे घे. पण तुला ज्यावेळेला संगीत घ्यायचंय, त्यावेळेला तुला रियाजच करावा लागेल. लोक एखाद्यावेळेला तुझा सन्मान करतील." पद्मश्री शंकरबापूंचा मुलगा, "ही शाल घ्या, हे हार घ्या आणि स्टेजच्या खाली जाऊन बसा. पण जेव्हा तुला स्टेजवर बसायचे असेल त्यावेळेला तुला तेवढ्याच ताकदीनेच रियाज करावा लागेल."



कुठलंही कार्यक्रमाचं निमंत्रण आले की, शंकरबापू हे उद्धवजींना सांगायचे बघ कार्यक्रमाचं निमंत्रण आलंय, रियाज कर. त्यामुळे उद्धवजींना कुठलाही कार्यक्रम आला की, खूप धास्ती वाटायची. उद्धवजी कोठेही पखावज वाजवायला गेले आणि तेथे त्यांनी वडिलांचं नाव घेतले की, लोकांच्या अपेक्षा वाढायच्या. उत्तर भारतात गेले तर लोकं म्हणायची, 'ये शिंदेसाहब का बेटा हैं। शिंदेसाहब तो बहुत अच्छे पखवाजी हैं, चलो चलो प्रोग्राम देखते हैं। पता नहीं उनका बेटा कैसा बजाता हैं।' म्हणून उद्धवजींना फारच काळजी वाटायची. म्हणूनच उद्धवजी तासनतास, जेवढा होईल तेवढा रियाज करत असत. ज्यावेळेस उद्धवजी कार्यक्रमामध्ये वाजवायचे, तेव्हा बऱ्याचदा बापू त्यांच्यासमोर असायचे. जर चुकलं तर मग माफी नसायची. मग तो कार्यक्रम असो, समोर माणसं असोत, शंकरबापू तेथेच उद्धवजींना रागवायचे. उद्धवजी हे कोठे चुकले हे कधीच त्यांनी उद्धवजींना एकांतात सांगितलं नाही. जेथे बरीच मंडळी असायची तेथेच ते त्यांना सांगायचे. "बघा, उद्धव असा चुकला." त्याचं उद्धवजींना फारच वाईट वाटायचं. पण या गोष्टीचा उद्धवजींवरती फार मोठा परिणाम झाला. आपण चुकू नये याची उद्धवजींना जेवढी काळजी घेता येईल, तेवढी काळजी त्यांनी घेतली.

१९७३ साली सीनिअर डागर बंधू दिल्लीवाले यांचा मुंबईला कार्यक्रम होता आणि उद्धवजींचा तो पहिलाच मोठा कार्यक्रम होता. त्यावेळी पहिल्यांदा उद्धवजी मुंबईला गेले. मोठे शहर बघून, डागर बंधूचा पोशाख बघून, ती साऊंड सिस्टीम बघून, एवढं सगळं आधुनिक होतं की तेथे अक्षरशः उद्धवजींना काय वाजवायचंय, हेच ते विसरून गेले. हा त्यांच्या आयुष्यातला एक खडतर प्रसंग होता. डागर बंधू उठले. तेव्हा शंकरबापू समोर बसले होते. डागर बंधू म्हणाले, "अरे शिंदे साहब, लगता हैं बेटा थोडा घबरा गया हैं।" त्यांनी उद्धवजींच्या पाठीवरून हात फिरवला आणि म्हणाले, "बेटा घबराने की कोई बात नहीं। आपकी तालीम बहुत अच्छे गुरू से हुयी हैं।" मग उद्धवजींना धीर आला आणि उद्धवजींनी पखवाज असा वाजवला की सर्व रसिक मंत्रमुग्ध झाले. असे काही प्रसंग उद्धवजींच्या आठवणीतले आहेत.

१९९२ साली त्यांच्या वडिलांनी उद्धवजींना रियाजामध्ये खंड पडू नये, म्हणून चक्क तीन वर्ष लातूरच्या एम. आय. टी. इंजिनिअरिंग कॉलेजला पाठवले. तेथे उद्धवजी कॉलेज कॅन्टीनच्या गल्यावरती बसायचे व बाकीच्या वेळेस पखावजाचा रियाज करायचे. पुढे नंतर त्यांनी औरंगाबादला देखील पाच-सहा वर्ष रियाज केला.

ज्याला आपण फ्युजन म्हणतो, ते फ्युजन म्हणजे काय? उद्धवजींचा पखवाज आहे. त्यांची परंपरा, त्यांची वाजवण्याची पद्धत, त्याच्यात बदल न करता दुसऱ्याबरोबर साथ–संगत करणे, याला फ्युजन म्हणतात. उद्धवजींनी जर पखवाजवर तबला वाजवला, ढोलकीचा ताल वाजवला तर ते झालं रिमिक्स. पण उद्धवजी जर तबल्या बरोबर जुगलबंदी करतात, तबल्यावाला त्याच्या पद्धतीने वाजवत आहे आणि उद्धवजी त्यांच्या पद्धतीने वाजवत आहेत. जर एखादं वेस्टर्न इन्स्ट्रमेंट असेल, चैलो असेल, गिटार असेल ते त्याच्या पद्धतीने चालतेय. पण उद्धवजी त्यांच्या पखवाजचा धा ता त्यांच्या पद्धतीने चालतो. त्यालाच म्हणायचं फ्युजन. त्या सूत्राला धरून उद्धवजींची ही परंपरा चालू आहे. रियाज ही फार मोठी गोष्ट आहे. रियाजशिवाय काहीही शक्य नाही.

उद्धवजींच्या आठवणीतील एक प्रसंग. पणजीला संगीत नाटक अकादमीचा कार्यक्रम होता. भारतामधले सगळे पखवाज वादक तेथे गोळा झाले होते. त्यावेळेस उद्धवजी तेथे त्यांच्या खोलीत रियाज करत होतो. ते तिथल्या संयोजकाने ऐकले आणि येऊन म्हणाला, "अरे बेटा, तू बहुत ही अच्छा बजाता हैं। चलो आज तू बजाओ।" उद्धवजी म्हणाला, "गुरू से पुछो।" मग शंकरबापूंना सांगितले. शंकरबापूंनी परवानगी दिली आणि मग उद्धवजींनी इतके छान वाजवले की लोक फारच खूश झाले. पण तेथे उद्धवजींची एक चुक झाली आणि ती चूक त्यांचे गुरू शंकरबापूंना कळाली. लोक समोरून टाळ्या वाजवतात, त्याचवेळेस बापू ताडकण उठले आणि म्हणाले, "अरे बेवकुफ, तू लोकांना काय मूर्ख बनवतो का? काय वाजवलंस तू." उद्धवजी फारच घाबरले. तेथे उद्धवजींचा पखवाजच बंद झाला, त्यांचे हातच चालेना. असे प्रसंग आले. पण यातून उद्धवजी खूपच शिकले.



शेवटच्या क्षणी शंकरबापूंनी उद्धवजींना सांगितले की, "फार मोठ्या कलावंताचा मुलगा आहेस तू, त्यामुळे आयुष्यात तुझं चुकलं तरी कोणाची हिंमत होणार नाही की, तुझं चुकलं म्हणून सांगायची" आणि तसंच झालं. शेवटी संगीत आहे, चुकतंच. पण खरोखरच हिंमत झाली नाही कोणाचीच की, तुमचं इथं चुकतंय म्हणून सांगायची. शंकरबापूंनी शेवटी सांगितलं की, "तू मोठा होशील पण आता एक कर, आयुष्यात माणसं सांभाळ. तुझ्याजवळ जेवढी माणसं येतील, तेवढी तू गोळा कर आणि संगीत सुरू ठेव."

एक प्रसंग उद्धवजींनी सांगतात. सन १९९४ मध्ये वेरूळ महोत्सव होता. तेथे डागर बंधूंच्या साथीला उद्धवजी होते. कार्यक्रम खूप रंगात आला उद्धवजींनी त्या कार्यक्रमात फारच छान पखावज वाजवला. त्यावेळेस त्यांच्या वडिलांनी कार्यक्रम संपल्यावरती स्टेजवर येऊन उद्धवजींना शाब्बासकी दिली. हा उद्धवजींच्या आयुष्यातला फारच महत्त्वाचा क्षण होता, असे उद्धवजी सांगतात. कारण शंकरबापू कधी शब्बासकी देत नव्हते.



शंकरबापूंनी एकदा सैदुद्दीन यांना सांगितले की, "सैदसाहब, उद्धव अभी लगता हे की, कुछ अच्छा बजाता हैं। तो आप उसे कुछ स्टेज दे दो।" त्यांनीही ते मान्य केले आणि उद्धवजींना संधी दिली. सैदुद्दीन डागर यांच्याकडे उद्धवजींनी पहिले पखवाजच्या साथीचे धडे घेतले. त्यांच्याबरोबर फिरायचे, त्यांची सेवा करायचे. हळूहळू त्यांच्यासोबत एक-एक मैफिली करत राहिले. मग 'सूर-सिंगार संसद', मुंबई असेल, 'स्वर साधना', मुंबई असेल असे छोटे-मोठे कार्यक्रम उद्धवजी करत गेले.

त्यांच्या भागामध्ये जेथे जेथे सैदुद्दीन डागरांचा कार्यक्रम असायचा, तेथे तेथे त्यांना उद्धवजी साथ-संगत करायचे. अशा पद्धतीने उद्धवजींचा प्रवास चालू झाला. पुढे उस्ताद जहामुद्दीन डागर साहेब, यांच्याशी उद्धवजींचा संपर्क आला. त्यांनी पण त्यांना पखावज वाजवायला सांगितले. पुढे मग वासिपुद्दीन डागर असतील, खैमुद्दीन डागर असतील किंवा ध्रुपदातल्या या ज्या मोठ्या व्यक्ती आहेत, त्यांच्याबरोबर उद्धवजींनी वाजवले आणि आताही वाजवतात.

२००१ साली उद्धवजींना पहिली संधी युरोपला जाण्याची मिळाली. ख्यातनाम ध्रुपद गायक उस्ताद सैदुद्दीन डागर यांनी, त्यांना पहिली संधी दिली. २००१-२००२ मध्ये त्यांनी दोन-दोन महिन्यांच्या टूर केल्या. तेथे उद्धवजींना खूप शिकायला मिळाले. योगायोगाने बरीच मित्रमंडळी त्यांना भेटली. काही चांगले शिष्य झाले.



भारतीय शास्त्रीय पखवाज ही आपली कला आहे. एक लौकिकाचा भाग या दृष्टिकोनातून उद्धवजी युरोपला गेले. युकेला गेले. एवढे मात्र खरे की त्या ठिकाणी जाऊन उद्धवजींना बरेच शिकायला मिळाले. शिक्षणानेच माणूस कलावंत होतो, तो परिपूर्ण होतो. नुसती कलाच त्याच्याकडे असून फायदा नाही. आदान–प्रदान,चालणं–बोलणं, वेळेचा वक्तशीरपणा, काटकसर या सगळ्या गोष्टी त्या व्यक्तीला आल्या पाहिजेत आणि त्या दृष्टिकोनातून उद्धवजी युरोपला काही गोष्टी शिकले. म्हणूनच ते वरच्या वर त्यांचे पखावज वाजनाचे कार्यक्रम बाहेरील देशात करत आहेत.



अंबेजोगाईला, विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना शंकरबापूंचा महाराष्ट्र शासनाने सत्कार केला. विलासराव देशमुखांनी बापूंना विचारलं की, "काही तरी मागा, येथे एवढी तुमच्या ओळखीची माणसं आहेत." बापू म्हणाले, "बघा बरं का, मी लोकांसमोर मागेल हा. विलासराव म्हणाले,"ठीक आहे मागा." शंकरबापू म्हणाले, "माझी कला, परंपरा लोकांना जर पटत असेल तर, महाराष्ट्र शासनाने एक गुरूकुल उभं करावं, जेथे मी ही कला बाकीच्यांना शिकवू शकेल असं." त्यावेळेला त्याचा विचार झाला आणि २००४ साली अंबेजोगाईला गुरू–शिष्य परंपरेतलं गुरूकुल उभं राहील. पुढे याच गुरुकुलात उद्धवजींनी देखील ध्रुपद आणि पखवाज याची गुरू–शिष्य परंपरेतून सेवा दिली.



बिहारची काही वेगळी परंपरा आहे. काही मोठी घराणी आहेत. त्यांच्याबरोबर उद्धवजी हे पखावज वाजवतात. आता नवीन पिढीमधील भोपाळचे गुंडेच्या बंधू असतील, दिल्लीचे अशिष शंक्रदायन असतील, पुण्याचे उदय भवाळकर असतील, सैयद साहेबांची मुलं नफीस डागर, अनिस डागर हे असतील यांच्यासोबत आता उद्धवजींना वाजवायला मिळतंय. उस्ताद जहाऊद्दीन डागर जे रुद्रवीणाचे फार मोठे कलाकार. त्यांचा जो मुलगा उस्ताद बहाऊद्दीन डागर त्यांच्याबरोबर देखील उद्धवजी वाजवतात. म्हणजे एक पिढी की ज्यांनी त्यांच्या गुरुंबरोबर वाजवलं (उद्धवजींच्या वडिलांबरोबर) आणि त्यांचे जे शिष्य आहेत त्यांच्याबरोबर उद्धवजी वाजवत आहेत. हा एक फार मोठा योगायोग आहे. त्यांनाही उद्धवजींचे पखवाज वादन आवडते.

उद्धवजी शिंदे हे आताही म्हणजेच वयाच्या ६४व्या वर्षी देखील सकाळी पाच वाजता उठतात. तीस मिनिटे चालतात. नंतर ४५ मिनिटे योगासने करतात. त्यानंतर नाश्ता, आंघोळ करून दोन तास पखावजाचा रियाज करतात. त्याचप्रमाणे संध्याकाळी देखील दोन तास रियाज करतात, हा त्यांचा नित्यक्रम आहे.

उद्धवजींनी सन २०१७ मध्ये आळंदी येथे संपन्न झालेल्या श्री श्री रवी शंकर यांच्या वर्ल्ड फेस्टिवल कार्यक्रमात ९००० मृदंग वादकांना सोबत घेवून वारकरी संप्रदायाची सांघिक बैठक संपन्न केली. जिचा उल्लेख 'लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये झाला आहे. उद्धवजींनी पखवाज–बासरी, पखावज–सीतार, पखावज–तबला, पखावज–चेलो, पखावज–क्लोरोनेट, पखावज–ओफ्रीकन ड्रम्स, पखावज–सुफी संगीत, पखावज–युरोपियन बँड, पखावज–ऑपेरा

संगीत, पखावज–३६ (साऊथ आफ्रिकेतील प्रचलित वाद्य), पखावज–सेक्सोफोन, पखावज–युरोपियन गिटार, पखावज–भरतनाट्यम्, पखावज–मृदंगम्, पखावज–कश्यक, पखावज–रुद्रवीणा, पखावज–सुरबहार, पखावज–युरोपीयन व्हायलीन या वाद्यांबरोबर जुगलबंदी आणि साथ संगत केली. पखवाज जागतिक पातळीवरती घेऊन जाण्याचे काम उद्धवजींनी केले. 'नाद–सुफी' ही गालीया बेनाली, लुनिजीया येथील सुफी गायिका आणि उद्धवजींचा पखावज अशी अनोखी मैफिल भारतभर आणि जगभरात गाजली. आफ्रिकेचा कलावंत (नट) फ्रान्सिस व अमेरिकेची नृत्यांगना डेविटा पॉल यांनी अनुक्रमे विठ्ठल व मीरा यांचे पात्र (चरित्र) अभंगवाणीच्या माध्यमातून परदेशी पाहुण्यांपुढे मांडून भारताच्या समृद्ध भक्ती संगीत परंपरेचा परिचय युरोप मध्ये करून दिला. तेथे पखवाज वादक म्हणून उद्धवजी होते. भारतीय भक्ती व शास्त्रीय संगीताची गोडी परदेशी कलावंतांमध्ये आणि रसिकांमध्ये रुजवण्याचे काम उद्धवजींनी केले व आताही करत आहेत.



उद्धवजींनी 'स्पीक मॅके' या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गाजलेल्या अभिजात शास्त्रीय संगीताच्या प्रसार व प्रचारासाठी असलेल्या समुदायामार्फत व्याख्याने, पखावज वादन, कार्यशाळा यांचे आयोजन केले. यात प्रामुख्याने बँगलोर, आयआयटी पवई, आयआयटी जबलपूर, आयआयटी दिल्ली, एनआयटी अलाहाबाद आदी ठिकाणाचा समावेश आहे.



पखावजाचा शास्त्रशुद्ध अभ्यास व त्यावरची सप्रयोग व्याख्याने उद्धवजी यांनी जागतिक पातळीवर दिली आहेत. यात मुख्यत्वे:

१) पॅरीस युनिव्हर्सिटी (फ्रान्स)

२) ब्रुसेल्स युनिव्हर्सिटी (बेल्जियम)

३) बर्लिन युनिव्हर्सिटी (जर्मनी)

४) नान्ट युनिव्हर्सिटी (साऊथ ऑफ फ्रान्स)

५) ट्रॉपिकल इन्स्टिट्यूट (नेदरलँड)

६) ब्रिटीश इंटरनॅशनल स्कूल (टॉटवर्प)

७) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी–लुयीन कॉलेज, योगा सेंटर, इत्यादींचा उल्लेख करावा लागेल.

उद्धवजींनी भारतातील व भारताबाहेरील अनेक प्रतिष्ठीत शास्त्रीय समारंभात त्यांचे पखावज वादन सादर केले आहे. त्यात प्रामुख्याने:

१) स्वामी हरिदास संगीत समारोह – वृंदावन

२) सप्तक समारोह – अहमदाबाद

३) संगीत नाटक ॲकॅडमी महोत्सव, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, उदयपूर, अहमदाबाद

४) दसरा फेस्टिवल–म्हैसूर

५) पणजी कला ॲकॅडमी–गोवा

६) एल्लोरा फेस्टिवल–औरंगाबाद

७) जालंदर महोत्सव–पंजाब

८) गिरनार फेस्टिवल–गुजरात, बेंगलोर

९) धृपद समारोह–वाराणसी, जोतपूर, पटना, इंदौर, गया

१०) वर्ल्ड पिस फेस्टिवल–ब्रुसेल्स

११) युरोपालीया फेस्टिवल–जर्मनी

१२) दरबाद फेस्टिवल–लंडन

१३) नाद फेस्टिवल–नेदरलँड

१४) डेन्मार्क फेस्टिवल–कोपनहेगन

उद्धवजींनी भारतातील अनेक ज्येष्ठ धृपद गायक व वादकांसोबत साथसंगत केली आहे आणि आताही करत आहेत. त्यात प्रामुख्याने:

१) पद्मश्री वासीफउद्दीन डागर (दिल्ली)

२) पद्मविभूषण अमीननुद्दिन डागर (कोलकत्ता)

३) पद्मश्री सियाराम तिवारी (पटना)

४) पद्मश्री गुंडेचा बंधू (भोपाळ)

५) उस्ताद सईउद्दीन डागर (जयपूर)

६) पं. उदयजी भवाळकर (पुणे)

७) पं. भाऊद्दीन डागर (मुंबई)

८) पं. पुष्पराज कोष्टी (मुंबई)

९) नॅन्सी (अमेरिका)

१०) बर्ट कॉर्नलीस (पॅरीस)

११) डॅनियल (बेल्जियम) इ.

उद्धवजींना **शासकीय तथा निमशासकीय** असे अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत.

१) सांस्कृतिक पुरस्कार २०११–महाराष्ट्र शासन

२) तालमनी २०००– सूर–शिंगार, मुंबई

३) पखावज श्री १९९८–इंदौर

४) सर्वश्रेष्ठ सन्मान–वाराणसी

५) बेस्ट ड्रम्स प्लेअर २००१–नेदरलँड

६) पखावज रत्न १९९९–इंदौर

७) गीरनार रत्न २०१३–गुजरात

८) स्वरसाधना रत्न २००४–मुंबई.

३.१०.२ उद्धवजींची शिंदे यांची भेट

सन २००६ रोजी संशोधकाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे उद्धव शिंदे (आपेगावकर) यांचा पहिला पखावज जुगलबंदीचा कार्यक्रम पाहिला. त्यांच्या सोबत त्यांचे काही शिष्य पखावज वाजवित होते. सर्वांनी फारच श्रवणीय पखावज वाजवला, तेव्हा संपूर्ण यशवंतराव चव्हाण सभागृह त्यांच्या पखावजाने दुमदुमून गेले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वजण उद्धवजींना भेटायला गेले आणि कार्यक्रम फार छान झाला, असे त्या सर्वानीच उद्धवजींना सांगितले. त्याची ती उद्धवजींच्या सोबतची पहिलीच भेट होती.



काही दिवसानंतर त्याने उद्धवजींना फोन केला आणि त्यांचा एक कार्यक्रम मुंबईमध्ये पुन्हा एकदा ठेवावा, अशी विनंती केली. त्यांनी होकार दिल्यानंतर त्याने लोकशाहीर विठ्ठल उमप व त्यांचा मुलगा नंदेश उमप यांना उद्धवजींच्या कलेबद्दल सांगितले. लोकशाहीर विठ्ठल उमप म्हणाले की,'आपण उद्धवजींचा एक कार्यक्रम ठेवूया.' सन २००७ रोजी विठ्ठल उमप प्रतिष्ठानच्या वतीने उद्धवजी शिंदे आणि ज्युडी रस्ट (बेल्जियमच्या ऑपेरा सिंगर) यांचा खेळ मांडियेला हा मराठी अभंग आणि पखावज जुगलबंदीचा कार्यक्रम ठेवला. ज्युडी रस्ट यांनी वेगवेगळे मराठी अभंग गाऊन दर्शकांची मने जिंकली. त्यांना मृदुंगावर साथ–संगत उद्धवजींनी केली. खेळ मांडियेला या कार्यक्रमात ज्युडी रस्ट यांनी चक्क दहा ते बारा वेगवेगळे मराठी अभंग गायले. अशी एक वेगळी मैफिल लोकांनी अनुभवली. हा कार्यक्रम दर्शकांना फारच आवडला. एक वेगळा कलाविष्कार लोकांनी अनुभवला.

त्यानंतर उद्धवजींची आणि त्याची चांगलीच मैत्री झाली. त्यांनी त्याला ३१ ऑक्टोबर, २००७ रोजी पुण्याच्या एका कार्यक्रमासाठी बोलावले. ज्यामध्ये एकाच वेळेस ८ पखावज वादक, पखावज वादन करणार होते. तसेच, तेथे ज्युडी रस्ट यांचे अभंग गायन देखील होणार होते. संशोधक तेथे गेला. त्या कार्यक्रमासाठी एका खाजगी बसमधून जाताना उद्धवजी, ज्युडी रस्ट यांच्याशी गप्पा मारताना व त्या कुतूहलाने उद्धवजींचे बोलणे ऐकतानाचा, एक वेगळा फोटो त्याला तिथे मिळाला. नंतर त्याने कार्यक्रमात उद्धवजी त्यांच्या बाकीच्या शिष्यांसोबतची जुगलबंदीची देखील छायाचित्रे काढली. अशा पद्धतीने संशोधक दोन दिवस उद्धवजींच्या सोबत पुण्याला राहिला.



संशोधक हा २० डिसेंबर, २००८ रोजी उद्धवजींच्या घरी गेला कारण त्याला उद्धवजींसोबत त्यांचे काही कार्यक्रम छायाचित्रीत करायचे होते. तसेच, त्यांच्या आपेगावला जाऊन त्यांचे जन्मगाव देखील पाहायचे होते. म्हणून संशोधक अंबेजोगाईला गेला. जेथे उद्धवजी २००४ सालापासून राहत आहेत. तो व उद्धवजी दुसऱ्या दिवशी सकाळी आपेगावला गेले. त्या गावात उद्धवजींचं जुनं घर त्याने पहिले. त्यांचे वडील शंकरबापू शिंदे यांना मिळालेले पद्मश्रीचे मानपत्र त्यांच्या, याच घरात गाईच्या गोठ्याजवळ एका भिंतीवरती लावले होते. थोड्याच वेळाने, तो उद्धवजींसोबत त्यांच संपूर्ण गाव फिरला, त्यांच्या शेतात गेला. तेथे

उद्धवजी त्यांच्या बैलाजवळ गेले आणि त्यांच्या बैलाला ते माया करतानाचा एक वेगळा फोटो तेव्हा त्याला मिळाला. जणू काही त्यांचा बैल खूप वर्षानंतर त्यांना भेटला होता. त्यानंतर उद्धवजी त्याला एका जुन्या देवळात घेऊन गेले. त्या देवळात, ते आत मध्ये जाऊन देवाची पूजा करून आले. नंतर देवळाच्या बाहेर येऊन पायरीवर ते बसलेले होते आणि गावातील काही वृद्ध मंडळींशी चर्चा करत होते. गावकरी देखील त्यांना पाहून खूश होते. कारण बऱ्याच वर्षानंतर उद्धवजी हे आपेगावला आले होते. त्यांच संपूर्ण गाव, त्यांची शाळा, खेड्यातील जुनी बँक, दुकान, पोस्ट ऑफिस, या सगळ्या गोष्टी उद्धवजींनी त्याला दाखवल्या व त्याने त्या कॅमेऱ्यात बंदिस्त केल्या. थोड्याच वेळाने आम्ही पुन्हां त्यांच्या गावच्या घरी आपेगावला आलो. संशोधक याने तेथे उद्धवजींची तासभर मुलाखत घेतली आणि काही फोटो देखील काढले. तेथून नंतर दोघेही अंबेजोगाईला आले.



दुसऱ्या दिवशी तो सकाळी ५ वाजता उठून, उद्धवजींसोबत फिरायला गेला. फिरून आम्ही घरी आल्यावरती उद्धवजी लगेच तयार झाले आणि त्यांनी त्यांच्या पखवाजावर रियाज करायला सुरुवात केली. पुढील दोन तास त्यांनी त्यांचा पखावज वाजवला आणि त्याने त्यांच्या सर्व भावमुद्रा कॅमेरात कैद केल्या. त्यानंतर पुन्हा संध्याकाळी देखील उद्धवजींनी रियाज केला. संध्याकाळी त्यांच्यासोबत रियाज करायला, त्यांचे काही शिष्य आणि त्यांची छोटी मुलगी प्रज्ञाही होती. या सर्वांला ते पखावज शिकवत होते. पुढील दोन अडीज तास या सर्वानी एकत्र रियाज केला. त्यांची मुलगी प्रज्ञा ही उद्धवजींसोबत तानपुरा वाजवत होती आणि उद्धवजी मृदुंग

वाजवत होते. रियाज संपल्यावर प्रज्ञाने तिच्या आईला बोलावले आणि त्याला तेथे परिवाराचा एकत्र फोटो मिळाला.



पुढील दोन दिवस, तो उद्धवजींबरोबर त्यांच्या घरीच राहिलाव नंतर अंबेजोगाई येथे असलेलं गुरुकुल पाहण्यासाठी गेला. तेथे शंकरबापूंचा पुतळा ठेवलेला होता. तेथे काही क्षण उद्धवजी थांबले आणि त्या पुतळ्याकडे पाहत राहिले.



दुसऱ्या दिवशी तो व उद्धवजी हे देहू येथे गेले. तेथे संत तुकाराम महाराज जन्म चतुः शताब्दी निमित्त अखिल भारतीय वारकरी मंडळाने, आंतरराष्ट्रीय विराट गाथा पारायण सोहळा व दिव्य अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन केले होते. त्या गाथा पारायण सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून एक लाख लोकं येणार होती. त्यांच्या सोबत उद्धवजी यांच्या पत्नी देखील होत्या. तेथे सर्व दुपारी पोहोचले. नंतर उद्धवजींचे बरेच मित्र त्यांना भेटायला आले. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायाची बरीच मंडळी तेथे त्यांना भेटली. तेथे एका मोठ्या मांडवामध्ये बसलेलो असताना, त्यावेळेस एक आजी तेथे आली आणि चक्क दोन्ही हाताने उद्धवजींचे गाल पकडून त्यांना शाबासकी देऊ लागली.



दुपारी चारच्या सुमारास जेथे आंतरराष्ट्रीय विराट गाथा पारायण सोहळा होता, त्या स्टेजवर गेलो. स्टेज समोर गाथा पारायणासाठी साधारण लाखभर लोकं बसली होती. थोड्याच वेळाने गाथा पारायणाला सुरुवात झाली. संध्याकाळी ५ वाजता उद्धवजींनी त्या स्टेजवर जाऊन मृदुंग वाजवायला सुरुवात केली. एवढ्या मोठ्या जनसमुदाया समोर, उद्धवजी मृदंग वाजवतात असा फोटो त्याला मिळाला.



त्या संध्याकाळी सात वाजता उद्धवजी आणि उदय भवाळकर यांचा एकत्र जुगलबंदीचा कार्यक्रम, देहू येथे ठेवण्यात आला होता. उद्धवजी आणि तो, कार्यक्रमाच्या जागी पोहोचले, उद्धवजी तयार होऊन स्टेजवर गेले. उदय भवाळकर देखील तेथे आले होते. कार्यक्रमाला सुरुवात झाली. वेगवेगळे राग उदय भवाळकरांनी गायले आणि तितक्याच तोडीची तालाची संगत पखावज वाजवून उध्दवजींनी दिली. तेथे चौताल, धमार, सूरताल, तेवरा असे वेगवेगळे राग समोरील श्रोत्यांनी अनुभवले. अप्रतिम जुगलबंदी दोन्ही दिग्गज कलाकारांनी तेथे सादर केली. त्याने उद्धवजी शिंदे आणि उदय भवाळकर यांच्या विविध मुद्रा कॅमेऱ्यात बंदिस्त केल्या.



त्यानंतर जवळपास आठ वर्षानंतर म्हणजे ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी तो आळंदी येथे गेला. तेथे उद्धवजींचा एक वेगळा कार्यक्रम होता. तीर्थक्षेत्र आळंदी येथील इंद्रायणीच्या काठावर, अखिल भारतीय मृदुंग संमेलन आयोजित करण्यात आले होते. तेथे एकाच वेळी ९००० (नऊ हजार) पखावज वादक (मृदुंगवादक) एकाच तालावर सलग दीड तास मृदुंग वाजवण्याचा विक्रम करणार होते. हा संपूर्ण कार्यक्रमच उध्दवजींच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार होता. सकाळी नऊ वाजता, सर्व मृदुंगवादकांची रंगीत तालीम असल्यामुळे तो सकाळी आठ वाजता तेथे पोहोचला. पाहतो तर काय ९००० मृदुंगवादक इंद्रायणीच्या काठावर जमा झाले होते. सर्वांनी त्यांचा पखावज ट्युनिंग केला. बरोबर सकाळी नऊ वाजता त्यांच्या रंगीत तालमीला सुरुवात झाली. उद्धवजी, या सगळ्यांना मार्गदर्शन करत होते. तालावर ठेका धरून मृदुंगाचा नाद योग्य आहे की नाही, ठेक्यावर आहे की नाही, हे उद्धवजी पहात होते. असा दीड तास रियाज झाल्यानंतर एक ताल, एक सूर जमल्यानंतर, उद्धवजींनी त्या सर्वांना दुपारी ३ वाजता, त्याच जागी यायला सांगितले. मुख्य कार्यक्रम संध्याकाळी ५ वाजता होणार होता.



तो संध्याकाळी ४ वाजताच तीर्थक्षेत्र आळंदी येथील इंद्रायणीच्या काठावर पोहचला. तेथे सर्व पखावज वादक यायला सुरुवात झाली होती. उद्धवबापू तेथे आले होते. थोड्याच वेळात कार्यक्रमाला सुरुवात होणार होती. सर्वजण आपापल्या सकाळच्याच जागी पखावजासोबत बसले. यामध्ये बरीच बच्चेकंपनी देखील होती. तेही पखावज वादक होते. म्हणून तेही तेथे आले होते. थोड्याच वेळाने उद्धवजींनी पांढरे धोतर, पांढरा सदरा, त्या वरती काळे नेहरू जॅकेट आणि डोक्यावरती पुणेरी फेटा घालून तेथे आले. इंद्रायणीच्या काठावर त्यांनी सर्व पखावज वादकांना मार्गदर्शन करायला सुरुवात केली. एक ताल धरायला सांगितले आणि एकाच तालात त्यांचा सर्वांचा ठेका यावा यासाठी सर्वांना पुन्हा मार्गदर्शन केले. थोड्याच वेळाने मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली आणि ९००० मृदूंग एकाच तालावरती वाजू लागले. एक वेगळा नाद इंद्रायणीच्या तीरावरती घुमला. डोळ्यांची पारणे फेडणारा हा सोहळा मनालाही प्रसन्न करत होता. थोडा वेळ त्याने तेथे फोटो काढल्यानंतर त्याला या संपूर्ण कार्यक्रमाचा, तेथील लोकांचा एक टॉप अँगलचा फोटो हवा होता. कारण जमलेला इतका मोठा जनसमुदाय त्याला एका फ्रेम मध्ये कैद करायचा होता. त्यामुळे संशोधक हा तेथून जवळच असलेल्या एका तीन मजली इमारतीवर गेला. तेथे ३५ ते ४५ मिनटे थांबून एक टॉप एंगलचा फोटो त्याने काढला. ज्यामध्ये सूर्य मावळल्या नंतरचे लालबुंद आकाश, त्याच बरोबर नदीच्या काठावर जमलेला जनसमुदाय, तेथे केलेली दिव्यांची रोषणाई आणि या सगळ्यांचे नदीमध्ये पडलेले प्रतिबिंब या सगळ्या गोष्टी त्याने त्या एका फ्रेममध्ये बंदिस्त केल्या.



२९ मार्च, २०१७ रोजी बीड जिल्ह्यामध्ये उद्धवजींचा 'सितार बोले मृदुंगाला' हा आगळा वेगळा कार्यक्रम होता. एकामागून एक असे तीन कार्यक्रम, बीड जिल्ह्यातील आजूबाजूच्या गावांमध्ये होते. शिरूर कासार या गावी मृदुंग आणि सितार यांची ती जुगलबंदी होती. बर्ट कॉर्नलीस या बेल्जियमच्या सितार वादकासोबत उद्धवजींच्या पखावजची जुगलबंदी होती.

संशोधक हा मुंबईहून तेथे दुपारी पोहचला. त्यानंतर संध्याकाळी सात वाजता सर्वजण कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचले. तेथे उद्धवजी व बर्ड कॉर्नलीस, या दोघांना खूप छान पद्धतीने गुलाबी रंगाचा पुणेरी फेटा बांधण्यात आला. या दोन्ही कलाकारांचा सत्कार करण्यात आला. समोर प्रेक्षक वर्ग बराच होता. कार्यक्रमाला सुरुवात झाली. खूप मोठा स्टेज आणि खूप छान पद्धतीची सजावट तेथे करण्यात आली होती. उद्धवजी आणि बर्ट यांनी जुगलबंदी सुरु केली सूर तालची मैफिल तेथे रंगली. युरोपचा कलाकार आणि भारतीय कलाकार या दोघांनीही तेथील लोकांची मने जिंकले. एकामागून एक असे श्रवणीय राग त्यांनी समोरील श्रोत्यांना ऐकवले. एक वेगळ्या जुगलबंदीचा अनुभव लोकांनी घेतला. कार्यक्रम संपल्यावर उद्धवजी आणि बर्ट कॉर्नलीस या दोघांबरोबर बऱ्याच लोकांनी मोबाईलमधून सेल्फी काढले, त्यांच्या सह्या घेतल्या, त्यांच्याशी हात मिळवले. काहीजण त्यांच्या गळ्यात पडले तर काहींनी चक्क त्यांचे पाय धरले. या दोन थोर कलाकारांच्या वेगवेगळ्या भावमुद्रा त्याने त्याच्या कॅमेऱ्यात कैद केल्या.





दुसऱ्या दिवशी 'सितार बोले मृदुंगाला' हाच कार्यक्रम बीड जिह्यातील माजलगाव येथे होता. तेथे तिघेजन जायला निघाले. वाटेमध्ये बर्ट यांची नजर ऊसाच्या रसवंती दुकानाकडे गेली. त्यांना ऊसाचा रस प्यायचा होता. म्हणून हे तिघे त्या रसाच्या दुकानाच्या बाजूला गाडी उभी करून ऊसाचा रस घ्यायला गाडीतून उतरले. तेथे बर्ट कॉर्नलीस यांनी हातात एक मोठा ऊस घेतला व बासरी वाजवण्याची पोज दिली आणि म्हणाले की, मी कृष्णाची बासरी वाजवतो आहे. उद्धवजी या विनोदाला फार मनापासून खदखदून हसले. त्याने तो क्षण कॅमेऱ्यात कैद केला.



एक वेगळा मूड फोटो या प्रवासात त्याला मिळाला. त्यानंतर तिघेही माजलगावला पोहोचले. दुपारचे जेवण तिघांनी उद्धवजींच्या एका विद्यार्थ्याच्या घरी केले. संध्याकाळी उद्धवजी आणि बर्ट यांचा जुगलबंदीचा कार्यक्रम माजलगावला झाला. फार सुंदर आणि फार श्रवणीय असा कार्यक्रम माजलगावच्या लोकांनी अनुभवला. कार्यक्रम संपल्यावर उद्धवजींनी आणि बर्ट कॉर्नलीस त्यांचा सत्कार मजलगावच्या लोकांनी केला.



दिनांक २९ मार्च, २०१८ रोजी उद्धवजी शिंदे आणि बर्ट कॉर्नलीस हे कलाकार संशोधकाचे गाव निमदरी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथे आले. तेथे दिनांक ३० मार्च, रोजी त्याच्या गावच्या जत्रेनिमित्त त्यांचा जुगलबंदीचा कार्यक्रम ठेवला होता. त्याने घरामध्येच त्यांची राह्ण्याची व्यवस्था केली. जेवण झाल्यावर त्याने दोन्ही कलाकारांची गावातील लोकांची ओळख करून दिली. संध्याकाळी त्याने त्या दोघांना त्याचे संपूर्ण खेडेगाव फिरवून दाखवले. त्यांना गावचा निसर्ग फारच आवडला. बर्ट तर फारच खूश झाले.



दुसऱ्या दिवशी संध्याकाळी देवळाच्या समोर या दोन दिगज्ञ कलाकारांची जुगलबंदी रंगली. तेवरा, धमार, चौताल, चंद्रकंस, सुलताल असे एकामागून एक सुरेख राग या दोन्ही कलाकारांनी त्यांच्या वाद्यांवरती लोकांना ऐकवून प्रसन्न केले. फार सुंदर कार्यक्रम निमदरीच्या गावकऱ्यांनी अनुभवला. कार्यक्रम संपल्यावर दोन्ही कलाकारांचा ग्रामस्त मंडळींनी सत्कार केला. पुढील दोन दिवस हे दोन्ही कलाकार त्याच्या गावीच राहिले. तेव्हा त्याने त्याच्या संशोधनासंबंधित, उद्धवजींची मुलाखत घेतली. त्यानंतर बर्ट हे दिल्लीला आणि उद्धवजी अंबेजोगाईला निघून आले.

प्रकरण चौथे

संशोधनाच्या अभ्यासातून प्राप्त झालेले ज्ञान, त्याचे संकलन व पृथक्करण

४.१ परिचय

४.२ माहिती गोळा करणे व त्याचे पृथक्करण

४.२.१ तथ्यांचा अर्थ

४.२.२ मुलाखत

४.२.३ प्रश्नावली

४.३ सर्वेक्षणातील माहितीचे विश्लेषण

४.३.१ तक्ता १ : सर्वेक्षणातील महिला – पुरुष

४.३.२ सर्व्हेतील सारणी क्रमांक २

४.३.३ आलेखाचे अर्थनिर्वेचन

४.४ प्रबंधाची उद्दिष्टे आणि पूर्तता

४.५ गृहितके पडताळणी

४.१. परिचय

या संशोधनच्या संदर्भात निवडलेल्या लोककलाकारांना अनेकदा प्रत्यक्ष भेटी देऊन, त्यांचा कलाप्रकार कॅमेऱ्यात त्याने बंदिस्त केला. तसेच चलचित्र कॅमेऱर्याचा उपयोग करून लोककलाकारांच्या, त्यांच्या परिवारातील लोकांच्या, मित्रांच्या मुलाखती घेतल्या. विविध ग्रंथालयात, विद्यापीठात जाऊन वेगवेगळे ग्रंथ, पुस्तके, जुनी नियतकालिके, वर्तमानपत्रे यातून वरील विषयाबद्दलची माहिती मिळवली. तज्ज्ञांच्या व इतर लोकांच्या मतांतून व निरीक्षणद्वारे काही गोष्टी मांडल्या. त्यामुळे लोककलाकारांचे आयुष्य प्रभावीपणे फोटोमधून मांडता येते आणि ते प्रकाशचित्र, पाहणाऱ्यांच्या कित्येक दिवस स्मृतीत राहते. लुप्त होणाऱ्या लोककला फोटोग्राफीतून संग्रहित करून, तरुण पिढीसाठी सुरक्षित ठेवता येतील. या बाबतची देखील प्रश्नावलीच्या मदतीने मते नोंदून घेतली. यामुळेच संशोधनाच्या मूळ उद्देशापर्यंत पोहचण्यास मदत झाली आहे.

४.२ माहिती गोळा करणे व त्याचे पृथक्करण

सामाजिक बाबींच्या अभ्यासामध्ये वैज्ञानिक शास्त्राच्याद्वारे वस्तुनिष्ठ पद्धतीने संशोधन करण्यात येते. वैज्ञानिक पद्धती ही नियमांचा शोध घेण्याच्या उद्देशाने उपयोगात आणली गेलेल्या तंत्राची एक व्यवस्था आहे.

या पद्धतीचा उद्धेश कोणत्याही परिस्थितीच्या संदर्भात खऱ्याचा शोध घेणे हा आहे. एखाद्या गोष्टीची सत्य पडताळणी ही कल्पनेच्या धर्तीवर करणे शक्य नाही. त्यासाठी सत्य तथ्यांची माहिती गोळा करणे गरजेचे आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध संशोधन होऊ शकते. माहिती गोळा केल्यानंतर त्याचे अचूक वर्गीकरण आणि ज्या विषयाचा अभ्यास करायचा आहे त्याच्या निगडीत तथ्य संकल्पनाची निश्चिती करावी लागते. पूर्ण संशोधन हे तथ्यांची जी माहिती गोळा केली त्यावर विसंबून असते. त्यामळे योग्य ती माहिती गोळा करणे गरजेचे असते.

४.२.१ तथ्यांचा अर्थ:

तथ्य संकलनाचा विचार करण्यापूर्वी तथ्यांचा शास्त्रीय अर्थ विचारात घेणे आवश्यक आहे. शास्त्रीय विवेचनात तथ्यांचा बराच उपयोग करण्यात येतो. श्रीमती पॉलिन यंग यांनी म्हटल्याप्रमाणे तथ्य हा शब्द शास्त्रीय लिखाणात वारंवार वापरला जातो तरी अजून या शब्दाची

व्याख्या करणे अतिशय कठीण आहे. असे असले तरी काही शास्त्रज्ञांनी तथ्यांच्या व्याख्या दिल्या आहेत.''[३४]

४.२.२ मुलाखत:

इंग्लिश शब्द 'Interview' म्हणजे मुलाखत. Inter म्हणजे आतील आणि 'View' म्हणजे लक्षपूर्वक निरीक्षण. त्यामुळे मुलाखती म्हणजे 'आतील किंवा आंतरिक विचार माहिती करून घेणे'. संशोधनाचे मुलाखती हे प्रबळ शस्त्र आहे.

मुलाखतीचा अर्थ:

निरीक्षणाद्वारे तथ्यांचे संकलन करता येते. पण ज्या बाबीचा अभ्यास करू शकतो, त्यांचेच निरीक्षण करता येते.

माणसाच्या मनाची प्रतिक्रिया, प्रवृत्ती, भावभावना यांचा अभ्यास, निरीक्षणाने करता येत नाही. त्यासाठी संशोधनकाला मुलाखत तंत्राचा अवलंब करावा लागतो. हे तंत्र समाजशील संशोधनासाठी फार महत्त्वाचे ठरते.

या तंत्रामध्ये ज्यांची मुलाखत घ्यायची आहे तो व्यक्ती व मुलाखत घेणारी व्यक्ती प्रत्यक्ष भेटीतून, मुलाखतदात्याच्या मनाची प्रतिक्रिया आणि त्याच्या भावभावना यांचा अभ्यास करतो. वेगवेगळ्या तज्ज्ञांनी मुलाखतीचे असंख्य प्रकार सांगितले आहेत. संशोधनाच्या विषयानुसार मुलाखत घेतली जाते.''[३५]

संशोधनाचा मुख्य आत्मा हा मुलाखती आहेत. लोककलाकारांचा जीवन प्रवास हा जरी प्रकाशचित्रणातून मांडलेला असला, तरी त्या लोककलाकाराचं आयुष्य जाणून घेण्यासाठी संशोधनात 'गुणात्मक मुलाखत' ही पद्धती वापरली आहे. निवडलेले कलाकार व त्यांच्या नातलगांची माहिती ही गुणात्मक मुलाखतीद्वारे घेतली आहे. त्यांच्या पिढ्यांच्या, त्यांच्या कलेच्या, कलाप्रकाराच्या, संपूर्ण जीवनाच्या, राहणीमानाच्या, परिवाराच्या संबंधीचे प्रश्न विचारून गुणात्मक तथ्ये संकलित केली. तसेच काही प्रसंगी मिश्रित मुलाखत देखील घेतली. या विषया संदर्भात तज्ज्ञ लोकांची मते जाणून घेण्यासाठी देखील मिश्रित मुलाखत पद्धत येथे वापरली. तसेच, संशोधकाने संशोधन कालावधी आधी घेतलेल्या मुलाखती आणि छायाचित्रांचा वापर या प्रबंधात केला आहे. ते दुय्यम स्रोत आहेत.

४.२.३ प्रश्नावली:

एखाद्या विषयावरील माहिती पाहिजे असल्यास आपण प्रश्न विचारतो आणि त्या प्रश्नाची उत्तरे घेतो. मुलाखतीमध्ये ही प्रश्नांची उत्तरे मुलाखत दात्याकडून घेतली जातात. मुलाखत दात्यांशी प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करून चर्चेद्वारे माहितीचे संकलन केले जाते. परंतु प्रश्नावलीचे स्वरूप मात्र भिन्न आहे. प्रश्नावलीमध्ये अध्ययन विषयाच्या संबंधात प्रश्नांची एक मालिका असते. प्रश्नावली पद्धती संशोधनकर्ता उत्तरदात्यांना प्रत्यक्ष प्रश्न विचारत नाही. तर त्याच्याकडे प्रश्नावली पाठविली जाते. उत्तरदाता त्या प्रश्नावलीमधील उत्तरे स्वतः लिहित असतो. त्यामुळे प्रश्नावली पद्धतीत तथ्य संकलनाकरिता विशेष परिश्रम करण्याची आवश्यकता नसते. संशोधनकरता प्रश्नावली तयार करून पोस्टाने संबंधित उत्तरदात्याकडे पाठवितो. उत्तरदाते ती प्रश्नावली भरून उत्तरदात्यांना परत पाठवितात. त्यामुळे संशोधनकर्ता अगदी कमी वेळात दूरवर भागात असलेल्या उत्तरदात्याकडून माहितीचे संकलन करीत असतो. निरीक्षण, मुलाखत तंत्राप्रमाणेच प्रश्नावली हे देखील प्राथमिक तथ्य संकलनाचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे.

प्रश्नावलीचा अर्थ

''एका विषयासंदर्भात व्यक्तीकडून माहिती मिळविण्यासाठी तयार केलेली प्रश्नांची एक क्रमबद्ध सूची म्हणजे प्रश्नावली होय. प्रश्नावली ही पोस्टाने संबंधित व्यक्तीकडे पाठवली जाते. संबंधित व्यक्ती किंवा उत्तरदाते प्रश्नावली भरून संशोधनकाकडे पाठवितात.''[३६]

४.३ सर्वेक्षणातील माहितीचे विश्लेषण

संशोधनासाठी १५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. त्यामध्ये १ ते ९ प्रश्न हे बंदिस्त स्वरूपाचे होते, तर उरलेले ६ प्रश्न हे मुक्त प्रश्न होते. अशी ही मिश्रित प्रश्नावली महाराष्ट्रातील ६०० लोकांकडे पाठवण्यात आली. त्या प्रश्नावलीद्वारे या विषया संदर्भात बऱ्याच गोष्टींचा उलगडा झाला. या द्वारे संशोधनकर्त्यास एक दिशा मिळाली व जनमानसांची मते जाणून घेता आली. या आधारे ठोस निष्कर्ष काढण्यात देखील प्रश्नावलीची फारच मोठ्या प्रमाणात मदत झाली. या प्रश्नावली शिवाय हे संशोधन अधुरे राहिले असते.

संशोधनासंबंधित प्रश्नावली दिलेल्या ६०० लोकांपैकी प्रकाशचित्रणातील आणि लोककलेतील तज्ज्ञ २२ व्यक्तींना देखील प्रश्नावली देण्यात आली होती. या तज्ज्ञ व्यक्ती वृत्तपत्राशी, लोककलेशी, प्रकाशचित्रणाशी, कलेशी, कायद्याशी, समाजसेवेशी संबंधित आहेत.

तसेच ६०० लोकांमधून निवडक ३५ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची प्रस्तुत संशोधनांबद्दलची मते संशोधनामध्ये समाविष्ट केली आहेत.

बंदिस्त प्रश्न खालील प्रमाणे :

१) फोटो हा अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत सर्वांना कळतो का?

२) शब्दरचनेपेक्षा प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे अधिक प्रभावी माध्यम आहे का?

३) फोटो हे संदेश पोहचविण्याचे कार्य करतात का?

४) फोटोमुळे घटनेची सत्यता लगेच अनुभवता येते का?

५) सत्य घटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे प्रभावी माध्यम आहे का?

६) लोककलावंतांचे जीवन फोटोंमधून अधिक प्रभावीपणे मांडता येऊ शकते का?

७) लोककला लोप पावत चालल्या आहेत का?

८) काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला, प्रकाशचित्रणाद्वारे (फोटोग्राफीद्वारे) पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे का?

९) लोककला या समाज प्रबोधन करतात का?

दीर्घोत्तरी प्रश्न :

१०) एखादा फोटो पाहून तुमच्या मनावर काही परिणाम होतो का? काय परिणाम होतो?

११) शब्दांपेक्षा फोटो हा अधिक प्रभावी कसा आहे?

१२) लोककला ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी काय करायला हवे?

१३) लोककलांचे जतन कसे होऊ शकते?


१४) या लोककला जगवण्यासाठी सामाजिक माध्यमांची (सोशल मीडियाची) काही मदत होऊ शकते का? कशी होऊ शकते?

१५) सत्य घटनांचा आढावा प्रकाशचित्रणातून (फोटोग्राफीतून) कसा घेता येईल?


४.३.१ तक्ता १ : सर्वेक्षणातील महिला पुरुष

लिंग	संख्या
महिला	१२०
पुरुष	४८०


४.३.२ सर्व्हेतील सारणी क्र २




२) शब्दरचनेपेक्षा प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे अधिक प्रभावी माध्यम आहे का?




३) फोटो हे संदेश पोहचवण्याचे कार्य करतात का?




४) फोटोमुळे घटनेची सत्यता लगेच अनुभवता येते का?




५) सत्य घटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे प्रभावी माध्यम आहे का?




६) लोककलावंतांचे जीवन फोटोंमधून अधिक प्रभावीपणे मांडता येऊ शकते का?




७) लोककला लोप पावत चालल्या आहेत का?



८) काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला, प्रकाशचित्रणाद्वारे (फोटोग्राफीद्वारे) पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे का?



९) लोककला या समाज प्रबोधन करतात का?



४.३.३ आलेखाचे अर्थनिर्वेचन

फोटोतून सत्य घटना मांडता येते आणि ती समाजातील प्रत्येक स्थरापर्यंत पोहचून, त्यांना त्याचे आकलन होते. तरीही फोटोंना शब्दाची जोड मिळाली तर चांगलेच. लोप पावणाऱ्या लोककलेंचे फोटोतून जतन करता येईल. तसेच, लोककलाकारांना आजही पोटाची खळगी भरण्यासाठी कसरत करावी लागत आहे. लोककला या समाजाचे प्रबोधन करण्याचे साधन असल्या कारणाने नवीन पिढीने या लोककलांमध्ये रस घेणे जरुरी आहे. जेणेकरून लोककला शहरी भागातही तितक्याच प्रमाणात टिकतील. ह्या कलाकारांना समाजाकडून व शासनाकडून मदत मिळू शकेल.

तसेच लोककलाकार, लोककला समीक्षक, साहित्यिक, चित्रकार, फोटोग्राफर, वृत्तपत्रकार अशा ११ मान्यवरांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन चलचित्रणाच्या आणि ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून मुलाखती घेण्यात आल्या. त्यांची संशोधनाबद्दलची मते नोंदून घेतली.

या संशोधन विषयाच्या संदर्भात ११ असे गावातील आणि शहरी भागातील मान्यवर :

लोककलाकार	:	१
लोककला अभ्यासक	:	२
फोटोग्राफर	:	५
चित्रकार	:	२
वृत्तपत्रकार	:	१

१. प्रशांत नाकवे: पुरुष : वय – ४७ : फोटोग्राफर

मत : छायाचित्रकार त्याच्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून केव्हा खोटं बोलू शकत नाही. त्यामुळे सत्य घटनांचा आढावा घेण्याकरता प्रकाशचित्रण हे खूप प्रभावी माध्यम आहे. छायाचित्रे काढताना छायाचित्रकाराची विचार करण्याची जी पद्धत आहे, ती समतोल असली पाहिजे तेव्हाच हे प्रभावी माध्यम आहे. एखादा विषय हाताळताना, त्या विषययाची छायाचित्रे काढताना त्या छायाचित्रकाराने वास्तवाला धरून फोटो काढायला हवेत, किंवा वास्तवाला धरून तो विषय मांडायला हवा. छायाचित्रकाराचा तो फोटो काढताना जर हेतू शुद्ध असेल तर छायाचित्रासारखे दुसरे प्रभावी माध्यम कुठलेच नाही.

तू, जशी आवड दाखवून या लोकांवर काम करतो आहेस, तशी आवड इतर कलाकारांनी, या क्षेत्रातल्या लोकांनी, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाने देखील दाखवायला हवी. त्याचप्रमाणे शासनाचे जे अनुदान आहे ते खरोखर त्या लोकांपर्यंत पोहोचते का? पोहोचत नसेल तर त्यांच्यासाठी अक्षरश: चळवळ उभी केली पाहिजे आणि ते अनुदान त्या लोकांपर्यंत पोहोचवायला हवे. त्याचप्रमाणे दुसरी गोष्ट म्हणजे यामध्ये सोशल मीडिया देखील खूप प्रभावी माध्यम आहे. त्या कलाकारांची व्यवस्थित माहिती, त्या कलाकारांबद्दल काही छायाचित्रे, काही व्हिडिओ, मल्टिमीडिया स्वरूपात सोशल मीडियाच्या माधमातून लोकांपुढे यायला हवेत. त्या विषयांवरती प्रदर्शन व्हायला हवीत. आपण सर्वजण याकरिता बरंच काही करू शकतो पण आवड दाखवायला हवी, यासाठी वाहून घ्यायला हवे, तरच ते होऊ शकते. या लोककलेचं कायमस्वरूपी दस्ताऐवजीकरण कुठेतरी व्हायला पाहिजे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट या सगळ्यांची उपलब्धता सर्वांना सोप्या रितीने व्हायला पाहिजे. त्यासाठी प्रयत्न करायला हवा. त्यासाठी सोशल मीडिया हे फारच प्रभावी माध्यम आहे.

आता लोकं जास्त वाचन करत नाहीत. जे काय आहे ते लोकं मोबाईलवर बघतात. त्यामुळे एक चांगला ॲप तयार केला पाहिजे, ज्यामध्ये भारतातल्या लोककला, महाराष्ट्रातल्या लोककला या सर्वांची माहिती, त्या लोककलाकारांची छायाचित्रे, त्यांचे व्हिडिओज, त्यांचा संपूर्ण जीवन परिचय, जर त्या ॲपमध्ये असेल, तर लोक बघतील. हाताच्या बोटावर ते सर्वांपर्यंत जलद गतीने पोहोचेल. ते व्हायला हवे, वेबसाईटच्या माध्यमातून त्यांची माहिती लोकांपुढे यायला हवी. जेणेकरून लोक चालता–फिरता ही सर्व माहिती त्यांच्या मोबाईलवर पाहू शकतील. त्यांना पुस्तकं वाचण्याची आवश्यकता नाही. याकरता भारत सरकारने, महाराष्ट्र सरकारने, यामध्ये पुढाकार घेऊन काम करायला हवे जेणेकरून लोककला आणि हे लोककलाकार समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचतील. आपण कलेमध्ये किती धनवान आहोत, हे जगाला दाखवून देण्याकरता त्याचं डिजिटलायझेशन होणे, दस्ताऐवजीकरण होणे फार फार महत्त्वाचे आहे.

२. नितीन दादरावाला : पुरुष : वय – ६४ : चित्रकार, लेखक, फोटोग्राफर

मत : हो नक्कीच आहे, कोणीतरी लिहून ठेवलंय, एक फोटो हजार शब्दांचे कार्य करतो. म्हणून जे हजार शब्दांत व्यक्त करता येणार नाही ते एका फोटोमध्ये, एका क्षणात दाखवता येतं. तुम्ही नापामगर्लचा फोटो पाहिला असेल? त्या फोटोमुळे, त्याची जी भयानकता आहे, त्यामुळे अमेरिकेला व्हिएतनामच्या युद्धातून माघार घ्यावी लागली. तिकडे जे काय चाललं होतं ते सगळं थांबवण्याच्या हालचाली सुरू झाल्या. न्यूयॉर्क टाइम्समध्ये तो फोटो आल्यानंतर हे सर्व घडलं.

मी आता जो लेख लिहिलाय त्यामध्ये आंद्रियांना लेस्तिदो ही अर्जंटिंनियन फोटोग्राफर आहे. तिने हुकूमशाही विरुद्ध सगळी माणसं नाहीशी होत होती आणि आई आणि मुलीचा एक फोटो घेतलाय. ते घोषणा देतायत. आता त्या फोटोला 'पुलित्झर' बक्षीस मिळालं. त्या फोटोवर गाणी लिहिली गेली. या फोटोची पोस्टर्स निघाली. जे काय अर्जेंटिनामध्ये घडतंय त्याची जाणीव बाहेरच्या जगाला त्या फोटोमुळे कळाली. तसेच केविन कार्टरचा जो गिधाडाचा फोटो आहे. त्या फोटोमुळे अख्ख्या जगाला कळालं की सुदान मध्ये काय अवस्था झालेली आहे. तो फोटो बघून कोट्यावधी रुपयांची मदत सुदानमध्ये 'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' तर्फे आणि 'फूड ऑर्गनायझेशन' यांच्याकडे देण्यात आल्या. त्याच पोस्टर झालं आणि पुढे तोच फोटो मदत जमा करण्याकरता वापरण्यात आला. तसाच गुजरात दंगलीचा फोटो आठवत असेल. त्या माणसाच्या बोटाला फडकी बांधलेली आहेत आणि तो रडतोय. यामुळे गुजरात दंगलीची अवस्था काय आहे हे अख्या जगाला कळाले.

३. प्रदीप बांदेकर : पुरुष : वय – ६५ : फोटोग्राफर

मत : लोककलेत थोडासा आधुनिक काळाच्या रूपाने बदल करावा लागेल. पारंपारिक जी लोककला आहे ती ऐकणारे, ती समजणारे, ती पाहणारे लोक आता उरलेले नाहीत. त्यामुळे तुम्हाला लोकांमध्ये आवड निर्माण करायला लागेल. जगदीश खेबुडकर, व्ही. शांताराम, अनंत माने, राम कदम या सगळ्यांनी मराठी चित्रपटांमधून जे योगदान केले, लावणीला वगैरे जसा मॉडर्न टच दिला, असा पारंपरिक लोककलेला मॉडर्न टच द्यावा लागेल. तेव्हा लोक ते ऐकतील, तेव्हा लोक ते पाहतील.

शासनाने या लोककलांना काहीच मदत केलेली नाही. मुंबईमध्ये तर नाहीच नाही, पण गावच्या ठिकाणीही नाही. आता गावांमध्ये पण तुम्हाला स्मार्ट टीव्ही वर पिक्चर बघताना लोक दिसतील, पण लोककला बघणारे दिसणार नाहीत. इतकेच काय तर मराठी चित्रपटाकडे लोक वळत नाही. चांगले चांगले मराठी चित्रपट लोकं पाहत नाहीत. त्यासाठी तुम्हाला अनेक उपक्रम राबवावे लागतील. सुरुवातीला या लोककलांचा फुकट कार्यक्रम ठेवावा लागेल. नंतर थोडे पैसे लावून कार्यक्रम ठेवायला लागतील. लोकं जमायला लागल्यानंतर मग जास्त पैसे ठेवून कार्यक्रम ठेवायला लागतील. ते जे लोककलाकार आहेत त्यांच्या महिन्याच्या पैशाची तजवीज करावी लागेल. त्यांना महिन्याला काही तरी आर्थिक बळ मिळायला पाहिजे, तेव्हा ते पुढे येतील. आजच्या घडीला शास्त्रीय गायक नोकरी करून गायनाचे कार्यक्रम करतो. त्याला काही अर्थ नाही. कलाकारांनी त्याचं संपूर्ण आयुष्यच कलेकरता वाहायला हवं आणि त्याकरता त्यांना मोबदला मिळायला हवा. तरच ते जास्त चांगल्या पद्धतीने काम करतील. नाहीतर लोककलाकार त्यांच्या मुलांना म्हणतील इंजिनिअर होऊ द्या, डॉक्टर होऊ द्या, वकील होऊ द्या, छानपैकी पगार घेऊ द्या. या सगळ्यातून कला मरतील, कलाकार मरतील, कला लुप्त होतील.

४. राजू राऊत : पुरुष: वय – ५६ : लोककलाकार, चित्रकार, शिल्पकार

मत : सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लोककलेतील हे लोककलावंत जर मनोरंजनातून गेले, तर ते व त्यांच्या लोककला या अधिक लोकांपर्यंत पोहचतील. लोककलेला बऱ्याच छटा आहेत. त्याला सादरीकरणाची, नवीन भाषेची, बरोबरची प्रसारमाध्यमे, बरोबरची मनोरंजनाची माध्यमे, जितक्या ताकतीने, जितक्या सरावाने, जितक्या साधनेतून पुढे जातात, ती वैचारिक आणि तांत्रिक अशा दोन्ही बाजूने जातात. त्यामुळे सादरीकरण चांगल्यातल्या चांगल्या लोकांपर्यंत जाण्यासाठी बदलत्या जगाचा विचार आणि त्यातले विषय, त्यातला आशय, लोककलाकारांच्या सादरीकरणात आणि लिखाणात यायला हवा.

लोककला ही इतकी जुनी आहे. एक दोन गाणी पाठ झाली म्हणजे शाहीर होत नाही. शाहीर ही कल्पनाच वेगळी आहे. जो परिपक्व असतो, तो शाहीर. ज्याला पुराणापासून, इतिहासापासून ते वर्तमान काळातल्या जणासहित भविष्यकाळातील पण काही त्याला सुगावा

लागलेला असतो, नांदी लागलेली असते, ती तो समाजाला सांगून सूज्ञ करत असतो. लोककला टिकवायची असेल, तर परिपक्वपणे मुरलेली लोणची बाहेर काढायला हवी.

सत्यनारायणाची पूजा करायला आलेल्या पुजाऱ्याला जी तुमच्या घरात वागणूक मिळते, ती यल्लमाच्या जोगत्याला, वाघ्या मुरळीला मिळते का? नाही. त्यामुळे लोककलाकाराने त्याचं स्वतःचे सामाजिक स्थान नीट ठेवलं पाहिजे. त्याने त्याचे लोककलेचे सादरीकरण सुधारायला हवं.

ज्या जुन्या लोककला आहेत, त्या पुढच्या पिढीपर्यंत पोहचवताना, त्यामध्ये बदलत्या समाजाप्रमाणे, आवश्यक ते बदल करायला हवेत, त्यामध्ये सभ्यता आणायला हवी. त्यातलं, माधुर्य कसं वाढवायचं? लोककलेत नवीन काय आणलं पाहिजे? याचा विचार करायला हवा.

५. संदेश भंडारे : पुरुष : वय – ५६ : फोटोग्राफर, लेखक, चित्रकार

मत : पूर्वी शब्द हे प्रभावी होते. आता लोकं दृश्यांचा वापर करतात. अगदी तुम्ही आता मोबाईल वापरणारी माणसं जरी पाहिली तरी इमोजी वापर करणाऱ्या माणसांची संख्या प्रचंड वाढली आहे.

लोककलाकार हे त्यांची लोककला त्यांच्या त्यांच्या परीने लोकांपर्यंत पोहोचवतात. इतर माध्यमांमधील जी लोकं आहेत त्यांनी यासाठी प्रयत्न करायला हवेत. उदाहरणार्थ प्रकाशचित्रकार, लेखक, चित्रकार, पत्रकार, माहितीपट तयार करणारे या सर्वांनी ही लोककला आपापल्या परीने समाजाच्या विविध लोकांपर्यंत पोहोचवायला हवी. आजच्या घडीला आपल्या कलाकारांमध्ये माणूसपण हरवले आहे. ते जर आपल्या सारख्या कलाकारांनी जिवंत ठेवले तर त्या कलाकाराला आपल्याशिवाय दुसऱ्यांच जग काय आहे ते दिसेल. आपण स्वकेंद्री न राहता बहुमुखी व्हायला पाहिजे. तरच आपण लोककला लोकांपर्यंत पोहोचवू शकतो व लोककलांना जगवू शकतो.

६. गणेश चंदनशिवे : पुरुष : वय – ४२ : लोककलाकार, लोककला अभ्यासक

मत : प्रत्येक विद्यापीठात असा लोककला विभाग होणे गरजेचे आहे. जिथे जिथे मराठी लोकसाहित्य शिकवलं जातं, तिथे त्या साहित्याचं संशोधन होणे गरजेचे आहे. त्या लोककलांच्या मुळापर्यंत जाणे, या लोककलांचा उगम कुठून झाला, का झाला, याचा फायदा काय, आणि आजच्या काळामध्ये या लोककलांची गरज किती आहे. लोककलांच्या सगळ्या

बाबतीत संशोधन होतं पण एका गोष्टीचं संशोधन होत नाही. समजा मी आता जागरण–गोंधळ करतो, तर माझ्या पोरांनी आता ते करू नये असे काही लोककलाकारांना वाटते. पिढ्यानपिढ्या लोककला जोपासली पण आता बरीच घराणी अशी आहेत की, आता त्यांची मुलं या कलेमध्ये नाहीत.

जसा एखादा चोर चोरी करून जातो आणि त्याचं चित्र कोणीतरी स्केच करतो. त्यावरून तो चोर पकडला जातो. शब्दांमध्ये कल्पना जास्त असतात, स्वप्नवत जास्त असते. ज्या गोष्टी सत्यात उतरल्याही नाहीत त्या शब्दात उतरवल्या जातात. येथे प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून डायरेक्ट कॅरेक्टर लोकांसमोर येतं. म्हणून प्रकाशचित्र हे शब्दांपेक्षा जास्त प्रभावी आहे, असं माझ्यासारख्या कलावंताचं तरी मत आहे.

७. श्रीराम वेर्णेकर : पुरुष : वय – ५९ : फोटोग्राफर

मत : शब्द लिहायला तुम्हाला विचार करायला लागतो. कागदावर उतरावं लागतं. ते एडिट करावं लागतं. फोटो हे सत्य आहे. किती ठिकाणी फोटो पुरावा म्हणून वापरतात. कसाबचा एकमेव फोटो माझ्याकडे होता. माझी साक्ष सुप्रीम कोर्टापर्यंत ग्राह्य धरण्यात आली. हाच तो मनुष्य सीएसटीला हातात बंदूक घेऊन होता आणि हाच तो फोटो सिद्ध करतो आणि त्याच्यावरूनच त्याला फाशी देण्यात आली.

ज्या कला लोप पावत चालल्या आहेत. त्याबद्दल कोणीतरी लिहिलं पाहिजे. त्याचं प्रकाशचित्रण आणि चलचित्रण करून जागरूकता निर्माण केली पाहिजे. जुन्या लोककलेचं मूळ शोधून, त्याचं जतन केलं पाहिजे.

८. मुकेश पार्पियानी : पुरुष : वय – ६९ : फोटोग्राफर

मत : यात शंकाच नाही की एक फोटो हजार शब्दांचे कार्य करतो. वर्षानुवर्षे लोकांना माझे फोटोज लक्षात आहेत. अरुणा शानबागचा फोटो ऑनलाईनवर लोकांना मिळतो. पण त्यांना मी शूट केलेला अरुणा शानबागचा फोटो हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असतानाचा नाही मिळणार. आजकालच्या डेस्कवर बसलेल्या काही लोकांना न्यूज फोटोचा सेन्स नाही, याची खंत वाटते.

लोककलाकारांचे जुने जुने फोटो जमा करणे आणि त्यांची माहिती मिळवून, त्यांचे संग्रहीकरण करणे जरुरी आहे. लोककलाकार जिथे जिथे त्यांची कला सादर करतात, त्याचे प्रकाशचित्रण आणि चलचित्रण करणे आवश्यक आहे.

९. डॉ. नरेंद्र बोरलेपवार : पुरुष : वय – ४० : चित्रकार

मत : सत्य घटनांचा आढावा घेण्यासाठी व त्या गोष्टींचे दस्ताऐवजीकरण करण्यासाठी कॅमेराच महत्त्वाचा आहे. आपल्या मेंदूची मेमरी साठवून ठेवण्याची क्षमता काही ठराविक क्षणापुरती मर्यादित असते परंतु जेव्हा ते कॅमेऱ्याने दस्ताऐवजीकरण केले जाते त्यावेळेस त्याचे आयुष्य अमर्याद वाढते. जर तुम्हाला एखादी सत्यघटना नोंदवून ठेवायची असेल तर छायाचित्र कॅमेरा व चलचित्रण कॅमेरा हे सर्वात महत्त्वाचे आहेत.

आज कलेसाठी खूपच पोषक वातावरण आहे. प्रत्येक मोबाईलमध्ये कॅमेरा आलेला आहे. इंटरनेट आहे, सामाजिक माध्यमे आहेत, जग हे एक खेडे बनलेले आहे. काही तासाभरात जगाच्या कानाकोपऱ्यात पाऊल ठेवता येते. त्यामुळे त्याचा उपयोग करून जास्तीत जास्त लोकांपर्यंत लोककला पोहोचविण्याचे कार्य नवीन पिढीने करायला हवे. हे कार्य ते लोककलाकारच करू शकतात. कारण त्यांना या कलेबद्दल संपूर्ण ज्ञान असते. कलाकारांकडे गुणवत्ता असेल तर त्याला संधी मिळेलच. म्हणून रडत न राहता काळाचा उपयोग, या पोषक वातावरणाचा उपयोग करून घ्यायला हवा.

१०. डॉ. प्रकाश खांडगे : पुरुष : वय – ६२ : लोककला प्राध्यापक , लोककला अभ्यासक, पत्रकार, लेखक

मत : फोटोग्राफी हे अतिशय प्रभावी माध्यम आहे. लोककला जर विशुद्ध स्वरूपात जनसामान्यांपर्यंत पोहोचवायच्या असतील तर त्या छायाचित्रण व चलचित्रण करण्यासारखा दुसरा उत्तम मार्ग नाही.

भारत सरकारने अभिलेख विभाग अधिक सक्षम बनवणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या दूरचित्रवाहिन्यांवर सादर होणाऱ्या लोककला या विशुद्ध स्वरूपातल्या लोककला आहेत, असं मानायचं काही कारण नाही. उलटपक्षी त्याचं जर अर्कायवल तयार झालं, तर चुकीचा संदेशही पुढच्या पिढीपर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे ज्या विशुद्ध स्वरूपातल्या लोककला आहेत त्यांचे

अभिलेख तयार होणे गरजेचे आहे. त्यासाठीच पुन्हा आमच्यासारख्या अभ्यासक किंवा त्या पद्धतीच्या अभिलेख संस्था निर्माण होणे गरजेचे आहे.

११. तेजस्विनी चव्हाण : स्त्री : वय – ३५ : पत्रकार, लोककला अभ्यासक

मत : मुळात जे लोककलावंत आहेत, त्यांना स्वतःला त्या गोष्टींबद्दल किती आत्मीयता आहे. जग बदलतंय, म्हणून आम्ही बदलतोय.. पण कितपत बदलणार. तो एक मुद्दा आहे. शिक्षण वगैरे घेतात, ते मान्य आहे मला. तरी पण एक आपली पारंपरिकता टिकवण्यासाठी त्यांचे कला प्रकार मुद्रित करून ठेवायला हवेत.

संशोधनासंबंधित प्रश्नावली दिलेल्या ६०० लोकांपैकी प्रकाशचित्रणातील आणि लोककलेतील तज्ज्ञ २२ व्यक्तींना प्रश्नावली देण्यात आली होती. या तज्ञ व्यक्ती वृत्तपत्राशी, लोककलेशी, प्रकाशचित्रणाशी, कलेशी, कायद्याशी, समाजसेवेशी संबंधित आहेत. त्यांची संशोधनाबद्दल मतं जाणून घेतली.

१. मुकुंद गोविंद कुळे: पुरुष: वय – ४८ : एम. ए. : पत्रकार, लोककला अभ्यासक,

मत : शब्दांपेक्षा फोटोग्राफी हे माध्यम अधिक प्रभावी आहे, कारण शब्दांच्या माध्यमातून एखाद्या लेखात जे मांडता येत नाही, ते अनेकदा एखादा फोटो सांगून मोकळा होतो. या अर्थाने फोटोग्राफी हे प्रभावी माध्यम आहे, तिथे परिस्थितीत वर्णन करण्यासाठी शब्दांची गरज भासत नाही. फोटोग्राफी दृश्य–दस्ताऐवजासाठी एकदम उपयुक्त आहे. सत्य घटनांचा मागोवा लिखित शब्दांच्या माध्यमातून घेता येतो, परंतु तिथे वर्णनावर अधिक भर असतो आणि जे लिहिलंय त्याच्या आधारे वाचकाला कल्पनाच करावी लागते. फोटोमुळे मात्र सत्य परिस्थितीच डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी राहते. फोटोत कल्पनेला थारा नसतो, जे जसं आहे ते तसंच थेट फोटोत दिसतं. त्यामुळे व्यक्ती आणि प्रसंगांच्या सत्य चित्रणासाठी फोटोग्राफी हे अतिशय महत्त्वाचं माध्यम आहे.

एकूणच लोककला या पूर्वापार समाज प्रबोधनाचं एक सशक्त माध्यम राहिलेल्या आहेत. म्हणूनच एकनाथांनी समाज प्रबोधनासाठी अनागर समाजातील या लोककलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. गोंधळ–जागरण–भारूडासारख्या लोककलांमधून रंजकतेच्या माध्यमातून आजच्या वेगवेगळ्या समस्यांवर निश्चितच प्रबोधन होऊ शकते.

२. भारत दिगंबर कदम : पुरुष : वय – ३६ : एम.ए. (पॉलिटिकल सायन्स) : लोककलाकार, तलाठी

मत : फोटो हे सरळ मनाला भिडणारे माध्यम आहे. त्यामुळे साहजिकच चित्रांची भाषा वास्तव्याची जाणीव करून देते..

लोककलावंताना व्यासपीठ मिळून देऊन लोककलेला राजाश्रय देऊन लोककलेला शालेय शिक्षणात समाविष्ट करणे गरजेचे आहे, जेणेकरुन लोप पावत चाललेल्या लोककला पुढच्या पिढीपर्यंत पोहचतील. जनजागृती करण्याचे सर्वात उत्तम साधन सोशल मीडिया आहे.

३. श्रीनिवास अकेला : पुरुष : वय – ५४ : बी. कॉम. : फोटोग्राफर

मत : – photograph which affects you in any manner is worth more than a award. As a photographer we need to document various folk arts, in our state and country. One of the main job of a photo journalist is documentation and creating awareness among people.

४. प्रज्ञा उद्धवराव शिंदे (आपेगांवकर) : स्त्री : वय – २८ : बी. टेक इन फूड टेक्नॉलॉजी : लोककलाकार

मत : आपण शब्द वाचतो आणि पुढे जातो. पण फोटो हा मनात खोलवर बिंबतो. शालेय जीवनापासून लोककला मुलांना दाखवावी व टीव्हीवर जास्त कार्यक्रम दाखवावेत.

५. अरुण यशवंत सोनवणे : पुरुष : वय – ४४ : बी.ए.,एम.एस.डब्लू. : समाजसेवक

मत : फोटोमधील आशय मनाला लगेच भिडतो. नवीन पिढीला लोककलांचे महत्त्व पटवून देऊन त्याला राजकीय मदत मिळाली पाहिजे. सामाजिक माध्यमांचा नक्कीच फायदा होऊ शकतो.

६. नितीन शांताराम चव्हाण : पुरुष : वय – ४८ : बी. ए. : पत्रकार

मत : सामाजिक भान असलेले छायाचित्र असेल तर धगधगते वास्तव जाणवते. निसर्ग चित्रण असेल तर मनाची समृद्धी वाढते. वारी, तमाशा व इतर लोककलेची छायाचित्र असल्यास आपल्या समृद्ध परंपरेचा अभिमान वाटतो.

लोकाश्रय आणि राजाश्रय मिळायला हवा. लोककलांचे महोत्सव मोठ्या प्रमाणात भरवायला हवेत. कलावंतांच्या घरची चूल पेटली तर ते आपले अधिक चांगले मनोरंजन करतील. म्हणून कलावंतांना उत्तम मानधन, वृद्धपणाची सोय म्हणून चांगली पेन्शन मिळायला

हवी. आपण पाहिलेल्या लोककलेची प्रसिद्धी करावी. तिचे कौतुक करावे. लेखक, पत्रकारांनी ठळक प्रसिद्धी द्यावी. समीक्षा करावी. ओळखीच्या संस्थांमध्ये पुरस्कारासाठी शिफारस करावी.

७. मनोज कैलासचंद्र मेहता : पुरुष : वय – ५८ : एच. एस. सी. : फोटोग्राफर

मत : फोटोतून आशय प्रत्यक्ष प्रभावीपणे दिसतो. शाळा कॉलेजातूनच संस्कार करणे गरजेचे आहे. आपल्या सणांमधून पथनाट्ये करायला पाहिजे. व्यक्तिदर्शनाचा उपयोग करून, प्रकाशमाध्यमातून आकर्षक कलाकृती जनमानसात मांडता येतील हे नक्की.

८. माधव शिरवळकर : पुरुष : वय – ६३ : बी. कॉम : संगणक तज्ञ, पत्रकार, नाट्यलेखक

मत : युट्यूबवर लोककला अधिक प्रमाणात दाखवावी. त्यासाठी लोककलावंतांनी स्वतः मोबाईलच्या सहाय्याने युट्यूब चॅनेल चालवायला शिकवले पाहिजे. एक छायाचित्र हे भुकेल्यासाठी एका घासासारखे आहे. घास महत्त्वाचाही आहे आणि गरजेचा देखील, भूक शमवण्याची सुरूवात करणाराही आहे. पण एका घासाने भूक भागत नसते. अनेक घासांची मालिका भूक भागवू शकते. तद्वत छायाचित्रांची मालिका एकत्रित सादर होणं आणि त्या मालिकेला शब्द म्हणजे कॅप्शन्स वा तळटीपा असणं फार गरजेचं किंवा उपयुक्त आहे.

९. राजेश सखाराम मडाओ : पुरुष : ४९ : पदवीधर, : फोटोग्राफर

मत : 85 percentage of thoughts created in human mind are through the visuals he sees. So a photo has more power than words. Social media is a very powerful medium due to advancement of technology. Various mediums like Facebook, Whats-pp, twitter, Instagram can be used for creating awareness.

१०. डॉ. विश्वास पोपट मोरे : पुरुष : वय – ४४ : मास्टर इन जर्नलिझम, पीएचडी, : पत्रकार

मत: शासन पातळीवर कला अकादमी सुरू करावी. कलावंत शिष्यवृत्ती योजना सुरू करावी. विद्यापीठीय शिक्षण हवे. लघुपट, फोटो क्लिक करून सत्य घटनांचे चित्रण करता येईल.

११. रामदास दिगंबर कदम : पुरुष : वय – ३२ : एम ए बी एड, : लोककलाकार (गोंधळी)

मत : शब्द हे भाषणानंतर संपत असतात. फोटो हा दीर्घकाळ आपण पाहू शकतो, कितीही वेळा पाहू शकतो. जे पारंपरिक लोककला सादर करत आहेत, त्यांच्या येणाऱ्या पुढील पिढीला प्राधान्य देण्यात यावे. त्यांच्या पूर्वजांच्या लोककलांचा इतिहास आठवावा.

१२. ओंकार सिंघ प्लाहा : पुरुष : वय – ७४ : पदवीधर, : फोटोग्राफर

मत: These artists should be educated directed to present more effectively. The onus is on the effluent, politicians and the eminent personalities from advertising film industry for supporting them in every which way. Offer them means and skill in the art of presentation and marketing their art. Plus there should be willingness from the art associations to support them financially.

१३. विक्रांत पाटील : पुरुष : वय – ३४ : बी. ई. मेकॅनिकल, पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा इन इंडियन फिल्म स्टडीज् : चित्रपट समीक्षक

मत : Any visual medium is more effective than words. - semiotic approach will help in studying true event through a photograph.

१४. फैयाज खान : पुरुष : वय – ५१: पदवीधर, : फोटोग्राफर

मत: आपण फोटो आधी पाहतो व लेख नंतर वाचतो. लोककलांचे प्रयोग आणि प्रदर्शन जास्त प्रमाणात होत राहिले पाहिजे. कोणत्याही घटनेचा फोटो हा त्याच्या सत्यतेचा पुरावा असतो. अशा छायाचित्रांचं दस्तऐवजीकरण करून सत्य घटनांचा आढावा घेता येईल.

१५. प्रतिश सर्जेराव गायकवाड : पुरुष : वय – ३८ : कला स्नातक–पत्रकारिता पदवीधर : कायद्याचे अभ्यासक

मत : सत्य घटनेचे फोटोज् काढून ते दस्ताऐवज म्हणून निरंतर संग्रही राहतात. फोटोच्या माध्यमातून आशय व विषय अधोरेखित होतो. हजार शब्दांत मांडता येणारी गोष्ट एका फोटोद्वारे त्वरित अवगत होते.

१६. श्रीकांत लक्ष्मण कांबळे : पुरुष : वय – ४७ : मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, पत्रकार

मत: मानवी भाव टिपण्यासाठी फोटोग्राफी हे महत्त्वाचे माध्यम आहे. मनातील व चेहऱ्यावरील भाव कॅमेरा जेवढे काटेकोरपणे टिपतो, तेवढा भाव शब्दांच्या चिमटीत व अंतरंगात मावत नाही. प्रकाश फोटोतून योग्य तो मेसेज प्रेक्षकांसमोर पोहचतो. शब्दांच्या अर्थ व भावछटांना मर्यादा पडते. कोणतीही घटना किंवा प्रसंग पुन्हा तशीच पाहावयाची असेल तर त्यासाठी छायाचित्रण करून ठेवलेले फोटोग्राफ्स किंवा क्लिप हेच पुर्नप्रत्ययाचा अनुभव देऊ शकतात. दिवसभर टीव्हीसमोर मॅच पाहूनही दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांमध्ये पुन्हा एकदा तो

प्रसंग पाहावासा वाटणे हा त्याचाच भाग आहे. म्हणून तिला कोणतीही गोष्ट पुनःप्रत्यय घ्यावी अशीच वाटते. म्हणून फोटोग्राफी हे महत्त्वाचे साधन आहे. कोणत्याही घटनांची सत्यता छायाचित्रांवरून समजून घेता येते. परंतु अलीकडच्या काळामध्ये छायाचित्रांचं मिक्सिंग हा मोठा धोका समोर आलेला आहे.

१७. रमेश रामचंद्र वर्तक : पुरुष : वय – ७८ : पदवी, अर्थशास्त्र – राज्यशास्त्र : लेखक

मत : शालेय शिक्षणात समावेश, लग्न समारंभ, राजकीय मंचावर प्रथम लोककला सादर करावी. कार्पोरेट आणि धर्मदाय संस्थांचा पाठिंबा. सोशल मीडियावर नियमित लोककला सादर करणे. मीडियाचा अपुरस्कृत आधार. वर्तमानपत्रात दर आठवड्याला लोककला आणि कलावतांसाठी एक कॉलम राखून ठेवावा. थिएटर्स आणि गॅलरीमध्ये रिझर्वेशन ठेवावे. अशा प्रकारे भरीव मदत होऊ शकते. मीडियाची मानसिकता घडवायला हवी. सेकंदात लाखो लोकांपर्यंत पोहोचण्याची जबरदस्त ताकद टीव्हीमध्ये आहे. वृतपत्र, व्हाटसॲप, फेसबुक, ईमेल माध्यमांचा वापर करायला हवा.

१८. सीमा सोनावणे : स्त्री : वय – ३८ : पदवीधर फिईन आर्ट, अप्लाईड आर्ट : चित्रकार

मत: त्यात वेगवेगळे प्रयोग करत राहिले पाहिजे, जेणे करून नवीन पिढी ही त्यात इंटरेस्ट घेईल. फोटोग्राफीच्या सहाय्याने सत्य परिस्थिती एकाच वेळी खूप लोकांवर प्रभाव पाडेल.

१९. हरिष ज्ञानू यमगर : पुरुष : वय – ५४ : बी. ए. राज्य शास्त्र : पत्रकार

मत : प्रकाशचित्र हे बहुभाषिक आणि थेट वास्तव दाखविणारे माध्यम आहे. वेगळे पुरावे देण्याची गरज भासत नाही. संशय घ्यायला जागा उरत नाही. मात्र जो विषय मांडायचा आहे, तो विषय मांडताना परिपूर्ण प्रकाशचित्र समोर येणे आवश्यक आहे.

२०. सुरेखा नायर : स्त्री : वय – ५६ : एम. ए. बुद्धिस्ट स्टडीज : पत्रकार

मत: Even an illiterate person can understand the situation to some extent if the photograph captures the event, its emotion, etc. By offering them government support, bringing them to national parades, have folk art festivals, etc.

२१. सी. आर. बालासुब्रमणीयम : पुरुष : वय – ६५, पदवीधर आणि डिप्लोमा इन जर्नालिझम, पत्रकार

मत : Any event takes place the photographer gives you visual image about the incident let it be building collapse, the damages done by earth quake and floods, train accidents and many events.

२२. श्रीनिवास अनंत बेलसरे : पुरुष : वय – ६४ : मास्टर ऑफ मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, पत्रकार, जनसंपर्क अधिकारी

मत : फोटोमुळे नक्की परिणाम होतो. फोटोतील आशय केवळ माहित होतो असे नाही तर लिखित वृत्तापेक्षा अधिक सुलभतेने व तात्काळ समजतो, मनावर बिंबतो. त्यांच्या दर्जाचे प्रमाणिकरण व्हावे. त्यांना थिएटर सहज मिळावे. कलावंताचा आर्थिक स्तर उंचविण्यात यावा.

६०० लोकांना प्रश्न विचारून त्यातील निवडक ३५ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची संशोधनाबद्लची मत जाणून घेण्यात आली.

१. संतोष जगधने : पुरुष : वय – ४२ : एम. कॉम., एम. एस. डब्लू., एल. एल. बी., व्यवस्थापक (सामाजिक जवाबदारी)

मत: Words can't give a visual effect but photographs can.

२. सुधीर वाघ : पुरुष : वय – ५० : बी. एस. सी. जी. डी. आर्ट (ड्रॉईंग आणि पेंटिंग). ए. टी. डी. फोटोग्राफी डिप्लोमा

मत: त्यात जिवंतपणा जाणवतो. फोटो मनावर छाप पाडतो. कारण फोटो हा बघताच तुम्हाला भावना जाणवते. ते लिहून जमत नाही.

३. अक्षय भगत : पुरुष : वय – २५ : बी. ई. कंप्युटर

मत: काही फोटो हे मनाला भिडणारे असतात, जे सत्य परिस्थिती दाखवतात. फोटोग्राफी हे माहिती मिळवण्याचे एक चांगले माध्यम आहे. फोटोग्राफीच्या माध्यमातून एखाद्या सत्य घटनेचे क्षणचित्रे घेऊन ते लोकांपर्यंत सहज पोहोचवू शकतो आणि त्याच एक चांगला परिणाम सुद्धा होऊ शकतो.

४. संजय बळीराम जगताप : पुरुष : वय – २७ : पदवीधर

मत: बऱ्याच वेळा बोलण्याद्वारे किंवा लिखाणाद्वारे लक्षात येत नाही. पण तीच गोष्ट आपल्याला फोटोग्राफीतून लगेच कळते.

५. पुष्कर गायकवाड : पुरुष : वय – २९ : एम. बी. ए. मार्केटिंग

मत: It almost gives me the background about that picture or particular frame which I can relate to it by somehow as per my assumption. I believe, One picture is equal to thousands of words.

६. वर्षा जोशी पाटील : स्त्री : वय – ४२ : एम. एस. डब्ल्यू

मत: लोककला ह्या प्रत्येकापर्यंत पोहोचायला हव्यात. त्याच्या स्पर्धा व्हायला हव्यात. जेणेकरून पारंपारिकतेसोबतच त्याचा करमणुकीच्या सहाय्याने लोकांपर्यंत पोहचावे यासाठी त्याचे स्वातंत्र्याने प्रयोग व्हायला हवेत. सातत्याने प्रयोग करुन, त्या प्रयोगांच्या स्पर्धा घेऊन व त्या सादरीकरणासाठी थोडं अर्थसहाय्य द्यायला हवं. असं माझं वैयक्तिक मत आहे.

७. सुहास चंद्रकांत रेळेकर : पुरुष : वय – ५४ : एस. एस. सी.

मत: १००% संपूर्ण माहिती एक फोटोतून समजते. लोककलाकारांचे शहरी भागात विविध सणांना कार्यक्रम आणि त्यांच्या शहरातील नागरिकांशी संवाद घडवून त्यांची कला जतन होऊ शकते.

८. महादेव गोविंद जेकटे : पुरुष : वय – ५८ : बी. ए.

मत: Photo gives correct and true views of the situation. Social media's role is very important by presenting true picture of the people. True situation of the society is very important.

९. संजय गणपत परब : पुरुष : वय – ५३ : बी. एस. सी., पत्रकारिता पदवी, पत्रकार

मत: जे हजार शब्द सांगू शकत नाही ते काम एक फोटो करतो. पण, भारतात फक्त काम आटोपण्यापुरती फोटोग्राफी होते. संशोधन काम अतिशय कमी होते.

१०. रवींद्र पुणतांबेकर : पुरुष : वय – ६४ : बी. एस. सी., डी सी ई. फोटोग्राफर

मत: आपण त्या घटनेपर्यंत, त्या जागेवर तात्काळ पोहचतो. काय घडलंय, का घडलंय याचं विवेचन करतो किंवा सृष्टीसौंदर्याचा आनंद घेतो.

११. नितीन कीर : पुरुष : वय – ६३ : जी.डी. आर्ट (जे जे उपयोजित कला महाविद्यालय) मुंबई.

मत: कोणताही फोटो पाहिल्यानंतर क्षणात वास्तव्याची कल्पना येते. त्याचबरोबर छायाचित्रे यथार्थ परिणाम नक्कीच करतात. आजकालच्या ओघात लोककला लोप पावत आहे. तिचे पुनर्वसन करण्यासाठी त्याचं सादरीकरण समाजातील सर्व स्तरातील लोकांसमोर करणे अत्यावश्यक ठरते. आज जलदगतीने बदलणाऱ्या जीवनशैलीत सामाजिक माध्यमांनी आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. लोककलांचे लघुचित्रण मालिकांचे सादरीकरण दूरदर्शन, व्हॉटसॲप अशा सोशल मीडियावर केले तर लोककला नक्कीच जिवंत ठेवण्यासाठी मदत होईल.

१२. संजय पटवर्धन : पुरुष : वय – ५१ : बी कॉम

मत: लोककला जनमानसापर्यंत पोहोचण्यासाठी विविध अंगाने उपाय करायला हवेत, अशा लोककलांचे फोटो प्रदर्शन हा एक याचा पर्याय असू शकतो. एखाद्या घटनेचे विविध अंगांनी प्रकाशचित्रण केले असता वेगवेगळे दृष्टिकोन तयार होऊ शकतील.

१३. शीतल संदीप मिरके : स्त्री : वय – ३५ : बी. ए.

मत : फोटोमुळे घडलेला प्रसंग क्षणात डोळ्यांसमोर येतो, आणि त्या प्रसंगाची दाहकता अनुभवल्या सारखं वाटतं. एखादा प्रसंग शब्दात मांडायचा तर त्याला शब्द समूह जास्त लागतो, भाषेवर प्रभुत्व असावं लागतं, कमी शब्दात संपूर्ण घडलेली घटना मांडणं ही खूप अवघड गोष्ट आहे, आणि हे सगळ्यांनाच जमतं असं नाही. ह्या उलट जर एखाद्या घडलेल्या घटनेचा फोटो आपण पहिला तर आपल्याला ती घटना लगेच समजते, किंवा तिचे पडसाद आपल्या मनावर खोल परिमाण करून जातात. म्हणून मला वाटतं की, शब्दांपेक्षा फोटो अधिक प्रभावी असतात. जिथे जिथे अशा घटना घडतात, त्या सर्व घटना फोटोंमधून समाजासमोर प्रदर्शनामार्फत मांडायच्या जेणेकरून समाजाला त्या घटनांचे गांभीर्य समजेल.

१४. सतीश म. शिंदे : पुरुष : वय – ४९ : डी. एम. ई., शिक्षक

मत: प्राचीन काळापासून शिल्पचित्र, गुंफाचित्राद्वारे मानवाने त्या त्या काळातील चालीरिती, वेशभूषा, लोककला जपण्याचा प्रयत्न केला आहे. अजिंठा, वेरूळ लेण्यात भिंतीचित्रातून बुद्धकालीन जातक कथा जिवंत करण्यात आल्या आहेत. सत्य घटना कळण्यासाठी चित्र हे प्रभावी माध्यम आहे, हे प्राचीन काळापासून मानवास ज्ञात असल्याचेच

द्योतक आहे. त्यामुळे कलेच्या जपणुकीसाठी आताच्या प्रगत तंत्राचा अवलंब करायलाच हवा. प्रकाशचित्रण ही एक कला असल्याचे, माझे ठाम मत आहे. त्यामुळे त्याचा निशब्द आवाका पाहणाऱ्याच्या मनात ठसविणे हा आहे.

१५. राहुल अंकुशराव पांचाळ : पुरुष : वय – २५ : बी. कॉम.

मत: आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात लोक वृत्तपत्र कमी वाचत आहेत, त्यामुळे त्यांना ते समजणे कठीण जाते. तसेच एखादी बातमी असेल आणि ती शब्दात असेल तर माणूस समजू शकतो. पण तीच बातमी फोटोच्या रुपात असेल तर माणूस हा imagine करू शकतो. तसेच फोटो हे बोलके असतात म्हणून अधिकच प्रभावी ठरतात. आजच्या पिढीला याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे नवनवीन उपक्रम राबविले पाहिजेत. त्यातून लोककलेला वाव मिळतो.

१६. डॉ. रासगे गंगाधर बापू : पुरुष : वय – ५६ : एम. ए., एम. एड., पी. एच. डी.

मत: लोककलावंतांना आश्रय देणे, प्रोत्साहन देणे, अधिक कार्यक्रम घेणे, त्यांना प्रसिद्धी देणे, नवोदितांना प्रशिक्षण देणे. आधुनिक काळ सोशल मीडियाचा आहे, त्यामुळे त्यावर प्रसारण व प्रसिद्धीतून मदत होईल, वस्तुनिष्ठता येईल, घटनेचा पुरावा राहतो. विश्वासार्हता प्राप्त होते. जतन केल्यास ऐतिहासिक साधन म्हणून दीर्घकाळ टिकतो.

१७. सुलभा सुभाष कदम : स्त्री : वय – ५३ : बी.ए. पत्रकारिता

मत: ऐकण्यापेक्षा बघण्यात सत्यता जास्त असते. लोककलावंतांचे गावोगावी मेळावे घेतले पाहिजेत. तेथे त्यांच्या कला सादर केल्या पाहिजेत.

१८. जितेंद्र रामचंद्र चव्हाण : पुरुष : वय – ४८ : एच. एस. सी.

मत: सोशल मीडिया, टि.व्ही चॅनल्स यावरून त्यांची जास्तीत जास्त प्रसिद्धी व्हावी. तरच ही कला लोकांपर्यंत पोहचू शकेल. ही कला लोकांपर्यंत जास्तीत जास्त पोहचली तरच लोकाश्रय मिळेल. जी व्यक्ती फोटोग्राफ पाहत असते ती त्या फोटोमधील सत्य पाहत असते किंवा फोटोग्राफर त्या फोटोमधून सत्य सांगायचा प्रयत्न करीत असतो.

१९. सुयोग हेमंत पवार : पुरुष : वय – ३० : बी.एस्सी (बॉटनी)

मत: शब्द हे काल्पनिक असू शकतात, फोटो हे वास्तव असते, म्हणून तो अधिक प्रभावी ठरू शकतो. शालेय स्तरावरच जनजागृती झाली पाहिजे. ते बीज रुजले गेले पाहिजे. काही वेळ जाऊ शकतो पण त्यातून जो परिणाम निघेल तो दीर्घकाळ टिकेल.

२०. संतोष खरटमोल : पुरुष : वय – ४४ : बी. ए.

मत: The government needs to raise awareness of the importance of preserving folk art. If people are told that their culture is at risk, they'll do more to protect it. Folk art should also be taught in primary and secondary schools so that more students can learn about it and understand it.

२१. नवनाथ गिलबिले : पुरुष : वय –३९ : बी. ए.

मत: एखादी गोष्ट शब्दात मांडणे हे खूपच कठीण काम आहे. फार कमी लोकांना ही कला अवगत आहे, तरीसुद्धा शब्दांच्या माध्यमातून एखादी घटना हुबेहुब तशीच्या तशी सादर करणे अवघड आहे. फोटो हा घडलेल्या घटनेचा बोलका साक्षीदार असतो. फोटोच्या माध्यमातून एखादी गोष्ट पुरेपूर मांडता येते किंवा समोरच्या व्यक्तीला समजावता येते.

२२. प्रथमेश तांबे : पुरुष : वय – २७ : पदवीधर

मत: प्रत्येक फोटोमागे त्याची विशिष्ट कथा दडलेली असते. फोटो ही एक अशी गोष्ट ज्यामध्ये जीवनातले अमूल्य क्षण (पुन्हः न येणारे/मिळणारे) टिपता येतात आणि ते आयुष्यभरासाठी फोटो स्वरुपात कैद करता येतात. Every photograph has its own value emotion. As a viewer, I personally connects with its emotion while watching photographs, whether it's joyful, serious or sad.

२३. अक्षता वीरकर : स्त्री : वय – २० : बी. एम. एम.

मत: It gives out the emotions in person, thing or nature. It tells the mood in the picture. We should encourage kids to learn at least one folk art to keep our culture alive.

२४. सुशिल स. म्हाडगुत : पुरुष : वय – ३६ : वाणिज्य पदवी

मत: परिणामकारक फोटो असल्यास तो फोटो आपल्या मनात खोलवर रुजतो. सोशल मीडियाचा वापर केला गेला पाहिजे. त्याच बरोबर गरज भासल्यास याबद्दल जाहिरातीसुद्धा (वृत्तपत्रे, सोशल मीडिया, वृत्तवाहिनी इ. ठिकाणी) द्याव्यात. जास्तीत जास्त लोकांपर्यंत या कलेचा प्रसार व्हायला हवा.

२५. रामचंद्र संतुराम कर्णिक : पुरुष : वय – ८९ : बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन

मत: सत्यघटनांच्या प्रकाश चित्रणांत सातत्य वाढवावे. त्यात स्वतःचे समाधान न मानता व्यावसायिकता आणावी. मिळणाऱ्या रिस्पॉन्स वरून आढावा घेणे सहज शक्य होईल.

२६. विवेक सुरेश भोर : पुरुष : वय – ३६ : बी. ए., मास कम्युनिकेशन अँड जर्नालिझम, पदविका, पत्रकार

मत: फोटो मानवी मनावर तात्काळ परिणाम करतो. फोटोग्राफरने त्या फोटोत भाव किंवा घटना कशी टिपली आहे त्यावरून घटनेचे गांभीर्य लवकर समजण्यास मदत होते. फोटो हे शब्दांपेक्षा अधिक बोलके असतात. लोककलांचे कार्यक्रम अधिकाधिक आयोजित करायला हवेत यामुळे कलावंतांना आपली कामगिरी दाखवण्याची संधी द्यायला हवी. सरकारने लोककलावंताना जास्त प्रमाणात कार्यक्रम उपलब्ध करून दिल्यास त्यांची पोटापाण्याची दोन वेळची भ्रांत संपेल आणि ते आपली कला अधिक चांगल्या पद्धतीने लोकांसमोर सादर करतील.

२७. शैलेंद्र मांढरे : पुरुष : वय – ३४ : पदवीधर

मत: लोककला नावाचा विषय शाळेपासून असायला काही हरकत नाही आणि लोककलावंतांना चांगले व्यासपीठ द्यायला हवे. चांगले मानधन मिळायला हवे तरच ही कला जपता येईल. लोककला जगवण्यासाठी सोशल मीडियाची मदत होऊ शकते..!! लोककलेचे चित्रण/फोटो काढून पोस्ट करणे.

२८. शंकर चांगदेव मोरे : पुरुष : वय – ५७ : एम. ए. (Hist/Socio/Eco/n Ed. equalant to एम.एड., बी. ए. इतिहास/ मराठी, बी. एड. इंग्रजी इतिहास

मत शब्द डोळ्यांना वाचायला लावतात, तर फोटो हृदयातील जुन्या आठवणींना नुसतंच उजाळा देत नाहीत तर; हसता हसता रडायला नि रडता रडता हसायला लावतात...प्रतिमा नि प्रतिभा यांचं लहरण सुरू होतं.

२९. संग्राम मुक्ता संतराम सावंत : पुरुष : वय – ३७ : बी. ए., डी. एड.

मत: फोटोतून चटकन आशय प्रभावीपणे समजतो... माणूस त्या घटनेशी समरस होतो. शासनाने यासाठी लोककला धोरण आखून त्याची ठोस अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे. तसेच जनतेने ही हा वारसा समृध्द करण्यासाठी सहयोग करावा लागेल. मनापासून जनतेने यात जीव लावला पाहिजे. ही संपत्ती आहे आपली!

३०. प्रथमेश श्रीकृष्ण प्रभुतें डोलकर : पुरुष : वय – ३२ : एम एम एस फायनान्स

मत: एखाद्या गोष्टीचे विस्तृत वर्णन, विश्लेषण हे शब्दांपेक्षा अधिक प्रभावीपणे चित्रांतून सहज मांडता येते. चित्रांना कोणत्याही भाषेचे बंधन नसते ही सर्वात महत्त्वाची व जमेची बाजू.

३१. विजय देवचंद झनके : पुरुष : वय – ४३ : बी. ए. सी. टी. सी.

मत: शब्दाला वळण लावता येते ते बदलवता येतात. फोटो एकदा जसा प्रतिबिंबीत केला त्यामध्ये त्याच भावना व्यक्त होतात. सरकारने लोककला शालेय शिक्षणातून शिकवण्याची गरज आहे.

३२. हरिप्रसाद विजयकुमार गाडेकर : पुरुष : वय – ३४ : बी.ए.म्युझिक, संगीत विशारद, बी.लीफ

मत: फोटोग्राफी सामाजिक स्वास्थ टिकवण्यासाठी झाली तर नक्की सत्य घटनांचा आढावा घेतला जाईल.

३३. जितेंद्र किशोर पगारे : पुरुष : वय – ३२ : बी. ए.

मत: दृश्य हे आपल्या स्मरणात खूप काळ राहू शकतात. कारण मनुष्य हा विचार करताना images मध्ये बघत असतो.. त्यामुळे दृश्य हे खूप काळ मुनुष्याच्या स्मरणात घर करून राहते. त्यामुळे ते खूप प्रभावी माध्यम आहे.

३४. रविंद्र वसंत कांबळे : पुरुष : वय – ४० : बी. ए. मास कम्युनिकेशन

मत: शब्द हे वस्तुस्थिती सांगण्याचे काम करतात तर फोटो हे वास्तव दाखवण्याचं काम करतात. कमीत कमी शब्दांमध्ये फोटो हा बरच काही वास्तव दाखवण्याचं काम करतो.

३५. विजय सिताराम गुरव : पुरुष : वय – ४९ : बी. कॉम., डी. ई. एम.

मत: एखादा फोटो पाहून वस्तुस्थिती लक्षात येते आणि व्यक्तिच्या मनःस्थितीचे किंवा प्रसंगाचे नीट आकलन करता येते.

४.४ प्रबंधाची उद्दिष्टे आणि पूर्तता

संशोधकाने या प्रबंधासाठी खालील उद्दिष्टे ठरवून काम करायला सुरुवात केली. संशोधन योग्य पद्धतीने करण्याचा प्रयत्न करून ती उद्दिष्टे साध्य होतात का ते पहिले. ती उद्दिष्टे:

१. लोककलाकारांचे जीवन प्रकाशचित्रणातून अभ्यासणे.

लोककलाकारांचे आयुष्य छायाचित्रित करून, समाजापुढे सादर करणे जरुरीचे आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती लोकांसमोर आली तर, त्यांना समाजातून मदतीचे हात मिळू शकतात. फोटोतून परिस्थितीची तीव्रता अचूक कळू शकते. तसेच, त्यांच्या कलेची जपणूकही प्रकाशचित्रे करू शकतात.

त्याने दहा कलाकारांसोबत राहून त्यांचे जीवन प्रकाशचित्रणातून अभ्यासले. त्यांच्या पूर्वजांचा इतिहास समजून घेतला. त्यांच्या कुटुंबातील लोकांसोबत सुद्धा वार्तालाप करून माहिती संकलित केली. यातल्या खूप साऱ्या बाबी प्रत्यक्ष निरीक्षणाने अनुभवल्या. त्यातून या लोककलावंतांचे संपूर्ण आयुष्य किती दु:खी–कष्टी आहे याची प्रचिती आली.

२. लोककलाकारांच्या उदरनिर्वाहाची सोय कशी होईल आणि त्यांचे राहणीमान कसे उंचावेल, हे शोधणे.

या दोन्ही बाबी सरकारच्या मदतीने व आपल्या संपूर्ण समजाच्या पुढाकारानेच साध्य होऊ शकतील. या कलाकारांना, समाजाकडून मान मिळायला पाहिजे. आज मुंबई सारख्या शहरात या कला सादर व्हायला लागल्यात. तरी त्या कलावंतांना मान–सन्मान अद्याप मिळत नाहीय. तमाशा–लावणीसारख्या लोककलेला आज बरे दिवस आलेत. परंतु काही लोककला व कलाकार, आजही अंधारात आहेत आणि त्यासाठी शासनाने शहरांपेक्षा गावोगावी लोककलांचे उरूस भरवायला हवेत आणि नागर रसिकांना इथून तिथे नेण्याची व्यवस्था करायला हवी.

३. लोककलाकारांना लोकाश्रय व राजश्रय मिळवून देण्यासाठी काय काय करावे लागेल याची माहिती करून घेणे.

आपण स्वत:पासून ही गोष्ट सुरू करून, त्या कला बघायला पाहिजेत. त्या सर्व कलाकारांबद्दल आपल्याला आदर असायला हवा. आपल्या घरगुती कार्यक्रमात व समारंभात या कलावंतांना बोलावून त्यांच्या कलांचा आदर करायला पाहिजे. खेडेगावापासून ते कलाकार

शहरात आणण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. त्या लोकांला योग्य मोबदला मिळवून द्यायला हवा. समाजाकडून देखील त्या कलेचा व कलाकाराचा योग्य सत्कार, सन्मान व्हायला पाहिजे. सरकारी शाळा, विद्यापीठे, शासनाच्या मैदानावर देखील या लोककलांचे आयोजन नियमित करायला हरकत नाही. त्यामुळे सामान्यातील सामान्य जनदेखील ही कला उपभोगू शकतील. आपोआपच तिचा प्रसार व प्रचार होईल.

आपल्या सरकारने लोककलाकरांसाठी विविध योजना राबवल्या आहेत. पण दुर्भाग्यवश त्यांच्यापर्यंत त्या योजना आजही पोहचल्या नाहीत. तसेच काही कलाकार तितकेसे शिकलेले नसल्याने त्यांना, या योजनांचा फायदा घेता येत नाही. लोककलाकारांना राजाश्रय मिळाला तर, लोप पावत चाललेल्या लोककला, अधिक प्रफुल्लित होऊ शकतील. त्यांचे कलेतील शिक्षण विनामूल्य व्हायला हवे, किंवा त्यांना परिपूर्ण अशी शिष्यवृत्ती मिळायला हवी. तसेच, वयस्कर लोककलाकारांना अधिक पेन्शन मिळायला हवी आणि त्यासोबत त्यांच्या आरोग्याचा विमाही सरकारने काढायला हवा.

४. लोककलाकारांच्या समृद्धीसाठी प्रयत्न करणे व जनजागृतीसाठी मार्ग शोधणे.

त्यांना लोककलेचे योग्य शिक्षण दिले पाहिजे. गावातील आणि शहरातील कलाकारांनी एकत्र येऊन लोककला आणखी वृद्धिंगत कशा होतील, त्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. फक्त आर्थिक फायदयासाठी लोककलाकडे न पाहता, आपला वारसा–आपली संस्कृती कशी टिकवता येईल हे पाहायला हवे. आणि सरकार दरबारी यासाठी उपाययोजना करायला हव्यात.

५. लोककलाकारांच्या पिढ्यांनी त्या कलेसाठी दिलेल्या योगदानाची माहिती करून घेणे व पुढच्या पिढ्यांसाठी मार्ग काढणे.

या संशोधनासाठी घेतलेल्या काही कलाकारांच्या अनेक पिढ्यानी कलेसाठी योगदान दिले आहे. पण आर्थिकदृष्ट्या कलाकार गरीब राहिल्यामुळे किंवा योग्य ते मानधन न मिळाल्यामुळे नवीन तरुण वर्ग लोककलांमध्ये रुची घेत नाहीत. तसेच ते दुसरे उद्योग धंदे करतात. अशा तरुणांना आपल्या चालीरिती, संस्कृती, पारंपरिक विधी ह्याची नव्याने ओळख करून द्यायला हवी, त्यांची लोककलेत रुची वाढवण्यासाठी नवनवीन संकल्पना अमलात आणल्या पाहिजेत. त्यांची मानसिकता जाणून घेतली पाहिजे.

६. लोककलांचा प्रसार व प्रचार करण्यासाठीच्या मार्गांचा शोध घेणे.

आताच्या काळात हे काम फार सोपे झाले आहे. सामाजिक पोर्टलद्वारे ते सहज करू शकतो. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यूट्यूब यावर त्या त्या कलाकाराची माहिती उपलब्ध होऊ शकते. त्यासाठी त्या कलाकाराला स्वत: अथवा कोणाच्या तरी मदतीने संगणक हाताळता यायला हवे. ते जरी येत नसेल, तर त्या कलावंताने त्याच्याजवळील मोबाईल योग्यरित्या वापरून स्वत: केलेल्या कलाप्रकराचे चित्रीकरण व फोटोंच्या पद्धतीने त्याची कला इतरांपर्यंत वरील बाबींने सहज पोहचवता येते. जास्तीत जास्त लोकांनी या सर्वांची कला पाहिली, तर आपोआपच त्यांची ही कला लोकांपर्यंत जाईल. फोटोग्राफीच्या व व्हिडिओ शुटिंगच्या तंत्राने ही जतन करून भावी पिढीला दाखवता येईल. संकेत स्थळाच्या उपयोगाने कलाकार व त्यांची लोककला जगाच्या सर्व कोपर्यात पोहचेल. दैनिक पत्रांतून लेखांद्वारे ही कला समाजात पोहचेल. वेगवेगळ्या वाहिन्यांच्या प्रेक्षपणातून सुद्धा ही लोककला जनमानसात पोहोचेल.

४.५ गृहितके पडताळणी

संशोधकाने गृहितके पडताळणी खालीलप्रमाणे केली आहे.

१) शब्दरचनेपेक्षा प्रकाशचित्रण हे अधिक प्रभावी साधन आहे.

सर्वेक्षणात अधिकाधिक लोकांनी छायाचित्रण हे शब्दांपेक्षा जास्त प्रभावी माध्यम आहे, असे मान्य केले आहे. तर काहींनी दोन्ही साधनाची बरोबरी होऊ शकत नाही, असे सांगितले आहे. काही तज्ञांच्या मते शब्द आणि फोटो दोन्ही बरोबरीचे आहेत. एखादी घटना ही शब्दातून जाणून घेण्यासाठी आपल्याला सुशिक्षित असणे जरुरी आहे. पण फोटो पाहून, त्या घटनेचे काल्पनिक चित्र अशिक्षित माणसाच्याही डोळ्यांसमोर उभे राहू शकते. म्हणून शब्दरचनेपेक्षा छायाचित्रण प्रभावी साधन आहे.

२) प्रकाशचित्रणामुळे लोककलाकारांचे व्यक्तिमत्व अधिक प्रभावीपणे मांडता येते.

सामान्य व्यक्तीला शब्दातून एखादया लोककलाकाराचे वर्णन करायचे झाले तर, त्याला ते अचूक असे जमणार नाही. पण जर त्या कलाकाराचा फोटो आपण पहिला, तर त्या कलाकाराचे वर्णन करायची गरज भासणार नाही. कलाकार जी वस्त्रे परिधान करतात किंवा जी वेशभूषा करतात, ती पाहण्यासारखी असते. तसेच, लोककला मंच व त्यातील प्रसंग हे सर्व शब्दरचनेतून सांगणे कठीण आहे. पण फोटोतून बघणाऱ्याला ते अचूक अवगत होते. म्हणून रंगकर्मींचे व्यक्तिमत्त्व फोटोतून जास्त प्रभावीपणे मांडता येते.

३) प्रकाशचित्रण कला ही सर्वसामान्यांपर्यंत संदेश पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम आहे.

नेहमीची वार्तापत्रे याचे बोलके उदाहरण म्हणता येईल. दिवसागणित घडणाऱ्या बाबींची सत्यता दुसर्या दिवशी वर्तमानपत्रांतून लोकांपुढे येते. त्या घडलेल्या प्रसंगाचे जसेच्या तसे चित्र फोटोंमधून वाचकांपर्यंत पोहचते. एखादया व्यक्तीला मदत पोहचवायचे काम फोटो करतात. वेगवेगळ्या आपत्तींमध्ये प्रकाशचित्रे खूपच मोठी भूमिका बजावतात. सामाजिक मन बदल्याचे मोठे सामर्थ्य हे एका प्रकाशचित्रात आहे.

४) काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला प्रकाशचित्रणाद्वारे पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे.

लोककला आता नष्ट होत चालल्या आहेत. त्या जर नवीन युवकांपर्यंत घेऊन जायच्या असतील तर फोटोग्राफी हे खूपच चांगले माध्यम आहे. दृक कला म्हणून फोटोकडे बघितले जाते. कलाकारांच्या वेगवेगळ्या मुद्रा यातून संग्रहित होतात. काही काळानंतर तर फक्त हाताच्या बोटांवरती मोजू इतक्याच लोककला शिल्लक राहतील. त्या जतन झाल्याचं पाहिजेत, त्यासाठी छायाचित्रण हा एक छान असा पर्याय आहे.

५) प्रकाशचित्रणामुळे घटनेची सत्यता लगेच अनुभवता येते.

विश्वात रोजच असंख्य घटना घडतात. त्या घटनांचा प्रसार खूपच वेगाने एका ठिकाणावरून दुसरीकडे होतो. वेगवेगळ्या वृत्तपत्रांद्वारे, दैनंदिन वाहिन्यांद्वारे त्या घटना काही क्षणात चटकन दुसऱ्या देशात पोहचतात. संगणकाच्या माध्यमातून तर कुठलीही वार्ता, कुठलेही छायाचित्र एका मिनिटामध्ये विश्वातल्या दुसऱ्या कोपऱ्यात पोहचते. म्हणूनच कोणत्याही परिस्थितीची सत्यता लगेच जाणून घेता येते. तेच जर शब्दात मांडायचं झालं तर खूपच अवघड होऊन बसते. फोटो पाहून त्यातील वार्तामूल्य लगेच समजते. सत्याच्या अगदी जवळ घेऊन जाण्याचे कार्य प्रकाशचित्रे करतात.

प्रकरण पाचवे

निष्कर्ष, शिफारशी व भविष्यवेध

५.१ निष्कर्ष:

१) फोटो हा सर्वांना कळतो मग ती व्यक्ती सुशिक्षित असो की अशिक्षित असो, म्हणूनच फोटोग्राफी हे शब्दांपेक्षा अधिक प्रभावी माध्यम आहे. त्याचबरोबर फोटो हे संदेश पोहचविण्याचे काम देखील करतात.

२) फोटो पाहून घडलेल्या घटनेची सत्यता लगेच अनुभवली जाते, एवढे मोठे सामर्थ्य फोटोंमध्ये आहे. तसेच सत्य घटनेचा आढावा घेण्यासाठी प्रकाश चित्रण हे प्रभावी माध्यम आहे.

३) लोककलाकारांचे आयुष्य छायाचित्रांमधून प्रभावीपणे मांडता येते. परंतु लोककला आता लोप पावत चालल्या आहेत. या काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला, प्रकाशचित्रणाद्वारे (फोटोग्राफीद्वारे) पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे. तसेच लोककला या समाज प्रबोधनाचे कार्य करतात.

५.२ शिफारशी

यात निष्कर्ष वस्तुनिष्ठपणे मांडले आहेत. शिफारशीही घेतल्या गेल्या आहेत. संशोधनाचा अभ्यास करताना अनेक विषय आणि समस्या प्रस्तुत संशोधकासमोर आल्या, परंतु या विषयाच्या संशोधनाचे प्रमुख ध्येय गाठता यावे यासाठी पाठपुरावा करून त्यातील काही समस्यांची उत्तरे शोधता आली नाहीत. यामुळे अशा विषयांच्या व समस्यांच्या संदर्भात पुढे संशोधन कार्य सुरू राहावे आणि भविष्यात संशोधन करणाऱ्या संशोधकांना या विषयाचा उपयोग व्हावा, याचा भविष्यवेधही येथे घेण्यात आला आहे.

१) शालेय शिक्षणात सुरुवातीपासूनच लोककलांचा समावेश करावा. जसे मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर पदविकेच्या पातळीवर लोककलेच शिक्षण सुरू आहे, प्रमाणपत्र शिक्षण सुरू आहे, पीएच.डी. सुरू आहे. तसेच पुढे मुंबई विद्यापीठामध्ये पदव्युत्तर पदवी सुरू करण्यात येणार आहे. अशाप्रकारचे लोककलेचे प्रशिक्षणवर्ग फक्त महाराष्ट्रातल्याच नव्हे तर भारतातल्या वेगवेगल्या विद्यापीठांमध्ये सुरू होणे गरजेचे आहे. तसेच लोककलावंतांद्वारे सामाजिक प्रशिक्षण देणारे कॅम्प सुरू होणे गरजेचे आहे. लोककलावंतांनी त्यांच्या मुलांना या लोककलांचं बाळकडू तर देणं महत्त्वाचं आहे. त्याचबरोबर त्यांचे शिक्षणही देणे गरजेचे आहे. जेणेकरून शिक्षणामुळे ते त्यांच्याच लोककलेचा अभ्यास खोलवर करतील आणि त्याचं त्यांच्या कलेवर संशोधन होईल. लोककलावंतांच्या तरुण पिढीने लोककलांचे सादरीकरण करायला हवे. लोककलांचे सादरीकरण त्यांनी केले तर ते उपाशी मरणार नाहीत हे नक्की. पुढे तेच लोककलाकार त्या लोककलांचं जतन करतील. लोककलाकारांचं 'सायकोलॉजी' च्या बाबतीत संशोधन होणे गरजेचं आहे, ते होत नाही. संशोधकांनी लोककलावंतांची मानसिकता जाणून घ्यायाला हवी. लोककलांचे जतन–संवर्धन करण्यासाठी भारत सरकारने, महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारच्या मोहिमा सुरू केल्या पाहिजेत आणि रिसर्च आणि डॉक्युमेंटेशनची एक मोठी चळवळ ह्या भारतात सुरू होणे गरजेचे आहे. आता जशी कल्चरल मॅपिंगची चळवळ सुरू झालेली आहे. ती पुढे जोर धरेल अशी अशा आपण प्रकट करूया.

२) लोककलांची एक स्वतंत्र वाहिनी असणे गरजेचे आहे. जशी कृषी वाहिनी, बालचित्र वाहिनी होती, अशा पद्धतीने लोककलांना वाहिलेली स्वतंत्र वाहिनी भारत सरकारतर्फे सुरू होणे गरजेचे आहे. या लोककलांना किंवा लोककलावंतांना राजाश्रय व लोकाश्रय असणं खूप गरजेचा आहे, जो पूर्वी होता. जोपर्यंत यांना राजमान्यता आणि लोकमान्यता मिळत नाही तोपर्यंत या कलांची भरभराट होणार नाही. चित्रकार, प्रकाशचित्रकार, चलचित्रकार, शिल्पकार या सर्वांनी त्यांच्या त्यांच्या परीने या लोककलाकारांवर कलेच्या माध्यमातून काम करून त्या प्रदर्शन रूपाने, वेबसाईटच्या रूपाने, सोशल मीडियाच्या रूपाने, वृत्तपत्रांच्या रूपाने, विविध दूरचित्रण वाहिन्यांच्या रूपाने इतर समाजापर्यंत व संपूर्ण जगापर्यंत पोहचायला हव्यात. पुढे त्यांचे दस्ताऐवजीकरण व जतन व्हायाला हवे. आपण प्रत्येकाने समाजाचा एक घटक म्हणून लोककलाकारांना प्रोत्साहित करायला हवे. आपण त्या लोककला पाहणे हेच त्या लोककलांचं आणि लोककलाकारांचं जतन करणे आहे. शहरी भागातल्या वेगवेगळ्या विधींमध्ये आपण प्रत्येकाने लोककलांचा सहभाग करायला हवा.

३) खूपच कमी प्रमाणात वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, या लोककलाकारांच्या संदर्भात लिखाण करतात व प्रकाशचित्रे छापतात. लोकांपर्यंत या लोककलाकारांची कला पोहोचलीच नाही तर त्या कलेचा प्रचार–प्रसार व विकास कसा होणार? तो जर व्हावा असे वाटत असेल तर जास्तीत जास्त लिखाण या सर्वच लोककलांवर व लोककलाकारांवर व्हायला हवे.

४) लोककलावंतांच्या उतार वयात त्यांना पेन्शन योजना किंवा त्यांच्या आयुर्विम्याची योजना सुरू होणे गरजेचे आहे. लोककलाकारांना भारत सरकारच्या वतीने, महाराष्ट्र शासनाच्या वतीने जे पुरस्कार दिले जातात त्यांची संख्या वाढवावी तसेच पुरस्करची रक्कम देखील वाढवावी. निवड समितीवरती खरा ज्येष्ठ व श्रेष्ठ हाडाचा कलाकार असावा त्यामुळे पारदर्शक्ता येईल व योग्य लोककलाकारालाच तो पुरस्कार मिळेल. तसेच महाराष्ट्र शासनाने गावोगावी छोटी छोटी कलादालने बांधावीत. ज्याद्वारे लोककलाकारांना हक्काचे व्यासपीठ गावातच उपलब्ध होईल. कारण मुंबई सारख्या

शहरात त्यांना सभाग्रहाचे भाडे परवडण्यासारखे नसते. अपना उत्सव सारखे लोककलांचे उत्सव भारतभर सातत्याने भरवून तेथे आपल्या समृद्ध लोककलेची ओळख संपूर्ण देशाला व मीडियाच्या माध्यमातून जगाला करून द्यावी. लोककलाकार हे भटके असल्यामुळे शासनाने त्यांच्या घरकुलाची अडचण दूर करावी.

५) लोककलाकारांवरती मोठ्या प्रमाणात चित्र, छायाचित्र, चलचित्र यांची प्रदर्शने होणे गरजेचे आहे, त्यासाठी शासनाने या कलाकारांना प्रायोजकत्व देणे गरजेचे आहे. तसेच या लोककलाकारांवरती संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील शिष्यवृत्ती शासनाने द्यावी. त्यामुळे जास्त प्रमाणात संशोधन या विषयात होईल.

५.३ भविष्यवेध

प्रस्तुत संशोधनातून निघालेले निष्कर्ष आतापर्यंत येथे स्पष्ट केलेच आहेत. महाराष्ट्रात लोककलांचा आवाका फारच मोठ्या प्रमाणात आहे तसेच त्या कला सादर करणारे कलाकारही फारच मोठ्या संख्येने आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी जी काही साधने वापरण्यात आली, त्यांच्याही काही प्रमाणात मर्यादा आहेत. उदा. प्रकाशचित्रण कॅमेरा व चलचित्रण कॅमेरा या दोघांच्याही काही मर्यादा आहेत. त्या कारणामुळेच संशोधनातून निघणाऱ्या निष्कर्षाला देखील मर्यादा असणे अपरिहार्य आहे. म्हणून हे निष्कर्ष 'सार्वजनिक व अंतिम' आहेत, असा दावा संशोधक करू शकत नाही. प्रत्येक संशोधनाच्या निष्कर्षाची फेरतपासणी करण्यासाठी निरनिराळ्या साधनांच्याद्वारे पुन्हा पुन्हा संशोधन करणे आवश्यक असते. तेव्हाच त्यातून अंतिम निष्कर्ष किंवा त्यातील सत्य कळू शकते.

पुढील संशोधकांसाठी काही सूचना येथे संशोधक देत आहे, जेणेकरून भविष्यात याच विषयावरती संशोधन करणाऱ्या संशोधकांना याचा फायदा होईल.

१) प्रस्तुत संशोधनात फक्त १० लोककलाकार निवडण्यात आलेले आहेत व फक्त प्रकाशचित्रणाच्या माध्यमातून त्यांच्या जीवनावरती प्रकाश टाकण्यात आला आहे. बाकीच्या असंख्य अशा लोककलाकारांवरती काम करण्यासाठी संशोधकांना पुढे वाव आहे.

२) या संशोधनात लोककलावंतांच्या ठराविकच बाबींवरच प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामुळे लोककलाकारांच्या जीवनातील असंख्ये पैलू पुढील संशोधकांच्या अभ्यासासाठी खुले आहेत. तसेच प्रस्तुत संशोधन हे फक्त महाराष्ट्र या राज्यापुरतेच मर्यादित आहे. त्यामुळे बाकी राज्यातील कलाकारांचा वेध घेऊन अभ्यास करण्याची संधी पुढील संशोधकांना आहे.

३) हे सर्व प्रकाशचित्रण या माध्येमातून मांडले असल्यामुळे ते दृष्य कलेतून मांडण्यात आले आहे. त्यामुळे बाकीच्या माध्यमांचा उपयोग करण्याची संधी नक्कीच पुढील संशोधकांना आहे.

४) प्रस्तुत संशोधनात या १० ही लोककलाकारांच्या मानसिकतेचा अभ्यास केला गेलेला नाही. त्यामुळे या सर्वांच्या मानसिकतेचा अभ्यास करून पुढच्या पिढीसाठी काही ठोस उपाय करण्याची संधी पुढील संशोधकांना आहे.

VII संदर्भ सूची

प्रकरण: १

१. लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश', खंड १५, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, पृ. ६८२.

२. 'http://www.worldpressphoto.org'

३. य. च. मुक्त विद्यापीठ, 'छायाचित्रण पत्रकारिता', नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, २००६, पृ. ३.

४. य. च. मुक्त विद्यापीठ, 'छायाचित्रण पत्रकारिता', नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, २००६, पृ. ७९.

प्रकरण: २

५. लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश', मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, https://vishwakosh.marathi.gov.in/30070.

६. लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश', खंड १५, मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, पृ. ६८३.

७. मुकुंद कुळे, 'मुक्त शब्द मासिक', मुंबई, सिद्धीविनायक आर्ट्स, पृ. ९,१०.

८. डॉ. रामचंद्र देखणे, 'महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला', पुणे, पद्मगंधा प्रकाशन, पृ. ३१.

९. डॉ. रामचंद्र देखणे, 'महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला', पुणे, पद्मगंधा प्रकाशन, पृ. ३६.

१०. लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश', मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, https://vishwakosh.marathi.gov.in/30070.

११. शर्मिला फडके, 'मुक्तशब्द मासिक', मुंबई, सिद्धीविनायक आर्ट्स, मे, २०१४, पृ. ३५.

१२. नितीन दादरावाला, 'प्रतिमा–प्रचिती', मुंबई, लोकवाङ्मय गृह, पृ. ३६२.

१३. संदेश भंडारे, 'मटा ऑनलाइन', ११ जुलै, २०१९.

१४. बी.बी.सी. चे 'हिस्ट्री मासिक', साल २०१४.

१५. प्रकाश बाळ जोशी, 'सामना', २ एप्रिल, २०१७.

१६. अजय गंपावार, 'लोकसत्ता', १७ जानेवारी २०१४, पृ. ६.

१७. परशुराम पाटील, आकाशी झेपावणारा छायाचित्रकार, ऑनलाइन १९ मे, २०१४.

१८. Sneha Pillai, "The Week', -ugust 19, 2016.

१९. "The Great Photographers', total issue 10, 1983.

२०. Ian Westwell, "World War I', Hermes House.

२१. शर्मिला फडके, 'मुक्तशब्द मासिक', मुंबई, सिद्धीविनायक आर्ट्स, मे, २०१४, पृ. ३६.

२२. संध्या गोखले, 'मुक्तशब्द मासिक', मुंबई, सिद्धीविनायक आर्ट्स, नोव्हेंबर–डिसेंबर २०१८, पृ. २४,२६, २९.

२३. अल्टर इमेजेस व्हिडिओ, 'यू ट्यूब', २६ जुलै, २०१५.

२४. प्रा. सतीश बहादूर, अनुवादः सुषमा दातार, 'चित्रपटाचे सौन्दर्यशास्त्र', मुंबई, लोकवाङ्मय गृह, पृ. २७/२८.

२५. एच. एन. नरहरी राव, अनुवादः रेखा देशपांडे, 'अविस्मरणीय १३०', ठाणे, परम मित्र पब्लिकेशन्स, पृ. २/३.

२६. एच. एन. नरहरी राव, अनुवादः रेखा देशपांडे, 'अविस्मरणीय १३०', ठाणे, परम मित्र पब्लिकेशन्स, पृ. ७.

२७. एच. एन. नरहरी राव, अनुवादः रेखा देशपांडे, 'अविस्मरणीय १३०', ठाणे, परम मित्र पब्लिकेशन्स, पृ. १२/१३.

२८. प्रहार प्रतिनिधी, आनंद पटवर्धन, 'सिनेमा द रिअल', ५ मार्च, २०१३.

२९. डॉ. दु. का. संत, 'संशोधन पद्धती, प्रक्रिया, अंतरंग', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पृ. ७.

३०. डॉ. दु. का. संत, 'संशोधन पद्धती, प्रक्रिया, अंतरंग', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पृ. १४, १५.

३१. डॉ. रा. र. बोरुडे, 'संशोधन पद्धतीशास्त्र', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पृ. ४, ५.

३२. डॉ. दु. का. संत, 'संशोधन पद्धती, प्रक्रिया, अंतरंग', पुणे, विद्यार्थी गृह प्रकाशन, पृ. ५०.

३३. डॉ.प्रदीप आगलावे,'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे',नागपूर, विद्या प्रकाशन, पृ. १९९, २००.

प्रकरण: ३

या प्रकरणात त्या त्या कलाकारांना, त्यांच्या परिवाराला, मित्रांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मुलाखती चलचित्रित केल्या. त्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१. भारुड सादरकर्त्या मीराबाई उमप

२. पारंपरिक गोंधळी राधाकृष्ण कदम (स्वर्गवासी)

३. शाहीर देवानंद माळी

४. वारीनृत्य व घागरनृत्य सादरकर्ते राजूबाबा शेख (स्वर्गवासी)

५. सोंगीभारुड सादरकर्ते निरंजन भाकरे

६. लोकशाहीर विठ्ठल उमप (स्वर्गवासी)

७. जुन्या महिला शाहीर अंबुदेवी बुधगांवकर (स्वर्गवासी)

८. सप्तखंजिरी वादक सत्यपाल महाराज

९. शाहीर बापूराव विभूते (स्वर्गवासी)

१०. पखवाजवादक उद्धवबापू शिंदे (आपेगावकर)

११. साईनाथ कांबळे

१२. कविता कांबळे

१३. दत्तू कदम

१४. भारत कदम

१५. गुलाब कदम

१६. कल्पना माळी

१७. सखुबाई माळी

१८. दिलदार शेख

१९. सुमतीनाथ भाकरे

२०. नंदेश उमप

२१. कविता उमप

२२. विजया बुधगावकर

२३. धर्मपाल चिंचोलीकर

२४. आदिनाथ विभूते

२५. प्रसाद विभूते

२६. सर्जेराव

२७. बर्ट कॉर्नलीस

२८. ज्युडी रस्ट

२९. डॉ. नरेंद्र बोरलेपवार

३०. डॉ. प्रकाश खांडगे

प्रकरण ४:

३४. डॉ. प्रदीप आगलावे, ' संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', नागपूर, विद्या प्रकाशन, पृ. १९५/१९६.

३५. डॉ. प्रदीप आगलावे, ' संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', नागपूर, विद्या प्रकाशन, पृ. २३७.

३६. डॉ. प्रदीप आगलावे, ' संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', नागपूर, विद्या प्रकाशन, पृ. २६२. या संशोधन विषयाच्या संदर्भात गावातील आणि शहरी भागातील काही तज्ज्ञ मान्यवरांच्या मुलाखती ध्वनीमुद्रणाच्या माध्यमातून घेतल्या. त्यांची नावे खालीलप्रमाणे.

१. प्रशांत नाकवे

२. नितीन दादरावाला

३. प्रदीप बांदेकर

४. राजू राऊत

५. संदेश भंडारे

६. गणेश चंदनशिवे

७. श्रीराम वेर्णेकर

८. मुकेश पारपियानी

९. तेजस्विनी चव्हाण.

खालील काही प्रबंध प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासले.

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

संशोधक : नरेंद्र वसंतराव बोर्लेपवार, एम. एफ. ए. (अप्लाईडआर्ट्स)

Digital Camera as a Revolutionary Tool in Editorial Photography. 2013

संशोधक मार्गदर्शक : प्राध्यापक श्री. अरुण भापकर.

२. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

संशोधक : विश्वास पोपट मोरे

लोककला, ललितकला एक प्रबोधनाचे माध्यम : ऐतिहासिक अभ्यास. मार्च २०१८

संशोधक मार्गदर्शक : डॉ.रामचंद्र देखणे.

३. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

शाहिरी वाङ्मय (पोवाडे, लावण्या, तमाशा)

संशोधक: गणेश संपतराव चंदनशिवे

लोकरंगभूमीवरील तमाशाच्या सादरीकरणाचे बदलते स्वरूप: एक चिकित्सक

अभ्यास. ऑक्टोबर, २०११

संशोधक मार्गदर्शक : डॉ. पंडित आनंदराव शिंदे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

संशोधक: कृष्णा किरवले,

महाराष्ट्रातील दलित शाहीर आणि त्यांची शाहिरी १९८७

संशोधक मार्गदर्शक : डॉ. गंगाधर पानतावणे.

५. संशोधक: नवनाथ दत्तोबा चौधरी,

शाहीर विश्वासराव फाटे : व्यक्ती आणि वाङ्मय. २००२

संशोधक मार्गदर्शक : डॉ. सुदाम जाधव.

६. संशोधक: चंद्रकांत बाबूराव व्यवहारे,

मराठी शाहिरी वाङ्मयातील समाजदर्शन १९८६

संशोधक मार्गदर्शक : डॉ. यु. म. पठाण.

७. मुंबई विद्यापीठ

संशोधक: भगवान सोनजी सावंत

मराठीतील शाहिरी कविता (कालखंड १९२० ते १९८०):

पोवाड्यातील सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप. १९९२.

संशोधक मार्गदर्शक : डॉ. माधव राजाराम पोतदार.

८. भारूड, प्रहसने, पिराण्या, गौळणी

संशोधक: सुधाकर गोपाळ चांदजकर,

मराठी संतांची भारुडे : एक विवेचक अभ्यास. १९७४

संशोधक मार्गदर्शक : डॉ. यु. म. पठाण.

९. मुंबई विद्यापीठ

संशोधक: शीला भास्कर टेंबे,

एकनाथी भारूड : एक चिकित्सक अभ्यास १९९१.

संशोधक मार्गदर्शक : डॉ. सदाशिव बाळकृष्ण कऱ्हाडे.

खालील काही चित्रपट, माहितीपट, लघुपटप्रत्यक्ष पाहून प्रस्तुत संशोधन पूर्ण केले.

१. 'द पॉवर ऑफ फोटोग्राफी टू विटनेस'

२. 'द पॉवर ऑफ फोटोग्राफी मी टू सेलिब्रेट'

३. 'इट व्हॉट कॅन आय डू' ए फोटो जर्नालिस्ट जर्नी थ्रू हॉरर अँड जोय

४. 'द मून शॉट'

५. 'हाऊ फोटो जर्नालिस्ट कॅप्चर द मोमेंट'

६. लिमसे आधार यु लेन्स फ्रन्टलाइन

७. 'ग्लोबल जर्नालिस्ट: कॅरल गझी पुलित्झर विनिंग फोटो जर्नालिस्ट '

८. नॅशनल जिओग्राफीने तयार केलेल्या एकूण बारा छायाचित्रकारांवरील छायाचित्रणासंदर्भात १२ माहितीपट पाहून अभ्यासले.

९. याव्यतिरिक्त २० 'फँटॅस्टिक फोटोग्राफी डॉक्युमेंटरी' म्हणून देखील माहितीपट नॅशनल जिओग्राफीने बनवलेले आहेत. ते देखील अभ्यासले.

१०. तसेच आनंद पटवर्धन यांचे माहितीपट देखील पाहिले. ते 'टू द चिल्ड्रन ऑफ स्वाट फ्रॉम द चिल्ड्रन ऑफ मंडाला', 'हमारा शहर बॉम्बे', 'उन मित्रों की याद प्यारी', 'राम के नाम', 'पिता पुत्र और धर्मयुद्ध', 'जंग और अमन', 'वुई आर नॉट युवर मंकी' व 'जयभीम कॉम्रेड असे आहेत.

११. तसेच काही खूपच उपयुक्त व माहिती प्रधान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे चित्रपट पाहिले. ते राजा हरिश्चंद्र, संत तुकाराम, कुंकू, माणूस, श्वास, पथेर पांचाली, अपराजितो, अपूर संसार, माया बाजार, मधुमती, मुघल–ए–आझम, चारुलता, भुवन शोम, संस्कार, अंकुर, गर्म हवा, प्यासा, कागज के फूल, साहिब बीवी और गुलाम, नवरंग, दो आँखें बारह हाथ.

१२. सिटीझन केन, ब्रीफ एन्काऊंटर, रोम ओपन सिटी, कॅमेरा बफ, बायसिकल थीव्हज, राशोमान, सेव्हन सामुराई, 'हिरोशिमा, मॉन अमॉर', ब्रेथलेस, शिंडलर्स लिस्ट, नायकन, सिनेमा पॅराडिसो, चिल्ड्रन ऑफ हेवन, लाईफ इज ब्युटीफुल, कॅरेक्टर, पोस्टमेन इन द माउंटन्स, ऑल अबाउट माय मदर, द कप, कंदाहार, ओसामा, ब्यूटीफुल बॉक्सर, खामोश पानी, बफेलो बॉय, इत्यादी चित्रपट.

VIII परिशिष्ट

परिशिष्ट

संशोधनासाठी १५ प्रश्नांची प्रश्नावली बनवण्यात आली. त्यामध्ये १ ते ९ प्रश्न हे बंदिस्त स्वरूपाचे होते, तर उरलेले ६ प्रश्न हे मुक्त प्रश्न होते. अशी ही मिश्रित प्रश्नावली महाराष्ट्रातील ६०० लोकांकडे पाठवण्यात आली.

संशोधनासंबंधित प्रश्नावली दिलेल्या ६०० लोकांपैकी प्रकाशचित्रणातील आणि लोककलेतील तज्ज्ञ २२ व्यक्तींना देखील प्रश्नावली देण्यात आली होती. या तज्ज्ञ व्यक्ती वृत्तपत्राशी, लोककलेशी, प्रकाशचित्रणाशी, कलेशी, कायद्याशी, समाजसेवेशी संबंधित आहेत. तसेच ६०० लोकांमधून निवडक ३५ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची प्रस्तुत संशोधनाबद्दलची मते संशोधनामध्ये समाविष्ट केली आहेत.

बंदिस्त स्वरूपाचे प्रश्न:

१) फोटो हा अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत सर्वांना कळतो का?

२) शब्दरचनेपेक्षा प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे अधिक प्रभावी माध्यम आहे का?

३) फोटो हे संदेश पोहचविण्याचे कार्य करतात का?

४) फोटोमुळे घटनेची सत्यता लगेच अनुभवता येते का?

५) सत्य घटनांचा आढावा घेण्यासाठी प्रकाशचित्रण (फोटोग्राफी) हे प्रभावी माध्यम आहे का?

६) लोककलावंतांचे जीवन फोटोंमधून अधिक प्रभावीपणे मांडता येऊ शकते का?

७) लोककला लोप पावत चालल्या आहेत का?

८) काळानुरूप लोप पावणाऱ्या लोककला, प्रकाशचित्रणाद्वारे (फोटोग्राफीद्वारे) पुढील पिढीसाठी जतन करणे शक्य आहे का?

९) लोककला या समाज प्रबोधन करतात का?

दीर्घोत्तरी प्रश्न:

१०) एखादा फोटो पाहून तुमच्या मनावर काही परिणाम होतो का? काय परिणाम होतो?

११) शब्दांपेक्षा फोटो हा अधिक प्रभावी कसा आहे?

१२) लोककला ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी काय करायला हवे?

१३) लोककलांचे जतन कसे होऊ शकते?

१४) या लोककला जगवण्यासाठी सामाजिक माध्यमांची (सोशल मीडियाची) काही मदत होऊ शकते का? कशी होऊ शकते?

१५) सत्य घटनांचा आढावा प्रकाशचित्रणातून (फोटोग्राफीतून) कसा घेता येईल?

सर्वेक्षणातील महिला–पुरुष

लिंग	संख्या
महिला	१२०
पुरुष	४८०